# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. २८/०६/२०१६

आज मंगळवार दि. २८/०६/२०१६ (दि. ०७/०५/२०१६ रोजीची स्थगित सभा) रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी १०.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. २८/०४/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | मुन्ना सिंग | सभागृह नेता |
| ५) | लियाकत ग. शेख | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १३) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १४) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १५) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १६) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १७) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १८) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १९) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| २०) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २१) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २२) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २३) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २४) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २५) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २६) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २७) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३०) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३१) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३३) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३५) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३६) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४१) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४२) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४५) | संदिप मोहन पाटील | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४७) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४८) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५०) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५१) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५२) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५३) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५४) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५५) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५६) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५७) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५८) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५९) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६१) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ६२) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६५) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६९) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७०) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| ७४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७६) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८१) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८३) | प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| ८४) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८५) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८६) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८७) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८८) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८९) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ९०) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

गैरहजर सदस्य –

| | | |
|---|---|---|
| १) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ५) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ७) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज – निरंक

मा. महापौर :-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

नगरसचिव :-

दि. ०७/०५/२०१६ रोजी मा. महासभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी ठाणे जिल्हा विधान परिषदेची द्विवार्षिक निवडणूक जाहिर झाल्याने ठाणे जिल्ह्यात आचारसंहिता लागु झाली होती. करिता दि. ०७/०५/२०१६ रोजीची मा. महासभा घेता आली नव्हती. सदर सभेच्या विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. १ ते २५ तसेच पुरक घोषणेवरील प्रकरण क्र. २६ ते ३० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार, दिनांक २८/०६/२०१६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. १० वाजून ४० मिनिट झालेली आहेत.

प्रशांत केळुसकर :-

मा. महापौर मॅडम अभिनंदनाचा ठराव आहे. सन २०१४ साली विधानसभेची निवडणुक होवून महाराष्ट्र राज्यात भाजपा, शिवसेना, रिपई युतीची सत्ता स्थापन झाली व महाराष्ट्राचे तरुण तडफदार मा. मुख्यमंत्री म्हणुन मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झाली. त्यांनी त्यांच्या पहिल्या ३० दिवसांमध्ये मिरा भाईंदर शहरासाठी ७५ एम.एल.डी. पाणीपुरवठा मंजुर करुन दिला व त्यानंतर मिरा भाईंदर शहरावर त्यांचे अतिशय प्रेम आहे यांचे उदाहरण म्हणजे त्यांनी १८० कोटी अनुदान विकास कामासाठी मंजुर करुन दिले. सन २०१५ साली राज्यात सर्वात मोठा दुष्काळ पडला असून लोकांना पाणी नाही अशा परिस्थीतीत मिरा भाईंदरवर विशेष लक्ष म्हणुन मिरा भाईंदरला मात्र पाणी कपातीपासुन दुर ठेवले नागरीकांना त्याची झळ पोहचू दिली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या महत्वाच्या, ज्वलंत, प्रलंबित प्रश्नांबाबत मा.श्री.नरेंद्र एल. मेहता - आमदार, मा. श्रीम. गीता भरत जैन - महापौर यांनी वारंवार अर्ज केले असता त्यावर मा. मुख्यमंत्री - श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी अधिवेशन चालू असताना विधीमंडळाची बैठक बोलविली सदर बैठकीस मा. श्री.नरेंद्र एल. मेहता - आमदार, मा. श्रीम. गीता भरत जैन - महापौर, मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक, मा. उपमहापौर- श्री. प्रविण पाटील, जिल्हाध्यक्ष, श्री. हेमंत म्हात्रे, गटनेता श्री. शरद पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच आदरणीय मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी खाली नमुद केलेल्या विकासकामांना मंजुरी दिली आहे.

१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मिरा भाईंदर नाले बांधकाम (टप्पा-१) या प्रकल्पास सुधारीत शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेला रु.३५.७४ कोटी इतका निधी वितरण करण्यासाठी नगरविकास विभागास आदेश दिले.

२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नाले बांधकाम (टप्पा-२) अंतर्गत रु.१०४.६० कोटी रक्कमेच्या प्रकल्पास ८० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

३) बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत वाणिज्य वापरातून निधी उभारणेसाठी २५ ऐवजी ५० चटई क्षेत्र, वाणिज्य वापरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदल प्रस्तावास शासनास पाठवून मान्यता देण्याबाबतचे आश्वासन देण्यात आले.

४) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास व सुधारित सेवा प्रवेश नियमांना १५ दिवसांत मान्यता देण्यात यावी असे आदेश करण्यात आले.

५) उत्तन, भाईंदर पूर्व, नवघर, कनकीया येथे जेटी बांधण्यासाठी एमएमआरडीएस प्रत्यक्ष पाहणी करुन प्रस्ताव सादर करण्या संदर्भात आदेश देण्यात आले.

६) जैव विविधता प्रकल्प (Bio Diversity) पार्क विकसित करण्याचा प्रकल्प सादर करण्यास संबंधीतास आदेशित करण्यात आले.

७) धोकादायक इमारतींना वाढीव चटई क्षेत्र देण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे व क्लस्टर योजनेस मंजुरी देण्यासाठी आश्वासित करण्यात आले.

८) मिरा भाईंदर शहरात भेडसावत असलेली पाण्याची ज्वलंत समस्या सोडविण्यासाठी एमएमआरडीए तर्फे सुर्या धरणाच्या योजनेसाठी मंजुरी देवून पुढील निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

९) अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरिता अतिरीक्त २० पोलिस (पोलिस बळ) पुरविण्यात यावेत तसेच पोलिस आयुक्तालय सुरु करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यास देखील डी.जी. यांना आदेशित करण्यात आले.

१०) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या जागेतील झोपडपट्टी पुनर्वसन एसएसआरए प्रकल्प लवकरच सुरु करावा असे संबंधीत विभागास आदेश देण्यात आले.

सदर मिरा भाईंदर शहरातील ज्वलंत समस्या व प्रलंबित प्रस्ताव मार्गी लागण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांनी फार मोठे सहकार्य केले आहे याबाबत आपले महाराष्ट्र राज्याचेमुख्यमंत्री, मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा अभिनंदन ठराव मांडत आहे.

डिम्पल मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

नुकत्याच झालेल्या विधान परिषद - २०१६ मध्ये शिवसेना - भाजपा – रिपाईचे अधिकृत उमेदवार सन्मा. श्री. रविंद्र फाटक साहेब हे बहुमताने विजयी झाले. त्याबद्दल मी महायुतीच्यावतीने त्यांचे अभिनंदन करत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

लियाकत शेख :-

मा. महापौर मॅडम मी तुम्हाला १३ जुनला एक पत्र दिले होते. मला वाटते सभा सुरू होण्याआधी त्यावर चर्चा झाली तर बरे होईल .

भगवती शर्मा :-

मॅडम सन्मा सदस्यने अभिनंदन का एक ठराव किया है उन्होंने इस अभिंनंदन ठराव में जो जो मुद्दे लिखे है ठिक है जो भी मुद्दे होगे उसके अंदर में उन्होने जो ७५ एम एल डी के लिए कहॉ है की मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहबने उसको मंजूर किया है। उसको मैं सुधार करना चाहता हूँ २०१४ के अंदर में तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हान उनके नेतृत्व कें अंदर में मा. एम आय डी सी के मंत्री थे राणे साहब और अजितदादा पवार और सुनिल तटकरे साहब उस समय उन्होने यह ७५ एम एल डी पाणी को मंजूर किया था उसके बाद के अंदर में उसको पेन्डीग में बाद में मंजूरी मिली २०१४ के अंदर में तो उन्होने वहॉपे मुझे ऐसा लगता है कही गलतीसे भुलसे उन्होने उनका अभिनंदन किया है इनका अभिनंदन ठराव होना चाहिए तो उनका हो रहा है।

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम थोडी सुधारणा प्रकाश मेहताजी है मंत्री होते उद्योगमंत्री आणि तरी त्यांचा तेव्हा लाखे साहेब होते पाणी विभागाचे अधिकारी असतील त्यांनी तिकडे बैठक लावून सी ओ ला बोलवून तिकडे ते आदेशीत केले आणि त्यावेळी त्या पाणीला मंजूरी झाली. प्रस्ताव किंवा स्वप्न या शहरामध्ये अनेक वर्षापासून बघितले गेले मंजूरी देण्याचे काम या सरकारने केलेले आहे.

सुहास रकवी :-

पाणी पुरवठा विभाग अधिका-याना बोलवून घ्या आणि विचारा.

भगवती शर्मा :-

आपने ५ जानेवारी २०१६ को मा. सरकार से एक प्रश्न किया था उसका उत्तर बता देता हूँ मै आपने उस प्रश्न के अंदर में लिखा था की महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळाकडून बारवी धरणाचे ऊंची वाढविण्याचे कामे जवळपास पुर्ण झाले असून त्यासाठी अतिरिक्त महानगरपालिकेसाठी ७५ एम.एल.डी. इतके पाणी मिरा भाईदर महानगरपालिका देणेबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने संमती दर्शवली असून त्यानुसार दि. २४/१०/२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयानी भुमीपूजन केले असून मिरा भाईंदरच्या या योजनेचे भुमिपुजन केले असून त्या अनुषंगाने निर्णय निर्गमित करण्याचे वृत्ती मा. आमदार नरेंद्र मेहता यांनी केले उत्तर बघा तुम्ही काय लिहीले महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने ७५ एम.एल.डी. पाणी मिरा भाईदर महानगरपालिकेला द्यायची तयारी दर्शवली आहे व त्या नुसार त्यांनी पूर्वी याबाबत झालेल्या बैठकीत इतिवृत्तांत निर्गमित केले असल्यामुळे वेगळयाने शासन निर्णयाची आवश्यकता नाही असे ठरले. आपको जबाब दिया है लगता है आप भुल गये है।

नरेंद्र मेहता :-

आपल्या माहितीसाठी सांगतो हे २०१६ चे आहे ना पत्र आम्ही सांगितले पहिल्या ३० दिवसात कारण त्यानंतर उद्योगमंत्री सुभाष देसाई साहेब आले प्रकाश मंत्री महोदय असताना लाखे साहेब कमिशनर असताना त्यावेळी तो निर्णय झाला आहे तो वेगळा विषय आहे त्यानंतर आम्ही उद्योग कडून अजून पाणी मागितले, अजून वेगळ्या ॲगलने कारण शहराची परिस्थिती बघता वांरवार म्हणजे आता शेवटी सुर्या धरणातून पाणी चालू करावे हे ही आम्ही अभिनंदन ठरावामध्ये म्हटले आहे या जून एन्ड किंवा जुलैमध्ये ते मान्यता होऊन कामाला सुरूवात होणार आहे.

जुबेर इनामदार :-

पाणी पुरवठा अधिकारी ते आहेत त्यांना बोलवा त्यांना सांगा एम.आय.डी.सी ची मिनिटस आहेत त्यांना सांगा वाचायला म्हणजे स्पष्ट होऊन जाईल ना चित्र कोणी काम केले आणि कुणी श्रेय लाटायच हे कुठे शोभत तरी का? बोलताना तुम्ही विषय घेतला म्हणून आम्हाला बोलायला संधी मिळाली घेतला नसता तर आम्ही बोललोच नसतो.

नरेंद्र मेहता :-

आम्ही अभिनंदनाचा ठराव केलेला आहे.

जुबेर इनामदार :-

आम्ही निषेध करतो ना अभिनंदनाचा जिथे अभिनंदन करायचे तिथेच करायच जिथे श्रेय लोटायच तिथेच लाटा जे केले नाही त्याच्यावर कशाला बसता जाऊन १०० एम.एल.डी पाण्याची मागणी केली होती त्यातून ७५ एम.एल.डी पाणी मंजूर केले. वाकोडे साहेब जरा माहिती द्या.

मा. आयुक्त :-

खुलासा करत आहेत ते बसा आपण.

सुरेश वाकोडे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलता १०० एम.एल.डी.ची मागणी आपण अगोदर पासून शासनाकडे करत होतो.पण लाखे साहेब असताना याबाबत एम.आय.डी.सी सोबत मिटींग झाली आणि त्या मिटिंग मध्ये त्यांनी ७५ एम.एल.डी पाण्याची मागणी मंजूर केली आहे. मंजुरीची पत्र आपल्याला लाखे साहेब कमिशनर असताना त्या काळामध्ये मिळालेले आहे ते असतानाच आपल्या दोन मिटींग झाल्या होत्या.

भगवती शर्मा :-

त्यावेळी महापौर कॅटलीन परेरा होती आणि त्यावेळी मंत्री महोदय चिफ मिनिस्टर पृथ्वीराज चव्हान साहेब होते.

सुरेश वाकोडे :-

प्रकाश मेहता साहेब मिनिस्टर होते त्यावेळी त्यांनी मंजूरी दिली होती.

भगवती शर्मा :-

मी प्रोसेडिंग दाखवू शकतो तुम्हाला जेव्हा लाखे् साहेब त्यांनी याच व्यासपीठावरून त्यांनी सांगितले होते आज आम्हाला मंजूरी मिळाली आहे.

नरेंद्र मेहता :-

आता खुलासा केला अधिकाऱ्यांनी.............

सुहास रकवी :-

वाकोडेजी उद्योगमंत्री नारायण राणे जी बरोबर झालेल्या बैठकीचे मिनिटस घेऊन या ना.

मा. महापौर :-

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करा.

लियाकत शेख :-

मॅडम मी तुम्हाला १३ तारखेला एक पत्र दिले होते.

मा. महापौर :-

प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेऊया ना तुमचा विषय

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम माझा एक हरकतीचा मुद्दा आहे मला माझा विषय करू द्या नंतर तुम्ही मला प्रश्न उत्तर तास झाल्यानंतर सुध्दा संधी दिली चर्चा करायला तरी चालेल.

अभिनंदन ठराव क्र. ०१ :-

सन २०१४ साली विधानसभेची निवडणुक होवून महाराष्ट्र राज्यात भाजपा, शिवसेना, रिपई युतीची सत्ता स्थापन झाली व महाराष्ट्राचे तरुण तडफदार मा. मुख्यमंत्री म्हणुन मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झाली. त्यांनी त्यांच्या पहिल्या ३० दिवसांमध्ये मिरा भाईंदर शहरासाठी ७५ एम.एल.डी. पाणीपुरवठा मंजुर करुन दिला व त्यानंतर मिरा भाईंदर शहरावर त्यांचे अतिशय प्रेम आहे यांचे उदाहरण म्हणजे त्यांनी १८० कोटी अनुदान विकास कामासाठी मंजुर करुन दिले. सन २०१५ साली राज्यात सर्वात मोठा दुष्काळ पडला असून लोकांना पाणी नाही अशा परिस्थीतीत मिरा भाईंदरवर विशेष लक्ष म्हणुन मिरा भाईंदरला मात्र पाणी कपातीपासुन दुर ठेवले नागरीकांना त्याची झळ पोहचू दिली नाही.

मिरा भाईंदर शहराच्या महत्वाच्या, ज्वलंत, प्रलंबित प्रश्नांबाबत मा.श्री.नरेंद्र एल. मेहता - आमदार, मा. श्रीम. गीता भरत जैन - महापौर यांनी वारंवार अर्ज केले असता त्यावर मा. मुख्यमंत्री - श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी अधिवेशन चालू असताना विधीमंडळाची बैठक बोलविली सदर बैठकीस मा. श्री.नरेंद्र एल. मेहता - आमदार, मा. श्रीम. गीता भरत जैन - महापौर, मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक, मा. उपमहापौर- श्री. प्रविण पाटील, जिल्हाध्यक्ष, श्री. हेमंत म्हात्रे, गटनेता श्री. शरद पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच आदरणीय मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी खाली नमुद केलेल्या विकासकामांना मंजुरी दिली आहे.

१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मिरा भाईंदर नाले बांधकाम (टप्पा-१) या प्रकल्पास सुधारीत शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेला रु.३५.७४ कोटी इतका निधी वितरण करण्यासाठी नगरविकास विभागास आदेश दिले.

२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नाले बांधकाम (टप्पा-२) अंतर्गत रु.१०४.६० कोटी रक्कमेच्या प्रकल्पास ८० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

३) बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत वाणिज्य वापरातून निधी उभारणेसाठी २५ ऐवजी ५० चटई क्षेत्र, वाणिज्य वापरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदल प्रस्तावास शासनास पाठवून मान्यता देण्याबाबतचे आश्वासन देण्यात आले.

४) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास व सुधारित सेवा प्रवेश नियमांना १५ दिवसांत मान्यता देण्यात यावी असे आदेश करण्यात आले.

५) उत्तन, भाईंदर पूर्व, नवघर, कनकीया येथे जेटी बांधण्यासाठी एमएमआरडीएस प्रत्यक्ष पाहणी करुन प्रस्ताव सादर करण्या संदर्भात आदेश देण्यात आले.

६) जैव विविधता प्रकल्प (Bio Diversity) पार्क विकसित करण्याचा प्रकल्प सादर करण्यास संबंधीतास आदेशित करण्यात आले.

७) धोकादायक इमारतींना वाढीव चटई क्षेत्र देण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे व क्लस्टर योजनेस मंजुरी देण्यासाठी आश्वासित करण्यात आले.

८) मिरा भाईंदर शहरात भेडसावत असलेली पाण्याची ज्वलंत समस्या सोडविण्यासाठी एमएमआरडीए तर्फे सुर्या धरणाच्या योजनेसाठी मंजुरी देवून पुढील निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

९) अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरिता अतिरीक्त २० पोलिस (पोलिस बळ) पुरविण्यात यावेत तसेच पोलिस आयुक्तालय सुरु करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यास देखील डी.जी. यांना आदेशित करण्यात आले.

१०) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या जागेतील झोपडपट्टी पुनर्वसन एसएसआरए प्रकल्प लवकरच सुरु करावा असे संबंधीत विभागास आदेश देण्यात आले.

सदर मिरा भाईंदर शहरातील ज्वलंत समस्या व प्रलंबित प्रस्ताव मार्गी लागण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांनी फार मोठे सहकार्य केले आहे याबाबत आपले महाराष्ट्र राज्याचेमुख्यमंत्री, मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा अभिनंदन ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्रीम. डिम्पल मेहता

सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. निलम ढवण ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडले.

नुकत्याच झालेल्या विधान परिषद - २०१६ मध्ये शिवसेना - भाजपा – रिपाईचे अधिकृत उमेदवार सन्मा. श्री. रविंद्र फाटक साहेब हे बहुमताने विजयी झाले. त्याबद्दल मी महायुतीच्यावतीने त्यांचे अभिनंदन करत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

आजच्या सभेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूचित प्रकरण ''ड'' मधील दोन के अन्वये प्रस्ताव आलेला आहे. मिरा भाईदर महानगरपालिका विकास योजना रस्ते रुदींकरण, नविन रस्ते आरक्षणामध्ये बाधित होणा-या बाधिंतांना मोबदला देण्याबाबत हा प्रस्ताव आलेला आहे. प्रस्ताव घ्यायचा असेल तर सभागृहाची मंजुरी लागेल.

जुबेर इनामदार :-

विषय वाचून दाखवा.

नगरसचिव :-

विषयाचे वाचन केले.

जुबेर इनामदार :-

विषय चर्चेसाठी हाच विषय होता.

लियाकत शेख :-

मॅडम चर्चेसाठी हाच विषय होता की फक्त धोरण निश्चित करायचा आहे आपल्याला

जुबेर इनामदार :-

हा विषय चर्चेनंतर घेतला जाईल.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम सर्वांना पत्राची एक कॉपी द्या आणि तसेच प्रश्न तास लक्षवेधी प्रोसेडिंग झाल्यानंतर त्यावर चर्चा.

जुबेर इनामदार :-

एक तर हा नियमबाह्य तुम्ही विषय आणला आहे. कायद्यात याच्या प्रोव्हिजन नाही. मोबदला तुम्ही तोडल्यानंतर देणार.

भगवती शर्मा :-

सचिव साहेब ह्या मिटींगमध्ये असे विषय घेता येतात का? ही कुठली मिटींग आहे

नगरसचिव :-

आपल्याला आचार संहिता लागु झाल्याने मिटींग घेता आली नव्हती. तहकुब केलेली नव्हती तिला स्थगित म्हणतात. स्थगित प्रमाणे झाली होती.

भगवती शर्मा :-

स्थगित मिटींगमध्ये दुसरा कुठलाही विषय घेता येतात का?

नगरसचिव :-

तहकुब मिटींगमध्ये दुसरा कुठलाही नविन प्रस्ताव घेता येत नाही पण ही स्थगित आहे.

भगवती शर्मा :-

स्थगित मध्ये घेता येतात ना.

नगरसचिव :-

हो.

जुबेर इनामदार :-

मग या विषयावर आधी चर्चा करुया. हाच विषय आहे आमचा.

मा महापौर :-

प्रश्नोत्तर तास संपल्यावर करा.

जुबेर इनामदार :-

चर्चा आधी होऊ दया प्रश्नोत्तर तास नंतर घ्या.

मा. महापौर :-

जुबेर इनामदार आप बैठ जाइये आप सबको यह कॉपी मिल रही है तब तक हम प्रश्न तास खतम कर लेते है। चर्चा इस विषय पे जरूर होगी।

जुबेर इनामदार :-

ठिक है।

नगरसचिव :-

प्रश्न ३३ मिरादेवी यादव यांचा प्रश्न आहे. १० वाजून ५० मिनिट झालेली आहे.

मिरादेवी यादव :-

कमिशनर साहेब आप ०२/०५/२०१६ को आप गये थे साथमें ठेकेदार आये थे ८ दिन से १५ दिन का टाईम आप दिये थे। साहेब एक पोकलन लगाके आप उधर हप्ता में एक दिन पोकलन आयेगा एक घंटा चालू करके खोदके चला जाएगा इस तरीकेसे आप १८ महिने मे उनको बनाके देंगे क्या? साहेब श्रीजी का काम चल रहा है अच्छा चल रहा है। उनका में सराहना करूंगी।

मा. महापौर :-

मिरादेवीजी आपका प्रश्न अभी फॉलोअप पे है। तो आप अगर  फॉलोअप का कुछ पुछना चाहे विषयका तो आप पुछिए।

मिरादेवी यादव :-

पुछा ना यह दिये है क्या बरोबर है जो साईज पुछे है बराबर है खर्च बराबर है क्या पुछ तो रही हूॅं।

दिपक खांबित :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, दिलेले उत्तर बरोबर आहे. याच्या व्यतिरिक्त आपण पोलिस विभागाला १४ साऊड मिटर दिलेत जो आन्सर दिया वो बरोबर है।

मिरादेवी यादव :-

बराबर है? यह पोलिस वाहतुक को दिया है। वो बरोबर रहेगा।

दिपक खांबित :-

नही वो शांतता क्षेत्र में कितना आवाज होता है उसको गिनने का साऊन्ड मिटर आता है। वो डिसेबल गिना जाता है। तो गव्हरमेंन्ट ने अपने को एक आदेश दिया था की पुलिस लोग को वो साऊन्ड मिटर जो नापने का रहता है। व्हॉइस वो दिया जाए तो हमारी तरफ से १४ साऊन्ड मिटर डी.वाय. एस. पी. को हमने दिया है।  जिनसे वो माप सकते है।

मिरादेवी यादव :-

बादमें फेरबदल नही होगा ना?

दिपक खांबित :-

नही।

मिरादेवी यादव :-

फेरीवाला का क्षेत्र मे है क्या इसमे.

दिपक खांबित :-

फेरीवाला नही मॅडम शांतता क्षेत्र

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम खांबित साहेब म्हणतात की आपण १४ साऊन्ड मिटर त्यांना दिले आहेत याच काहीतरी तुम्ही रिपोर्टीग घेतले का? कोणत्या एरियामध्ये किती शांतता क्षेत्राचा भंग होत आहे किती डिसीबल आवाज येत आहे. त्यांनी आपल्याला काही रिपोर्टीग केले आहे का?

दिपक खांबित :-

काका आता चार दिवसापूर्वी तर हे दिले आता पोलिसांनी

रोहिदास पाटील :-

आता दिले याचे प्रश्न तर २०१३ चा आहे ना.

दिपक खांबित :-

हो. पण आपल काम काय होत की शांतता क्षेत्र घोषित करायच महासभेने जिकडे शाळा आहेत हॉस्पीटल आहेत आवश्यकता आहेत तिकडे शांतता क्षेत्र घोषित केले महासभेच्या मंजुरीने आपण पेपर ला ॲड वैगेरे दिली तिकडे फलक लावलेत सगळे २०१३ मध्येच आता फक्त त्याची अंमलबजावणी करायची आहे.

रोहिदास पाटील :-

ऐकून घ्या. माझी तुमच्याकडे एक सोडून अनुक पत्रे आहेत स्टेशन समोर शांतता फलक लावा तेथे नो हॉर्न असे बोर्ड लावा आजपर्यत तुम्ही एक ही बोर्ड तेथे लावलेला नाही.

दिपक खांबित :-

महासभेने जे शांतता क्षेत्र म्हणून.........................

रोहिदास पाटील :-

जिथे ट्राफिक आहे जिथे शांतता भंग होते जिथे लोक येतात तिथे माझ्यासारख्या साधु संत एकटा बसला आहे तिकडे बोर्ड लावणार का तुम्ही?

दिपक खांबित :-

आपल्याला ते नविन पुन्हा विषय आणुन करावे लागेल.

रोहिदास पाटील :-

खांबित साहेब आपण हे करतो लोकांसाठी करतो तुमच ते परिक्षण निरिक्षण असल पाहिजे की ज्या ठिकाणी लावायच तर गर्दीचे ठिकाण आहेत. जिथे वर्दळ आहे जिथे ट्राफिक जाम होते अशा ठिकाणी ते शांतता क्षेत्राचे बोर्ड लावावे लागतात की जिथे शांतता नाही तिथे लावणार .

दिपक खांबित :-

शाळा आणि हॉस्पीटल या परिक्षेत्रामध्ये

रोहिदास पाटील :-

शाळा हॉस्पीटल हा एक विषय आहेच ज्या ठिकाणी वर्दळ आहे तो ही ठिकाण आहे.

दिपक खांबित :-

तस नव्हत जे सुप्रिम कोर्टमध्ये.....................

रोहिदास पाटील :-

तुम्ही वाचा हो वाचून सांगा तुम्ही केले नसेल तर करतो असे सांगा.

दिपक खांबित :-

तपासून घेऊन आवश्यक असेल तर आपण प्रस्ताव आणू त्यावर

मिरादेवी यादव :-

कमिशनर साहब जवाब नही दिया।

दिपक खांबित :-

मॅडम उनका जो काम है ना रमेश का जो बोल रहे है ना उनका काम शुरू ही है।

मिरादेवी यादव :-

अरे साहेब शुरू खाली देखते रहेंगे खडे खडे हप्ता में एक दिन एक पोकलन लाके खडा रहेगा देखते रहो पोकलन आया है देखते रहो।

दिपक खांबित :-

कल ही उसके साथ मिटींग साहब के साथ हुई की उसको आर सी सी ड्रॉईग जो है वो टेस्टींग करके दिये गये है। कल ही उसको बुलाया था।

मिरादेवी यादव :-

साहब मुझे तो इतनी शरम लग रही है की मै ही आत्महत्या कर लू।

दिपक खांबित :-

कल साहबने खुद उनको बुलाया था। साहब के पास ही मिटींग हुई।

मिरादेवी यादव :-

यह जवाब सुनते सुनते हमको ५ से ६ साल बीत गया।

अशरफ शेख :-

मा. महापौर मॅडम सत्तापक्ष आत्महत्या करने की बात कर रहा है।

मा. महापौर :-

हम ऐसा कुछ होने नही देंगे। सचिव साहेब पुढच प्रश्न

नगरसचिव :-

डॉ. नयना वसाणी यांचा प्रश्न आहे.

नयना वसाणी :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते मॅडम माझा प्रश्न हा २०१३ सालीचा होता आणि आत्ता २०१६ झालेला आहे. आणि ते पाणी मिटर कार्यशाळा या बद्दल होता. पाणी पुरवठा विभागाने मला त्याची पाणी मिटर कार्यशाळाचे वर्क ऑर्डर काढलेली आहे त्याची कॉपी दिलेली आहे. माझ त्यावर समाधान झालेले आहे. फक्त एवढच की हे जे आहे लवकरात लवकर करून घ्यावे एवढी मी या महासभेच्या निमित्ताने विनंती करते आणि माझा प्रश्न मागे घेते माझ समाधान झाले आहे म्हणून मी यावर चर्चा करत नाही.

नगरसचिव :-

डॉ. राजेंद्र जैन यांचा प्रश्न आहे. ते उपस्थित नाही.

मिरादेवी यादव :-

अभी तो अच्छे दिन की एक साल से शुरूवात हुआ इसके पेहले अच्छे दिन था वो भी देखते देखते मुझे चार साल बिता था।

नगरसचिव :-

श्रीम. दिप्ती भट यांचा प्रश्न आहे.

दिप्ती भट :-

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते. पुढच्या महासभेत टाईम भेटेल मला कारण याचे उत्तर पण बरोबर नाही आणि मी तयारी पण केली नाही. कारण माझ्या अगोदर तीन जण होते म्हणून

मा. महापौर :-

हा दिप्ती मॅडम पण तुम्हाला थोडी जर प्राथमिक चर्चा किती वेळ बाकी आहे. तुम्ही प्राथमिक चर्चा करून घ्या तुम्हाला जे आन्सर भेटलेले नाहीत तस सांगा अधिका-याना ते आन्सर भेटल्यावर तुम्ही ते बोलणार परत

दिप्ती भट :-

शांतीनगरच्या केवढया आर जी आजपर्यत हॅन्डओव्हर झालेल्या आहेत आणि आत्तापर्यत आपण काय त्यांच्याबरोबर ॲग्रीमेन्ट बनवलेले आहेत का?

मा. आयुक्त :-

जे उत्तर दिले आहे, त्याने काय आपले समाधान झाले नाही का ?

दिप्ती भट :-

नाही झाले.

मा. आयुक्त :-

बोलावले आहे उत्तर देण्यासाठी .

मा.महापौर :-

आपको और क्या डिटेल चाहिए वो आप बोलिए ताकी आपको वा और डिटेल मिल जायेगा।

दिलिप घेवारे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मिरारोड पूर्व शांतीनगर येथील महानगरपालिकास हस्तांतरीत झालेल्या आर जी बाबतचा करारनामा मा. दिप्ती भट ह्यांना पूर्वीच दिलेला आहे व सदरच्या आर जी चे लोकेशन देखील संबधित कनिष्ठ अभियंता यांच्या मार्फत आपणास प्रत्यक्ष जागेवर दाखवण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त आर.जी. जागेवर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडून विकसित करण्याची कार्यवाही होत असल्यामुळे कोणत्या आर.जी. जागेवर महानगरपालिकेने काम सुरु केले आहे याबाबत आपण कृपया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. दुसरा मुद्दा आहे आर.जी. मध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमानुसार आवश्यकतेनुसार आर.जी. प्रस्तावित करुन उर्वरीत आर.जी.मध्ये फेरबदल करण्याची तरतूद आहे. तिसरा मुद्दा शांती नगर येथील आर.जी. मध्ये विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीच्या व्यतिरिक्त फेरबदल केलेले नाही. ४) सदर मंजूर विकास कामात कोणत्याही प्रकारची इमारतीचे बांधकामाबाबत मंजूर नकाशाचे उल्लंघन केल्याचे आढळत नाही. ५) मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय चटाई क्षेत्राच्या मर्यादेत विकास कामे परवानगीसाठी प्रस्ताव सादर केले असता सुधारीत परवानगी देण्यात येऊ शकते. ६) आर.जी. च्या आरक्षित जागेवर विकास नियंत्रण नियमावलीनुसार १५ टक्के च्या मर्यादित नकाशे मंजुर करण्याचे विकास नियंत्रण नियमावलीत तरतूद आहे. ७) आर.जी. चा एफ.एस.आय. इतर ठिकाणी वापरण्याची तरतूद नाही तसेच शांती नगर येथील आर.जी. चा एफ.एस.आय. इतरत्र कुठेही वापरण्यात आलेला नाही.

दिप्ती भट :-

साहेब आपण जे ॲग्रीमेंट बनवले ते कॉपी दिलेत तस बनवू शकतो जे ॲग्रीमेंट बनवले आपण ते बनवू शकतो.

दिलीप घेवारे :-

हा आपण ॲग्रीमेंट बनवलेत आर.जी. चे त्यांच्यासोबत .........

दिप्ती भट :-

बनवलेत तर त्याच्यामध्ये आपण कुठली जागा घेऊ शकतो.

दिलीप घेवारे :-

आर.जी. ची जागा घेऊ शकतो फक्त.

दिप्ती भट :-

आर.जी.ची कुठली जागा शासनाचा नियम २०१० च्या हिशोबाने आपण कुठली जागा घेऊ शकतो.

दिलीप घेवारे :-

जे मंजूर लेआऊटमध्ये आर.जी. मंजूर केली आहे. तीच जागा आपण घेतो.

दिप्ती भट :-

माझा प्रश्न असा आहे की ओपन जागा घेऊ शकतो की त्यांनी डेव्हलप केलेली जागा आणि ही जिम्मेदारी कोणाची होती. त्यांची होती की आम्ही डेव्हलप करायच अस की त्यांनी त्यांना आम्ही बांधकामाची परमिशन दिली तर त्यांनी डेव्हलप करुन द्यायची होती.

दिलीप घेवारे :-

दोघांची जबाबदारी होती. त्यांनी आपल्याला जागा द्यायच्या होत्या आणि आपण त्या घ्यायच्या होत्या. आता त्याच्यामध्ये एखाद्या जागेचं बांधकाम असेल तर ते ॲम्युनिटीसाठी किंवा ते बांधकाम जे आहे समजा पाण्याची टाकी आहे किंवा काहीही आहे ते आपल्याच क्षेत्रातल्या उपयुक्ततेसाठी आहे त्यामुळे ते बांधकाम ताब्यात घेतलेले आहे.

दिप्ती भट :-

त्या ॲग्रीमेंट्स मध्ये अशा जागा आहेत ज्याच्यावरती कोर्ट केस आहेत. तर त्या जागा आपण घेऊ शकतो.

दिलीप घेवारे :-

नाही घेऊ शकत.

दिप्ती भट :-

आपण घेतल्या आहेत तर मग ॲग्रीमेंट चुकीच आहे ना.

दिलीप घेवारे :-

नाही तस व्हेरीफिकेशन सुरु आहे. अशा काही जागा असतील तर त्या तपासून त्याच्या परत जागा घेतल्या जातील.

दिप्ती भट :-

अशा ज्या जागा आहेत की ज्याच्यावरती बांधकाम झालेले आहेत मंदिर आहेत जे पण आहेत त्याला काढून बाकीच्या जागा घ्यावी अशी आमची सगळ्यांनी रिक्वेस्ट आहे की मंदिर आणि जे पण काय असेल चर्च किंवा मज्जिद काय पण असेल त्या जागा काढून घेण्यात याव्यात आणि बाकीच्या ज्या जागा राहतील त्या महानगरपालिकेला हॅन्ड ओव्हन करण्यात याव्या.

दिलीप घेवारे :-

तपासून घेण्यात येईल ते.

दिप्ती भट :-

आणि एकूण जागा किती आहेत ते पण तुम्ही पूर्ण सांगा कारण जेव्हा ॲग्रीमेंट बनवतात तेव्हा आम्हाला सांगा की कुठली जागा घेतो आणि त्याच्यामध्ये कुठल्या जागा अशा पण आहेत की तुम्ही डायरेक्ट संस्थांना बिल्डरनी दिले तर आपण असे देऊ शकतो.

दिलीप घेवारे :-

नाही नाही.

दिप्ती भट :-

मग त्यांनी जे नावे दिलेत ते सगळे कॅन्सल करण्यांत यावे. महासभेत आणण्यात यावे आणि त्याच्यामधून जेवढे........... आहे ते सर्व काढण्यात यावे. त्या जागेवरती आर.जी. जागेवर आणि दुसरा प्रश्न आर.जी. जागेवर आपण बांधकाम करु शकतो.

दिलीप घेवारे :-

हो १५ टक्केच्या मर्यादेत करु शकतो.

दिप्ती भट :-

आपण करु शकतो की बिल्डर करु शकतो.

दिलीप घेवारे :-

बिल्डर सोसायटी आपण कुणीही. आर.जी. ची जागा जेवढी आहे समजा १००० मी. ची आर.जी. आहे त्याच्यामध्ये १५ टक्के १५० मीटर आपण खाली १०० मीटर आणि वर पहिल्या मजल्यावर ५० मीटर बांधकाम करु शकतो. ते बिल्डर ही करु शकते. सोसायटी ही करु शकते किंवा आपण ही करु शकतो.

दिप्ती भट :-

समजा आपण टेंडर काढल आणि खर्च केल...........

दिलीप घेवारे :-

त्यांनी आपल्याकडून परवानगी घ्यायला पाहिजे जो कोणी करेल.

दिप्ती भट :-

महानगरपालिकेचे खर्च झाले असेल ज्या जागेवरती आणि आर.जी. वरती त्याच प्लॉट वरती आपण न करता समोरच्या आर.जी वरती महानगरपालिकेने डेव्हलपमेंट केली आहे. आमच्या पत्रानुसारच केली आहे पण जी जागा तुम्ही आता बिल्डर स्वतः बनवु शकतो बांधकाम.

दिलीप घेवारे :-

आर.जी. चे.

दिप्ती भट :-

आपण खर्च केले आहे टेंडर निघाले आहे. महानगरपालिकेने त्याच्यावर खर्च केला आहे. म्हणून मी सांगत होते की पुढच्या महासभेत हे मला पण पूर्ण पेपर वर्क आणायचे आहे. कारण यामध्ये जेवढ्या प्रश्नाचे उत्तर दिलेत सगळे चुकीचे आहे आणि सगळ्यांवरती ह्यांनी उल्लंघन केले आहे तर पुढच्या महासभेत घेतले तर तुम्हाला पण उत्तर द्यायला बरे होईल आणि मला पण बोलायला बरं राहील.

दिपक खांबित :-

उत्तर दिलेत ना मॅडम.

दिप्ती भट :-

महानगरपालिकेतर्फे २०११ मध्ये ज्या जागेवरती टेंडर निघाले आहेत गार्डनचे त्या जागेवरती आपण काम केलेले आहे आणि नंतर २०१५ मध्ये त्याच्या समोरच्या जागेवर आपण आर जी पालिकेला दाखविलेले आहे आणि पालिकेने त्याच्यावरती गार्डन बनविलेले आहे. पण ज्या जागेवरती आपण खर्च केलेला होता त्या जागेवर बिल्डर बांधकाम करू शकतो का?

दिपक खांबित :-

जर त्यांना बांधकाम परवानगी दिली असेल तर करू शकतो.

दिप्ती भट :-

तुम्हाला माहित होत की ही जागा महानगरपालिकेची आहे तेव्हा तुम्ही खर्च केला ना त्याच्यावरती

दिपक खांबित :-

जो नकाशा तिकडचा मंजूर आहे ना तो वेळोवेळी रिव्हाईज होत असतो आणि जेवढी त्याला आर जी जागा द्यायला पाहिजे ती कुठेतरी ठेवली असेल ना

दिप्ती भट:-

म्हणजे ६ महिने वर्षामध्ये तुम्ही बदली करू शकतात.

प्रेमनाथ पाटील :-

कुणाच्या परवानगीने.

दिपक खांबित :-

महानगरपालिकेच्या

प्रेमनाथ पाटील :-

मॅडम तुम्ही बोलता ६-६ महिण्यामध्ये आर जी बदली करू शकतो कुठल्या बेस वरती महासभेची परवानगी घेऊन की तुम्ही परस्पर बदली करतात.

दिपक खांबित :-

त्याच्या मंजूर नकाशाप्रमाणे.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब आर जी आपण डी पी प्लान कधी १९९७ ला बनवले होते त्यामध्ये असेल ना उल्लेख की हे गार्डन आहे की प्लेग्राऊन्ड आहे की स्कूल आहे.

दिपक खांबित :-

त्या ज्या आर जी आहेत त्या मंजूर ले आऊट मधल्या आर जी आहेत त्या रिझर्व्हेशन मधल्या जागा नाहीत.

प्रेमनाथ पाटील :-

जी आर जी आहे त्यात परत तुम्ही त्यामध्ये दुसरी लिहू शकता .

दिपक खांबित :-

रिव्हाईज प्लान मधली बदलू शकतो ना.

सुहास रकवी :-

त्याच्यामध्ये त्यांच म्हणण असे आहे की डी पी प्लान मधला ती आर जी जागेवर आपण बांधकामाची परवानगी देणार का?

दिपक खांबित :-

डी.पी. प्लानमध्ये आर.जी. नसतेच ना.

सुहास रकवी :-

ते तेच म्हणतात तुम्ही खाजगी जो असेल प्लान त्यातला तुम्ही डेव्हलप करु शकतात. साहेब आमचा विषय त्याच संदर्भात आहे. आमच्या मर्लिन डिसानी त्या संदर्भात उपोषण केले होते की त्या बिल्डरने ती आर.जी. हॅन्डओव्हर नाही केली.

नगरसचिव :-

वेळ संपलेली आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मला बोलायचं होते दोन मिनिट याच्यावरती. महापौर मॅडम हा माझा इश्यू आहे. हा माझा कोर्टमध्ये इश्यू पेंडींग आहे. मला दोन मिनिट याच्यावर बोलायचे आहे.

नगरसचिव :-

वेळ संपलेली आहे.

दिप्ती भट :-

पुढच्या महासभेत मला उत्तर द्या.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैननी सांगितले आहे की माझा मॅटर कोर्टमध्ये पेंडींग आहे त्यामुळे सभागृहामध्ये या विषयावर अजिबाबत चर्चा करता येणार नाही.

दिप्ती भट :-

पुढच्या महासभेमध्ये हा विषय कंटीन्यू ठेवा आणि जर तुम्हाला कोर्टामध्ये मॅटर आहे ते क्लोज करत आहेत तर आजपर्यंत जेवढे बांधकाम आहे ना गार्डनच्या जागेवर तर ते बंद करा. कारण आजपर्यंत कोणी पण याचा प्रश्न उचलला नाही. ती लोकांची जागा आहे आर.जी. लोकांची आहे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मला फक्त दोन मिनिट विचारायचं आहे या विषयावरती.

मा. आयुक्त :-

आपण जे प्रश्न विचारलेत त्याच्या संदर्भामध्ये मॅटर मा. उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असल्यामुळे या सभागृहामध्ये या विषयावर अजिबात चर्चा करता येणार नाही. आणि त्याचे उत्तर देणे मला बंधनकारक असणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

अश्विन कासोदरिया :-

आयुक्त साहेब आपकी बात हम मान्य करते है लेकिन जब तक न्यायालय में है विषय तब तक कुछ भी काम शांतीनगर का होना नही चाहिए बिल्डींग का। सब काम रुकना चाहिए। आप अभी हम को रुका रहे है तो शांती स्टार बिल्डर का एक भी काम आगे बढना नही चाहिए।

दिनेश जैन :-

अभी कोर्ट के अंदर उसका काम है तो रुकाओ फिर यह जो विषय है आपने प्रश्न तास में क्यों लिया कोर्ट में था तो?

दिप्ती भट :-

मी तुम्हाला पहिलेच बोलले पुढच्या महासभेत घ्या. तुम्ही घेतले जबरदस्ती या महासभेत.

दिनेश जैन :-

मला विचारायचे फक्त २ विषय होते साहेब.

दिप्ती भट :-

साहेब त्याच्यामधून ॲग्रीमेंट कॅन्सल करुन मंदिर वेगळे करा. आणि खाली आर.जी. घ्या.

प्रमोद सामंत :-

कोर्टातला विषय आर.जी. चा नसून त्याच्या बांधकामाबाबत असणार. आर.जी. चा विषय वेगळा आहे आणि त्याचा कोर्टातला विषय वेगळा आहे. आयुक्त साहेब अशा प्रकारे उत्तर देऊन तुम्ही विषयाला.

दिनेश जैन :-

आपण प्रश्न तास वर विषय का घेतला?

जुबेर इनामदार :-

आर.जी. संदर्भात पूर्ण शहराचा विषय असणार तो. फक्त एक शांतीनगरचा नाही.

मा. आयुक्त :-

शहराचा विषय नाही फक्त शांतीनगरचा विषय आहे.

दिप्ती भट :-

पण माझा विषय तोच आहे ना.

जुबेर इनामदार :-

त्यांनी तुमचा विषय उडवून टाकला.

दिप्ती भट :-

नाही उडवला पुढच्या तासात घेतील ते.

सुहास रकवी :-

आयुक्त साहेब दिनेश जैन एकटे कोर्टात गेले संपूर्ण सभागृह नाही.

(सभागृहात गोंधळ)

नगरसचिव :-

प्रश्नोत्तराचा तास पुढच्या सभेला घेणार असे महापौरांनी जाहिर केले आहे. आजच्या महासभेत दोन लक्षेवधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी जुबेर इनामदार यांची आहे आणि दुसरी लक्षवेधी नरेंद्र मेहता यांची आहे. त्या दोन्ही लक्षवेधी मी महापौरांच्या सुपुर्त करत आहे. श्री. जुबेर इनामदार यांच्या लक्षवेधीचा विषय महासभा दि. ७/०५/२०१६ मध्ये विकास नियंत्रण नियमावली बाब क्र. ९(अ) अन्वये चर्चेत लक्षवेधी घेणे सादर करणे. वरील विषयास अनुसरुन आम्ही खालील प्रस्ताव सादर करत आहोत. (लक्षवेधी टाईप करणे.) जुबेर इनामदार यांच्या लक्षवेधीचे वाचन केले. श्री. नरेंद्र मेहता यांच्या लक्षवेधीचे वाचन केले. दोन्ही लक्षवेधी मी महापौरांकडे सूपूर्त करत आहे.

मा. महापौर :-

मा. श्री. नरेंद्र मेहता यांची लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे. ते त्याच्यावर चर्चा करु शकतात.

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने मा. आयुक्त साहेब कुठलेही सदस्य असू द्या कुठलेही पक्ष असू द्या, फेरिवाला संदर्भात मग सत्ताधारी असू द्या, विरोधी पक्ष असू द्या हे सर्व त्रस्त आहे. वारंवार वेगवेगळ्या प्रदर्शनच्या माधम्यातून आपल्या निदर्शनास आणून दिले की फेरिवाल्यांचे अतिक्रमण रस्त्यावर दिवसेंदिवस हे वाढत चालले आहे आणि इथपर्यंत दादागिरी झाली की आता एखादा नगरसेवकाने पुढाकारची भुमिका घेतली तर त्यांच्यावर गुन्हा सुध्दा दाखल होतात. म्हणजे एखाद्या नगरसेवकाने अग्रेसिव भुमिका घेतली अधिकाऱ्याला साथ दिली ते संघटन जातात पोलिस स्टेशनला १०० च्या संख्येने जातात १००० च्या संख्येने जातात आणि गुन्हा दाखल करायला लावलात एफ.आय.आर. दाखल होतो नंतर भलेही त्याला १६९ होत असेल काहीपण पण एकदा त्यांच्यावर दाखल होतो. या सभागृहामध्ये अनेक सदस्य आहेत ज्यांच्यावर फेरिवाल्यांवर कारवाई केली आणि खोटी तक्रार केली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केलेत आता सदस्यांनी पण हे ठरविले पाहिजे की कितपत आपण त्यावर भूमिका घ्यायची आणि नागरिकांनी वारंवार यामध्ये जनतेने लोकप्रतिनिधींना दोषी ठरविले की ते काही करत नाही. कॉंग्रेसने आंदोलन केले होते, भाजपचे नगरसेविका आमचे दिप्ती भट आहेत, प्रशांत दळवी आहे शिवसेनेचे त्या सर्वांनी मिरा रोडचे काही ट्रस्टी आहेत. भाईंदर पूर्वचे काही ट्रस्टी आहेत कनाकियाचे काही ट्रस्टी आहेत असे ठराविक हे ही सत्य आहे की एका दिवसामध्ये पूर्ण शहर फेरिवाला मुक्त आपण करु शकत नाही. पण काही ठराविक मार्ग आहेत ज्यामध्ये कठोर भुमिका घेणे कडक कारवाई करणे हे गरजेचे आहे. अनेकदा उत्तरे दिली जाते की, कधी म्हणता सुप्रिम कोर्टचा कायदा आहे कधी याचा कायदा आहे. सर फेरिवालाची कारवाई मुंबई असू द्या, नवी मुंबई, ठाणे सगळीकडे चालुच आहे ना कुणी बंद केलेली नाही ना कारवाई. आपण एखादा उदाहरण देतो आणि ते सोक्षमोक्ष लावतो. नावापुरता खाली कारवाई करतो आपण गेलो की अर्ध्या तासात बसतात. दिपक हॉस्पीटलचा रस्ता या ठिकाणी एकदम प्रचंड म्हणजे भाजी मार्केट सारखं झाला. हॉकर्स बसणे हा एक वेगळा भाग झाला पण रस्त्याला भाजी मार्केट किंवा फेरिवाला क्षेत्र हॉकर्स म्हणजे या बाजुने हॉकर्स या बाजूने हॉकर्स रस्त्याच्या मधे पण हॉकर्स, साईडला पण हॉकर्स या पध्दतीचे झाले आहे. यामध्ये नक्की प्रशासन याच्यावर ठराविक आम्ही मान्य करतो. एका दिवसात कारण पर्यायी व्यवस्था दिल्याशिवाय हे हॉकर्स एका दिवसात शहरातलं जाणार नाही. आणि शहराची काही प्रमाणात गरज सुध्दा आहे. पण गरज कुणाची आहे भाजीवाले असतील, फ्रुट्सवाले असतील, दैनंदिन लागणारी आवश्यक वस्तू कटलरी, क्रॉकरी, कपडे हे दुकानात मिळू शकतात ना साहेब याला काय संध्याकाळी घरातून उतरलो की रोज लागत नाही ना, असे कुठे तरी बंधण आणावे लागेल. जशी आपली भूमिका आहे त्यांना काहीतरी केले पाहिजे जे अति आवश्यक वस्तू आहेत त्यासाठी आपण करु पण बाकीला तुम्हाला कुठेतरी वेगळे स्थलांतर करता येईल ना. कपडे रस्त्यावर विकणे हे काय डेली आमची गरज नाही, कटलरी विकणे हे काही आमची डेली गरज नाही. जे डेलीची गरज आहे त्या ठिकाणचे स्थानिक नागरिक असतील तर एक ठराविक लिमिटमध्ये काहीतरी धोरण नक्की करा. हे धोरण जिथपर्यंत नक्की होणार नाही हे अशाच प्रकारे चालत राहणार आहे. ६० फिट रोडचा होता तो आता नवरंग हॉटेलपर्यंत गेला मग काही केले की, नगरसेवकावर दोष आरोप बसू देत नाही मग त्यांचा मोर्चा मग राजकीय दबाव या सगळ्या बाबी पण प्रशासनाने आपली भूमिका यामध्ये आजपर्यंत स्पष्ट झाली नाही की नक्की त्यांना कारवाई करायला अडचण काय सुप्रिम कोर्ट, मॅन पावर की आपण कमी पडतोय तर आपण कृपया आम्हाला या विषयावर खुलासा करा या सभागृहाला. जे अती महत्वाचे रस्ते आहेत कुठल्याही पक्षाच्या सदस्याने आपल्याला सूचवू द्या आणि आपल्याला वाटते हे अती महत्वाचे रस्ते आहेत या ठिकाणी फेरिवाले गेले पाहिजे तर ही कारवाई आपण कुठल्या प्रकारे करणार आहे, कधी पर्यंत करणार आहे.

कशाप्रकारे करणार आहे आणि कायमस्वरुपी ती कारवाई राहील याबद्दल आपण आम्हाला काय आश्वासित करतात याची माहिती द्यावी.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम, आमदार साहेबांनी चांगला विषय मांडला. मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देईल आयुक्त साहेबांनी गेल्या मे महिन्यामध्ये शेवटच्या आठवड्यात मोहिम सुरु केली. १५ जुनला ती मोहिम थांबविली. लोकांना त्रास झाला काही काहींना बरे वाटले. आमच्या सारख्यांना फार त्रास झाला हे जरी सत्य असलं तरी आता ती मोहिम १५ तारखेपासून थांबल्यानंतर आजची २८ तारीख आहे म्हणजे त्यांनी निवांत सगळे त्यांचे अधिकारी असं म्हणतात ज्याला रेस्ट पिरेड तो झालेला आहे. आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की, त्या टाईमला जस बारकुंड साहेबांना त्या मोहिमेचे प्रमुख केले होते आणि आपले अधिकारी सगळे कामाला लावले होते त्यात आपले जे २० पोलिस होते त्यात आणखी आपले बाऊंसर होते अशी जी यत्रंणा होती तीच यंत्रणा उद्यापासून कामाला लावा. २ महिन्याचा त्यांना अवधी द्या दुसरे काही काम नाही. ऑफिसचे काही काम नाही केले बारकुंड साहेबांनी तरी चालेल. त्यांनी राऊंड मारायच ते प्रभाग अधिकारी जे आहेत त्यांनी तस राऊंड मारायचे. मी माझ्या पुरत सांगु शकतो की, आमचा बी.पी. रोड आहे, नवघर रोड आहे स्टेशन समांतर आहे आपला जो वॉर्ड ऑफिसर आहे त्यांनी दिवसभर संध्याकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत आपलं त्याच्यावर कोणतही नियंत्रण राहत नाही. आमची विनंती आहे तमाम नागरिकांची विनंती आहे या सभागृहाची विनंती आहे की आपण त्यांना सक्त निर्देश द्यावे की हे तुम्ही काम कसूर केले तर जस आपण लोकांना मध्ये दमदाटी केली तशी ती अधिकाऱ्यांना दमदाटी करा कर्तव्यात कसूर केला तर माफ करणार नाही. ही सभागृहाची मागणी आहे एवढीच माझी विनंती आहे.

मदन उदित नारायण सिंग :-

महापौर मॅडम, आज यह जो फेरिवाला का विषय आमदार साहब ने लाया है और आपने लिया और मुझे लग रहा है आयुक्त साहब भी उसमें इन्ट्रेस्ट ले रहे है तो में उसको धन्यवाद देता हूँ। यह जो विषय है पुरे शहर का है और मैं इसमें एक सूचना देना चाहता हूँ खाली कारवाई करके कुछ नही होगा, कारवाई अगर हम कन्टीन्यू ६ महिना भी करे तो ६ महिने के बाद वापस बेठेंगे इसपे महानगरपालिका, वार्ड ऑफिसर और पुलिस यंत्रणा और अपने आरोग्य के कर्मचारी सब लोग मिलके कोई उपाययोजना बनाया जाए तो कारवाई चाहे हो या ना हो वो आदमी वहाँ बेठेगा ही नही। उस जगह की उस रोड की लिस्ट पोलिस चौकी को दि जाए की यहाँ पर यह बैठना ही नही चाहिए और अगर वो बैठ गए तो उसपे हम कारवाई करेंगे एफ.आय.आर करेंगे। जब तक ऐसी उपाययोजना हम नही बनाऐंगे तब तक हम उसपे सक्सेस नही हो सकते। उसमें मैं और एक जोडना चाहता हूँ फेरिवाला के साथ साथ जो गटर होती है बिल्डींग में दुकान के बाहर ओटला होता है। ओटला चलो सोसायटी का है लेकिन ओटले के बाहर जो नगरपालिका की गटर होती है उस गटर को भी कव्हर करते है। दुकानवाले सामान रखते है तो चलनेवाली पब्लिक चलेगे कहाँ से। तो फेरिवाला के साथ साथ उस गटर का भी ऐसा उपाययोजना बनाए जाए की उसपे कोई बेठने की हिम्मत ही नही करे। अगर ऐसा करेंगे तभी हम सफल हो पायेंगे नही तो नही हो पायेंगे।

सुर्यकांत म्हात्रे :-

साहेब मी हे शेवटचे बोलतोय ४ वर्ष बोलुन बोलुन थकलो त्या मच्छीवाल्या संदर्भात पण कारवाई काही होत नाही. मेहता साहेबांनी आता फेरिवाला संदर्भात बोलले म्हणून आज शेवटचे बोलतो सभागृहामध्ये त्या मच्छीवाल्यांवर कारवाई करा साहेब. ते मच्छीवाले रोज तिकडे घाण करुन बसलेले असतात पण आपला कुठलाही अधिकारी आणि आपण ही त्यांना आदेश देत नाही त्या मच्छीवाल्यांना हटविण्यासाठी.

मा. आयुक्त :-

कुठले मच्छीवाले.

सुर्यकांत म्हात्रे :-

एस.के. स्टोनच्या पाठीमागे सर वारंवार बोलुन थकलो साहेब मी ४ वर्षे झाली. नगरसेवक होऊन ४ वर्षे झाली पण आता तो एकच विषय घेऊन बसलो आहे पण तो ही साध्य होत नाही.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम २ मिनिट बोलतो मेहता साहेबांनी खरोखर चांगला विषय आणला त्यांचे अभिनंदन करतो. कारण की आमच्या इथे पण आपलं पोलिस स्टेशनपासून ते स्टेशनपर्यंत त्या फेरिवाल्यांचे काय करायचे. आपण जर काही विनंती केली प्रभाग अधिकाऱ्यांना तर कुरळेकर साहेबांनी स्टॅन्डिंगमध्ये शरद दादांना काय उत्तर दिले की नाही आम्ही फेरिवाल्यांना हटवू शकत नाही म्हणे हायकोर्टची ऑर्डर आहे. दादांनी म्हटलं की कुठली ऑर्डर अशी दिली उद्या पालिकेमध्ये आम्ही १५ ठेवतो २० ठेवतो त्यांना हटवणार की नाही. कुरळेकर साहेब म्हणतात की नाही आम्हाला तस कुठल्याही प्रकारचा आदेश नाही त्यांना हटवावे. त्याच्यावरुन सुध्दा तुम्ही तुमचे संबंधित अधिकाऱ्यांना एक आदेश द्यावा की हे जे फेरिवाले आहेत साहेब त्याच्यानंतर आम्ही तक्रार केली की त्यांना असं वाटतं की हे नगरसेवक खंडणी मागतात. खंडणी मागायला काय अरे रस्ता साफ असला पाहिजे. सकाळी साहेब तुम्ही याच रोडने येतात आणि हा जो मेन मुख्य रस्ता आहे छत्रपती शिवाजी मार्ग हा मोकळा असला पाहिजे सगळे साहेब ते फेरिवाले आहेत ते कोणत्या पक्षाचे सुध्दा नाहीत. नगरसेवकाच्या सगळ्यांच्या मागण्या आहेत की त्या सर्वांना तुम्ही हटवायचे आहे साहेब एक

रिक्वेस्ट आहे छत्रपती शिवाजी मार्ग, काशिमिरा ते गोल्डन नेस्टपर्यंत आम्ही वारंवार स्टॅन्डिंगचे सभापती माजी सभापती प्रशांत केळुसकर साहेब आता विद्यमान आहे हरिश्चंद्र आमगावकर साहेब आम्ही नेहमी सांगतो कारवाई १-२ दिवस करतात नंतर प्रभाग अधिकारी म्हणतात आम्ही या कामाला गेलोय आणि म्हसाळ साहेब पण असतात तिकडे तर ही कारवाई कायम चालली पाहिजे कारण आपण त्याच्याकरिता ४० बाऊंसर अपॉईंट केले आहेत. त्यांना स्पेशल त्या कामाकरिता ठेवा आणि आमदारांनी हा जो विषय आणला त्याचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. या विषयाचा एक तोडगा करावा ही तुम्हाला विनंती आहे सर.

दिनेश नलावडे :-

मा. महापौर मॅडम मी सर्वप्रथम आदरणीय आमदार साहेबांना खरोखर मनापासून धन्यवाद देतो कारण हा त्यांनी स्वतःहून आणलेला आहे चांगला विषय आहे. अगोदर आम्हाला अस वाटायच की आमदार मनावर का घेत नाही आणि त्यांनी हा विषय आणलेला आहे. खरोखर चांगला विषय आहे. मॅडम मी तुम्हाला सांगतो की नवघर रोड बी.पी. रोड हे दोन रोड फेरीवाल्यांमुळे बाधित झालेले आहे आणि या विषयावरती माजी सभापती शरद पाटील आणि सगळ्या सभागृहाने आपण देखील हा विषय वारंवार या सभागृहामध्ये आणला आहे परंतु आजपर्यंत माहापौर मॅडम फेरीवाल्यांना हटविण्याचे काम या शासनाकडून प्रशासनाकडून झालेले नाही. आज हा विषय आमदार साहेबांनी आणलेला आहे. तर त्यांना या विषयावरती निश्चीत पणे आम्हाला अस वाटते की आमदार साहेबांनी विषय आणल्यामुळे हा फेरीवाल्यांचा विषय निश्चितपणे मार्गी लागेल.

मा. आयुक्त :-

आमदार साहेबांनी विषय आणला पण तुमच सहकार्य आहे ना त्याला.

सुहास रकवी :-

साहेब म्हणुन तर अभिनंदन केले ना.

दिनेश नलावडे :-

कमिशनर साहेब नवघर रोडलो शाळेच्या बसेस जातात फेरीवाले दोन्ही बाजूने नो फेरीवाला झोन आहे तरी देखील फेरीवाला बसलेले आहेत. फुटपाथ दुकांनदारांनी काबीज केले आहे.तिकडे आमचे महानगरपालिकेचे अधिकारी वसुली करतात. लोकांना फुटपाथ चालण्यासाठी असतांना देखील त्या ठिकाणी नागरिकांना चालायला सुविधा होत नाही. प्रत्येक दिवशी रोडने जातांना लोकांना........................

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आत्ता जो विषय आणला आमचे आमदार मेहतासाहेब खूप चांगला विषय आहे. आणि विरोधी लोकांनी पण या विषयाची प्रशांसा केली त्यांचे मी धन्यवाद करतो पण आयुक्तसाहेब याच्यामध्ये एक मोठी चूक आहे की ज्या टाईमाला आपली गाडी कारवाईला निघते कुठल्याही प्रभागामध्ये त्या फेरीवाल्याला अगोदर खबर असते की आत्ता गाडी येणार आहे. हा प्रश्न सुटत नाही तोपर्यत तुमची कारवाई १०० टक्के होणार नाही. तुमचे जे अधिकारी आहेत त्यांच्याकडून पहिला फोन जातो तिकडे की आम्ही तिथे कारवाई करायला येत आहोत. तिथे गाडीवाला एक पण होत नाही. गेली गाडी तुमची की परत तिथे सगळे धंदे तसेच्या तसे लागते. कुठलाही प्रभाग असू द्या. तुम्ही निरिक्षण करा की कोणी त्यांना टिप देतो की, आत्ता गाडी येणार आहे आणि दोन गाडी ठेवा एक गाडी या बाजूने आणि एक गाडी या बाजूने जर तुम्ही गाडी उचलली तर ते प्रॉब्लेम सॉल्व्ह होंणार नाहीत. माझ्या प्रभागामध्ये दर स्टॅन्डिंग मिटींग मध्ये मी विषय ही आणतो. इथे गाडी उभी आहे तिथे समोर १० फिट १५ फिट सोडून जी सगळी गाडी लागलेली आहे मी बोललो उचला ते तर ते बोलतात तुम्ही कम्पलेन्ट इकडची दिली होती. अशी आपली नगरपालिका चाललेली आहे. साहेब आणि खरोखर आमच्या नगरसेवकाचे नाही तुम्ही ऐकत असाल तर आमचे आमदार, महापौर, आयुक्तांनी विषय आणला आहे तरी तुम्ही लक्ष द्या. याला खरोखर तुमच एक मोठ मन ठेवून तिथे जेवढे तुमचे अधिकारी आहे. त्यांना सांगा की आपल्या कारवाईच्या अगोदर कोण त्या फेरीवाल्यांना सांगतो की गाडी येते. जर हे विषय सुटणार नाही तर तुमची कारवाई कधी पण पूर्ण होणार नाही.

प्रेमनाथ पाटील :-

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, साहेब एवढी चर्चा झाली फेरीवाल्याना उचलायची तर आत्ता आयुक्त साहेब नाहीत तर तुम्ही हे डिसीजन घेऊ शकता का?

दिनेश जैन :-

साहेब आयुक्त साहेबांना बोलवा स्टॅन्डिंगमध्ये पण तुम्ही याचा जवाब देऊ शकले नाही.

प्रमोद सामंत :-

मा. महापौर मॅडम मिरा भाईदर महानगरपालिकावर थोडीशी विचित्र अशी परिस्थिती आलेली आहे. शहराच्या आमदारांना महानगरपालिका सभागृहात फेरीवाल्यांच्या विषयावरती लक्षवेधी मांडावी लागत आहे. परिस्थिती तशी आणली आहे ना. की प्रशासन या गोष्टीवरती..........................

नरेंद्र मेहता :-

माझी हरकत आहे. त्यांना काय मांडायच त्यांनी मांडायच मी काय केल बोलायच अधिकार नाही. आत्तापर्यंत आमदार साहेब विधान भवनात लक्षवेधी मांडतात ते काय चुक करतात या शहराचा

(सभागृहात गोंधळ)

नरेंद्र मेहता :-

त्यांना माहित नसेल तर मागच्या ५ वर्षाच्या इतिहास काढा पाच वर्षात ६ सहा सभा झाली असेल त्यात ५८ लक्षवेधी त्यांचीच आलेली आहे ते विसरलेत का?

प्रमोद सामंत :-

तेच तर सांगत आहे आता प्रशासनाने सभागृहावर अशी परिस्थिती आणली आहे की आमदारांना लक्षवेधीच्या माध्यमातून प्रशासना समोर हा विषय मांडावा लागतोय मला अस म्हणायच होत माल तुमच्याबद्दल वाईट म्हणायच नव्हत चुकीची समजूत करून घेऊ नका. शहरामध्ये सदस्यांनी दोन-दोन वेळा १५-१५, २०-२० मि. आमचे दळवी साहेबांनी भाषण केले, तुम्ही अनुमती दिली पण तुम्ही एकदाही रुलींग दिली नाही. आम्ही विषय मांडला तुम्ही त्यावर बोलले नाही आता आमदारांनी महासभेसमोर विषय आणला आहे. तुम्ही या विषयावर रुलींग द्यावी. शहरात दोन ठिकाणी रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना हटविण्यासाठी दोन वेळा ३-३ दिवस उपोषण झाले. प्रशासनाने उत्तर दिले की आम्ही त्यांच्या वरती कारवाई करू आम्हाला २० लोकांचा पोलिस बंदोबस्त मिळालेला आहे आम्ही त्यांच्यावरती कारवाई करू आणि त्यांचे उपोषण मागे घेतले गेले. अस असतांना आज जवळ जवळ १ मे ला उपोषण झाले १ मे पासून आता २८ जून ६० दिवस उलटून गेले तरी प्रशासनाने कारवाई केली नाही नक्की प्रशासनाला काय महत्त्वाचं होतं उपोषणासाठी लोक बसली कुठे तरी त्या लोकांना त्रास होत असेल. शहरामध्ये काही ठराविक रस्त्यावरती मग आयुक्त साहेब तुमच्या बंगल्याच्या रस्त्यावरती असो, दिपक हॉस्पीटलच्या रस्त्यावरती असो, आमच्या शांती नगर मध्ये स्टेशन परिसर १ नंबर, २ नंबर मधला रस्ता असो, सेक्टर ५ नंबरचा असो, नवघर असो ३ नंबर असो या सगळ्या ठिकाणी अनधिकृत फेरीवाले म्हणजे आम्ही गेले २७ दिवस गेल्या वर्षात मे महिन्यामध्ये एप्रिल महिन्यामध्ये २७ दिवस कुठलंही पोलिस बंदोबस्ताशिवाय कारवाई झाली होती. त्याच प्रभाग अधिकाऱ्यांने त्याच स्टॉफने ५-६ जणांच्या स्टॉफ मध्ये २७ दिवस त्या २ नंबर आणि १ नंबर मधल्या रस्त्यावरती फेरीवाल्यांना बसु दिले नव्हते. प्रशासनानेच केली होती पण नंतर तिकडच्या वर्षभरात प्रशासनाने कुठेही आपली इच्छाशक्ती दाखवली नाही की आपण हा विषय तडीस नेऊ फेरीवाल्याचा विषय आज शांतीनगर मध्ये आपण गेली महिनाभर, नवघर मध्ये महिनाभर दिपक हॉस्पीटला गेली करून हा विषय कुठे तरी तडीस नेऊ अस प्रशासनाला कधीच वाटले नाही आणि त्यानंतर आमच्या सदस्यांनी विषय घेतला आम्ही विषय घेतला उपोषण झालं वर्षभरात तरी अजूनही हा विषय घेतला जात नाही. लक्षवेधीच्या माध्यमातून चांगला विषय आलेला आहे. महापौर मॅडम तुमच्याकडे आमचं नम्र निवेदन आहे की या विषयाला कुठेतरी रूलींग द्या. एखादं रूलींग देऊन हा विषय तडीस न्या कारण काय होतं प्रत्येक वेळी सदस्य बोलतात त्यावर कुठलीही ठोस कारवाई होत नाही. प्रशासनाची उच्छाच नाही की उपोषणाला माणसे का बसली कुठे त्रास होतोय तरी तुमच्याकडे निवेदन आहे की याला रूलींग द्यावे. हा विषय झाल्यावर एक रूलींग पास करावा.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, या शहरामध्ये गेली ४ वर्षा पासून फेरीवाल्यांच्या संदर्भामध्ये अनेक सदस्यांनी तक्रारी केल्या आहेत ते आपल्याला माहित आहे. आज या शहराचे आमदार नरेंद्र मेहताजी यांना धन्यवाद देईल कारण हा बऱ्याच दिवसाचा विषय आपण त्यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून घेतलेला आहे. महापौर मॅडम आज या शहरामध्ये चारही पोलिस स्टेशन मधून माहिती घ्या. या फेरीवाल्यामुळे अनेकांचा अपघातामध्ये बळी गेलेला आहे आणि जे गेलेत ते वापस येऊ शकत नाही त्यांचे परिवार उध्दवस्त झालेत मग ४ वर्षापासून प्रशासनाने जे लापरवाई केली तर त्या अधिकाऱ्यांवर काही कारवाई होणार का? कारण या शहरामध्ये हातगाडीवाले गाडी वर गाडी करून सगळे रस्ते आज आपण शहरामध्ये रस्ता रूंदीकरणाचा काम करतोय रस्ता रूंदीकरणामध्ये अनेकांची आपण कारवाई केली या शहरामध्ये शहराचा विकास होतोय आणि विकासासाठी जे आपण सर्वपरिने काम करतोय त्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो पण जे फेरीवाले आहेत ज्यांच दुकान नाही, ज्यांचे घर नाही ते रस्त्यावर त्यांनी घर बांधून बसले गेले ४ वर्ष झाले अनेक सदस्यांनी उपोषण, आंदोलन आणि आमदार साहेब ही आपण मिरारोडला आंदोलन, उपोषण केले होते. त्या आंदोलनाच्या नंतर जे काही परिस्थिती होती. दळवी साहेबांनी तर सभागृहामध्ये अनेक वेळा बोलले कमिशन साहेब आम्हाला उत्तर द्या. या कारवाईचे स्वरूप कसे असेल का डामाडोल असेल फक्त लक्षवेधी मांडली अस प्रत्येक वेळेला होते आणि या वेळेला या प्रशासनावर ज्यांनी ४ वर्षे फेरिवालासाठी सक्त भूमिका घेतली नाही. कुठलीच कारवाई केली नाही. अनेक सदस्य बोंबलून ओरडून शांत बसले काही लोकांनी उपोषण करुन शांत बसले आश्वासनावर आश्वासन ४ वर्षे झाले. आश्वासनच चालले आहे. आज लक्षवेधी घेतलेली आहे. या लक्षवेधीला तरी कमीत कमी प्रशासन खानापूर्ती करेल का?

मा. महापौर :-

भोसले साहेब थोडक्यात मांडा............

अनिल भोसले :-

महापौर मॅडम थोडक्यात थोडक्यात म्हणून त्या थोडक्याच अपार झालं आहे. या शहरामध्ये आणि सगळ्यांचे तोंड गप्प केल्यामुळे आज जे या शहरामध्ये लोक मेलीत त्यांचा वारीस कोण? त्यांचा महानगरपालिका जबाबदारी घेऊन खर्च देणार का? त्यांच्या मुलांचे शिक्षण वंचित झाले आहे. जे चांगले

इंग्लिश मिडियममध्ये शिकत होते ते चांगल्या ठिकाणी शिकत होते ते म्युनिसिपाल्टीमध्ये शिकतात अशी परिस्थिती झाली आहे. ४ वर्ष झाले मी याच विषयावर बोलत आहे आज आमदारांनी लक्षवेधी मांडली आहे. प्रशासनाने सिरियसली घेतले नाही म्हणून आमदारांना लक्षवेधी मांडायची पाळी आली आहे. जे बळी गेलेत ते यांच्यामुळे गेलेत.
(सभागृहात गोंधळ)
मा. महापौर :-
भोसले साहेब प्लीज बसून जा उत्तर देते.
अनिल भोसले :-
समाधानकारक उत्तर द्यावे अशी विनंती.

नयना वसाणी :-
महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते प्रत्येक वेळी महासभेमध्ये फेरिवाला विषयी सदस्यांनी तक्रार केलेली आहे. हा विषय सुध्दा आणलेला आहे आणि गेल्या २-३ महासभेमध्ये आयुक्तांनी अस सांगितल की फेरिवाल्यांवर कारवाई करायला प्रशासन तयार आहे नगरसेवकांनी मध्ये येऊ नये असं आपण आयुक्त महोदय महासभेमध्ये बोलला होतात आणि आता गेल्या काही दिवसाआधी परत आपण जाहिरमध्ये वर्तमानपत्रामध्ये असे स्टेटमेंट दिलेले आहे की फेरिवाल्यांना नगरसेवक उठू देत नाही. नगरसेवक मधे येत आहेत माझी आपल्याला विनंती आहे की नगरसेवकाचे नाव आपण जाहिर करावे अन्यथा सदस्यांना आपण बदनाम करु नये. आपण असं जाहिर स्टेटमेंट दिलेले आहे कुठल्या नगरसेवकांनी मध्ये अडथळा आणला त्यांचे नाव जाहिर करावे.
दिप्ती भट :-
महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आयुक्त साहेब आपल्याला सांगते माझ्या वॉर्डमध्ये आपल्या ठेक्यामध्ये मार्केट दिलेले नाही आणि मी वारंवार कम्पलेंट केली आहे पण ते बाजार अजून पण माझ्या वॉर्डामध्ये प्रभाग ३८ मध्ये अजून भरतोय. आपल्याला खूप रिक्वेस्ट आहे की ते मार्केट सोमवार बाजार हटवण्यात यावे. आणि आज तुम्ही हटवणार असाल तरच सांगा कारण मी वारंवार पत्र व्यवहार करते आणि आपल्याकडून रिप्लाय मॅडम उपोषणाला बसू नका हे नका करु अस आता आम्ही कारवाई करतो आम्हाला तिथे जाऊन उभे रहायला लागते मग पोलिस प्रोटेक्शन भेटते असं म्हणजे चुकीचे वाटत आहे आम्हाला पण लोकांमध्ये की पालिका कारवाई करत नाही. सगळ्याच सेटलमेंट झाल म्हणजे शब्द आम्हाला ऐकायला होत नाही आता तर आपण जे पण आहे ते क्लिअर करावे. क्लिअर करणार की नाही ते पण आणि दुसरे की नॉन हॉकर्स झोनमध्ये जे बसतात बोर्ड लावलेले आहेत त्याच्यामध्ये आपण कमीटी बनवणार होते ते आम्हाला सगळ्यांना माहिती द्या की कमीटी कुठपर्यंत लायसन्स द्यायची ते कुठपर्यंत प्रोसेस पोहोचलेली आहे आणि आपण जे कमीटी बनवणार आहे ते या मे महिन्यामध्ये आपण बोलत होते तर जून आला तर आपण कधी बनवणार आहे. आणि महापौर मॅडम मी याच्या अगोदर माझे जे वर्डस् असेल ते त्यांनी चेंज करावे कारण हेच डॉक्युमेंट पुढे प्रॉब्लेम करणार शब्दांचे की मी असं सांगितले की ॲग्रीमेंट मधून जे पण मंदिर आहे त्यांना संस्थाला देण्यात यावे आणि आर.जी. जे खाली आहे २०१० च्या हिशोबांनी शासनाच्या नियमाप्रमाणे त्याच आर.जी. घेण्यात याव्या आणि बाकी जे मंदिर आणि ते बांधले आहे ते मंदिराच्या संस्थाला देण्यात यावे नाहीतर पुढे ते बोलण्यामध्ये मिस्टेक करुन चुकीचे करणार.
रवि व्यास :-
महापौर मॅडम आपकी परमिशन से बोलना चाहता हूँ मेरे प्रभाग क्र. २ में बॉम्बे मार्केट शिवसेना गली का जो क्षेत्र है जो की मिरा भाईंदर महानगरपालिका ने ना फेरिवाला क्षेत्र ऑलरेडी घोषित किया हुआ है। आयुक्त साहब जैसे की ३-४ महिने पहिले जब काफी बार आपको कम्पलेन्ट की थी तब आपने प्रभाग अधिकारी द्वारा वहाँ पे कारवाई की थी। आपको यह बताना चाहता हूँ की शिवसेना गली वहाँ पे ३ स्कूल है और वह गली बहुत ही छोटी है और डेड एन्ड है आने और जाने का एकही रास्ता है। वहाँ पे गणेश देवल नगर वहाँ ४० से ५० हजार लोगो की बस्ती है। प्लस साथ में १५-२० हजार लोग जो भी बिल्डींगो में रहते है और आने और जाने के लिए सिर्फ एकही गली है जैसे शिवसेना गली जनता नगर बोला जाता है वो ऑलरेडी ना फेरिवाला क्षेत्र है। फिर भी वहाँ पे फेरिवाले रोड पे इतनी ज्यादा संख्या में बैठते है और गॅस सिलेंडर लेके सारी चिजे लेके बैठते है। उसके लिए कई पत्रव्यवहार मैंने किए है कॉर्पोरेशन के साथ में, पोलिस स्टेशन के साथ में उसके लिए जब प्रभाग अधिकारी वहाँ पे कारवाई करने जाते है ऐसी बात नही है वो पहले जब गए थे लेकिन वहाँ के जो फेरिवाला है वहाँ की उनकी युनियन है वो इतने अग्रेसिव है। वो इतनी गुंडागर्दी और दादागीरी करते है की और आपके अधिकारीयों के उपर भी वो लोग झुठे केसेस नगरसेवक पे झुठे केसेस इस तरीके से वो लोग कहते है। उनके युनियन के लॉयर्स वगैरा सब है तो वो लोग बहोत ही ऑरगनाईज तरीके से मतलब प्रशासन के खिलाफ, नगरसेवक के खिलाफ झुठे केसेस और झुठी कारवाई करते है। तो उसके लिए आपके अधिकारी भी शिवसेना गली में खास कर कारवाई करने के लिए वहाँ पे आने से डरते है, अवॉईड करते है। वे बोलते है की वहाँ पे जाऐंगे तो हम लोगो पे केस हो जाएगा। वसंत राणे, संजय दोंदे इन लोगो पे ऑलरेडी केसेस हो चुके है। मेरे उपर एक्स्टॉर्शन का झुठा केस वो संस्था के द्वारा हो चुका है। मैं आपको आयुक्त साहब को यह कहना चाहता हूँ की, आपके पास

५० बाऊन्सर है और अभी तो पोलिस के अलग से अॅडीशनल फोर्स भी है। तो आप अगर वहाँ पे दो बाऊन्सर खाली आप अपॉईंट करे की सुबह २-३ घंटा बैठे और शाम को २-३ घंटा बैठे वहाँ पे अगर २-२ आदमी भी बैठे और उन लोगो को वहाँ पे लगाने ही नही दिया जाए तो उस समस्या का समाधान हो जाएगा। और में आपसे साहब विनंती करता हूँ की, जो-जो स्पॉट है फेरिवालो की जहाँ पे ज्यादा समस्या है नगरसेवक से आप लिजिए की कौन से स्पॉर्ट पे ज्यादा कम्प्लेन्टस आती है। उस स्पॉट से आप २-२ बाऊंसर या आपके २-२ के पथक के कर्मचारी अगर आप परमनन्टली अपॉइन्ट कर देंगे उस समय के लिए तो सुबह से ही वो लोग उनको लगाने ही ना दे तो उसका सोल्युशन कही ना कही होगा नही तो क्या है फेरिवाला पथक को फोन करेंगे वो गाडी लेके जाऐंगे। जब तक वहाँ से फेरिवाले आगे पिछे हो जाते है तो कारवाई प्रॅक्टीकली पॉसिबल नही होती है। अगर हम पर्मनन्टली १ वॉचमन की तरह या सेक्युरीटी के हिसाब से हम लोग आयडेन्टीफाय करके वहाँ पे लगाए तो कुछ ना कुछ हो सकता है। साथ में म्हसाळ सर मैंने स्टॅन्डींग कमिटी में भी दो बार बोला है आमदार साहब और महापौर मॅडम ने भी आपको विनंती की है की फेरिवाला जो पथक है वो काफी सालो से एकही पथक चल रहा है। उन लोगो के फेरिवालो से रिलेशन बन गए है। उन लोगो की आपस में ताल मेल है तो कारवाई हो नही पाती है। आपको विनंती है की उनका पुरा का पुरा डिपार्टमेंट से ट्रान्सफर किया जाए। ट्रान्सफर ऐसा नही की वेस्ट वालो को ईस्ट में और मिरारोड में डाले। उनका डिपार्टमेंट चेंज किया जाए। आपको काफी बार विनंती कर चुके है फिर भी आपने अभी तक कोई इसपे कारवाई नही की है। मैं आपसे यह विनंती करता हूँ की जल्द से जल्द इस समस्या का समाधान किया जाए।

मा. महापौर :-

सभी नगरसेवक से विनंती करती हूँ की, यह जो फेरिवालो की समस्या आप जो बोल रहे हो अपने-अपने वॉर्ड की पुरे शहर के लिए यह कॉमन है और आप जो भी उठके बोलोगे वो आपके वॉर्ड के लिए बोलेंगे। कमिशनर साहब अभी पुरे शहर के लिए वो क्या कर सकते है वो बता रहे है। तो आप लोग प्लीज बैठ जाए। आपके वॉर्ड की समस्या भी उसी समय सॉल्व्ह हो जाएगी।

मा. आयुक्त :-

सभागृहाचे गांभिर्य माझ्या लक्षात आले आहे मला बोलु द्या.

शिल्पा भावसार :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलु इच्छिते, कमिशनर साहब आपणांस मी नम्र विनंती करते की मी पण वारंवार पत्रव्यवहार केलेले आहेत. माझ्या वॉर्डात सिल्वर पार्कमध्ये पण खूपच फेरिवाले लागलेले आहेत. २ फेरिवाल्यांमध्ये एक अर्धा इंच पण जागा नाही त्यांनी एवढे गीचोगीच फेरिवाल्यांचे अतिक्रमण झालेले आहे. गाड्या घेऊन जातात पण परत ते गाड्या लावतात. विजय पार्कपर्यंत पूर्ण पॅक झालेले आहे. बस स्टॉप सुध्दा आपला अतिक्रमण झाला आहे.

मा. महापौर :-

शिल्पाजी यह सभी के लिए कॉमन समस्या है।

शिल्पा भावसार :-

मॅडम मिरा भाईंदर हायवे भी कवर किया है।

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम एक मिनिट मी कोणत्या वॉर्डा विषयी बोलत नाही.

शिल्पा भावसार :-

मॅडम हायवे पे लोगो को चलने के लिए जगह नही। हायवे पे ट्रॅफीक है तो हायवे पे भी वो गाडी लगाते है।

मा. महापौर :-

शिल्पाजी मैं वही बोल रही हूँ यह पूर्ण शहर की समस्या है आप बैठ जाइए।

प्रभात पाटील :-

मॅडम मला एवढच सांगायचे आहे की या शहरामध्ये या महासभेमध्ये आतापर्यंत फेरिवाला वर खुप चर्चा झाली बऱ्याचदा झाली. सगळ्यांनी आमदारांचे अभिनंदन केलं. पण मी असं म्हणेन की आमदारांना ही वेळ यावीच का? ही वेळ आमदारांवर का यावी की त्यांनी या विषयाला हात घालावा. याचा अर्थ तुम्ही आम्हा नगरसेवकांचे या सभागृह नेत्यांचे ऐकणारच नाही. आज आमदारांनी मांडलेल्या लक्षवेधीला इतकं मोठ वेटेज आहे आनंद आहे त्या गोष्टीचा. पण आता तरी कारवाई व्हायला पाहिजे. त्यांच्या शब्दाखातर तरी या शहरात कारवाई व्हायला पाहिजे. तुम्ही लोकांना नोटिसा न देता तुम्ही अनधिकृत बांधणार, रस्ते वाईंडींग करण्याच्या नावाने.

मा. आयुक्त :-

तो विषय नंतर आहे.

प्रभात पाटील :-

एक मिनिट मला बोलु द्या. परंतु तुम्ही तोडलेल्या ठिकाणी..............

मा. महापौर :-

प्रभात ताई आपण त्या विषयावर बोलत नाही. बसा नंतर त्या विषयावर बोलायची संधी दिली जाणार. पहिले फेरिवालाचा विषय होऊ द्या.

प्रभात पाटील :-

मी फेरिवाल्यावर बोलते. तुम्ही तोडलेल्या जागी फेरिवाला बसलेत. त्यांच्यावर का कारवाई नाही? तुम्ही रस्ते बंद करायचे आणि तिथे काय फेरिवाल्यांना जागा द्यायच्या का? लोकांना बेघर करायचे आणि फेरिवाल्यांना बसवायचे का? त्याच्यावर का तुम्ही लक्ष देत नाही. तुमचे प्रभाग अधिकारी सगळे बदला. तुमच्याकडे जेवढा लेडिज स्टाफ आहे ना तेवढ्या सगळ्यांना प्रभाग अधिकारी बनवा, आम्ही पोटतिडकीने बोलतो फेरिवाला हटवा म्हणून.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या लक्षवेधीला ते आमदार ही आहेत असो. खरोखरच ज्वलंत विषय आहे या शहराचा. हा विषय त्यांनी या सभागृहात मांडलेला आहे. गाऱ्हाणे सगळ्यांचे तेच आहे काळजाचा कोळसा करुन लोक बोलत आहेत. प्रशासनाला काही त्याचा फरक पडत नाही आणि आयुक्त काय उत्तर देणार आहेत तेमी तुम्हाला सांगतो.

मा. आयुक्त :-

माझं उत्तर तुम्ही देणार असाल तर मला उत्तर द्यायची आवश्यकता नाही. आयुक्त काय उत्तर देणार त्याचा अधिकार तुम्हाला नाही.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

आमचा अधिकार तुम्ही आम्हाला सांगु नका. तुमचा अधिकार तुमच्यापर्यंतच ठेवा.

मा. महापौर :-

तुम्ही तुमच मांडा काय मांडायचे.

मा. आयुक्त :-

आपण उत्तर देण्याचा प्रयत्न करायचा नाही.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

आम्हाला वारंवार मिळालेले तुमच्या माध्यमातून उत्तर राष्ट्र फेरिवाला धोरण हे एकमेव उत्तर असणार आहे. महापौर मॅडम विषय आला म्हणून आणि साहेब तुम्ही विधान भवनमध्ये.............

मा. आयुक्त :-

आपले उत्तर सभागृहात मांडावे. आयुक्त काय करणार ते तुम्हाला मांडण्याची आवश्यकता नाही एवढे माझे म्हणणे आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त काय मांडतात. आजपर्यंत किंवा त्यांनी काय मांडणार तेच मी बोललो. पाहिजे तर परत ऐकून घ्या रेकॉर्डींग.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्र शासनाने धोरण निश्चित केले राष्ट्रीय फेरिवाला धोरण राष्ट्रीय फेरीवाला हा एक निश्चित केला आहे. त्याची अंमलबजावणी प्रत्येक राज्याने करायची. त्यांना एक स्वतंत्र धोरण निश्चित करायला सांगितले आहे. मात्र राष्ट्रीय फेरिवाला धोरण जे केंद्र शासनाने निश्चित करुन दिलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ज्याला मंजुरी दिली आहे त्याच्यामध्ये कुठे अंतर्भुत होणार नाही. कमीत कमी या फेरिवाल्यांच्या वरती कारवाई करताना जस कुठल्या तरी एका सदस्याने मध्ये सांगितले की युनियनला घेऊन ते आपल्यावरती प्रेशर दबावतंत्र आणण्याचा प्रयत्न करतात. आणु द्या त्यांना दबावतंत्र काय आणायचं मात्र आपल्याकडून सर्वेक्षण नाही झालं तरी आपण राष्ट्रीय फेरिवाला धोरणाचे निष्कर्ष ते त्यांनी आपल्याला दिलेत त्याप्रमाणे आपण कारवाई करु शकतो. आयुक्त महोदय त्या कारवाई करायला आपल्याला कोणी थांबवलेले नाही.

मा. महापौर :-

सबसे पहले आप कमिशनर को सुन लिजीए। अगर आपको लगता है की आपके आन्सर नही आए तो आपको वापस बोलने देंगे।

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम या विषयाला धरुन बोलते आयुक्त महोदय सगळ्यांनी आपआपले मनोगत व्यक्त केले. सगळे बोलतात की फेरिवाल्यांचा त्रास आहे. लोकांनी या जनतेने भाजी खावी की नाही. आपण फ्रुट खावे की नाही. याच्यावर कुणी विचार केला का? एक महत्वाचा विषय आहे मटण खावे की नाही? सगळ्यांनी सांगितले लक्षवेधी आणली, सगळे बोलले त्रास आहे. प्रत्येकाच्या वॉर्डात त्रास आहे मी म्हणते माझ्या वॉर्डात त्रास आहे. मग आपण जनतेने जगावे कसे? भाज्या आणायला कुठे जायचं मुंबईला जायचं का वाशीला जायचं, का ठाण्याला जायचं, का वसई-विरारला जायचं याचे उत्तर पाहिजे. ज्या ठिकाणी फेरिवाला क्षेत्र आहे आणि काही ठिकाणी करुन घ्यावे हा महत्वाचा मुद्दा आहे. मी सगळ्यांचे ऐकते सगळे बोलतात,

पोटतिडकीने बोलतात पण ज्या ठिकाणी मतदार आमचे आम्हाला म्हणतात की आम्हाला भाज्या, आम्हाला फ्रुट, आम्हाला मासे जवळ पाहिजे त्यांचे कोण उत्तर देणार? त्यांना जवाब कोण देणार, त्यांना सुविधा त्यांची फॅसिलिटी कोण त्यांना करुन देणार? आयुक्त महोदययाची सुध्दा नोंद घेणे. महापौर मॅडम फार महत्वाचा मुद्दा आहे.

मा. महापौर :-

तुमचा मुद्दा लक्षात आला बसा खाली आयुक्त साहेब तुम्ही खुलासा करा आता. सगळ्यांनी बसुन जा.

अशरफ शेख :-

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलतो मला फक्त दोन मिनिट बोलु द्या. शोर मचाना मेरा मकसद नही, मेरी तो यह कोशिश है की सुरत बदलनी चाहिए। यह सुरत नही बदल रही है महापौर मॅडम।

मा. महापौर :-

आपको विनंती है आप बैठ जाइए देखिए सभी के विषय समझ में आ गया है। आयुक्त को भी अपना मांडने दिजीए।

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने मी या सभागृहाच्या भावना माझ्या लक्षात आलेल्या आहेत. त्या भावनांचा आदर करुन मी सभागृहाला या प्रश्नाचे उत्तर देऊ इच्छितो की सभागृहाला खऱ्या अर्थाने चिंतन आणि मनन करण्याची आवश्यकता आहे की मिरा भाईंदर शहरामध्ये ही वेळ का आली? या शहरामध्ये डी.पी. प्लानची अंमलबजावणी करत असताना यापूर्वी जुबेरजी आपण ऐकताय ना? तर यापूर्वी ज्यावेळी या शहरामध्ये डी.पी. प्लानची अंमलबजावणी केली त्यावेळी या सभागृहामध्ये १९९७ ला प्लान आला. प्लान आल्यानंतर तो ९७ च्या महासभेने मंजूर केला त्यानंतर मंजूर झाल्यानंतर या प्लानप्रमाणे अंमलबजावणी सुरु झाली. अनेक रस्ते विकसित झाले, अनेक गार्डन विकसित झाले आणि अनेक खेळाचे मैदान विकसित झाले. शाळा विकसित झाल्या मात्र सामान्य नागरिक या ठिकाणी जी गती आहे १९८५ च्या अगोदर ग्रामपंचायत होती, ग्रामपंचायतची नगरपालिका ८५ मध्ये झाली, ८५ नंतर २००२ मध्ये ही महानगरपालिका झाली आणि या शहराची लोकसंख्या ज्या गतीने वाढत आहे त्या गतीने वाढत असताना या ठिकाणी इमारत उभे करण्याचे काम फार जोरात चालले परंतु पाठीमागे कोणीही याच्याकडे बारकाईने लक्ष दिले नाही असं प्रशासनाचं या ठिकाणी ओपिनियन आहे. मला एखादा एरिया असा दाखवा की या एरियामध्ये भाजी मार्केट आहे या एरियामध्ये फ्रुट मार्केट आहे या एरियामध्ये मच्छी मार्केट आहे. या एरियामध्ये मटण मार्केट आहे. या एरियामध्ये फेरिवाला झोनसाठी झोन आहे असं काहीही या शहरामध्ये मागच्या पिरेडमध्ये उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे आज सभागृहामध्ये ही वेळ आलेली आहे आणि मी माझ्या कामामध्ये कधीही कामचुकारपणा करणार नाही हे मी सभागृहाला निश्चितपणे सांगु इच्छितो आणि सभागृहामध्ये द्विधा मनस्थिती निर्माण झाली. मा. आमदारांनी विषय आणला. आमदारांनी विषय आणला असे बरेच सदस्य बोलले पण मा. आमदार या सभागृहाचे सन्मा. सदस्य आहेत हे ते लोक विसरलेत का? अस मला या ठिकाणी बोलावस वाटते. कारण मा. आमदारांना जरी विधानभवनामध्ये प्रश्न मांडण्याचा अधिकार असला तिथे लक्षवेधी करण्याचा अधिकार असला तिथे लक्षवेधी करण्याचा अधिकार असला तरी या सभागृहाचे ते सन्मा. सदस्य आहेत त्यांनी या सभागृहाचे सदस्य म्हणून एखादा विषय आणला, की आमदारावरती ही वेळ आली असं म्हणण्याची आवश्यकता नाही कारण प्रशासनाने वेळोवेळी या ठिकाणी कारवाई केलेली आहे. मात्र त्या कारवाईने आपले समाधान झाले नाही यामुळे मी या सभागृहाला निश्चितपणे या विषयावर जास्त भाषण न करता मी आपल्याला सांगु इच्छितो की ज्या-ज्या रस्त्यावरती हे फेरिवाले लोक बसून नागरिकांना रहदारीसाठी अडथळा निर्माण करतात किंवा त्यांच्यामुळे रहदारीला फार मोठा अडथळा निर्माण होतो आणि साध्या नागरिकांना पायी देखील चालता येता नाही. बाजारामध्ये दुपारी तर फार बेकार परिस्थिती असते बाजारच्या दिवशी आणि संध्याकाळी ४ च्या नंतर सुरु होतो आणि अशी परिस्थिती निर्माण होते ज्या ठिकाणी अस क्षेत्र आहे हे क्षेत्र तर आमच्याकडे लिखित आहे परंतु आतापर्यंत ही वॉर्ड ऑफिसरची जबाबदारी होती आतापर्यंत आपण वॉर्डवाईज ही कारवाई केली परंतु ती कारवाई ठोस झाली असे वाटले नाही. आणि अनेक पक्षांनी त्यामध्ये बऱ्याचवेळा आमच्याकडे निवेदन दिले आम्ही त्यांना आश्वासन दिले आम्ही कारवाई केली पण त्या कारवाईने माझे देखील समाधान झाले नाही समोरच्या पार्टीचे देखील समाधान झाले नाही. आता हा विषय नुसत्या मिरा भाईदरच्या एका नागरिकांचा किवा सन्मा. एका नगरसेवकाचा विषय राहिला नाही किंवा आमदार साहेबांचा एकट्याचा विषय राहिलेला नाही. संपूर्ण शहराचा विषय आहे. संपूर्ण शहराची जबाबदारी माझ्यावरती आहे त्यामुळे मी आपल्याला निश्चितपणे सांगु इच्छितो की अशी अडथळ्याची क्षेत्र आहे त्याचा आम्ही छाणणी येत्या आठवड्यामध्ये आणि नेक्स्ट विकमध्ये हा प्रोग्राम लावू. आणि प्रोग्राम एक दिवस न लावता हा कन्टीन्युशनमध्ये प्रोग्राम चालवून एक महिनाभरामध्ये त्या ठिकाणी कुणीही बसणार नाही याची गॅरेन्टी मी १०० टक्के आपल्याला देतो. जशी आपण मोठ्या प्रमाणावर कारवाई जी आता रस्ता रुंदीकरणाची कारवाई केली त्या पध्दतीने सगळे अधिकारी याच्यामध्ये ५

प्रभाग अधिकारी, ५ डेप्यूटी इंजिनिअर, ५ ज्युनियर इंजिनिअर, ५ आमचे २ उपायुक्त अशी मोठी कारवाई आमचा आराखडा तयार करुन येथील १० लाख नागरीकांना अजिबात त्रास होणार नाही याची दखल १०० टक्के मी या ठिकाणी घेतो आणि आपल्याला आश्वासन देतो की यापुढे फेरिवाला धोरणाच्या विरुध्द १०० टक्के आम्ही कारवाई करु. जरी मा. कोर्टाचे निर्देश असले तरी नागरिकांना अडथळा निर्माण करावा असं कोर्टाने कधी म्हटलेले नाही. परंतु तो कागद घेऊन लोक फिरतात की आमच्यावर कारवाई करु नये असा आदेश आहे,फेरिवाल्यांना आदेश आहे. त्यांना धंदा करायला आमची मनाई नाही. परंतु आमचा जर ५० फुटाचा रस्ता असेल आणि तो १०० टक्के ब्लॉक केला असेल अनेक नागरी संघटना माझ्याकडे आल्या त्यांना मी फोटो दाखवले की या पध्दतीने तुमचे लोक व्यवसाय करतात इथून लेडीजने जायचे कुठून, पुरुषाने कुठून जायचे म्हणून आम्ही याची आखणी करु आणि पुढच्या आठवड्यात म्हणजे ४ तारखेनंतर या कारवाईला सुरुवात होईल एवढे आश्वासन या ठिकाणी देतो, आणि एकही फेरिवाला रस्त्यावर बसु दिले जाणार नाही हे मी आपल्याला निश्चितपणे सांगतो. वसाणी मॅडमने एक प्रश्न केला आता की साहेब तुम्ही स्टेटमेंट दिले की नगरसेवक बदनामी करतात नावे डिक्लेर करा वगैरे तर मी आपल्या माहितीस्तव सभागृहामध्ये सांगु इच्छितो की, कोणत्याही पत्रकाराने येऊन माझी मुलाखत घेतलेली नाही आणि कोणत्याही नगरसेवकाचे नाव मी त्यांच्यासमोर सांगितलेले नाही की या नगरसेवकाने अडथळा केला या नगरसेवकाने हफ्ता मागितला अमक केले ही जी सभागृहात वाच्यता झाली त्याच्याबद्दल मी सांगू इच्छितो की पेपरला आलेली १०० टक्के बातमी खरीच असते असं नाही.

नयना वसाणी :-

मग तुम्ही तशी प्रेस नोट काढा की मी असं कुठलं स्टेटमेंट दिलेले नाही.

मा. आयुक्त :-

मी अशा प्रकारचं स्टेटमेन्ट कुठल्याही पत्रकाराला दिलेले नाही. ज्या कोणी पत्रकाराला माझी विनंती आहे की बऱ्याचशा पेपरला बातम्या येतात त्या बातम्या काही गोष्टी माहित नसताना छापल्या जातात अस माझं वैयक्तीक मत आहे त्याच्यामुळे पत्रकार मंडळीनी देखील जे काही त्यांच्या मनामध्ये बातमी देण्याबद्दल असेल त्याबद्दल आयुक्तांची भुमिका विचारात घेऊन त्यांनी काय छापायचे ते छापावे त्याच्याबद्दल माझं दुमत नाही त्यांचा छापण्याचा अधिकार आहे. त्यांचा अधिकार आम्ही कधीच हिरावून घेणार नाही. परंतु एखाद्या गोष्टीला समजा फेरिवाला धोरणाबद्दल काय असेल ते आम्हाला विचारा कमीत कमी विचारल्यानंतर तुम्ही छापा पण न विचारता छापता तुम्ही असे गैरसमज होतात. त्यामुळे मी कोणत्याही पत्रकाराला असं म्हटलेले नाही हे नगरसेवकांनी हफ्ता घेतला आणि त्या नगरसेवकाचे नाव डिक्लेर केले असा विषय नाही. आमदार साहेब आपण लक्षवेधी सभागृहात उपस्थित केली आहे आणि मी आपल्याला १०० टक्के गॅरेन्टी देतो की एक महिन्यामध्ये मी एकही रस्त्यावर माणूस बसू देणार नाही. ४ तारखेपासून आता पावसाळ्यात आम्हाला दुसरे काही काम नाही. एवढी एकमेव कारवाई हातामध्ये घेऊन १०० टक्के यशस्वी करुन दाखवेल. सभागृहाला ऐवढे आश्वासन देतो.

वंदना चक्रे :-

आयुक्त साहेब माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही भाज्या खायच्या की नाही, फ्रुट खायचे की नाही.

मा. आयुक्त :-

रस्त्यावर बसून खायचे नाही घरात बसून खायचे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, चक्रे मॅडमने कदाचित ऐकले नाही............

वंदना चक्रे :-

तुम्ही मोठी माणसे तुम्ही बाहेरुन आणून खाणार. बाकीच्यांचे काय?

मा. महापौर :-

आपण ऐकून घ्या ना. त्यांनी पहिला पण सांगितले.

नरेंद्र मेहता :-

मी पहिलेच सांगितले की या शहरामध्ये काही अती आवश्यकता भाजी असेल, फ्रुट असेल या गरजेच्या बाबी आहेत कटलरी असेल, कपडे असेल दुसरे काही सामान असेल हे डे टू डे माणसाला लागत नाही. त्यांसाठी त्याची पर्यायी व्यवस्था केल्या शिवाय हे शक्य पण नाही की ५००० फेरिवाल्यांवर तुम्ही एका दिवसात कारवाई कराल आणि साफ होईल. माझी विनंती अशी आहे की हा न संपणारा विषय आहे आणि एवढ्या सदस्यामध्ये त्याचा निर्णय सुध्दा लागू शकत नाही. आपण जी भूमिका घेतली ती योग्य आहे. आपल्याला विनंती अशी आहे सर्व गटनेत्यांची बैठक महापौर मॅडम आपल्या दालनात बोलवावी आपण ठराविक पहिले रस्ते नक्की करुया. हे ठराविक जे शहराला अडथळा निर्माण करतात ज्याच्यामुळे ट्रफिकचा इश्यू असेल किंवा एकदम भाजी मार्केट झाले असे काही ठराविक १०-२० रस्ते असतील की काकांनी आता सूचना केली सन्मा. सदस्यांनी की एका विशेष अधिकाऱ्याची अपॉईंटमेंट करा ठराविक रस्ते घ्या ना साहेब आणि ते ठराविक करा. गटनेत्यांची बैठक यासाठी बोलतो की एखादा माझ्या एरियात दिपक हॉस्पीटलचा तो मार्केट काढायचा असेल तर मला आपल्याला दुसरीकडे शिफ्टींग करायला सहकार्य सुध्दा करावे लागणार आहे की यांना या ठिकाणी करा नाहीतर तिकडे ही मी विरोध करायचा इकडेही विरोध करायचा आणि फेरिवाला सगळे दुकान बंद करुन कोणी ५००० फेरिवाला इकडने जाणार नाही. तर कुठेतरी जे

महत्वाचे रस्ते आहेत किती बसावे कोणी बसावे याचे धोरण नक्की करणे गरजेचे आहे आणि या लक्षवेधीच्या माध्यमातून हे होऊ शकत नाही. महापौर मॅडम आपल्याकडे सर्व गटनेत्यांची बैठक घ्या. सर्वांचे ऐकुन घ्या आणि अशी ठराविक यादी तयार करा हे २० रस्ते २५ रस्ते आपण पूर्ण यंत्रणा लावू. मॅन पावर लावा, पोलिस फोर्स लावा, बाऊन्सर लावा जे लावायचे ते बंद म्हणजे ते बंद त्या पध्दतीने करा. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आपल्या दोघांचे धन्यवाद पुढील विषय घ्यावा अशी विनंती.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, आमदार साहेब मला एक मुद्दा सांगायचा होता की फेरिवाला धोरणाच्या बाबतीमध्ये मला एक थोडं निवेदन करायचं होते फेरिवाला समिती गठीत करण्याबद्दल शासनाचे आदेश प्राप्त झाले होते आपण नंतर आदेश आल्यानंतर ते रद्द केले आता फेरिवाला धोरणाबद्दलची नियमावली महाराष्ट्र राज्याने निश्चित केली आहे आणि थोड्याच दिवसामध्ये ती आपल्याला येईल तर ते फेरिवाला धोरण निश्चित झाल्यानंतर ती समिती गठित करायची आहे. त्या समितीलाच निर्णय घ्यायचा आहे की कोणत्या लोकांना कुठे बसवायचं. एका रस्त्यावर किती बसवायचे काय? त्यावेळी साहेब आपण हे करु पण तोपर्यंत ट्राय घेऊ द्या ना आम्हाला...........

(सभागृहात गोंधळ)

मॉरस रॉड्रीक्स :-

ते भाजीवाले किंवा मच्छीवाले हातगाड्या घेऊन किंवा टोपल्या घेऊन सर्व विकायला जातात. इकडे काय जरुरी नाही का मार्केट लागलेच पाहिजे. ते काढलेच पाहिजे सर्व रस्ते क्लिअर केले पाहिजे. आपण रस्त्यासाठी का खर्च करतो.

मा. आयुक्त :-

आपल्या मताशी सहमत आहे आम्ही ड्राईव्ह ४ तारखेला चालु करु.

निलम ढवण :-

महापौर मॅडम आयुक्त साहेब आपण करत असलेले प्रयत्न योग्य आहे. परंतु दिवसेंदिवस ही फेरिवाल्यांची संख्या वाढत आहे. फेरिवाल्यांचा मागच्या वेळी सर्व्हे झालेला आहे आणि त्या सर्व्हेची लिस्ट प्रभाग कार्यालयामध्ये आहे. दिवसेंदिवस नवीन नवीन गाड्या तयार करुन नविन नविन जे वाढत आहेत त्यांच्यामध्ये, त्यांच्यावर तुम्ही हे कस करणार त्यांना बंदी कशी घालणार कारण त्यांना बंदी घातल्याशिवाय साहेब पुढे हा प्रॉब्लेम खूपच वाढत जाणार आहे.

मा. आयुक्त :-

मॅडम मी माझे निवेदन केल्यानंतर सभागृहाच्या सगळ्या भावना लक्षात घेऊन निवेदन केले आहे पुन्हा तोच विषय घेऊ नये अशी विनंती.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब तशी ड्राईव्ह तुम्ही घ्याच आणि ना फेरिवाला क्षेत्र जे घोषित केले आहे पहिलेपासून आणि जे जे रस्त्यांना आता खूपच अडथळा निर्माण आहे ते पहिले क्लिअर करायला घ्या आणि तिथून नागरिकांना सोयी करुन द्या तशी मी रुलिंग देते इथून आणि ते सगळे ड्राईव्ह उद्यापासून ते चालू करणार आहे तर सगळ्यांनी बसून जा.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ०१, दि. ०४/०९/२०१५, दि. १५/१०/२०१५, दि. ०४/१२/२०१५ व दि. १८/०१/२०१६ (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

प्रेमनाथ पाटील :-

पान क्र. ३९ साहेब प्रकरण क्र. ९७.

नगरसचिव :-

पान नं. ३९ ला ठराव ४६ प्रकरण ७२ आहे.

भगवती शर्मा :-

६९ के अंदर में सचिव साहब महापौर मॅडमने एक परिपत्रक का जो था ना उसके अंदर में वोटिंग में उन्होंने लिखा था की ठरावाच्या बाजूने २९ आणि विरोधात २७. पर वोटिंग का जब निकालेंगे ना उसमें २८ और २७ है।

नगरसचिव :-

चेक करके देखता हूँ।

प्रेमनाथ पाटील :-

१५/१०/२०१५ चालु आहे ना त्याच्यामध्ये प्रकरण क्र. ९७ महापौर मॅडम आपण एक ठराव केला होता सर्व धर्मीयांच्या सणउत्सवासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मॅडम प्रशांत केळुसकरने ठराव मांडला आणि मी त्याचे अनुमोदन दिले होते. मॅडम त्यामध्ये मागील जे ५ गुडीपाडवा, धारावी माता मंदिर, फातीमा उत्सव, शिवजयंती, महाराणा प्रताप जयंती आणि बाबासाहेब आंबेडकर जयंती मॅडम हा ठराव आपण सर्वानुमते मंजूर केला असताना सुध्दा आयुक्त साहेबांनी विखंडीत करायला पाठवला आहे. त्याच कारण काय? आणि महानगरपालिका अधिनियम १९४९ कुठल्या कलमानुसार ते पण आम्हाला सांगण्यात यावे.

मा. आयुक्त :-

अशा प्रकारचा निधी वितरीत करण्याचे प्रोव्हिजन आपल्या महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये नसल्याकारणाने तो आपण विखंडनला पाठवला आहे.

प्रेमनाथ पाटील :-

कुठल्या ॲक्टखाली साहेब?

मा. आयुक्त :-

महानगरपालिका कायद्यामध्ये अशी तरतूद नाही.

प्रेमनाथ पाटील :-

तुम्ही विखंडीतला पाठवले त्याचे पण नियम असेल ना कुठल्या कलमानुसार.

मा. आयुक्त :-

४५१ प्रमाणे विखंडीतला पाठविले आहे.

प्रेमनाथ पाटील :-

४५१ साहेब वाचून दाखवले तर बरे होईल.

मा. आयुक्त :-

४५१ चा पहिला पॅरेग्राफ वाचून दाखवा.

प्रेमनाथ पाटील :-

४५१- मनपाच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशांचे कार्यान्वयन केल्याने किंवा मनपा कडून किंवा अशा प्राधिकाऱ्याकडून किंवा तिच्या किंवा त्यांच्यावतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याची शक्यता आहे किंवा जी करण्यात येत असेल ती केल्याने हा अधिनियम किंवा त्यावळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्न्वये देण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या विरुध्द किंवा मर्यादेबाहेर किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा लोकांस किंवा व्यक्तीस कोणत्याही वर्गास किंवा गटास इजा किंवा त्रास होणे संभव आहे किंवा लोक हिताविरुध्द नगरपालिका निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यव होण्याचा संबंध आहे. साहेब यात म्हटलेले आहे की कुठल्याही गटामध्ये शांततेचा भंग आता तुम्ही काही समाजाला पैसे देतात. आणि काही समाजाला पैसे देत नाही हे शांततेच्या भंग विरुध्दात नाही का हे?

मा. आयुक्त :-

शासनाकडून एक यादी प्रसिध्द होते. प्रशासनाने काय करावे तेवढ्याच उत्सवावरती आपण महानगरपालिकातर्फे खर्च करतो आणि नगरपालिका अस्तित्वात असताना नगरपालिका कायद्यात तरतूद होती म्हणून आपण काही इतर सणांना तुम्ही पैसे देत होतात परंतु महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये अशी तरतूद नाही त्याच्यामुळे आपण ते बंद केलेले आहे आणि विखंडनला तो ठराव पाठविलेला आहे. काय होणार माहित आहे का? आजच्या तारखेला तुम्ही ठराव केल्याप्रमाणे मला २ कोटी वितरीत करावे लागतात आणि बघा अशाप्रकारे जनतेचा पैसा कशात पण पाठवणे.

प्रेमनाथ पाटील :-

मग सर्व बंद करुन टाका ना.

मा. आयुक्त :-

प्रत्येक समाज तयार होणार आम्हाला १० लाख द्या, १५ लाख द्या, २० लाख द्या.

प्रेमनाथ पाटील :-

आयुक्त साहेब जी मंजूर रक्कम आहे त्याचेच डिस्ट्रीब्युशन करा ना त्यामध्ये करु शकतात तुम्ही. फक्त मागील ५ तुम्ही शिवजयंती नाही करायचा, गुढीपाडवा नाही करायचा बाकी सर्व करायचे का?

मा. आयुक्त :-

बघा आपण ठराव घेतलेला आहे मी शासनाकडे पाठविला शासन म्हटले की हे आयुक्तांची भूमिका चुकीची आहे सभागृहाने घेतलेले मान्य आहे तर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

रोहिदास पाटील :-

मी त्या पलीकडे म्हणतो की साहेब तुम्हाला जी मंजूर रक्कम होती ती तुमच्या अधिकारामध्ये ॲप्लीकान्ट होते ते यांनाही डिव्हाईड केले तर सगळे खूश होतील.

मा. महापौर :-

काका आपण ते सर्वच बंद केले आहे कौनसा चालु रखा है? कौनसा चालु नही है एकभी चालु नही है सभी बंद है।

प्रेमनाथ पाटील :-

दिलेत ना आतापर्यंत सर्वांना दिलेले मॅडम पैसे फक्त मागील आपण शिवजयंती, गुढीपाडवा...............

मा. आयुक्त :-

या नवीन वर्षामध्ये १ एप्रिलपासुन सगळ बंद करण्यांत आलेले आहे.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम या सर्वधर्म उत्सवाच्या बाबतीत काही कोर्टाचे निर्देश किंवा कोण कोर्टात गेले आहे का हा विषय आपल्याकडे आहे का?
(सभागृहात गोंधळ)
प्रेमनाथ पाटील :-
आयुक्त साहेब फक्त मागील ५ विखंडीतला पाठवले आहे बाकीचे विखंडीतला पाठविले नाही. खांबित सर लेटर दाखवा विखंडीतचं. आपण जे धारावी माता मंदिर, गुढीपाडवा, फातीमा, शिवजयंती याच फक्त तुम्ही विखंडीतला पाठविले आहे बाकीचे पाठविले नाही तुम्ही विखंडीतला.
दिपक खांबित :-
सगळे सण पाठविले.
निलम ढवण :-
सगळे दिलेत.
प्रेमनाथ पाटील :-
नाही पत्र आहे माझ्याकडे.
दिपक खांबित :-
त्यानंतर पुन्हा प्रस्ताव पाठवला.
प्रेमनाथ पाटील :-
कुठल्या तारखेला पाठवला.
शरद पाटील :-
खांबित साहेब प्रस्ताव पाठविला त्याची प्रत आमच्याकडे सादर करावी.

निलम ढवण :-
खांबित साहेब नंतरचा दिलेला प्रस्ताव सगळ्यांच्या माहितीसाठी वाचून दाखवा त्यामुळे हा गैरसमज झालेला आहे की पाचच तुम्ही दिलेलेत म्हणून.
दिपक खांबित :-
पत्र काही उपलब्ध नाही. पत्र तुम्हाला १० मिनिटात त्याची प्रतच देतो मी. आणि आपण करणार नाही असं नाही जे आपले सार्वजनिक ठिकाण आहे ना चौपाट्या वगैरे विसर्जन जिकडे होते त्यासाठी लाईटची आणि सेक्युरिटीची जी व्यवस्था आपण सगळीकडे करतो.
प्रेमनाथ पाटील :-
तुम्ही गणगौरला द्या. गणपतीच्या विसर्जनाला द्या, छटपुजेला आमचं कोणालाही विरोध नाही पण मागे तुम्ही जे आम्ही ठराव मांडला तेच फक्त ५ तुम्ही विखंडनला पाठविले.
मा. आयुक्त :-
सार्वजनिक कार्यक्रमात त्याला आपण देतोय.
प्रेमनाथ पाटील :-
द्या ना आम्ही मान्य करतो साहेब.
रोहिदास पाटील :-
या सभागृहात ज्याला मान्यता दिली आणि ते तुम्ही दिले नाही पूर्ण विषय कम्पलीट झाला.
प्रेमनाथ पाटील :-
ठराव झाला साहेब बहुमताने मतदान झाले.
मा. आयुक्त :-
पहा सार्व. गणेशोत्सव आहे त्याला आपण देतो, नवरात्र उस्तव आहे ते करतोय आपण परंतु अस बाय फॉरगेटेड सगळे जर म्हणतील माझ्या समाजात हे आहे तुझ्या समाजात हे तर अशी एक लाईन लागेल की करोडो रुपये पुरणार नाही त्याला आणि अस मनपा कायद्यामध्ये तरतूद नाही.
प्रेमनाथ पाटील :-
आम्ही मान्य करतो साहेब तुम्ही गणपती विसर्जनाला, नवरात्रीला द्या ना आम्ही नाही म्हणत नाही बाकी सणाला पण देताना तुम्ही गणगौर, कार्तीक पोर्णिमा, नवरात्रला देतात.
मा. आयुक्त :-
नाही दिले १ एप्रिलपासून बंद केले आहे पुढचं वर्ष संपायला आता...............
मा. महापौर :-
प्रेमनाथजी उसके बाद महावीर जयंती गणगौर किसी चीज को दिए नही है। १ एप्रिल के बाद किसी भी महोत्सव के लिए हमारे अपने यहाँ से पैसे नही गए।
प्रेमनाथ पाटील :-
मॅडम हा ठराव आहे २०१४ ला आपण स्वतः मांडला होता त्यावेळी पण आपण ठराव सर्वानुमते करुन घेतला होता. आता २०१६ ला दिले नसेल पण २०१४-१५ ला दिलेना आपण पैसे सगळ्यांना.
मा. महापौर :-

२०१४-१५ ला दिलेत पण आता त्यांना वाटलं की आता आपल्याला द्यायचे नाहीत आणि ते विखंडनला पाठविले.

प्रेमनाथ पाटील :-

मॅडम ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यानंतर मॅडम तो ठराव फक्त पाचच उत्सव विखंडीत करायला पाठविले.

मा. महापौर :-

पाचच उत्सव नाहीत सर्वसकट आहे.

मा. आयुक्त :-

यानंतर पाठविलेली कॉपी देत आहेत तुम्हाला.

दिपक खांबित :-

याबाबतीत एक मा. उच्च न्यायालयामध्ये पी.एल. दाखल झालेली आहे त्याची अजून तारीख लागलेली नाही.

प्रेमनाथ पाटील :-

त्याच्यावरती निर्णय नाही आलेत.

दिपक खांबित :-

निर्णय नाही आला.

प्रेमनाथ पाटील :-

काहीच निर्णय आलेले नाहीत.

दिपक खांबित :-

परंतु ऑलरेडी आपण सर्व ठराव विखंडीतला पाठविले आहे आणि आपण त्याप्रमाणे काही कारवाई करत नाही ठरावाप्रमाणे.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब पण हे खर आहे का सन्मा. सदस्य सांगतात फक्त ५ उत्सवाचं.

दिपक खांबित :-

साहेब गेल्या वर्षी लाखे साहेब असताना ५ पाठविले होते त्यानंतर साहेबांकडे हा विषय गेल्यानंतर साहेबांनी शहानिशा करुन बाकी सगळे सण पाठवून दिले.

प्रमोद सामंत :-

म्हणजे लाखे साहेबांकडून चुक झाली होती असं होतं का?

मा. आयुक्त :-

चुकीची दुरुस्ती करण्यात आली.

प्रमोद सामंत :-

नाही म्हणजे झाली होती ना. बस तेवढच सांगा लाखे साहेबांकडून चुक झाली होती आम्ही चूक सुधारली.

मा. आयुक्त :-

बघा मनुष्य हा चुकीचा पुतळा आहे आपल्या पण भविष्यामध्ये कुठे तरी चुक होते माणसाची.

प्रमोद सामंत :-

तेच विचारतोय झाली होती का?

मा. आयुक्त :-

चुकीची दुरुस्ती झाली.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, मॅडम आताच आपण सांगितल सर्वांनी आपण महानगरपालिकेकडून फंड देतो पैसे देतात सगळ्या सणाला. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि बुध्द जयंतीला पण द्या. जर कोर्टात कोणी गेल असेल तर सगळ्यांना नाही तर आम्हाला पण नाही. तशी माझी आपणास विनंती आहे आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, बौध्द जयंतीला काही देत नाही ना. तर कोणालाच नाही हेच माझं म्हणणं आहे.

मा. महापौर :-

नाही देत.

वंदना चक्रे :-

नाही देत ना हेच माझ म्हणण आहे कोणालाच नाही तर आम्हाला पण नाही.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम आता कुठल्या समाजाला चालु आहे का पैसे देणे सार्वजनिक उत्सवाला चालु आहे का कोणाला?

भगवती शर्मा :-

ठराव में १०१ नाम है गोषवारा में ५८ थे तो इसका मतलब है की सूचना हुई होगी ना।

नगरसचिव :-

सूचना हुई।

भगवती शर्मा :-

लेकिन ठराव में कही ऐसा नही लिखा है की सूचना के साथ।

नगरसचिव :-

महापौरने रुलिंग दिया था उस टाईम।

भगवती शर्मा :-

वही तो सुधारणा करना है ना। मेरा यह कहना है जब गोषवारा दिया था उसमें ५८ नाम थे और जो मंजूर किए उसमें १०१ नाम है। अच्छी बात है १०१ नाम सजेशन में सूचना की होगी। लेकिन ठराव में कही यह नही लिखा हुआ है की सुचना के साथ मे मंजूर है। दुसरा एक और कहता हूँ की महापौर मॅडम कुछ दिन पहले केबीन रोड पे नाम का विवाद हुआ था की पहले कुछ रखा हुआ था सभागृह के अंदर में कुछ लोगो को समझ में नही आ रहा था। इसके लिए वो नाम रख दिया गया। ऐसे ही इस गोषवारा के अंदर में ४ नाम ऐसे है जो पहले ऑलरेडी रखे हुए है उनको चेंज किया हुआ है तो उसमें भी किसी की भावना दुखेगी ना। मैं आपको बता दे रहा हूँ जो गोषवारे में दिया हुआ है ५ नंबर का था। ५ नंबर के अंदर में मिरारोड तन्वर हॉस्पीटल, टाटा डोकोमो शोरुम सेंट ब्लेसिंग चर्च रोड लिखा है इसको चेंज किया हुआ है एक तो यह है। एक छह नंबर है मिरारोड पूर्व बाळासाहेब ठाकरे उद्यान ऑरेंज हॉस्पीटल पर्यंत इसको भी चेंज किया गया है। फिर १३ नंबर है भाईंदर पश्चिम मोखा तलाव फिर उसके बाद के अंदर में २६ नंबर है भाईंदर पूर्व नवघर येथील साईबाबा नगर कस्तुरी हॉस्पीटल यह नाम पहले से रखे हुए है। फिर वादविवाद न हो इसलिए महापौर मॅडम मेरा यह कहना है आपसे की जो यथास्थिती थी वहाँ बनी रहे।

मा. महापौर :-

उस प्रोसिडिंग में मैंने कहाँ भी था की रखे हुए नामो को बदला नही जाएगा। ऐसे कुछ हुआ है तो वो दुरुस्ती कर लिया जाएगा।

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम बट नेम्स आर चेंजेस. इवन इन माय वॉर्ड गार्डन नेम्स दॅट इज चेंज.

मा. महापौर :-

वील रिचेंज इट अगेन. इफ इट इज डन ॲन्ड इट वॉज गिवन वील डू इट अगेन.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम सन्मा. सदस्याने सांगितले आहे की सेंट झेवियर्स चर्च अगोदरचे होते ते अंजनुम उल्गार चौक हे जे अगोदरची नावे दिलेली होती ती आता तुम्ही परत करणार आहात की नाही.

मा. आयुक्त :-

डिक्लेर केले ना आता असं डबल येणार नाही याची खातरजमा करुन ते दुरुस्त करण्यांत येईल.

मा. महापौर :-

देखिए आप लोगो को फिर एक बार कहती हूँ जो नाम रस्ते को दिए हुए थे वो चेंज नही किए जाऐंगे।

प्रमोद सामंत :-

आणि ते गोषवाऱ्यामध्ये दिलेले होते.

मा. महापौर :-

वो ठराव में जो नाम थे, ठराव में जो नाम लिए गए है गोषवारा नही। महासभा का अधिकार है अगर वो ठराव बहुमत से पास हुआ है तो वो ठराव में अगर वो रस्ते को नया नाम दिया गया है तो वो नाम दिया जाएगा।

आसिफ शेख :-

माझे असे म्हणणे आहे या ठिकाणी की एखाद्या रस्त्याला नगरपरिषदेचे नाव दिले आहे. महानगरपालिका झाली त्याच रस्त्याला महानगरपालिकेने दुसरा ठराव बहुमताने दिला. पुन्हा झाल पुन्हा तिसऱ्यांदा महासभेत विषय झाला पुन्हा त्याच रस्त्याला तिनदा नाव दिलं असे प्रस्ताव आलेले आहेत तर कोणतं तुम्ही आता मान्य करणार. नगरपरिषदेने केले ते मान्य करणार. महानगरपालिकेने त्याच रस्त्याला दिले. पुन्हा १-१ रस्त्याला तिनतिनदा नावे दिलीत. कोणता ठराव मान्य करणार.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम जो मैंने बोला आपको इसके पहले यह जो दि. १५/१०/२०१५ को जो ठराव हुआ है उसके पहले वो नाम दुसरे थे ठराव के माध्यम से लेकिन १५/१०/१५ को उनके नाम बदले गए है। बदलने का अधिकार महापौर मॅडम महासभा को है। जैसे सावित्रीबाई फुले को भी बदला था। लेकिन इसके पहले कई संतो के नाम से ऐसे महापुरुषो के नाम से नाम रखे हुए है। वो भी पहले जो मैं ४ बता रहा हूँ। किसी व्यक्ती विशेष के नाम से नही है। अगर उनको भी ऐसा किया जाएगा तो सिर्फ लोगो की भावना दुखेगी और यह गलत मॅसेज है।

मा. महापौर :-

भगवतीजी मैंने पहले भी कहाँ की जीन रोड को नाम दिए गए थे इस महासभा में आने के पूर्व जीन रोड को नाम दिए गए थे वो नाम हम नही बदलेंगे। आप प्रोसिडींग देखेंगे तो उसमें भी है की दिए हुए नाम बदलेंगे नही।

भगवती शर्मा :-

आपने बोला है लेकिन उस ठराव में आया नही मॅडम।

प्रेमनाथ पाटील :-

ठरावात झालेले नाही.

मा. महापौर :-

उसकी दुरुस्ती कर ली जाएगी।

आसिफ शेख :-

दुरुस्ती कशी करणार समजा एका रस्त्याला नाव सन्मा. आमदार नरेंद्र मेहताचे नाव दिले नगरपरिषदेत दुसरे नाव मुन्ना सिंगचे त्याच रस्त्याला तिसरे नाव पुन्हा शरद पाटीलचे दिले.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम विनंती अशी आहे आपण जे सांगितल सभागृह त्याच्याने सहमत आहे की जी नावे दिलेली असेल कुठल्याही पक्षाने दिली महापुरुषांची नावे आपण दिली ती कायम. आता जी नावे आपण प्रत्येक सदस्य आपआपली भूमिका मांडत असतात सभागृहात जी नावे आता दिलेली आहे ते ही बदललं तर त्यांचे अवमान होईल, अपमान होईल त्यांची ती ४ नावे दुबार आले त्यांचे पुढच्या सभेमध्ये विषय घेऊन त्यांना इतर कुठल्या तरी मार्गावर कारण त्यांचही अवमान किंवा अपमान होऊ नये. त्यांची नावे दुसरीकडे ज्या ठिकाणी नामकरण झाले नाही अशा ठिकाणी ते सूचवावे त्यांच ही मान राहतील आणि त्यांची नावे दिलेली आहे ते कुठल्याही प्रकारात बदल करण्यांत येऊ नये.

प्रमोद सामंत :-

वाचून दाखवा ना.

नरेंद्र मेहता :-

आता वाचण्यापेक्षा ते रेकॉर्डवर येईल आपण पूर्ण शहानिशा करा डबल झालेली ही नाही. अजून कुठली नावे असतील.

भगवती शर्मा :-

ही ४ दिलेली आहे याच्या व्यतिरिक्त कोणी असेल.

प्रमोद सामंत :-

त्या दिवशी पण महासभेला असाच विषय झालेला स्पष्टपणे विचारलं गेले आहे की गोषवाऱ्यातली नावे बदली होणार आहे का? त्यावेळी सांगितले गेले होते महापौराकडून गोषवाऱ्यामध्ये बदल नाही होणार तर प्रशासनाने..............

मा. महापौर :-

गोषवारा नाही प्रमोद सामंत साहेब मैंने कहाँ दि हुई नाम गोषवारे में जो रोड का नाम है और अभी है जो पहले दिया गया है वो बदला नही जाएगा। मैं आपको बारबार वो बोल रही हूँ।

प्रमोद सामंत :-

और पहले दिया नही रहेगा तो वो प्रशासन के पास प्रस्ताव आया रहेगा ना।

मा. महापौर :-

ठराव के माध्यम से जो पास हुआ होगा वही दिया जाएगा।

प्रमोद सामंत :-

ठरावात विषय असा होता की गोषवाऱ्याची नावे दिलेली आहे.

भगवती शर्मा :-

आपको समझ में नही आ रहा है देखिए गोषवारा में भले ही वो गलत नाम दे दिया जैसे सावित्रीबाई फुले का किया था। वैसे ही यह चार नाम गलत दे दिए गए थे लेकिन वो पहले ठराव हो चुके है।

(सभागृहात गोंधळ)

नगरसचिव :-

महासभा दि. ४/१२/२०१५ ची.

अनिता परमार :-

प्रकरण क्र. ६९ पेज क्र. १९ जयमाला पाटील यांनी हा विषय मांडलेला आहे आणि त्याचे अनुमोदन सौ. अनिता परमार यांनी केलेले आहे पण तुम्ही अनिता पाटील लिहिलेले आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे करतो.

रोहिदास पाटील :-

प्रकरण क्र. ७२ आरक्षण क्र. १०२ तुमचे रुलिंग आहे की त्या आरक्षणामध्ये आपण संबंधितांना बोलावणार, गटनेत्यांना बोलावणार, नगरसेवकांना बोलावणार त्याच पुढच काही झाल नाही मी या सभागृहात माहिती देतो मी पुन्हा-पुन्हा सांगत होतो आरक्षण क्र. १०२ सर्व्हे नं. १५३, हिस्सा नं. २ या ठिकाणी आताही अनधिकृत बांधकाम चालु आहे. मनपाच्या निदर्शनास आणुन सुध्दा त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही अस का होत आहे? या ठिकाणी ८००, ९०० लोक एकत्र जमतात. आयुक्त साहेब आपल्याला निवेदन देतात येतात भेटतात जातात. पुन्हा पुन्हा आपलं प्रेमपत्र देत राहतात. कोणच त्याची दखल घेणार नाही म्हणजे तुम्ही नाही दखल घेतली की ते आमच्याकडे येतात. आमच्याकडे घेतलं की कोण तरी सांगतात की हे जाणुनबुजुन होत आहे.

मा. महापौर :-

काका आपण ते लवकरच करु.

रोहिदास पाटील :-

ओके थॅंक्यू.

मदन उदित नारायण सिंग :-

यह जो अपना अंदाजपत्रक था बजेट शिक्षण का अंदाजपत्रक आया था उसमे मैंने दिखाया था की अपने ३० लेखाशिर्ष थे। ३० मे से बीच के ३ गायब कर दिए थे १२,१३,१७,१२,१३ की जरुरत नही थी लेकिन जो १७ था मैंने बताया था १७ था शिक्षक दिन, आदर्श विद्यार्थी, आदर्श शिक्षक पुरस्कार, तो सचिव साहब ने भी बोला था आयुक्त साहब ने भी बोला था की इसका हम करेक्शन करेंगे लेकिन जो करेक्शन की हुई कॉपी आयी उसमें भी वो गायब है उसमें लेखाशिर्ष दिया ही गया नही है। ते टाकलच नाही साहेब गाळुनच टाकल एकदम। तो महत्वाचा लिखाशिर्ष आहे. तरीही अजून करण्यात आलेले नाही. आता काय करायच लेखाशिर्षाचं. परत सगळ बजेटची कॉपी प्रिंट करायचे का? ही चुक कोणी केल साहेब बोलवा त्यांना.

मा. महापौर :-

बेलवटे को बुलाया जा रहा है और आगे किसीको प्रोसिडींग के बारे मे..................

मुन्ना सिंग :-

दि. ०४/०९/२०१५, दि. १५/१०/२०१५, दि. ०४/१२/२०१५ व दि. १८/०१/२०१६ (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

अश्विन कासोदरिया :-

सुचनेसहित अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर आता के चा प्रस्ताव घ्या. तो विषय घ्यायचा का नाही ते ठरवा.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम देखिए वो विषय लेने के लिए पहले ही बात हुई थी की पहले हमको चर्चा करने दिजीए इस विषय पे ५ मिनिट उसके बाद में हम निर्णय लेते है ना की कुछ मुद्दे हे जो क्लिअर हो जाए उसके बाद उस विषय पे बात कर लेते है। आपने यह विषय दि. ४/९/२०१५ को लिया था। ४/९/१५ को विष क्र. ७५ था। डी.पी. रोड मध्ये येणारी घर दुकाने गाळे यांना मोबदला देणे किंवा पुर्नवसन करणेबाबत धोरण ठरविणे. यहाँ पे विषय लिया था ठराव क्या किया था आपने उस समय के अंदर में की सदर विषय बाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक आहे त्यामुळे सदर विषय मागे घेण्यात येत आहे. सविस्तर अहवाल परत सादर करावा साहेब असा ठराव मांडत आहे. तो कम से कम आप पिछे क्या बोले हो वो तो ध्यान में रखो ना की सविस्तर आने दो उसके लिए हम थोडी चर्चा करना चाहते है।

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम विषय घेऊन चर्चा करायची वाटत असेल तर समर्थन करावे ज्यांना नाही वाटत असेल पण चर्चा करु शकतात ना विषय घेतल्यानंतर. विषयच नाही घ्यायचं तर ती चर्चा कसली.

जुबेर इनामदार :-

चर्चा करुया आणि आम्हाला तुम्ही चर्चा करायला संधी देणार होतात. कारण हा विषय जो आहे तो स्पष्टपणे प्रशासनाने दिलेला गोषवारा असा थातुरमातुर गोषवारा आहे.

मा. आयुक्त :-

आमचा थातुरमातूर वाटत असेल तर तुम्हाला काय वाटते ते सूचना द्या ना. आम्ही घ्यायला बसलो आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब तुमच निवेदन आम्हाला ऐकायचं आहे. आमचे प्रश्न संपल्यानंतर तुमच निवेदन आम्हाला ऐकायचं आहे आणि त्या निवेदनाच्या आधारावर हा सभागृह तुम्हाला त्याची मान्यता देईल पण आम्हाला समजू तर द्या.

मा. आयुक्त :-

पण विषय विषयपटलावर आणल्याशिवाय कशी चर्चा करणार.

मा. महापौर :-

जुबेरजी अभी हमे विषय लाना है। अगर चर्चा करनी है तो विषय तो लेना पडेगा। विषय लाना है इसके लिए यह लिजीए मत लिजिए और विषय लाना है या नही वो नक्की करे सभागृह।

जुबेर इनामदार :-

विषय पर ही तो चर्चा करनी है।

भगवती शर्मा :-

आपने गोषवारा दिया बराबर है। गोषवारा हमने देखा कुछ उसके अंदर में ऐसी चीजे है जीन मुद्दो पे क्लिअर करना चाहिए।

मा. महापौर :-

तो वो क्लिअर होगा ना चर्चा में।

मा. आयुक्त :-

मैं निवेदन करुंगा ना उसपे विषय तो आने दो।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम हा विषय आणला त्याला कारण एकच आहे शहरामध्ये विकासाच्या नावावरती जो विनाश केलेला आहे. त्या धर्तीवर तुम्ही हा विषय येथे आणलेला आहे आणि तो का आणला.

मा. महापौर :-

आप चर्चा करना चाहते है विषय तो लिजीए।

जुबेर इनामदार :-

मॅडम होऊ शकत आमच्या चर्चेनंतर तुम्ही स्वतः म्हणाल की हा विषय बरोबर नाही याच्यामध्ये सुधार केले पाहिजे आणि प्रशासनाने परत हा विषय आणला पाहिजे. रितसर आणला पाहिजे गोषवाऱ्यात सुधार केला पाहिजे.

मा. महापौर :-

जुबेरजी अगर हमें आपकी बात सही लगी तो हम आपके साथ है ना।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विषयावर चर्चा केल्यानंतर घ्यायला काय हरकत आहे.

प्रमोद सामंत :-

एका बाजुला महापौर मॅडम प्रशासन सांगत फेरिवालाचा विषय आहे की सभागृहाला आणि सदस्यांना चिंतन केले पाहिजे आणि चिंतन करुन यावरती तोडगा काढला पाहिजे.

मा. आयुक्त :-

फेरिवाल्यांचा विषय संपलेला आहे.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम, बोलतील संपलेला असेल तर आणि आयुक्त साहेब तासभर अगोदर गोषवारा देतात आणि सांगतात विषय घ्या आणि त्यावरती तुम्ही तुमचा निर्णय द्या. म्हणजे प्रशासनाने वर्षानुवर्षे अभ्यास करायचा आणि सभागृहाने एका तासात निर्णय द्यायचा अस करण्यापेक्षा या विषयावरती चर्चा व्हावी. ज्वलंत विषय आहे. प्रशासनाने एकदम तोडक कारवाई शहरात जिकडे तिकडे केलेली आहे. कोणाचही काही विचारात न घेता गरीब लोकांची घरे तोडली आहेत. ४० वर्ष, ५० वर्ष, ३० वर्ष जुनी घरे तोडली आहेत आणि त्यावरती चर्चा करुन मग हा विषय घेण्यात यावा.

नरेंद्र मेहता :-

त्यांना करायची असेल तर विषय घेऊन चर्चा करा.

प्रमोद सामंत :-

नाही नाही हा विषय घेण्यात यावा.

नरेंद्र मेहता :-

ठराव करा मतदान घ्या.

जुबेर इनामदार :-

हा विषय प्रशासनाने दिला आहे. हा विषय प्रशासनाचा आहे की सत्ताधाऱ्यांचा आहे?

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम विषय घ्यावा आणि चर्चा करावी.

मा. महापौर :-

मी विषय ठेवला आहे आपण विषय स्विकारावा आपण त्यावर चर्चा करु ना.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम हा विषय के चा विषय प्रशासनाने दिला आहे. हा विषय प्रशासनाचा आहे का सत्ताधाऱ्यांचा? तो एक महत्वाचा विषय आहे. प्रशासनाचा विषय असला तर त्यावर चर्चा झालीच पाहिजे. तुम्ही आमच्या हातामध्ये दोन मिनीट आधी एक कागद देणार म्हणाल याच्यावरती निर्णय द्या आम्ही घेऊ शकत नाही. हा ज्वलंत विषय आहे हा धोरणात्मक विषय आहे याचा धोरण निश्चित करायचा आहे. कायद्याच्या चौकटीत करायचा आहे. म्हणून याच्यावरती चर्चा झालीच पाहिजे. आधी चर्चा करा चर्चा झाल्यानंतर..........

लियाकत शेख :-

महापौर मॅडम, एकदम ज्वलंत प्रश्न आहे एकतर कोणालाही विश्वासात न घेता मिरा भाईंदरमध्ये जी तोडफोड झाली बरेच लोक बेघर झालेत. एक ही नोटीस कोणाला काही नाही फक्त डिमार्केशन करून निघून गेले आणि नंतर यंत्रणा कामात लागली. एक तर कुठल्याही कायद्याच्या चौकटीत न करता कोणाचा तरी एकट्याचा अधिकार वापरून केलेले कृत्य एकदम बेकायदेशीर आहे. जसं इल्लीगल ॲक्टीविटी मी तुमच्या निदर्शनास आणून देतो अशा प्रकारची कारवाई हैदराबाद मुनसीपल कॉर्पोरेशनने केली होती सुप्रिम कोर्टात मॅटर गेले. २०१२ साली सुप्रिम कोर्टने एच.एम.सी. ला त्यांची बरीच झाडाझडती घेतली त्याची ऑर्डर कॉपी देतो मी तुम्हाला म्हणजे तुम्ही जी कारवाई केलेली आहे एवढी घाई काय होती की भर पावसाळ्यात तुम्हाला तोडून आत्ताच्या आत्ता रस्ते तयार करायचे होते एवढी इमरजन्सी काय होती अशी असली कुठली इमरजन्सी होती.

मा. आयुक्त :-

याच्यानंतर सभागृहात प्रत्येक सदस्य आपली भावना मांडेल त्याच्यानंतर मी निवेदन करतो १-१ प्रश्नावर थोडीच निवेदन करणार.

लियाकत शेख :-

एवढी इमरजन्सी काय होती पहिले ते आम्हाला सांगा.

मा. आयुक्त :-

इमरजन्सी काय होती काय नाही हे मी सविस्तर सभागृहाला निवेदन करेल आणि कायद्याच्या चौकटीत बसून निवेदन करेल आपल्याला काय ऑब्जेक्शन घ्यायचे काय तुमची भावना ती सभागृहात व्यक्त करावी.

लियाकत शेख :-

एवढी इमरजन्सी काय होती.

मा. आयुक्त :-

म्हणूनच म्हटलं ना आपण तो विषय पटलावर घेतल्यानंतर चर्चा करा त्याच्यावर आम्ही निवेदन करू.

लियाकत शेख :-

त्याच्यानंतर तुम्ही बोलता आम्ही मोबदला देऊ आम्ही हे करू अहो एकदा दोनदा डिमॉलीश झालं, रिडव्हलपमेन्टच्या परवानगीसाठी त्याला १०-१०, १२-१२ वर्ष गेले तिथे त्या टेक्नीकल पूर्तता करतांना आत्ताच तुम्ही याच्यात लिहीलय बघा बाधित क्षेत्रासाठी मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे लगतच्या उर्वरित जागेमध्ये अतिरिक्त चटाई क्षेत्र निर्देशांक किंवा विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. आता साहेब तुम्ही समजून घ्या टेक्नीकली माझी पूर्णच जमीन गेली लगत काहीच नाही तर काय करणार तेथे काय प्रोव्हीजनल केली. काहीच नाही थातूर मातूर काही लिहीलेलं आहे मोबदला देऊ टी.डी.आर. काय मोबदला देणार कुठल कॉपेनसेशन करणार काय मार्केट क्रिएट करणार काय प्रीव्हीलिंग रेट आहे आणि तुम्ही काय डिसाईड करणार त्याच धोरण निश्चित झाल पाहिजे त्याच्यासाठी टाईम लागेल तुम्ही आजच्या आज सांगुन हे करणार तर शक्य नाही ते आत्ताच्या आत्ता मेहताजी तुम्ही सांगणार मतदान घ्या नाही हा प्रश्न आहे गोर गरिबांचा. साहेब बोलण्याचा अर्थ काय याचे टेक्नीकली बरेच मुद्दे आहेत इक्झामपल १२ मीटरचे रोड असेल आणि त्याचा तुकडा १००-२०० मीटरचा आहे बिल्डिंग ज्या वेळेला ग्रामपंचायतीच्या वेळेला अशी सरळ सरळ बांधलेली आहे रस्त्यात गेली त्याला उर्वरीत जागा नाही नंतर तुम्ही सेल्स टॅक्सच्या नावाने याच्या नावाने त्याला जर परमीशन पुढे काही भेटत नाही १०-१०, १२-१२ वर्षे झाली एका बिल्डिंगला तोडून रिडव्हलपमेन्ट म्हणून त्याला हे करताना १४ वर्ष लागली परमीशन घेण्यासाठी का तर म्हणे सेट बॅग बसत नाही तुमची इ-यंत्रना तुटली फायरची एन.ओ.सी. मिळत नाही का तर ते त्याच्यात बसत नाही पुढे त्या टेक्नीकल ग्रॅंडमध्ये त्यांची फजिती होते हो तर ते सर्व होण्यासाठी त्यांना लौकरात लौकर कस पुर्नवसन करता येईल किंवा त्यांचा मोबदला टि.डी.आर. काय करता येईल त्याच व्यवस्थित झालं पाहिजे. उदा. देतो मेहता साहेब सपोझ जर एखादी बिल्डिंग आलेली आहे ॲज पर डि.पी. मध्ये ९७ दॅट्स मीन ती बिल्डिंग इक्झीट होती. इक्झीट बिल्डिंग होती तिथे आहे आणि डि.पी. मध्ये दाखवतय का हा रस्ता जाणार तेथून आज जर हा रस्ता गेला नसता तर त्याचा पुर्नविकास करण्यासाठी ॲडिशनल टी.डी.आर. मिळाला असता ॲडिशनल एफ.एस.आय. मिळाली असती. आपण आज रस्त्यासाठी त्याला तोडणार आणि त्याला देणार एक एफ.एस.आय. पण जर ते तिथे नसतं त्याच्यात नसती रस्त्यात नसती तर त्याला दोन एफ.एस.आय. भेटले असते ती तरतुद करायला पाहिजे त्यासाठी ते ॲडिशनल एफ.एस.आय., टी.डी.आर. त्याच्यात काहीच लिहीलेले नाही आपण काय देणार टी.डी.आर कोणाला देणार मालकाला देणार का यांना देणार जे

सोसायटीज आहेत याच एक धोरण निश्चित झालं पाहिजे त्याच्यानंतर हा प्रस्ताव आणा ही अरजन्सी आहे या विषयावरती.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, क चे प्रस्ताव आजपर्यंत ज्या ज्या वेळी सभागृहामध्ये आले ते अति महत्त्वाचे असतात, गरजेचे असतात म्हणून क च्या माध्यमातून येतात, रूटिन प्रश्न असले असते तर क च्या माध्यमातून येत नाही या सभागृहामध्ये अनेकदा अनेक विषयावर क खाली प्रशासनाने प्रस्ताव दिले. काही वेळा सत्ताधाऱ्यांनी विषय मांडला काही ठिकाणी विरोधकांनी मांडले ज्या ज्या वेळी वाटले प्रशासन सत्ताधारी विरोधी क खाली आणून प्रस्ताव ताबडतोब निर्णय घेण्याची गजर आहे त्या अनुषंगाने प्रशासनाने हा प्रस्ताव दिलेला आहे. चर्चा व्हावी, मोकळ्या मनाने चर्चा करावी. विरोधी पक्षाने करावी सत्ताधाऱ्यांनी करावी त्यात आपण उत्तर द्यावे आमचा काही विरोध नाही. आम्ही काही लांब जात नाही परंतु विषयच घ्यायचा नाही आणि चर्चा करायची याला काय अर्थ नाही आणि विषय घेतल्यानंतर जरूरी नाही ना शेवटी सभागृहाला पटेल तरच निर्णय होणार, सभागृहाला नाही पटेल तर निर्णय नाही होणार कदाचित सभागृहाला वाटल हे थातुरमातुर आहे याला परत विषय रितसर आला पाहिजे कदाचित परत तो निर्णय होईल पण तो सभागृहामध्ये एकदा विषय पटलावर आल्यानंतर त्याच्यावर निर्णय होऊ शकतो. आम्ही किती भाषणं केली त्यांनी किती भाषणं केली त्याला अर्थ काय? विषयाला धरूनच होणार नाही आणि शेवटी निर्णय सभागृहाला घ्यायचा आहे विषय पटलावर आल्यानंतर भरपूर चर्चा करा काही घाई नाही आम्हाला तुम्ही चर्चा करा आम्ही चर्चा करतो आणि शहराला न्याय मिळण्याच्या हिशोबाने आपण निर्णय घेऊ ना तर आपल्याला ही विनंती राहिल पाहिले तो विषय घ्यावा चर्चा करायची असेल आणि त्यांना वाटत असेल की रितसर तर तो पुढच्या सभेत विषय आणा. तसमत असेल तर आमची काही हरकत नाहीए कारण दोनच गोष्टी होऊ शकतात आयदर हा विषय होऊ शकतो आयदर पुढच्या सभेत हा विषय होऊ शकतो त्यांनी त्यांच मत व्यक्त करा की आम्हाला या विषयाला आज नाही तर पुढच्या मिटिंगला आणा आम्ही पुढच्या मिटिंगला आणतो काही हरकत नाहीए. ही माझी भूमिका आहे ही माझी भूमिका मांडतोय की आमची इच्छा आहे की हा विषय आपण घ्यावा आणि नाही घ्यायचे असेल तर मतदान घ्यावे. विषय सादर केला तर त्याला नक्की करावे लागेल. क खाली आपण विषय वाचला आहे ते नक्की करावे लागेल घ्यायचे की नाही घ्यायचे. पेन्डींग ठेवू शकत नाही, तुम्ही पहिले आता नक्की करा घ्यायचं की नाही घ्यायचं. आम्ही बोलतोय सभागृहाच्या वतीने की तो विषय घ्यावा.

लियाकत शेख :-

आपण अजून कुठालाही क चा असा प्रस्ताव वाचलेला नाही त्याच्या अगोदरच आपली चर्चा सुरू झालेली आहे. माझा अस म्हणणं आहे की या विषयावर आपण विशेष महासभा बोलवू.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम, हा खरोखरच ज्वलंत विषय आहे कारण की,

लियाकत खेख :-

याच्यावर व्यवस्थित अभ्यास करुन प्रत्येकाचे निवेदन घ्या साहेब, त्या अगोदर गटनेत्यांची आणि पदाधिकाऱ्यांची एक बैठक घ्या.

जुबेर इनामदार :-

विरोधी पक्ष नेते विषय आणला प्रशासनाने अति महत्त्वाचा विषय आणि आयत्या वेळचा विषय क च्या अंतर्गत आणलेला आहे बरोबर आहे? कारण काय त्याचं, मोबदला मिळाला पाहिजे ज्यांना जे बाधित होते त्यांना मिळायलाच पाहिजे मोबदला आम्ही त्याच मताचे आहोत. मात्र विषय ज्या पध्दतीने आपला आहे प्रशासनाने एक तर घाईत कारवाई केली कशी आणि का केली आणि कोणत्या नियमाच्या अंतर्गत केली त्यावर आम्हाला चर्चा करायची आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे सभागृहाची अशी भावना असेल तर आपण विशेष महासभा बोलवू.

भगवती शर्मा :-

मॅडम, इसमें हम सब सेहमत है इसके लिए क्योंकि शहर के अंदर में हर हर व्यक्ती कोई ना कोई वॉर्ड में कही ना कही उससे बाधित है। किसी भी बात से नियम से मिलेगा नही मिलेगा अपनी भावना रखेंगे उसके पेहले आपके पास में मिलेंगे आयुक्त साहब से मिलेंगे और वो सब कर के ३ दिन का नोटीस दे के विशेष महासभा लगाइये ना हमारी मंजुरी है।

मा. महापौर :-

ठिक है। हम इस विषय को विशेष महासभा बुलायेंगे।

वेंचर मेन्डोंसा :-

मॅडम ॲज पर द रूल व्हाट इज द लास्ट डेट ऑफ ब्रेकिंग इव्हरिथिंग इन एम.बी.एम.सी.

मा. महापौर :-

१५ पर्यंत होती.

सुहास रकवी :-

साहेब तुम्ही अतिक्रमण कधी तोडणार कधी थांबवणार आहात.

मा. महापौर :-

थांबवल ना आपण.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, या विषयावर आज चर्चा करायची की नाही? साहेब आज लोक आमच्याकडे बघतात त्यांना तुम्ही रस्त्यावर आणलय.

मा. आयुक्त :-

हा तुम्हीच मांडला विषय आता सभागृहामध्ये की पुढच्या बैठकीमध्ये घ्यायचं पुन्हा काय चर्चा करता. विषय पुढच्य सभेमध्ये घ्यायचा आहे.

जुबेर इनामदार :-

विषय नाही पण चर्चा होऊ शकते ना. चर्चा करू द्या ना आम्हाला.

प्रकरण क्र. ०१ :-

दि. ०४/०९/२०१५, दि. १५/१०/२०१५, दि. ०४/१२/२०१५ व दि. १८/०१/२०१६ (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ०२ :-

दि. ०४/०९/२०१५, दि. १५/१०/२०१५, दि. ०४/१२/२०१५ व दि. १८/०१/२०१६ (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. मुन्ना सिंग अनुमोदक :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २, पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रशांत केळूसकर :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार एकात्मिक नाले बांधणी प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश नाले पक्के मोठे, खोल, रुंद तसेच बंधिस्त स्वरुपाचे बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचे नाले जे.सी.बी., पोकलन इत्यादी यंत्रसामुग्रीमार्फत सफाई करणे शक्य होत नसल्याने, सदरचे नाले सफाई करणेकामी मनुष्यबळाचा वापर करुन नाल्यांमध्ये उतरुन गाळ/माती/कचरा काढून नाले सफाईची कामे करण्यात आली आहेत.

शहरांतील बहुतांश नाल्यांलगत अरुंद रस्ते असल्याने त्या ठिकाणी गाल/माती/कचरा वाहतुक करणेकामी वाहने घेऊन जाणे शक्य होत नाही.त्याचप्रमाणे रेल्वे हद्दीतील भाईंदर ते मिरारोड जाफरी खाडी पर्यंत रेल्वेने संरक्षण भिंत बांधली असल्याने या नाल्यातील निघालेला गाळ/माती मनुष्यबळाद्वारे उचलून रस्त्यावर गोळा करुन तद्नंतर वाहनात भरुन वाहतुक करण्यात आला. त्यामुळे या कामासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा वापर करावा लागला आहे.

वरील बाबी विचारात घेता नाले सफाई कामावर रु. २.०० कोटीच्या खर्चास ही सभा सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

अश्वीन कासोदरीया :-

माझे अनुमोदन आहे.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम आम्ही स्टॅन्डीगला ५० लाखांची मंजूरी दिली आणि दरवर्षी पानपट्टे साहेबांना माहित असत अंदाजे किती खर्च येतो. पण पक्के नाले झाल्यामुळे यांनी ती रक्कम कमी केली. त्यानंतर आता ''के'' च्या खाली सुध्दा त्यांनी प्रस्ताव आणून सक्षम पम्पाच दरवर्षी यांना ते किती रक्कम यावी आणि महासभेमध्ये आणताना त्यांनी पूर्णपणे या मिरा भाईंदरचा विचार केलेला दिसत नाही. दरवर्षी दिड कोटी रुपये आपण खर्च करतो. पण मंजूरी घेताना आपण ५० लाखाची घेतली आणि मग अशाप्रकारे ते ठराव आणतात. तर पानपट्टे साहेब तुम्हाला दरवर्षी जानेवारी महिन्यात या सगळ्यांची तयारी करायला पाहिजे होती. आता तुम्ही हे जे जास्त रक्कम खर्च केली आहे ती आम्ही ५० लाखाचीच मंजूरी दिलेली आहे. स्टॅन्डीगचे सगळे सदस्य त्यांनी ५० लाखापर्यंत तरतुद केली आहे. तेव्हा त्याचा विचार व्हावा.

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम ठराव झालेला आहे. आयुक्त साहेब हे जे नाले सफाईचे काम आहे आम्ही तुम्हाला काल भेटलो. मी भेटलो, मदन सिंगजी भेटले, प्रेमनाथ पाटील भेटले, मेघना रावल भेटल्या, धनेश पाटील सगळे भेटलो आणि आम्ही तुम्हाला पत्र दिले २५ ला आणि २६ ला जर भाईंदर बुडल तर कसं

काय? हे कसं काय? कोणाला तरी तुम्ही ऑथोरीटी द्यायला पाहिजे. तुम्ही तरी ऑथोरीटी लावून हे काम करुन घ्यायला पाहिजे होतं. आता काल तुम्हाला पत्रव्यवहार करुन तीन फोन झाले. सकाळपासून कोणता नाला कोणता नाला नवघर रोडकडून जाणारा हनुमान मंदिरकडून तो आताही ४ फुटने भरलेला आहे. स्टेशनसमोरचा नाला ३ फुटने भरलेला आहे. हे जर त्याची डेली कॅपेसीटी वाढलेली असती साहेब तर हे पडलेले पाऊस हा मोठ्या प्रमाणात पाऊस नाही पडला. पाऊस पडला आणि लोकांच्या घरामध्ये दुकानामध्ये पाणी गेले. हा गंभीर विषय आहे की नाही पैसे मंजुर आहे हा विषय महत्वाचा नाही पैसे अजून घ्या. आम्ही स्टँडिंगमध्ये पण बोलतच होतो किती पैसे पाहिजे बोला पण काम आधी करा. आज तुम्ही कामच नाही केले.

मा. आयुक्त :-

काका, काल आपण निवेदन दिलेलं आहे. आज महासभा असल्यामुळे मी साईटवर जाऊ शकलो नाही. उद्या स्वतः मी पाहणी करणार जर समजा तिथे नालेसफाई झाली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबनाची करण्याची कारवाई करण्यात येईल.

संदिप पाटील :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो राई, मुर्धा, मोर्वा येथे शेतजमीन आहे आणि खारलाईन जो रस्ता आहे तिथे खार लाईन रस्त्यालगत संपूर्ण भरणी झालेली आहे. आता जे शेतीचे पाणी भरते पाणी जाण्याचा मार्गच उपलब्ध नाही. मी आयुक्त साहेबांना पत्र पण दिले होतं चर्चा पण केली पण अजून काय निष्कर्ष निघालाच नाही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने जे.सी.बी. लावलेली आहे तिथे काल.

संदिप पाटील :-

जे.सी.बी. कुठे लावली. शेतीमध्ये पाणी तुडुंब भरलेले आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

भरणी केलेली आहे त्या ठिकाणी त्यात जे.सी.बी. ने मार्ग काढून आपण पाणी काढणार आहे.

संदिप पाटील :-

आता ज्या लोकांनी भरणी केली आहे त्यांना नोटिसा काढा ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

हो काढायची ना.

संदिप पाटील :-

किती दिवसात होईल हे?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

१-२ दिवसात होईल हे.

मा. आयुक्त :-

मी स्वतः बघायला येतो त्यांना घेऊन येतो त्यावेळेस मला दाखवा.

वर्षा भानुशाली :-

महापौर मॅडम आपकी परमिशन से बोलना चाहती हुँ। कमीशनर साहब तुम्ही आले होते माझ्या वॉर्डात तुम्हाला एक नाला दाखवला होता. तुम्ही मला उत्तर दिले एवढे वर्ष झाले आणि आमच्याकडे इंजिनिअर आहे आम्ही त्या हिसाबातून बघतो. खर आहे तुमचं. तुमचे इंजिनीअर खूप चांगले करतात आम्हाला माहिती आहे. पर सर भाईंदर ईस्ट में भी इंडस्ट्री खूप आहे. सगळ्यांना माहित आहे. बरेच लोक भाईंदर ईस्टचे आहेत. तुम्ही प्रॅक्टीकली नाला बघा असाच फक्त इंजीनिअर वरती नाला बघू नका कारण की १५ दिवसात नाल्यामध्ये एवढं घाण जाम होते ना आणि भाईंदर ईस्ट काकांनी आता दाखवले प्रभात ताई आहे. दिनेश नलावडे साहेब सगळ्यांना माहित आहे. भाईंदर ईस्टची परिस्थिती काय आहे आमच्या गटनेत्या भाईंदर ईस्टच्या आहेत तरी आपण नाले सफाईसाठी बजेट वाढवा अजून. मी त्या विषयावरती बोलत नाही पण तुम्ही प्रॅक्टीकली साहेब. इंजिनीअर आम्हाला दाखवून तुम्ही त्या दिवशी मला उत्तर दिले मला फार वाईट वाटले कारण की सर मी राहत पण नाही. भाईंदर इस्टमध्ये आणि मी जे बोलत होते ते माझ्यासाठी बोलत नव्हते मी लोकप्रतिनिधी आहे माझ्या पाठीमागे माझ्या १०००० वर्ल्ड बँक आहेत मी त्याच्यासाठी बोलत होते तरी यावेळी जरी तुम्ही नाला सफाईमध्ये व्यवस्थित दिलेले नाही. लक्षच दिलेले नाही. तर सर्वात आधी आमचे भाईंदर ईस्ट डुबणार आहे. तरी तुम्ही पर्सनल त्याच्यावरती लक्ष द्यावे. जे नविन नाला बांधत आहेत तुम्ही त्याच्यावरती पण लक्ष द्या.

संदिप पाटील :-

पानपट्टे साहेब मला प्रश्न विचारायचा होता की गेल्या महासभेत पावसाळ्याच्या अगोदर लावली होती गेल्या वर्षी त्यामध्ये मी चर्चा केली होती की राई, मुर्धा, मोर्वा या जुन्या खाड्या आहेत तिथून पहिले बोट यायची मीठागराची आता बोट पण जाऊ द्या. साधी होडी पण जात नाही तेथून तर त्याच्यावर मँग्रोजची तुम्ही कारवाई काय केली? पत्रव्यवहार केले आहे का? कारण जिथपर्यंत मँग्रोजच निघत नाही तिथपर्यंत नाला सफाई तुम्ही कितीही केला तरी काहीच होऊ शकत नाही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आम्ही हायकोर्टमध्ये अपिल करणार आहोत.

संदिप पाटील :-

साहेब २ वर्ष झाली.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

चालु आहे त्याचा सर्व्हे केला आहे त्याचा फोटो काढला आहे.

लियाकत शेख :-

मी स्वतः तुम्हाला घेऊन गेलो होतो. उत्तन केसमध्ये अशाच प्रकारचे का याचे तुम्ही कुठली बोट पोकलन देणार होता तिवराची झाडे तुम्हाला सांगितल तुम्ही अर्ज करा परमिशनसाठी पण तुम्ही काहीच एक तरी अर्ज केला आहे का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

कलेक्टर साहेबांना अर्ज केला आहे पण त्यांना सविस्तर अहवाल पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

लियाकत शेख :-

२-२ वर्ष झालीत आमची नाला सफाई झाली नाही. झाली का उत्तनला?

संदिप पाटील :-

पानपट्टे साहेब तुम्ही जो पत्रव्यवहार केलेला आहे मंत्रालयात सी.आर.झेडला आणि याच्यामध्ये तो पत्रव्यवहार दाखवा ना आम्हाला किती वर्ष झाले आणि तुम्ही बोलता हायकोर्टात पीटीशन दाखल करणार. हायकोर्टाचा निकाल यायला ३-४ वर्ष जातील म्हणजे आमची टर्म संपून जाईल. लोक आम्हाला विचारतात.

लियाकत शेख :-

साहेब या सर्व गोष्टीला २-२ वर्षे लागतात का? एन.ओ.सी. आणायला तुमचा ब्रिज बांधायचा असेल रस्ता बांधायचा असेल तुम्ही सी.आर.झेड मधून परवानगी घेऊन येत नाही का? नाही आणत का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

एक नाल्याचा नाही साहेब भरपूर नाले आहेत.

लियाकत शेख :-

३-३ वर्ष लागतात ही नालेसफाई करण्यासाठी का तर म्हणे तिवराची झाडे आहेत तेथे आम्ही हात लावणार नाहीत. आमच्यावर गुन्हे दाखल होतात अरे पण परवानगी घेऊन करा.

संदिप पाटील :-

पानपट्टे साहेब मुर्धा खाडीचा नाला याच्यानंतर राईचा नाला आणि मोर्व्याचा नाला हे तुम्ही साफ केलेले मला दाखवून द्या.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ज्या-ज्या ठिकाणी नाले साफ केले त्या सर्व व्हिडीओ शूटींग आमच्याकडे आहेत.

संदिप पाटील :-

खाडी साफ केलीत का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

खाडी, नाला साफ केले ना. दाखवतो ना.

संदिप पाटील :-

नाला साफ केलेत खाडी साफ नाही केली.

(सभागृहात गोंधळ)

संदिप पाटील :-

तुम्हाला १०० फोन करावे लागतात की आम्हाला जे.सी.बी. द्या, पोकलन द्या नाले साफ करायला तरी अजूनपर्यंत त्याची व्यवस्था होत नाही.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपण कधीच मला फोन केला नाही. नाहीतर मी लगेच लक्ष दिले असते.

संदिप पाटील :-

विचारा तुमच्या पी.ए. ला.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम सभी सदस्योंने कहाँ की करोड नही दो करोड जितना पैसा चाहे लो, यह भी जनता का पैसा है फालतु नही जाना चाहिए। एक साईड में हम सभी धर्म उत्सव में फंड कम कर रहे है। जनता का पैसा है बेकार नही जाना चाहिए। आमदार साहब भी बैठे है। इन्होंने भी मेरे पास सब प्रोसीजर है २०१४-१५ से इन्होंने हर बार कहाँ था की गोषवारा पूर्ण रुप से लाया जाए की आप हर बार इसके अंदर में नाला सफाई कर रहे है। उसके अंदर में आपको मालुम होना चाहिए की आपके कच्चे नाले कितने है पक्के नाले कितने है? उनकी लंबाई कितनी है? उसमें किस किस साल मनुष्य बल कितना लगा था? उसमें मशिनरी कितनी लगी थी। हर बार के अंदर में २०१३-१४-१५ में हर सदस्य ने आवाज उठाई की गोषवारा उसके साथ में आप दिजीए। और उसके बाद के अंदर में उसमें कितना खर्चा होता है १ करोड लगता है

देढ करोड लगता है दो करोड लगता है, अपेक्षित जो होता है वो आप दिजीए। लेकिन आपने कभी नही दिया। पानपट्टे साहब आपने कभी भी २०१३ से लेकर मेरे पास सब प्रोसीडींग है पढके सुना देता हुँ आपको, लेकिन कभी भी आयुक्त साहब इन्होंने गोषवारा के अंदर में उसमें नमुद नही किया। आज मेरे पास इनकी यादी है। इन्होंने यादी दिया है २०१६-१७ वार्षिक वर्षातील पावसापूर्वीचे कच्चे पक्के नाले सफाई खोदकामाबाबत माहिती। इसके अंदर में इन्होंने १५५ नालो की लिस्ट दे दी है। लेकिन यह १५५ नाले क्या कच्चे है? कच्चे नही है साहब। इसमें ६५ से ७० टक्के बांधकाम विभागने पक्के नाले जो इसके अंदर में है। नगरोत्थान अंतर्गत के अभियान के अंदर में इन्होंने बना दिया इन्होंने पिछली बार भी कहाँ था की जो नाले पक्के बन गए उनकी आज सफाई की आवश्यकता नही है क्योंकी उस कॉन्ट्रॅक्टर ने उसको साफसफाई करके और बांधकाम को सोपा है। उस नाले के अंदर में आज भी एक ढक्कन खोले नही गया। जब शहर के अंदर में ७० टक्के नाले पक्के के रुप में परिवर्तन होंगे जो पहले कच्चे नाले के अंतर्गत थे उनके अंदर में मशिने मनुष्य बल हर चीज ज्यादा लगता था आज वो कम होना चाहिए। लेकिन कही भी कम नही हो रहा था। खाली एक यह हो रहा है की, हमारा एक टारगेट लिया जा रहा है की देढ से दो करोड उनका खर्चा करना है तो करना है। दुसरी बात महापौर मॅडम महासभा के अंदर ५० लाख की मंजूरी दी थी उस समय के अंदर में शायद कुछ कॅल्क्युलेशन मिस्टेक हो गई होगी। ५० लाख की आपने मंजूरी दि थी। जब की बजेट के अंदर में ठराव नही होता फिर भी ठराव किया जाता है। ठराव हुआ था १९/३/१६ को नियम में ३ महिने पहिले दुसरा ठराव नही होता है। फिर भी आपने विषय ३ महिने के पहले नियम को साईड में करते हुए ले लिया। उसके बाद में कोई बात नही उसमें भी हुआ महासभा में यह मंजुरी दी ५० लाख की स्टॅन्डिंग कमिटी में दर निश्चित करने की मंजूरी दि की जो भी दर है पोकलन के क्या दर है, मनुष्यबल के क्या दर है, हर दर निश्चित करने के लिए। पिछले १५ से २० दिन पहले के अंदर में मा. महापौर मॅडमने दौरा किया था पानपट्टे साहब के साथ की शहर के अंदर में नाला सफाई का काम ९० टक्के हो गया। पेपर में भी बातमी आई थी। अगर शहर के अंदर ९० टक्के नाले पूर्ण रुप से साफसफाई हो गए थे तो क्या वो ५० लाख में हुए थे। की देढ करोड में हुए थे। मंजूरी आप आज ले रहे है। अगर ९० टक्के ५० लाख मे हो गए। तो यह बाकी का पैसा किसके अंदर में जाएगा। १० टक्के के अंदर में तो १ करोड, देढ करोड जाएगा नही। तो आपने वहाँ पे वो स्टेटमेंट गलत दिया की ९० टक्का गया या वो ५० लाख में हुआ नही है। ५० लाख से अगर ज्यादा हुआ है तो वो किस बेस के उपर में आपने खर्चा किया या मंजुरी दि। कोई कानुन के अदंर में मुंबई प्रांतिक अधिनियम के अंतर्गत किस कानुन के तहत किस धारा के अंतर्गत आपने उसकी मान्यता दी। मैंने आपसे पूछा था की यह ज्वलंत महत्वपूर्ण विषय है। ऐसे विषय पे निर्णय लेने पडते है। पानपट्टे साहब महत्वपूर्ण निर्णय तो ऐसे कही है पालिका में। आपको में बताऊ गणवेश का विषय शाला का होता है। हर बार के शाला खुलने के बाद हम गणवेश देते है ३-३ महिना, ४-४ महिना क्यों? क्योंकी लेट होता है। तो अगर यह महत्वपूर्ण विषय है तो क्या यह महत्वपूर्ण विषय नही। यह भी महासभा के अंदर में होता है तो उसमें क्या ऐसा किया नही जा सकता है? नही किया जाता है क्योंकी नियम के अंदर में तरतूद नही है। आपने जो किया गलत किया है। महापौर मॅडम, आयुक्त साहब में आपके माध्यम से बोलना चाहता हूँ की सार्व. बांधकाम विभाग और यह नाले साफसफाई का जो आरोग्य विभाग दोनो मिलके अगर काम किए होते तो यह नालेसफाई आधे पैसो में होती क्यों, क्योंकी शहर के नाले पक्के नाले में परिवर्तीत हो चुके है और अधिकांश नाले जो अंतर्गत नाले है महिने में २ बार साफसफाई जो हमारे ठेका दिया हुआ है उसके अंतर्गत होता है। तो कही ना कही यह आरोग्य विभाग आयुक्त साहब, महापौर मॅडम आपको दिशाभूल कर रहे है। हर बार कहाँ जाता है। ठराव में नमुद होता है की नगरसेवक को उसको सूचना दि जाएगी उसके बाद में नाला साफसफाई होने जा रही है। कभी भी नही दि जाती क्यों नही दी जाती। वो भी एक उसके अंदर में गवाह रहेगा की हमारे नाले साफसफाई बराबर हुई है। वहाँ पे इतने पोकलन लगे है यहाँ पे इतने डम्पर लगे है। यह कही ना कही प्रशासन दिशाभूल कर रहा है नगरसेवक को को। हर बार ठराव में नमूद होता है। मेरा आपसे कहना है की आप अपने पास के अंदर में पुरी चौकशी किया जाए की इसके अंदर में क्या क्या लग रहा है क्या-क्या नही लग रहा है। कितने नालो की साफसफाई हुई, फोटोग्राफी, डम्पर के नंबर उनके कितने घंटे काम किए हुए है क्योंकी जनता का पैसा बेकार नही जाना चाहिए। और नियम के अंतर्गत हुआ की नही हुआ इसका खुलासा करे।

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम हा जो विषय आलेला आहे. मी आपणांस सूचित करु इच्छितो आपल्या शहरात भाईंदर पूर्वेला २ नाले फार महत्वाचे आहेत एक इंदिरा नगरचा नाला जो केबिन रोडवरुन आलेला आहे इंडस्ट्रीयल मध्ये. आता भानुशाली मॅडमने जे आपल्याला सांगितले त्याबद्दल इंडस्ट्रीजमध्ये मॅडम रोजचा इंडस्ट्रीचा कचरा त्या नाल्यामध्ये पडतो. ज्यावेळी पावसाला सुरुवात होते त्यावेळी फक्त नाले साफसफाई करायला जातो आज काही ठिकाणी त्यांच्या गाड्याच पोहोचलेल्या नाही काही ठिकाणी कामगारच पोहोचलेले नाही. कमिशनर साहेब आज आपण जर पाहणी केली संयुक्त दौरा काढा. तुम्हाला माहिती मिळेल की किती नाले साफ झालेले आहेत. अंतर्गत नाले तसेच आहेत. आमच्या नवघर रोडला एस.टी.पी.चे प्लान आहे त्याच्या बाजूने कच्चा नाला गेलेला आहे. तो अजून साफ झालेला नाही. कदाचित पावसामध्ये भरती आली आणि पाऊस जोरात असेल तर संपूर्ण नवघर रोड भरणार आहे. हे आज मी आपल्याला सूचित करु इच्छितो. महापौर मॅडम आज आरोग्य डिपार्टमेंट पानपट्टे साहेबांकडे आहे आणि

कित्येक वर्ष ते डिपार्टमेंट त्यांच्याकडे आहे. फक्त कॉन्ट्रॅक्ट वाले वाट बघतात आम्हाला हे नाला सफाईचे काम केव्हा मिळेल. पावसाळा आला की त्यांना कॉन्ट्रॅक्ट जाते परंतु ते नाला सफाई झाले का नाही याच्यावर पानपट्टे साहेबांनी कधी जाऊन पाहणी देखील केली नाही. पानपट्टे साहेबांनी सांगावे की ते केव्हा गेले नाल्याची साफसफाई झाली का नाही पाहायला. महापौर मॅडम हे आरोग्य डिपार्टमेंट आता म्हसाळ साहेब सुध्दा आलेले आहेत त्यांनी थोडेफार काहीतरी बदल करा कारण जोपर्यंत बदल होणार नाही तोपर्यंत या कामांमध्ये तुम्हाला बदल दिसणार नाही. पानपट्टे साहेब कुठे बाहेर फिरलेले दिसत नाही फक्त ऑफिसमध्ये यायचं बसायचं. काम करतात नाही करतात माहित नाही. सगळ्याच डिपार्टमेंटमध्ये त्यांची बोंबाबोंब असते इकडे पावसाळा आला की नाले सफाईचे काम येते हा विषय प्रत्येक वेळी निघते परत ये रे माझ्या मागल्या. महापौर मॅडम आयुक्त साहेब आपण संयुक्त दौरा करुन पहा नाहीतर भाईंदर पूर्व पावसाळ्यामध्ये निश्चितपणे बुडेल हे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो आणि आपण पाहणी करुन त्या ठेकेदाराच्या वरती त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या वरती कारवाई करा त्या वेळेला हे कुठेतरी जाऊन काम होईल आणि पावसामध्ये त्रास होणार नाही धन्यवाद मॅडम.

आसिफ शेख :-

सन्मा. महापौर मॅडम, नेहमीची येतो पावसाळा त्याप्रमाणे नाला सफाईचा विषय हा दरवर्षी चर्चेला राहतो आणि दरवर्षी नाला सफाईची बोंबाबोंब असते. मला आयुक्त साहेबांना एवढेच सांगायचे आहे या ठिकाणी. प्रॉपर नियोजन आपल्याकडे असलं पाहिजे नुसत जर आपण नियोजन केले तर निश्चितपणे त्यामध्ये आपल्या प्रशासनाला गालबोट लागणार नाही. नाला सफाईचा विषय आहे. नाले सफाई आरोग्य विभाग त्याचप्रमाणे बांधकाम विभाग आणि त्याचप्रमाणे नगररचना विभाग या तीनही विभागांचे एकमेकांशी को-ऑर्डिनेशन पाहिजे. जेव्हा आपण बजेट तयार करतो तेव्हा आपण बांधकाम विभागाला विश्वासात घ्या, नगररचना विभागाला विश्वासात घ्या आणि अरोग्य विभागाला विश्वासात घेऊन व्यवस्थित आपण नियोजन केले पाहिजे. किती नालेसफाई आपल्याला निश्चितपणे करायची आहे. बांधकाम विभागामध्ये नगरोत्थानच्या माध्यमातून जे नाले बनवले आहे त्यामध्ये त्यांना वगळले पाहिजे. नगररचना विभागाचा अभिप्राय घेतला पाहिजे. त्यामध्ये नक्की त्यामध्ये फिसीबीलीटी आहे की नाही जागेचा वाद आहे का नाही ते सगळे तपासून केले पाहिजे. इथून पुढे आता झाल गेल ठिक आहे पण इथून पुढे आपण जेव्हा बजेट करता ना या तीन्ही विभागाशी निगडीत. तिघांशी सुसंवांद पाहिजे सुसंवाद झाला तर मला वाटते निश्चितपणे प्रशासनाला गालबोट लागणार नाही. त्या दृष्टीकोनातून आपण येथून पूढे तिन विभागांशी संबंधित याप्रमाणे कारवाई केली पाहिजे. निश्चितपणे नालेसफाई व्यवस्थीत होईल. सुपरव्हिजन राहील आणि आपल्याला गालबोट लागणार नाही.

रवि व्यास :-

महापौर मॅडम आपकी परवानगी से बोलना चाहता हूँ की, भाईंदर पश्चिम प्रभाग क्र. ०२ में जो वहाँ पे मुख्य नाला है। वहाँ पे नाला सफाई का काम शुरु होने से पहले ही वहाँ के संबंधित इंजिनिअरने और कॉन्ट्रॅक्टर ने हम लोगो को वहाँ पे बुलाया था और हमारे निर्देशन के अंदर ही बहुत ही अच्छे तरीके से वहाँ पे नाला सफाई का काम किया गया है और महापौर मॅडम आपको भी बहुत धन्यवाद देता हूँ की आपने भी पानपट्टे साहब के साथ पुरे मिरा भाईंदर में पर्सनली आपने व्हिजीट किया था। पुरी धुप के अंदर आप पैदल चल रहे थे, दुसरे दिन आपकी तबीयत खराब हो गई थी। सब लोगो को पता है तो प्रशासनने नाला सफाई का काम मेरी नजर में तो ठिक किया है और अभी तक कही मुझे पानी भरने की कोई भी कम्पलेन्ट मुझे मेरे प्रभाग से आसपास से आई नही है।

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम नाला सफाई की पहले चर्चा हुई थी। उस समय मैंने बताया था की पिछली बार भी नाला सफाई में जितना खर्चा, १-१ खर्चा हमारा गटार तुट गई ढक्कन उसपे हुआ था। मैंने बोला था इसमें प्री सफाई ढक्कन का सर्व्हे और बाद का सर्व्हे होना चाहिए। अभी तक मुझे उसके बारे में कोई भी जानकारी नही मिली है की ऐसा किया गया है। मुझे जरा स्पष्ट किजीए की आपने नाला सफाई के पहले कितने गटर सलामत थे। कितने टूटे इस बारे में कोई कारवाई हुई की नही हुई है। इसका खुलासा करके बताऐंगे।

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते शितल नगरमध्ये परवा पाऊस पडला तर रात्री ३ वाजता पासून ग्राऊंड फ्लोरमध्ये काही सोसायटीमध्ये पाणी शिरलं आणि ३ वाजल्यापासून लोक तिकडे जागे आहेत. सकाळी मी साडे पाचला फोन केला. पराडकर साहेबांना आणि त्यांना सांगितल तिकडे यायला. मी स्वतः जाऊन साडे सहा वाजता पिक्चर घेतले शिंदे साहेबांना सांगितले नंतर तिकडे मशिन लावून पाणी उपसलं गेले. तर हे मी विचारते साहेब जर नाला सफाई व्यवस्थित केली असती तर हे प्रकरण घडलं नसतं.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम संबंधित विषय आहे आता अगदीच पाऊस पडला थोडा कमी जास्त माझ्या प्रभागात सुध्दा नविन नाल्याचे काम चालु आहे आणि काम चालु असताना सुध्दा एवढा मोठा पाणी भरणं सिल्व्हर पार्कला मी आयुक्त महोदयांना आणि पानपट्टे साहेबांना फोन करुन सांगितले. खूप पाणी भरले आणि अजुनही पाणी आहे. विजय पार्कमध्ये आणि माझ्या राहत्या कॉम्पलेक्समध्ये एवढं ऊंचावर असून सुध्दा एवढं

पाणी भरले. नाला सफाई जशी पाहिजे तशी झालेली नाही. विषय दुसरा नाही औषध मारण्याचा औषध फवारणी करण्याचा एकतर ते सफाई होत नाही आणि दुसरे औषध मारले जात नाही. औषधाच्या गाड्या नेहमी म्हणतात एकच गाडी आहे आठवड्यातून एकदा येते पण ती येत नाही. सद्या घरच्या लोकांच्या घेऊन जातात. पानपट्टे साहेब आयुक्त महोदय ऐका ४-५-८ गाड्या कुठे प्रभाग समितीच्या खाली सडत आहे त्या गाड्या. गेल्या वर्षी घेतलेल्या आहेत गाड्या. त्या गाड्या महानगरपालिकेचे किती नुकसान होत आहे याच्यावर कोण लक्ष देणार. प्रभाग समितीला विषय आला होता साफसफाईचा आणि औषध मारण्याचा तर त्या वेळेस त्या गाड्या आहेत ना त्या दुरुस्त करुन घ्या. नाल्यांची व्यवस्थित सफाई करुन घ्या. आता सफाई केली तरच नंतर काही फायदा होणार नाही. त्याच कारण पाऊस आला वाहून जाणार. कमीत कमी जे दगड आहेत किंवा त्यामध्ये काही कचरा अडकलेला आहे ते काढून ताबडतोब साफ करुन घ्या. ताबडतोब भरत नाही साहेब ते कारण ते ओला असतो कचरा ओली घाण भरुन टाकावी. हे आमचं समाविष्ट करुन घ्यावे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आपकी परवानगीसे मैं बोलना चाहता हूँ की, नाला साफसफाई का विषय है। आपने, उपमहापौर, सभापती सबने धूप में चलके आपने सब सर्व्हे किया यह पुरे जनता को मालुम है। जब की यह काम प्रशासन का होना चाहिए लेकिन मेरी एक इस विषय से विनंती है की मिरा भाईंदर शहर के अंदर से एक जाफरी खाडी निकलती है जो पुरे मिरारोड को बाधित करती है और वो जाफरी खाडी को आगे चलते नाले में कन्वर्ट किया हुआ है अगर उसकी साफसफाई का ध्यान अगर नही रखा गया तो आगे चलके पुरा मिरारोड के अंदर पानी भरने की समस्या है और मैंने पानपट्टे साहेब को यह हमारी स्टॅन्डिंग मिटींग खतम होने के बाद में इस बात को अवगत भी कराया था की उसको भी साफ कराया जाए ताकी आनेवाले टाईम में जो नाले को छोटा करके उसको बांधकाम करके छोटा किया हुआ है उस खाडी को नाले के रुप में तो कभी भी उसके अंदर अगर कचरा ज्यादा भर गया तो पुरा पानी भर जाएगा मिरा भाईंदर में। और मेरे वॉर्ड को लगके वो जाफरी खाडी होने के वजह से मेरे वहाँ के रहिवासी को बहुत ज्यादा तकलीफ होती है तो मैं इस माध्यम से आपको सूचित करता हूँ की आप उसके उपर ध्यान दे और जाफरी खाडी को एकदम साफ सुथरा रखे क्योंकी यह एक खाडी है जिसके वजह से पुरे मिरा भाईंदर को तकलीफ हो सकती है। जो शहर के बीचोबीच से निकलती है।

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आयुक्त महोदय तुमच लक्ष केंद्रीत करु इच्छितो खरतर हा ठराव जो नाला सफाईचा ५० लाखाचा त्या अनुषंगाने चर्चा चालु आहे. खर तर तो ठरावच होऊ शकत नाही. तो विशेष महासभेमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा करत असताना त्याच्यामध्ये सूचना म्हणून समाविष्ठ केलेला आहे असा अर्थ होतो घुसवला. तो ज च्या प्रस्तावाच्या माध्यमातून मी आणू शकत होतो ते ज चे प्रस्ताव मी मांडले होते. आम्ही केलेला ठराव तुम्ही मान्य केला आणि याला विखंडीत केले तर तुम्हाला काही अडचणच येणार नाही. ही चर्चाच व्हायची गरज नसती आणि आरोप तुमच्यावर प्रशासनावर झालेच नसते. तुम्हाला पूर्णपणे संधी होती अजूनही करु शकतात कारण मी माझ्या ठरावामध्ये प्रशासनाने आयुक्तांनी दिलेल्या आकड्यामध्ये कुठलाही बदल घडवलेला नाही. दुसरे एक चुक प्रशासन सुरुवातीपासून करत आलेली आहे आणि परत आता आम्हाला सुधारीत गोषवारे दिले आहेत नाला सफाई झाली पाहिजे. दरवर्षी प्रशासन करत आला आणि हे काही ५० लाखाचे काम नाही हेही स्पष्ट गोषवारा दिल्याच्यानंतर परत पावसाळ्यापूर्वी नाला सफाई कामास कार्योत्तर मंजूरी देण्याचे नियमच नाही कुठेच नाही. कुठेही तुमची पुस्तके कितीही उलटली तरी आज कार्योत्तर मंजूरी काय विषय आहे तो स्पष्ट होत नाही. तुम्ही साहेब करेक्शनमध्ये सही सुध्दा दिली त्याच्यापुढे २ कोटी खर्च अपेक्षित आहे. कार्योत्तर मंजूरी २ कोटी परत अपेक्षित आहे. काहीतरी एक स्पष्ट भूमिका घ्या. २ कोटी रुपये खर्च केले त्याची कार्योत्तर मंजूरी घेत आहेत की करायला देतात. हे सगळे गोंधळ प्रशासन गोषवाऱ्याच्या माध्यमातून ते कळतच नाही अभ्यासच करत नाही आम्हाला सोडतात अभ्यास करायला घ्या हातामध्ये.

मा. महापौर :-

पानपट्टे साहेब खुलासा करा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो जुबेर साहेबांचा खुलासा करतो कार्योत्तर मंजुरी ऑलरेडी काम केलेले आहे.

जुबेर इनामदार :-

ऑडिटरला बोलवा आणि विचारा करु शकता का?

मा. आयुक्त :-

बजेटमध्ये काय तरतूद होती? आपण काय प्रस्तावित केल होत. स्टॅन्डिंग कमिटीने कशाला मंजूरी दिली? सगळ सविस्तर सभागृहाला कळू दे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

अर्थसंकल्पाच्या बजेटमध्ये त्याला कार्योत्तर मंजूरी फक्त ५० लाखाची दिली होती. दरवर्षी नाले सफाईला जवळपास पावणे दोन ते दोन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यापूर्वी बांधकाम विभागाने नाले

सफाईला किती खर्च त्याच इस्टीमेट डिटेल केले होते जवळपास ५ ते ६ कोटी जात होते. दरवर्षी या विषयावर चर्चा करतात, नगरसेवक चर्चा करतात म्हणून मी हा विषय माझ्याकडे नको म्हणून सविस्तर आयुक्तांना विनंती केली होती हा विषय डिटेलने मोजमापने होऊ द्या किती रुपये खर्च लागतो त्याला तेव्हा ते इस्टीमेट केले होते की ५ ते ६ कोटी लागतात. कमी खर्चामध्ये आपण दरवर्षी नाले सफाई करतो त्याची व्हिडीओ शुटींग होती त्याचे फोटोग्राफी करतो त्यावर सुपरव्हिजन इंजिनिअरचे असते, आमचे असते. प्रत्येक नाला सफाईला आम्ही प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष फिरतो काम संपूर्ण होते नंतर मग तक्रार करायची असते. प्रत्येक वॉर्डमध्ये फिरतो त्यावेळेस सदस्यांनी मला फोन करायला पाहिजे होता की ही नाले सफाई होत नाही पाणी साठते. आजपर्यंत मला कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही. ज्या ठिकाणी मोजक्या लो लाईन गेल्या त्या ठिकाणी थोडा जरी पाऊस पडला ३० मी.मी. जरी पाऊस पडला तर ते पाणी साचते त्या ठिकाणी फक्त आपण २७ ठिकाणी सक्शन पंप लावतो. पंपाशिवाय दुसरे लो लाईन गेली त्याला थोडा जरी कुठे पाऊस पडला तरी पाणी साचणार म्हणजे साचणार. मोठे जे बी.पी. रोड, केबीन रोड, स्टेशन रोड त्या ठिकाणी अतिक्रमणची मोठी कारवाई केलेली आपण त्यामुळे ते मधेमधे पडत होते त्या ठिकाणी नाले सफाई केली जरी काही असेल तर तेथे पण नाले सफाई करतो. मध्यंतरी विषय होता ५० लाखाचा मा. महासभेने ते बजेटमध्ये तरतूद केली होती दरवर्षी त्याला पावणे २ ते २ लाख रुपये खर्च येतील त्यासाठी ५ तारखेला गेल्या मे मध्ये विषय आणला होता तथापी मध्यंतरी आचार संहिता लागल्यामुळे तो विषय होऊ शकला नाही त्यामुळे आता सुधारीत गोषवारा दिलेला आहे. त्यामध्ये जवळपास २ कोटी अपेक्षित आहे. अजून ३-४ महिन्यामध्ये ज्या मशिनरी लागत असतील पुन्हा नाला खोदत असेल कुठे भरणी केली असेल ते लागतील म्हणून अंदाजित २ कोटी खर्च दिलेला आहे.

भगवती शर्मा :-

पानपट्टे साहेब नियमामध्ये तरतूद आहे का? साहेब यांनी कबूल केले आम्ही खर्च केलेला आहे ५० लाखाची मंजूरी होती ती यांनी आता स्वतःने सांगितले की १ कोटी खर्च केलेला आहे. कुठलीही मंजूरी न घेता.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपत्कालीन परिस्थितीमध्ये................

भगवती शर्मा :-

अधिनियममध्ये कुठे आहे आम्हाला सांगा ना.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आपत्कालीन परिस्थितीमध्ये करु शकतो साहेब.

(सभागृहात गोंधळ)

भगवती शर्मा :-

पानपट्टे साहेब देखीए कायदा एकही होगा। सबके लिए अभी इन्होंने बोला सर्वधर्मीय उत्सव के लिए कोई भी कायदे में ऐसी तरतूद नही है। ऐसे इन्होंने बोला था तो वही चीज इसमें भी होनी चाहिए ना। कायदा में क्या तरतूद है की ऐसे विषय के अंदर में १ कोटी खर्चा कर सकते है क्या? जब की ५० लाख का मंजूरी था। विषय को मंजूरी न लेते हुए महासभा की मंजूरी न लेने के पहले १ कोटी खर्चा कर सकते है। यह नियम के हिसाब से बता दिजीए ना।

जुबेर इनामदार :-

पण आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली कुठे?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

होऊ शकते हे मे मध्येच कामकरावे लागेल जूनमध्ये करु शकत नाही.

जुबेर इनामदार :-

आम्हाला कायद्यात तरतूद दाखवा.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

ॲक्ट वाचून बघा.

जुबेर इनामदार :-

वाचून दाखवा प्रशासन अधिकारी तुम्ही का आम्ही.

सुहास रकवी :-

बजेटमध्ये ५० लाखाची तरतूद आयुक्तांनी दिली आहे.

भगवती शर्मा :-

आयुक्त साहेब सचिव साहेब तुम्ही सांगा ना अधिनियमामध्ये अस आहे का? विषय आणल्यापूर्वी असा खर्च करु शकता का? मग महासभा कसली? ऑडीटरला बोलवून सांगा ना. ते आम्हाला महापौर मॅडम की नियम मे तरतूद है तो कोई बात नही है ना।

नयना वसाणी :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, पानपट्टे साहेब आपण आता सांगितले की, प्रत्येक जागेची जाऊन आपण स्वतः तपासणी करता आपण व्हिडीओ रेकॉर्डींग करुन घेतात. २०१२-१३ साली व्हिडीओ

रेकॉर्डींग झालेली नाही. आयुक्त विक्रम कुमार होते तेव्हा त्यांनी त्या कंपनीला ३६ लाखाचा फाईन केला होता. २०१२-१३ मध्ये बरोबर आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

बरोबर आहे.

नयना वसाणी :-

तो फाईन वसुल केला का?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

त्याला बिलच दिले नाही ना तेवढे आपण. वसुल करायला त्याला बिलच गेले नाही.

नयना वसाणी :-

मग ती कंपनी डिफॉल्टर नाही का? जर त्या कंपनीला ३६ लाखाचा फाईन झालेला आहे. तर ती कंपनी आपण डिफॉल्टर म्हणून का घोषित केली नाही. म्हणजे अशाच कंपनीला त्याच कंपनीला आपण दरवर्षी टेंडर देतोय त्याच कारण काय?

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

या कंपनीला त्यावेळेस दिलेले नाही.

नयना वसाणी :-

आता कुठल्या कंपनीला दिले.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

आशापुरा कंपनीला दिलेले आहे त्या कंपनीला नाही.

नयना वसाणी :-

आशापुरालाच २०१२-१३ ला दिलेले आहे साहेब.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

दोन आहेत एम.एस आहे आणि दुसरी एक आहे.

नयना वसाणी :-

एम.ई. आहे मालिक एकच आहे त्याचा साहेब. आणि गेल्या वर्षी १,६५,०००० रु. खर्च झालेला आहे. ६५ लाख बॅलेन्स आहे म्हणजे ते झाले २ कोटी ३० लाख. तर बाकीच्या ६५ लाखाची तरतूद तुम्ही कुठे केली. कुठल्या महासभेत तो ठराव पास झाला ते दिले का? गेल्या वर्षाची तरतूद किती होती दिड कोटीची होती त्याच्यातून एक पासष्ट आणि ६५ लाखाचा तुम्ही अतिरिक्त खर्च दाखवलेला आहे.

नयना वसाणी :-

गेल्यावर्षीचे विचारताय का तुम्ही?

सुहास रकवी :-

मॅडम बजेटमध्ये फक्त ५० लाखाची तरतूद आयुक्त साहेबांनी केली होती. पानपट्टे साहेब तेव्हा आपत्कालीन परिस्थिती नव्हती आम्ही तुम्हाला विचारलेले तुम्हाला विचारलेले दरवर्षी तुम्हाला नाले सफाईचा अंदाज आहे.

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

खुलासा करतो मी. नाले सफाई आणि दैनंदिन साफसफाई यासाठी एकत्रित तरतूद ६५ कोटी आहे.

सुहास रकवी :-

६५ कोटी?

भगवती शर्मा :-

साहब वो दैनंदिन साफसफाई के लिए उसके अंदर में पुरे वर्ष की दैनंदिन साफसफाई प्लस कच्चे नाले पक्के नाले खोदाई सब मिलाके। लेकिन उसके अंदर में ५० लाख की मंजूरी दि गई थी यह कबुल है ना।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

दी थी मगर हमने नही मांगी थी वो।

भगवती शर्मा :-

आप मांगो ना मांगो आप तो जो मांगोगे क्या मिलेगा? यह सभागृह इसीके लिए है की सभागृह निश्चित करता है क्या करना है क्या नही करना है। उस समय ५० लाख किया आज २ करोड कर रहे हो। आज वो ढाई करोड कर देंगे वो अलग बात है। निर्णय सभागृह करेगा लेकिन निर्णय के पहले जो आपने १ कोटी बोला वो प्रांतिक अधिनियम में किस कलम के अंतर्गत कर सकते है। उसका खुलासा कर दिजीए। आप ऑडीटर को बुला लिजीए महापौर मॅडम। और उनके सामने पुछीए की ऐसा नियम है क्या? मैंने पत्र भी दिया था आयुक्त साहब आपको भी दिया था। इनको भी कॉपी दिया था की हमारा कही यह नही कहना है की ५० लाख में होना चाहिए। जो काम वास्तविक अमाऊंट है उसमें होना चाहिए। जो व्हिडीओ शुटींग यह सब बताऐंगे तो बताइए हम देखेंगे उसके बाद वापस सभा में विषय ले लेंगे। लेकिन साहब वो नियम के अंतर्गत कर सकते है क्या? खाली उतना बता दिजीए।

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय ५० लाखामध्ये होऊच शकत नाही. हे स्पष्ट आहे तरी ही ठराव ५० लाखाचा का केला आणि आज कार्योत्तर मंजूरी द्यायला कोणी काही बोलत नाही.

अश्विन कासोदरिया :-

महापौर मॅडम, आपके माध्यम से मैं पानपट्टे साहेब से यह जानना चाहता हूँ की जाफरी खाडी की साफसफाई हुई की नही हुई है।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

मॅन्युअल जितना कर सकते है उतना किया है वह।

अश्विन कासोदरिया :-

मैं आपको बताना चाहता हूँ की पुरा नयानगर, शांती नगर, मिरारोड को जो भी पानी है वो जाफरी खाडी के माध्यम से बाहर निकलता है और जाफरी खाडी के अंदर आज भी आपको पता है यह जो भी कचरा रहता है उधर जाके डाल देते है सिधा जाफरी खाडीमे और अगर जाफरी खाडी मे साफसफाई नही हुई तो मिरारोड के अंदर नयानगर के अंदर पानी भरने का पुरा पुरा चान्स है। और जाफरी खाडी का मेरे पास व्हीडीओ है। किसी आदमी एक व्हिडीओ शुटिंग किया है। जो पुरा पानी रिव्हर्स होता है वो मिरारोड के अंदर वापस आता है। भरती होने दो लेकीन साफसफाई भी होनी चाहिए ना। आज जाके देखो उपर कैसा दिखता है। मै आपको अभी जाके शुटींग दिखाता हुं। आपको पुरा कचरा दिखता है उपर और एक भी अभी तक जाफरी खाडी साफ नही हुआ है।

नरेंद्र मेहता :-

३१ मार्च ला बजेट मंजूर झाले. सभा नंतर होती. नालामध्ये उशीर होता कामा नये. कामकाज चालु व्हावे, नाल्याची साफसफाई चालू व्हावी. म्हणजे इमिजिएटली लगेच आम्ही ५० लाखाची आर्थिक प्रशासकीय मान्यता त्याच वेळी दिली की हे काम महत्वाचे आहे त्या हिशोबाने ती दिली गेली. कारण त्यावेळी प्रशासनाकडे कुठल्याही प्रकारची माहिती किंवा विषय उपलब्ध नव्हता पण आम्हाला जाणीव होती या शहरामध्ये येणाऱ्या पावसाळा सामोरे जावे लागेल. त्यासाठी ॲडव्हान्स आम्ही ५० लाख रु. ची आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली. आपल्याकडे जी निविदा प्रक्रिया आहे ते एखादे आपण सामुग्री घेतो, जेसीबी असू द्या, माणसे असू द्या त्यांचे आपण दर ठरवत असतो. आणि त्याला लागणारा जो काही खर्च ५० लाख रु. त्याला आम्ही इनिशिअल मंजूरी दिली होती. मधल्या काळात जस आता भगवती शर्मा यांनी सांगितले आचार संहिता लागली काम करणेही गरजेचे होते. आपण ती वाट बघू शकत नाही की, ती आचार संहिता कधी संपेल आणि महासभेची परत कार्योत्तर मंजूरी कधी घ्यायची. दर नक्की होते. त्याप्रमाणे आपण काम केले आणि त्याप्रमाणे आज आपण सुधारीत मान्यता आम्ही देतोय. आम्ही काय नविन आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत नाही. सुधारित देतो ५० लाख रु. इनिशियली शहराला पुढे पावसासमोर जावे लागेल त्यासाठी आम्ही अर्थिक, प्रशासकीय ॲडव्हान्स दिलेली कारण विषय आलेला नव्हता. आता रितसर आलाय त्याला आम्ही दिली आणि पावसामध्ये जर आपण थांबलो असतो, ५० लाख रु. नसते केले तर आज आपण काय केले असते. जसे भगवती शर्मांनी सांगितले मग आज गणवेश सारख झाल असत, की गणवेश वाटप झाले नाही आणि नालेसफाईही झाली नाही. ही परिस्थिती झाली असती. तर जे काही केले ते या शहरासाठी केले. जे दर ठरवले त्याप्रमाणे आपण करतोय. आपण काही वेगळे ठरवत नाही. भगवती शर्मांनी सांगितले खर म्हणजे हा मला स्वतःला प्रश्न पडला की, कसं भाषण केले होते. मला फक्त हेच जाणायचे आहे की ते त्यावेळी बरोबर नव्हते का? मी त्यावेळी बरोबर होतो. मला फक्त एवढेच जाणायचे होते. मला त्यावेळी वाटायचे की भगवती शर्मा करतात तेच बरोबर आहे आणि आम्ही तीच पध्दत अवलोकन केली. आजही त्यांनी स्विकार केले आम्ही चुकीचे करत होतो. या पध्दतीने परत तुम्हीही करु नका. पुढच्या वेळी मॅडम नक्की तसच करु या. मला अस वाटल होते ते जे मांडतात सत्तेत आहे बरोबर मांडत असेल तर या सुधारणा आम्ही करु शकतो. भविष्यात आपण ते क्लिअर करावे. नविन मान्यतेचा नाही म्हणून विषय मंजूर करावा. पुढील विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनी आपल्या निवेदनामध्ये आत्ता जे काही सांगितल त्याच्यामध्ये त्यांना मी या ठरावामधली सुचना वाचून दाखवतो. या कामाच्या निविदा अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मर्यादित मागविण्यास व सदर खर्चास ही सभा मान्यता देत आहे. म्हणजे ५० लाखाचीच असं इनिशिअल अस कुठलही त्याच्यामध्ये उल्लेख केला नाही.

नरेंद्र मेहता :-

आता आपण रेट नक्की केले, निविदा मागवली नाही. आता सुधारीत ................

जुबेर इनामदार :-

म्हणजे तुम्ही चुकला असे कबुल करता.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम दरवर्षी नाले सफाईचे काम आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जेवढे नाले आहेत त्याचं आजपर्यंत आपण करत आलेलो आहे आणि सभागृहाला याची जाणीव आहे. आणि बऱ्याचशा सन्मा. सदस्यांनी हे कबुल केले आहे. विशेष म्हणजे जुबेर इनामदारजी यांनी कबुल केले आहे की दिड कोटीच्या आतमध्ये काम होत नाही. हा आपला मागचा अनुभव आहे. आणि आम्ही डंपरचा रेट काय

असणार, जेसीबी, पोकलनचा रेट काय असणार, लेबरचा रेट काय असणार म्हणजे याला जी काही मशिनरी लागते त्याच्या रेटच आपण टेंडर मागवले होते आणि दुर्देव आपले असे की आपण महासभा पण लावलेली होती. परंतु आचार संहिता लागल्यामुळे आम्हाला स्टॅन्डीग कमिटी आणि महासभा दोन्ही घेता आले नाही. म्हणून आम्ही इलेक्शन कमिटीची विशेष परवानगी घेवून टाकली आणि ते टेंडर ताबडतोब फायनल केले आणि २-४ दिवसामध्ये म्हणजे दिल्लीतुन परवानगी मिळाली. त्याच्यामुळे २ दिवस उशीर लागला तरी पण नाले सफाईचे महत्व लक्षात घेता ही कारवाई प्रशासनाने पुढे काय होणार आहे किंवा या शहरामध्ये जर पाऊस जास्त झाला तर काय गंभीर परिस्थिती उद्‌भवू शकते या हेतूने ही कारवाई केलेली आहे. स्टॅन्डीग कमिटीच्या मान्यतेने रेट निश्चित केले आहे आणि त्या रेटनुसार आजच्या तारखेला किती खर्च येणार आहे म्हणजे त्याच्याबद्दल अंदाजित आम्ही दिलेले आहे की २ कोटी पर्यंत खर्च अपेक्षित आहे. पर्यंत हा शब्द आहे. मग तो १ कोटी ५५ लाख असू शकतो, ७५ असू शकतो, ९९ असू शकतो. २ कोटी पेक्षा जास्त लागले तर आम्ही मागु शकतो आणि दुसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ६७ क मध्ये आपण वाचा. जुबेरजी आपल्याकडे पुस्तक असेल तर जरुर वाचावे. आयुक्तांना २५ लाखापर्यंत एखाद्या कामावर खर्च करण्याचा किंवा प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे. स्टॅन्डींग कमिटीला त्यांनी ८ दिवसाला, १५ दिवसाला काय ते नियमात तरतुद आहे त्याच्याप्रमाणे अवलोकन केले पाहिजे. परंतु ६७क जे आहे ते त्याला लागु होत नाही. एकच पॅरीग्राफ वाचून दाखवतो आपल्याला. ६७ क कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगामध्ये, तुम्ही म्हणता आणीबाणी काय निर्माण झाली? आणीबाणी हि निर्माण झाली की आचार संहिता लागली. त्यामुळे प्रशासन पुढे जाऊ शकत नाही. प्रशासनाने स्टॅन्डीग कमिटीची मान्यता घेतली. जनरल बोर्डला पण आचार संहिता लागल्यामुळे आम्ही महासभेमध्ये हा विषय घेऊ शकलो नाही. मग ही जर वेळ निघून गेली असती आणि जर पाऊस जास्तदझाला असता. उद्या गावामध्ये पाणी भरल असत, तर ह्याला जबाबदार कोण? आयुक्तांनी अस करायला पाहिजे होतं, आयुक्तांनी तसं करायला पाहिजे होतं, कायद्याप्रमाणे करायला पाहिजे होते. त्यांना ६७ क खाली अधिकार होता. त्यावेळेस तुम्ही दाखवल असत. जे मी आज दाखवत आहे ते. त्यामुळे कोणत्याही आणीबाणीच्या कोणत्याही परिस्थितीत, जनेतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा महापालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी अशा आणीबाणीच्या परिस्थितीमुळे त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची कार्यवाही त्यास अधिनियमान्वये दुसऱ्या एखाद्या महानगरपालिकेच्या परवानगीने किंवा शासनाच्या मंजूरी मान्यता किंवा प्राधिकाराशिवाय करता येईल, करता आली नसती तरी ही अशी कार्यवाही केली पाहिजे. काय म्हंटल आहे याला जर शासनाची मान्यता आवश्यक असणार असेल किंवा सभागृहाची मान्यता आवश्यक असेल. परंतु अशी परिस्थिती निर्माण झाली की त्याला हे करणे क्रमप्राप्त आहे. परंतु शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही. मग ते अशा परिस्थितीमध्ये म्हणून ही वेळ मारुन नेण्यासाठी आम्ही केलेले काम आहे. याच्यात काही चोरी कुणी केली नाही आणि ज्या नगरसेवकांची तक्रार आहे त्याच्याबद्दल मी संबधित व्हीजीट करुन जर खऱ्या अर्थाने काम झाले नसेल तर त्याच्यावर कारवाई करणार असे मी अगोदरच घोषीत केले आहे आणि दरवर्षी आपण दिड कोटीला मान्यता देतो. ७५ कोटीची मान्यता ऑलरेडी आत्ता शर्माजींनी सांगितले की, आपले जे साफसफाईचे काम चालते दैनंदिन काम चालतं गटार सफाई नाले वगैरेच म्हंटल आहे. त्याच्यातले ७५ कोटी पैकी २ कोटी पर्यंत नालेसफाईसाठी अशी मागणी आहे.

भगवती शर्मा :-

आप उस चीज की भी जाँच किजीए, एकात्मीक के नाले के अंदर मे कितने पक्के नाले परिवर्तन होंगे। उनमे तो साफसफाई रहती है ना साहब। कही ना कही प्रशासन का जनता का पैसा बचना चाहिए। अननेसेसरी उसके अंदर मे खाली बिलींग नही हो। इसका भी आप जरा ध्यान रखे।

मा. आयुक्त :-

एकात्मिक नाले जो बने उसमे सफाई नही होती, ऐसा बोलना है आपका।

भगवती शर्मा :-

हॉ।

मा. आयुक्त :-

होता है।

भगवती शर्मा :-

साहब मै बोल रहा हूँ, एक ढक्कन नही खोला गया है।

(सभागृहात गोधळ)

भगवती शर्मा :-

आपको मै बता रहा हूँ, देड सो फुट के अंदरमे पुरा एकात्मिक नाले का गटार बना हुआ है। अमृतवानी के उपर में वो गटार बना हुआ है। एक ढक्कन नही खोला गया। बताईए आप। पुछीयो उनसे।

संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-

प्रॉब्लेम हो तो बताओ ना फिर। प्रॉब्लेम क्यु नही हुआ।

भगवती शर्मा :-

मैं यह नही बोल रहा हूँ की वहाँ क्यों नही हुआ। मेरा यह कहना है जो पक्के नाले में परिवर्तन हो गए है वो पिछली साल साफसफाई के अदंर में पैसा लगा था। वो पैसा तो बचना चाहिए ना कम से कम।

मेरा यह कहना है प्रशासन का जनता का पैसा है ये इसमें बच सकता था पर बचाया नही जा रहा है। आप ध्यान देंगे तो ठिक है।

दिपक खांबित :-

टोटल हमने ३० कि.मी. के नाले बनाए है और ढक्कन रहते है। वो ढक्कन खोलके सफाई करनी पडती है हायड्रो से वो भी।

भगवती शर्मा :-

साहब मैं वो नही बोल रहा हूँ लेकिन इस बार के अंदर में उन नालो की सफाई नही हुई। मेरा यह कहना है कम से कम उनके पैसे बचने चाहिए।

मा. महापौर :-

भगवतीजी उसके साथ साथ किमान वेतन बढ गया है वो बात शासद आपने ध्यान में नही ली। बहुत सारी ऐसी चीजे है भाडा यह सब चीज बढ गई है। वो भी आप कंन्सीडर करीए।

भगवती शर्मा :-

ठीक है कोई बात नही अगली महासभा के अंदर में जैसे यह साफसफाई की बिलींग होने के बाद में इस सभागृह को सूचना दी जाए की कितना मनुष्यबल लगा था या कितने डम्पर लगे थे, कितने नाले साफ हो गए उसका एक अहवाल सबको दिया जाए।

मा. महापौर :-

यह सब बताया जाएगा। मुझे लगता है अब काफी चर्चा हुई है। ठराव सर्वानुमते मंजूर।

भगवती शर्मा :-

आमचा ठराव आहे.

लियाकत शेख :-

महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५५ कच्चे पक्के नाले सफाई करण्याकरीता दरवर्षी विविध यंत्रसामुग्री व वाहने, मनुष्यबळ इत्यादी भाड्याने घेवून कामे करण्यात येत असतात व सदर कामावर दरवर्षी सुमारे दिड कोटीपेक्षा जादा खर्च येत असतो. मात्र दि. १९/०३/२०१६ रोजीच्या मा. विशेष महासभा, ठराव क्र. १४३ अन्वये सन २०१६-१७ या वर्षात रु. ५० लक्ष खर्चाच्या मर्यादेत मनपा क्षेत्रातील नालेसफाई करणेबाबतचा ठराव पारित केलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने सार्व. आरोग्य विभागाने मनुष्यबळ, विविध यंत्रसामुग्री घेणेबाबत निविदा मागवून दर मंजूर करण्याची प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

मनपा क्षेत्रातील मोठ्या नाल्यांची लांबी, रुंदी व संख्या त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्र खाडीलगत असल्याने अतिवृष्टीच्या वेळी सखल भागात पावसाचे पाणी शिरुन नागरी वस्तीत गैरसोय होऊ नये यादृष्टीने शहरातील एकूण १५५ कच्चे पक्के नाले समाधानकारकरित्या मुदतीत साफसफाईची कामे रु. ५० लक्षच्या मर्यादेत करणे अशक्य आहे, असे गोषवाऱ्यात म्हंटले आहे.

तथापी महापालिका प्रशासनानाद्वारे नालेसफाई करावयाच्या दिलेल्या यादीनुसार त्यापैकी ७० टक्के पेक्षा जास्त नाले सार्व. विभागाच्या मार्फत साफसफाई करुन गेल्या दोन वर्षात पक्के करण्यात आलेले आहेत. सदरच्या नाल्यांवर योग्यप्रकारे झाकणे बसवून महापालिकेस नाले सफाईकरीता वारंवार खर्चिक होऊ नये म्हणून अशाप्रकारचे नाले जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेनुसार करोडो रुपये खर्च करुन पक्के करण्यात आलेले आहेत. त्यानुसार आरोग्य विभागातर्फे नाले सफाई करणेकरीता देण्यात आलेल्या यादीप्रमाणे सार्व. बांधकाम विभागाशी ताळमेळ न करता तसेच योग्य पाहणी न करता अंदाजीत यादी बनविल्याचे दिसून येत आहे.

नाले सफाईच्या विषयांतर्गत दरवर्षी महापालिकेत झालेल्या चर्चेनुसार नाले सफाईचे कामकाज करताना किती मनुष्यबळ, जे.सी.बी., पोकलन, पंप, डम्पर, टीपर याची आवश्यकता आहे याबाबतची माहिती सभागृहात देणे आवश्यक असलेबाबतचा उल्लेख दरवर्षीच्या महासभेतील नालेसफाईच्या विषयाबाबतच्या चर्चेच्या इतिवृत्तांत असल्याचे दिसून येते. दरवर्षी नाले सफाईबाबत व्हिडीओग्राफी करणेबाबतच्या सुचना मा. महासभेत करण्यात येतात. परंतु प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात याबाबत कोणतीही बाब नमुद करण्यात आलेली नाही. दरवर्षी नाले सफाईच्या कामावर सुमारे दिड कोटी पेक्षा जादा खर्च येत असतो, याचे अवलोकन करुन दि. १९/०३/२०१६ रोजीच्या मा. विशेष महासभा ठराव क्र. १४३ अन्वये सन २०१६-१७ या वर्षात रु. ५० लक्ष खर्चाच्या मर्यादेत मनपा क्षेत्रातील नालेसफाई करणेबाबतचा ठराव पारित केलेला आहे. तसेच दैनंदिन साफसफाई करणाऱ्या ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट या ठेकेदाराकडून दर महिन्यातुन दोनदा पक्के नाले साफ करण्याचे काम करण्यात येत असते.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण (२)(र) नुसार महापालिकेने पारीत केलेल्या कोणत्याही ठरावात तो पारित झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी किंवा कोणत्याही विवक्षीत बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठींबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल. खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पुर्ण करुन अशा सभेची नोटीस देण्यात आली पाहिजे आणि अशा नोटीशीत ज्या ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजिले असेल तो ठराव

आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी असलेली सुचना किंवा प्रस्ताव पूर्णपणे नमुद केला पाहिजे.

असे असताना मा. महापौर आणि उपायुक्त (आरोग्य) यांनी केलेल्या पत्रकार परिषदेत ९० टक्के नाले सफाई झाले असल्याचे जाहिर केलेले असून मा. महासभा ठराव क्र. १४३, दि. १९/०३/२०१६ अन्वये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार नालेसफाईचे काम ९० टक्के केले असल्यास योग्य ठरेल अन्यथा दि. २८/०६/२०१६ रोजीच्या महासभेकरीता दिलेल्या गोषवाऱ्यात पालिका प्रशासनाने नालेसफाईकरीता आवश्यक दिड कोटी रुपयांची नमुद केलेली मर्यादाप्रमाणे नालेसफाईवर ९० टक्के इतका केलेला खर्च नियमबाह्य ठरणार आहे.

वर नमुद विविध मुद्यांना अनुसरुन तसेच मा. महासभा ठराव क्र. १४३, दि. १९/०३/२०१३ रोजीच्या प्राप्त रु. ५० लक्ष एवढ्या रक्कमेच्या मंजुरीला अधिन राहून नाले साफई करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब ठराव मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८, पोलिस आयुक्तालयासाठी जागा आरक्षित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे.वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास योजनेमधील आ.क्र. ९४, २६१, २८०, २९९, ३३१, ३३४, ३३५ व ३६४ या आरक्षणाचे नाव बदलून मार्केट याप्रमाणे आरक्षणाचे नाव करणेबाबत दि.३०/०७/२०१० रोजी मा. महासभेने ठराव क्र. ३४ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर मंजूरीप्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/३४५४/२०१०-११, दि.२१/१२/२०१० अन्वये मंजूरीसाठी सादर करणेत येवून दि.१६/०९/२०११ अन्वये फेरविनंती करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या समस्यांबाबत स्थानिक आमदार मा.श्री.नरेंद्र मेहता यांनी आयोजित केलेल्या मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दि.०४/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी मिरा भाईंदर शहरासाठी पोलीस आयुक्तालय देण्याचे तत्वतः मान्य केलेले असून प्रस्तावित पोलीस आयुक्तालयासाठी मा.पोलीस अधिक्षक यांचे समवेत मा. महापौर व मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी दि.१८/०४/२०१६ रोजी पाहणी करुन मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्कमधील आ.क्र. ३३१, ३३२, ३३३, ३३४ व ३३५ या आरक्षणाने बाधीत जागेसाठी पसंती दर्शविलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्क या परिसरामध्ये मौजे मिरा, स.क्र. ३३(१६२)/पैकी, ५१(१८३)/पैकी, १५(१४४)/पैकी, १४(१४३)/पैकी, १६(१४५)/पैकी या जागेमध्ये विविध वापराची खालीलप्रमाणेची आरक्षणे दर्शविलेली असून सदर आरक्षणाचे प्रयोजन मंजूर विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र व महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजने प्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | मनपाच्या ताब्यातील क्षेत्र (चौ.मी.) | ताब्यात आलेल्या जागेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ३४२८.२४ | ६८.५६% |
| २ | ३३२ | दवाखाना व प्रसुतिगृह | २३०० | २३५७.०० | १००% |
| ३ | ३३३ | मार्केट | २००० | ५९६.४८ | २९.८२% |
| ४ | ३३४ | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | १३००० | ३९६७.६० | ३०.५२% |
| ५ | ३३५ | बगीचा | ७८०० | २६५९.०० | ३४.०९% |

सदरचा परिसर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे या भागामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे कार्यालय झाल्यास शहरामधील जनतेला त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

यास्तव दि.३०/०७/२०१० रोजी महासभेने ठराव क्र.३४ अन्वये मंजूर केलेल्या फेरबदलामधील आ.क्र.३३१, ३३४, ३३५ या आरक्षणाच्या मर्यादित फेरबदल रद्द करणे आवश्यक असून त्याप्रमाणे शासनास माहिती सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर परिसरामध्ये आ.क्र. ३२८ हे माध्यमिक शाळा व खेळाच मैदानासाठी तसेच आ.क्र. ३२७ व आ.क्र. ३३६ हे प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित असल्यामुळे तसेच या भागामध्ये डॉन बॉस्को स्कूल, रॉयल कॉलेज, दालमिया कॉलेज हे विद्यमान शाळा व कॉलेज आहेत. यास्तव वरिल तक्त्यामधील आ.क्र. ३३४ "माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान" हे आरक्षण वगळून त्याठिकाणी मा. पोलीस

आयुक्त कार्यालयासाठी आरक्षण दर्शवून तसेच या परिसरात विद्यमान भक्तीवेदान्त हॉस्पीटल असून रॉयल कॉलेज जवळ आ.क्र. ३३८ हे डिस्पेंसरी व मॅटनिर्टी होम हे आरक्षण विकास योजनेमध्ये दर्शविलेले आहे. तसेच या व्यतिरिक्त या भागामध्ये खाजगी दवाखाने अस्तित्वात असल्यामुळे तसेच मिरा भाईंदर शहरामध्ये विकास योजना रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधीत होणा-या दुकानांसाठी व फेरीवाले यांच्या पुर्नःवसनासाठी मार्केट च्या जागांची आवश्यकता असल्यामुळे आ.क्र. ३३२ (डिस्पेंसरी व मॅटनिर्टी होम) हे आरक्षण वगळून आ.क्र. ३३२ व आ.क्र. ३३३ ही आरक्षणे एकत्रित करुन मार्केट साठी आरक्षित ठेवून इतर आरक्षणाच्या आखणीमध्ये फेरबदल प्रस्तावित करता येईल.

वरीलप्रमाणे फेरबदल करावयाचे ठरल्यास खालीलप्रमाणे आरक्षणे व त्यांचे क्षेत्र प्रस्तावित होईल.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजनेचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | फेरबदला प्रमाणे प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ५४८९ |
| २ | ३३३ | मार्केट | २००० + २३०० | ४८२७ |
| ३ | ३३४ | पोलीस आयुक्तालय | ---- | ११८१५ |
| ४ | ३३५ | बगीचा | ७८०० | ७८९६ |

सबब दि.३०/०७/२०१० रोजीच्या मा. महासभा ठराव क्र.३४ अन्वयेच्या मंजूर फेरबदलामधील आ.क्र. ३३१, ३३४ व ३३५ या आरक्षणाच्या मर्यादित फेरबदल रद्द करणेस ही सभा मंजूरी देत असून याबाबत शासनास माहिती सादर करणेसाठी तसेच वरिलप्रमाणेच्या तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम सबसे पहले तो इसके अंदर गोषवारे में दिया है आरक्षण क्र. ३३२ उसके अंदर में विकास योजना प्रमाणे आरक्षण क्षेत्र २३०० और महानगरपालिकेच्या ताब्यात २३५७ यह जादा कहा से आया।

दिलीप घेवारे :-

हो सकता है फिजीकली जो रिपोर्ट में होता है वो अंदाजे से होता है। जो हम ॲक्च्युअली लेते है वो थोडा कम जादा हो सकता है।

भगवती शर्मा :-

चलेगा, फेरबदल के बारे में महापौर मॅडम ३३३ मार्केट का रिझर्व्हेशन का किया है। जिसके अंदर मार्केट का रिझर्व्हेशन ॲक्च्युअल में २००० ही था। अभी यहाँ पे २३०० बताया गया है। मंजूरी लेना है पोलिस आयुक्तालय की जगह के लिए साथ साथ में हम मार्केट का रिझर्व्हेशन भी यहाँ पे चेंज कर रहे है। पोलीस आयुक्तालय के लिए जो जगह के अंदर में हमको खाली ३९६६ स्क्वेअर मीटर ही ताबे मे आई है। और यहाँ पे हम दे रहे है ११८१५। यह आरक्षण माध्यमिक शाळा खेल के मैदान और दवाखाना प्रसुतीगृह यह सब चीज के लिए है। तो अभी जो नया डी.पी प्लान बन रहा है उस क्षेत्र के अंदर में इन चीजों की आवश्यकता नही है क्या? डी.पी. प्लान जो नया बन रहा है अभी तो इतनी घाई और जल्दबाजी क्यों की गई। फेरिवाला को हम हटाने के लिए तयार हो रहे है। मार्केट का वहाँ रिझर्व्हेशन है वो बढा रहे है ठिक है हमको समझ में आ रहा है। लेकिन दुसरे आरक्षण माध्यमिक शाला, खेल के मैदान। माध्यमिक शाला के दिए गये है। वहाँ पे दुसरे स्कूल है। महापौर महोदय वहाँ पे जो भी दुसरे स्कुलों के नाम दिए गए है वो सब प्रायव्हेट स्कूल है। म्युनिसिपालटी की एकभी स्कूल नही है। और उन स्कूलो के अंदर में ॲडमिशन पाना भी कितना मुश्किल है। तो कम से कम यहाँ के शहरवासियों के जो गोरगरिब जनता है उनके लिए भी तो कुछ सोचना चाहिए ना। तो मेरा यह मानना है यह नया डी.पी. प्लान बन रहा है। इतनी जल्दबाजी न करके उसके अंदर में जो योजना समाविष्ट हो सकता है उसको करना चाहिए।

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम सर्वप्रथम आपण मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करु या. आभार परत एकदा मानुया की गतीशील सरकार आहे आणि एका बैठकीत निर्णय दिला आहे की आयुक्तालय करावे ४ दिवसामध्ये डी.जी. ऑफिसमधून आपल्याला पत्र येते की आपली ना हरकत द्यावी. एप्रिल महिन्यात बैठक झाली आणि एप्रिल महिन्यातच पत्र आलं की आपली ना हरकत द्यावी. त्यानंतर ज्या शहरामध्ये पोलीस आयुक्तालयचे कुठलेही मोठे आरक्षण नाही आणि त्याला कमीत कमी ३ एकरचे आरक्षण हा अपेक्षित आहे. त्या जागेवर एकुण ५ आरक्षण आहेत. मार्केट, डिस्पेन्सरी, स्कूल, गार्डन स्कूलचे २ आरक्षण आहेत. म्हणून ते ५ झाले आणि त्या परिसरामध्ये तो डी.पी. बघितला तर राईट लेफ्टला अजून आरक्षण आहेत म्हणजे आपण साधारण ५००

मीटरवर गेलो की परत आरक्षण आहेत. ते आरक्षण जास्तीचे त्या ठिकाणी ऑलरेडी आहेत त्या लोकसंख्येप्रमाणे डेन्सीटी काऊन्टेन्ट आहेत. राहिलं आपली महानगरपालिकेची शाळा जेवढी आरक्षण आहेत आतापर्यंत २००२ पासून एकही आरक्षणामध्ये आपण कधी शाळा बांधली नाही. खाजगी शाळाच केली गेली. आतापर्यंत कमीत कमी २५ नवीन शाळा बांधली ते प्रायव्हेट शाळेत येतात. आरक्षण जरी असलं रिझर्व्हेशन इज प्रायव्हेट, लॅन्ड इज प्रायव्हेट ती काय महानगरपालिकेची जागा नाही की आपण महानगरपालिकेची शाळा बांधणार. एखादा आपल्याला वाटलं की आपल्याला बांधायचं तर आपण बांधू शकतो ते आरक्षण ताब्यात घेऊन आपण स्वतः बांधू शकतो पण एवढी आरक्षणामध्ये दिली आणि एक आरक्षणामध्ये बदल झाला तर आपल्या शहराचे काय होईल त्या गरिब विद्यार्थ्यांचे काय होईल. त्या बाजूला अजून आरक्षण आहेत. त्या ठिकाणी तो विचार आपल्याला करता येईल. डिस्पेन्सरी व मॅटर्निटी सांगितल या शहरामध्ये ज्यावेळी मुळ आराखडा तयार केला आहे त्यावेळी प्रायव्हेट हॉस्पीटल येतील नाही येतील त्यांना जागा मिळतील नाही मिळतील हा सगळा प्रश्नचिन्ह होता १९९२ ला. पण आज या शहरामध्ये अनेक प्रायव्हेट हॉस्पीटल आलेले आहेत. आता ते हॉस्पीटल हॉस्पीटलच्या आरक्षणामध्ये याव की प्रायव्हेट यावे, लोकसंख्येप्रमाणे हॉस्पीटल उपलब्ध आहे ही प्रायव्हेट जागा आहे ही काही महानगरपालिकेची जागा नाही की तुम्ही सांगणार आम्ही महानगरपालिकेचे हॉस्पीटल बांधू. तो एखादा प्रायव्हेट विकासक विकसित करु शकतो. एका बाजूला आपल्याकडे एवढे मोठे हॉस्पीटल तयार केले तोच आपल्याला भार पडतो म्हणून आपण सरकारला देतो. दुसरीकडे अजून आपण स्व. आनंद दिघे साहेबांच यांच्या नावाने आपण हॉस्पीटलला मान्यता दिली तो ही आपण लवकर तयार करणार आहोत. आपण या हॉस्पीटलमध्ये आतापर्यंत काय केले लोकांना बिल्डींग बांधायला दिलं. २० टक्के, २५ टक्के आपण ताब्यात घेत असतो म्हणजे हा आरक्षण त्यापेक्षा मार्केटची जागा जस आता सकाळी चेंज झालं तर त्या २००० मीटर पेक्षा आपण ३३०० मीटर पर्यंत जास्तीत जास्त फेरिवाले जस आपण सांगितल की आपण कुठे भर दिली नाही. हा आता आम्ही भर देतोय की मार्केटचे आरक्षण हा मोठा होवो तर त्या ठिकाणी स्कूलचे आरक्षण सुध्दा आहे, गार्डनचे आरक्षण सुध्दा आहे, मार्केटचे आरक्षण सुध्दा आहे, १ स्कूल कमी होऊन हा आला आहे डिस्पेन्सरीची आवश्यकता आपल्याला त्या भागामध्ये नसली तरी काय फारस मोठ नुकसान आणि परिणाम होणार नाही. आणि डी.पी. आपण जसं सांगितल की आता २०१७ पर्यंत ही सगळी प्रक्रिया चालणार आहे. हे काही आज संपणार नाही. एक ऑब्जेक्शन, सजेशन मला वाटत नाही कमीत कमी त्याला एक दिड वर्ष तरी मिनिमम लागणार आहे. पण आयुक्तालय सरकार गतिशिल आहे. त्यांना या वर्षीच्या अखेरपर्यंत हा निर्णय घ्यायचा आहे की मिरा भाईंदरला स्वतंत्र आयुक्तालय व्हावे यासाठी ३७ करण्याचे पण आपल्याला सरकारने सुचविले होते. मुख्यमंत्र्यांनी सूचविले होते आणि आपण ते काम व्हावे यासाठी गतीने आपण तो प्रस्ताव पाठवत आहे. म्हणजे चिंता करण्याची आवश्यकता नाही. शर्माजी विद्यार्थी कुठे जातील किंवा त्या हॉस्पीटलचे काय होईल. आपल्याकडे अनेक आरक्षण आहेत त्या ठिकाणी. सगळ्या हॉस्पीटलमध्ये आपण हॉस्पीटल बांधत नाही. सगळ्या शाळेत आपण शाळा बांधत नाही. आतापर्यंत २००२ पासून आतापर्यंत या १५ वर्षात एकही आरक्षणामध्ये आपण शाळा बांधलेली नाही. चांगला विषय आहे शहरासाठी आज प्रत्येक ठिकाणी चेन केसींग असू द्या, क्राईम असू द्या कन्ट्रोलींग होत नाही आपण पोलीसांना मागितल. पोलीस दल आपल्याला मिळत नाही. अनेक कामासाठी या शहरामध्ये ग्रामीण असणारे शहरी भाग झाले २००२ साली तर अजूनपर्यंत ग्रामीण पोलीस आहे. १९४७ ला जो पोलीस फोर्स होता तोच पोलीस फोर्स आज आहे. खर म्हणजे आपल्याला पूर्ण महाराष्ट्रामध्ये ८००००० लोकसंख्या असलेले मात्र तो एक अमरावती तिकडे कमिशनरकडे हा दुसरा या मुख्यमंत्री महोदयांनी मिरा भाईंदर हा दुसरा. उदा. असेल की कमी लोकसंख्या असलेले ठिकाणी आयुक्तालय कारण हा शहरीकरण झालेले आहे मुंबई लगत शहर आहे. इकडचे क्राईम वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. ते मंत्री महोदयांनी सांगितले पोलीसांनी सांगितले आणि या सर्वांनी सुचविले या ठिकाणी आयुक्तालय झाल पाहिजे. चांगला विषय आहे. सर्वांनी एकमताने हा विषय पाठवू या. चांगला मॅसेज जाऊ द्या. शहरामध्ये आता पोलीस दल वाढणार आहे. क्राईम रेट फार कमी होणार आहे. धन्यवाद.

भगवती शर्मा :-

साहब आपको याद दिलाता हूँ अभी बीच में ठराव हुआ था। ठाणे के एक परिसर के अंदर में रिझर्व्हेशन था हॉस्पीटल का रिझर्व्हेशन तब आपकी भूमिका यह गलत थी आपने कहाँ था की बिल्डर को ना दे कर के पहले हम बांधेंगे और महानगरपालिका द्वारा तब यह भी चर्चा की गई थी की हम जो एक हॉस्पीटल है। टेंबा हॉस्पीटल वो भी राज्य सरकार को देने के लिए तयार है। वो भी हम परिपूर्ण रुप से चलाने के लिए सक्षम नही है। तब आपकी भूमिका अलग थी की वो हम ताबा में ले करके और हम बनाऐंगे। आज आपकी भूमिका अलग हो रही है। तब क्या हॉस्पीटल नही था शहर के अंदर में?

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम कदाचित त्यांनी आरक्षण वाचलं नसेल या शहरामध्ये हॉस्पीटलचे एकमेव आरक्षण आहे. तो कनाकियाला हा झेड.पी. हॉस्पीटल आरक्षण होता. इतर एकही आरक्षण नाही आणि भविष्यात या शहराची लोकसंख्या बघता महानगरपालिकेला हॉस्पीटलची गरज पडणार म्हणून तो बिल्डरने करु नये मॅटर्निटी डिस्पेन्सरी तुम्हाला तुम्ही बघितल तर ५० आरक्षण असतील एक नसलं तर काय फरक पडणार आहे आणि यासाठी तो निर्णय घेतलेला की हॉस्पीटलचे आरक्षण त्याच्याव्यतिरिक्त एक सींगल रिझर्व्हेशन आहे आणि तो आपल्याकडे असणे गरजेचे आहे. मॅटर्नीटीचे ५० आरक्षण आपल्याकडे आहेत.

भगवती शर्मा :-

डी.पी. प्लान जो पहले ९७ में बना था आप जो बोल रहे है की उस समय उनको यह नही था की २० साल में क्या होगा क्या नही होगा। तो २० बरस के बाद का सोचके ही बनाया गया था। आज भी जो बन रहा है वो २० बरस को सोचके ही बन रहा है। यह आपकी परिकल्पना हो सकती है की हॉस्पीटल नही होंगे यह नही होंगे वो नही होंगे। लेकिन लोकसंख्या के आधार के उपर में हर चीज का एक वहाँ पे रिझर्व्हेशन किया जाता है। ठिक है आयुक्तालय को हमारा कोई विरोध नही है लेकिन आप यह भूमिका और यह कैसे कह सकते हो की वहाँ पे इस चीज की जरुरत नही है। यह सरासर गलत है की आप बोल रहे हो वहाँ पे हॉस्पीटल की जरुरत नही है। आप बोल रहे हो वहाँ पे प्रसुतीगृह का जरुरत नही है। आप बोल रहे हो वहाँ पे माध्यमिक शाला की जरुरत नही है। अरे आप जो शाला का नाम बता रहे हो वहाँ पे देखीए ना डॉन बॉस्को स्कुल, दालमीया कॉलेज इनके अंदर में क्या स्थिती है। क्या आज तक म्युन्सीलालटी ने यह नही बनाया है तो अब नही बन सकती है।

मा. महापौर :-

भगवतीजी अब बनने के लिए हमारे पास दुसरी जगह अभी भी है। आप शायद बराबर सुन नही रहे है।

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम इनकी जानकारी के लिए मैं बता दू सत्ता में आने के बाद सबसे पहले हमने कोई काम किया तो आरक्षण में आज के बाद महानगरपालिका परमिशन नही देगी। जहाँ जरुरत नही है वही पे हम वो निर्णय लेंगे यह पहला ठराव हमने किया। आज तक क्या हुआ जितने डिस्पेन्सरी आपने सभी बिल्डर को परमिशन दिया है आप चाहे मार्केट की बात ले लो, चाहे हॉस्पीटल की बात, सब बिल्डर को परमिशन हमको नही ।

भगवती शर्मा :-

मैं तो बोल रहा हूँ जस समय के अंदर में आप बोल रहे हो ना हमने यहाँ पे जो निविदा निकाली उसके अंदर में आपने ही भरा था।

नरेंद्र मेहता :-

क्या भरा था।

भगवती शर्मा :-

टेंडर आपने ही मांग की थी संस्थाओ के नाम से। ऐसा नही है लेकिन उस समय के अंदर में उसको रोक लगा दी गयी थी।

रवि व्यास :-

महापौर मॅडम अपकी परमिशन से बोलना चाहता हूँ जबसे आपने महापौर मॅडम का जबसे कार्यभार संभाला है हमारे आमदार साहब की जो विकास की गती है वो इतनी तेज है की हमारे समाज में जो सदस्य है विरोधी पक्ष के उनको आदत नही है इतनी विकास देखने की और काम करने की तो धीरे धीरे थोडा टाईम लगेगा।

जुबेर इनामदार :-

हमको आदत नही हवाँ में उडने की वस्तुस्थिती ऐसी है ही नही।

मा. महापौर :-

ठराव है?

लियाकत शेख :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून ती दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रय नियमावली शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२ दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिका-याची नियुक्ती करण्याबाबत मा. महासभा ठराव क्र. १०० दि. १८/०१/२०१६ अन्वये ठराव पारीत झाला असून सबब शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार श्री. दिलीप घेवारे यांची मा. सहसंचालक नगररचना कोकण विभाग यांनी नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे.

तसेच मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारित करण्यांच्या खर्चास मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२०१६ ठराव क्र. ११ अन्वये मंजूरी देण्यांत आलेली आहे. तसेच मा. महासभा दि. १५/१०/२०१५ ठराव क्र. ७६ अन्वये मिरा भाईंदर विकास योजना सुधारित करणेबाबत इरादा जाहिर करणेसाठी मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार नविन विकास आराखडयात पोलीस

आयुक्तलयासाठी जागा आरक्षित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार पुढील कारवाई करावी.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम माझी एक सूचना आहे. आयुक्त साहेब माझ्या वॉर्डमध्ये एक शाळेच, महानगरपालिकेच्या शाळेच एक ग्राऊंड आहे आणि एक फेरीवाला झोनसाठी आणि एक प्ले ग्राऊंडसाठी. अशी ३ जागा आरक्षित आहेत. गार्डनच्या बाजुला सगळ्यांना माहिती आहे तर माझ अस म्हणणं आहे की महानगरपालिकेची शाळा व्हावी त्यात ते समाविष्ट करुन घ्यावे. प्ले ग्राऊंड आहे ते प्ले ग्राऊंड व्हावे ते समाविष्ट करुन घ्यावे आणि दुसरे आता नविन आराखडा जो तयार होत आहे त्याच्यामध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये कालच बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारला बसला आनंदाची गोष्ट आम्हाला खूप खुशी आणि आनंद झालेला आहे. माझी एक सूचना आणि एक मागणी आहे की, या नविन आराखड्यामध्ये आणि नवीन जो ले आऊट प्लान त्या ठिकाणी जागा असेल खाली त्या ठिकाणी मिरा भाईंदर शहरामध्ये बुध्द विहारासाठी एक जागा राखीव असावी आणि त्या ठिकाणी बुध्द विहार व्हावे अशी माझी सूचना समाविष्ठ करुन घ्यावी. अशी माझी विनंती आहे.

मा. आयुक्त :-

मॅडम पोलीस आयुक्तालय तुमच्यासाठी बनत नाही इकडच्या नागरिकांसाठी बनत आहे. तुम्हाला कशाची गरज आहे.

राजू भोईर :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब हा विषय माझ्या प्रभागाचा असून स्थानिक रहिवासींच्या जमिनी या आरक्षणामध्ये आहेत. त्यांना विश्वासात घेऊन फेरबदल करावा अशी माझी सूचना आहे. ऑब्जेक्शन सजेशन येणारच आहे तो नंतरचा भाग आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, आपल्याकडे आता घेवारे साहेबांनी सांगितल आणि शर्माजींनी पण सांगितले डी.पी. चे काम सध्या चालु आहे. चालु आहे म्हणजे आपल्याला अंधारात ठेवून आम्ही डी.पी. करत आहोत अस नाही. प्रशासनाचे जोपर्यंत काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या डी.पी चे काम आमच संपल्यानंतर त्याच्या हरकती सूचना आपण मागवणार आहोत. त्यावेळेस सभागृहामध्ये येणार आहे हा विषय. त्यावेळेस आपल्याला काय सूचना द्यायची आहे किंवा काय हरकत घ्यायची आहे त्याच्यावर सुनावणी होणार आहे. म्हणजे सगळ्यांना त्यामध्ये संधी दिली जाणार आहे. हा विषय वेगळा आहे. तो एकमेकांत घुसल्यामुळे सर्व संभ्रम निर्माण होतो आणि आपल्याला पोलीस आयुक्तालय लवकरात लवकर करण्याची करायचे आहे आणि आता मा. आमदार साहेबांनी सभागृहामध्ये सविस्तर निवेदन केल्यानंतर देखील कुणाच्या मनात काही शंका असेल तर आपल्याला हे आयुक्तालय करण्यासाठी आपण फक्त ३७ चे मॉडीफिकेशन करायला शासनाकडे पाठवत आहोत आणि शासनाने मंजूरी दिल्यानंतरच ही जागा त्यांना दिली जाणार आहे आणि आपल्याकडे ३ एकर कमीत कमी त्यांना जागा लागते असं आपल्याला कळविलेले आहे मिटींगमध्ये. त्यामुळे आपल्याला हे लवकरात लवकर पाहिजे आहे. आणि आता सांगितल्याप्रमाणे की आपलं ज्या गतीने या ठिकाणचे पॉप्युलेशन वाढत आहे त्यामुळे पोलीस आयुक्तालयाची नितांत आवश्यकता आहे म्हणून आपण ताबडतोब प्रस्ताव पाठवत आहोत. ते लवकरात लवकर झालं तर आपल्या शहरासारखं भाग्य कुणाचे नाही. त्यामुळे सर्वानुमते हा ठराव मंजूर करावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम आयुक्त साहेबांनी आता सांगितले की सदस्यांना अंधारात ठेवून डी.पी. चे काम चालू नाही.

मा. महापौर :-

आपल्याला या विषयाला धरून बोलायचे असेल आपण ठराव टाकला आहे. ठराव मतदानाला घ्या.

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब मासिक अहवाल द्या डी.पी. चे काम चालु आहे त्याचे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला सूचक श्री. प्रशांत केळुसकर दुसरा सुचक श्री. लियाकत शेख. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सूचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५, विरोधात २५, तटस्थ ४ इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ०८ :-

पोलिस आयुक्तालयासाठी जागा आरक्षित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.

ठराव क्र. ०९ :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे.वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास योजनेमधील आ.क्र. ९४, २६१, २८०, २९९, ३३१, ३३४, ३३५ व ३६४ या आरक्षणाचे नाव बदलून मार्केट याप्रमाणे आरक्षणाचे नाव करणेबाबत दि.३०/०७/२०१० रोजी मा. महासभेने ठराव क्र. ३४ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर मंजूरीप्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/३४५४/२०१०-११, दि.२१/१२/२०१० अन्वये मंजूरीसाठी सादर करणेत येवून दि.१६/०९/२०११ अन्वये फेरविनंती करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या समस्यांबाबत स्थानिक आमदार मा.श्री.नरेंद्र मेहता यांनी आयोजित केलेल्या मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दि.०४/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी मिरा भाईंदर शहरासाठी पोलीस आयुक्तालय देण्याचे तत्वतः मान्य केलेले असून प्रस्तावित पोलीस आयुक्तालयासाठी मा.पोलीस अधिक्षक यांचे समवेत मा. महापौर व मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी दि.१८/०४/२०१६ रोजी पाहणी करुन मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्कमधील आ.क्र. ३३१, ३३२, ३३३, ३३४ व ३३५ या आरक्षणाने बाधीत जागेसाठी पसंती दर्शविलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्क या परिसरामध्ये मौजे मिरा, स.क्र. ३३(१६२)/पैकी, ५१(१८३)/पैकी, १५(१४४)/पैकी, १४(१४३)/पैकी, १६(१४५)/पैकी या जागेमध्ये विविध वापराची खालीलप्रमाणेची आरक्षणे दर्शविलेली असून सदर आरक्षणाचे प्रयोजन मंजूर विकास योजनेप्रमाणे एकूण क्षेत्र व महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजने प्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | मनपाच्या ताब्यातील क्षेत्र (चौ.मी.) | ताब्यात आलेल्या जागेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ३४२८.२४ | ६८.५६% |
| २ | ३३२ | दवाखाना व प्रसुतिगृह | २३०० | २३५७.०० | १००% |
| ३ | ३३३ | मार्केट | २००० | ५९६.४८ | २९.८२% |
| ४ | ३३४ | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | १३००० | ३९६७.६० | ३०.५२% |
| ५ | ३३५ | बगीचा | ७८०० | २६५९.०० | ३४.०९% |

सदरचा परिसर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे या भागामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे कार्यालय झाल्यास शहरामधील जनतेला त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

यास्तव दि.३०/०७/२०१० रोजी महासभेने ठराव क्र.३४ अन्वये मंजूर केलेल्या फेरबदलामधील आ.क्र.३३१, ३३४, ३३५ या आरक्षणाच्या मर्यादित फेरबदल रद्द करणे आवश्यक असून त्याप्रमाणे शासनास माहिती सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर परिसरामध्ये आ.क्र. ३२८ हे माध्यमिक शाळा व खेळाच मैदानासाठी तसेच आ.क्र. ३२७ व आ.क्र. ३३६ हे प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित असल्यामुळे तसेच या भागामध्ये डॉन बॉस्को स्कूल, रॉयल कॉलेज, दालमिया कॉलेज हे विद्यमान शाळा व कॉलेज आहेत. यास्तव वरिल तक्त्यामधील आ.क्र. ३३४ "माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान" हे आरक्षण वगळून त्याठिकाणी मा. पोलीस आयुक्त कार्यालयासाठी आरक्षण दर्शवून तसेच या परिसरात विद्यमान भक्तीवेदान्त हॉस्पीटल असून रॉयल कॉलेज जवळ आ.क्र. ३३८ हे डिस्पेंसरी व मॅटनिर्टी होम हे आरक्षण विकास योजनेमध्ये दर्शविलेले आहे. तसेच या व्यतिरिक्त या भागामध्ये खाजगी दवाखाने अस्तित्वात असल्यामुळे तसेच मिरा भाईंदर शहरामध्ये विकास योजना रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधीत होणा-या दुकानांसाठी व फेरीवाले यांच्या पुर्नःवसनासाठी मार्केट च्या जागांची आवश्यकता असल्यामुळे आ.क्र. ३३२ (डिस्पेंसरी व मॅटनिर्टी होम) हे आरक्षण वगळून

आ.क्र. ३३२ व आ.क्र. ३३३ ही आरक्षणे एकत्रित करुन मार्केट साठी आरक्षित ठेवून इतर आरक्षणाच्या आखणीमध्ये फेरबदल प्रस्तावित करता येईल.

वरीलप्रमाणे फेरबदल करावयाचे ठरल्यास खालीलप्रमाणे आरक्षणे व त्यांचे क्षेत्र प्रस्तावित होईल.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजनेचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | फेरबदला प्रमाणे प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ५४८९ |
| २ | ३३३ | मार्केट | २००० + २३०० | ४८२७ |
| ३ | ३३४ | पोलीस आयुक्तालय | ---- | ११८१५ |
| ४ | ३३५ | बगीचा | ७८०० | ७८९६ |

सबब दि.३०/०७/२०१० रोजीच्या मा. महासभा ठराव क्र.३४ अन्वयेच्या मंजूर फेरबदलामधील आ.क्र. ३३१, ३३४ व ३३५ या आरक्षणाच्या मर्यादित फेरबदल रद्द करणेस ही सभा मंजूरी देत असून याबाबत शासनास माहिती सादर करणेसाठी तसेच वरिलप्रमाणेच्या तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. राकेश शाह

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | १) भोईर भावना राजु |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | २) भोईर राजु यशवंत |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | ३) जाधव मोहन महादेव |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ४) भोईर कमलेश यशवंत |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | अनिता जयवंत पाटील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | रकवी सुहास माधवराव | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | लियाकत ग. शेख | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | अशोक तिवारी | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | तारा विनायक घरत | | | |
| २८ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २९ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३० | परमार अनिता भरत | | | |
| ३१ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३२ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३४ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३५ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३८ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३९ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ४० | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ४१ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ४२ | मुन्ना सिंग | | | |
| ४३ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४४ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४५ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ०९, सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापरासंबंधीची तरतूद मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करणेबाबत.

निलम ढवण :-

महाराष्ट्र राज्यामधील नागरी भागाचे रहिवास, वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी वेगाने विकसन सुरु असून वाढती लोकसंख्या व पाण्याचे स्त्रोत यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे नागरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी तयार होवून ह्यामध्ये रासायनिक व विषारी घटकांचा समावेश असल्याची शक्यता असते. यास्तव सदरचे सांडपाणी प्रक्रिया न करता शहरामधील मलनिस्साःरण वाहिन्यांमध्ये सोडणे योग्य नसल्यामुळे व त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकत असल्यामुळे याबाबतची तरतूद बृहन्मुंबई व नागपूर महानगरपालिका वगळता राज्यातील ईतर महानगरपालिकासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सामाविष्ठ करणेसाठीची कार्यवाही करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणे बाबत शासनाने कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत. तसेच सदरच्या तरतूदीसाठी संदर्भिय पत्रासोबत परिशिष्ठ देण्यात आलेले आहे.

सदरच्या परिशिष्ठाप्रमाणे शहरामधील ४००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्तीच्या क्षेत्राच्या भूखंडामध्ये नव्याने होणा-या विकासकासाठी / पुर्नविकासासाठीच्या गृहप्रकल्पासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करावयाची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

## Regulations for Waste Water Treatment &Recycling :

### A. TYPES OF WASTE WATER

1) Black Water : It means waste water from W.C. urinals and M.S.W.
2) Grey Water : It means waste water from bathrooms, sinks and wash areas
3) Apart from residential waste water, Waste water generated from industrial, medical, commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

### B. APPLICABILITY

These regulations shall be applicable to all developments / redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq.m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval / building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation, etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupations of the respective building.

### C. REGULATIONS

### (C-1) For layout approval / building permission

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq.m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.
II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc. and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc.
III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked an different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation / Council / Approving authority.
IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporation / Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner / developer at his own cost.
V. A clause must be included by the owner / developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises / organization or society of the purchasers shall ensure that.
a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent Authority / EHO of the respective Ward Office.
b. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled, Copy of any such recommendation and necessary action taken shall be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

**(C-2) Group Housing / Apartment Building**

i. In case of group housing if the built-up area is 3000 sq.m. or above or if consumption of water is 20,000 lit / day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial, Government, Semi-government organization, hotels, lodging, etc.**

i. For all buildings in this category having a build-up area of 2000 sq.m. or more and if water consumption is 20,000 lit / day or more, then provision for waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

i. All hospitals having 100 or more beds, must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1)

**(C-5) Vehicle Servicing Garages**

i. All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehilcles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

i. All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

i. Any owner / developer / organization / society violating the provisions of these bye-laws shall be fined Rs.2500/- on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100/- for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.
ii. If the results of test as mentioned in (C-1 v. a. b.) are not satisfactory, then the concerned owner / developer / organization / society shall be charged a penalty of Rs.300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

सबब शासनाच्या निर्देशाप्रमाणे वरिलप्रमाणेचीतरतूद मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली सामाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी व त्या अनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

तारा घरत :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत केळुसकर :-

इमारतीच्या पुर्नःविकासासाठी परवानगी देताना विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे १.५० मी. सामासिक अंतर सोडून परवानगी देण्याची तरतुद असल्यामुळे सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध होणार नाही. शैक्षणिक वापराच्या इमारतीमध्ये पाण्याचा वापर जास्त प्रमाणात होत नसल्यामुळे व शाळेचे मैदान विद्यार्थ्यांना खेळावयास ठेवावे लागत असल्यामुळे सदर प्रकल्प राबवून अपेक्षित फायदा होणार नाही अशी सुचना मांडतो.

शरद पाटील :-

अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सूचनेसह मंजूर.

प्रकरण क्र. ०९ :-

सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापरासंबंधीची तरतूद मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करणेबाबत.

ठराव क्र. १० :-

महाराष्ट्र राज्यामधील नागरी भागाचे रहिवास, वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी वेगाने विकसन सुरु असून वाढती लोकसंख्या व पाण्याचे स्त्रोत यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे नागरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी तयार होवून ह्यामध्ये रासायनिक व विषारी घटकांचा समावेश असल्याची शक्यता असते. यास्तव सदरचे सांडपाणी प्रक्रिया न

करता शहरामधील मलनिस्साःरण वाहिन्यांमध्ये सोडणे योग्य नसल्यामुळे व त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकत असल्यामुळे याबाबतची तरतूद बृहन्मुंबई व नागपूर महानगरपालिका वगळता राज्यातील ईतर महानगरपालिकासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सामाविष्ठ करणेसाठीची कार्यवाही करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणे बाबत शासनाने कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत. तसेच सदरच्या तरतूदीसाठी संदर्भिय पत्रासोबत परिशिष्ठ देण्यात आलेले आहे.

सदरच्या परिशिष्ठाप्रमाणे शहरामधील ४००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्तीच्या क्षेत्राच्या भूखंडामध्ये नव्याने होणा-या विकासकासाठी / पुर्नविकासासाठीच्या गृहप्रकल्पासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करावयाची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

## Regulations for Waste Water Treatment &Recycling :

### A. TYPES OF WASTE WATER

1) Black Water : It means waste water from W.C. urinals and M.S.W.
2) Grey Water : It means waste water from bathrooms, sinks and wash areas
3) Apart from residential waste water, Waste water generated from industrial, medical, commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

### B. APPLICABILITY

These regulations shall be applicable to all developments / redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq.m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval / building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation, etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupations of the respective building.

### C. REGULATIONS

### (C-1) For layout approval / building permission

VI. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq.m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

VII. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc. and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc.

VIII. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked an different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation / Council / Approving authority.

IX. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporation / Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner / developer at his own cost.

X. A clause must be included by the owner / developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises / organization or society of the purchasers shall ensure that.

c. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent Authority / EHO of the respective Ward Office.

d. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled, Copy of any such recommendation and necessary action taken shall be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

**(C-2) Group Housing / Apartment Building**

ii. In case of group housing if the built-up area is 3000 sq.m. or above or if consumption of water is 20,000 lit / day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial, Government, Semi-government organization, hotels, lodging, etc.**

ii. For all buildings in this category having a build-up area of 2000 sq.m. or more and if water consumption is 20,000 lit / day or more, then provision for waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

ii. All hospitals having 100 or more beds, must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1)

**(C-5) Vehicle Servicing Garages**

ii. All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehilcles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

ii. All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

iii. Any owner / developer / organization / society violating the provisions of these bye-laws shall be fined Rs.2500/- on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100/- for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

iv. If the results of test as mentioned in (C-1 v. a. b.) are not satisfactory, then the concerned owner / developer / organization / society shall be charged a penalty of Rs.300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

**सबब शासनाच्या निर्देशाप्रमाणे वरिलप्रमाणेचीतरतूद मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली सामाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी व त्या अनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदक :- श्रीम. तारा घरत

सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत केळूसकर व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

इमारतीच्या पुर्नःविकासासाठी परवानगी देताना विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे १.५० मी. सामासिक अंतर सोडून परवानगी देण्याची तरतुद असल्यामुळे सदर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध होणार नाही. शैक्षणिक वापराच्या इमारतीमध्ये पाण्याचा वापर जास्त प्रमाणात होत नसल्यामुळे व शाळेचे मैदान विद्यार्थ्यांना खेळावयास ठेवावे लागत असल्यामुळे सदर प्रकल्प राबवून अपेक्षित फायदा होणार नाही.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

आज सन्मा. नगरसेविका श्रीम. शुभांगी कोटीयन यांचा वाढदिवस आहे. महापौर इथे त्यांचा डायसवरुन पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत आहेत. कृपया त्यांनी डायसवर यायचे आहे.

मा. महापौर :-

सर्वपक्षीय अभिनंदन.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०, महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर संबंधित कामे करण्यासाठी खाजगी संस्थेकडून निविदा मागविणेबाबत.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम एक सूचना आहे शुभांगी मॅडमचा बर्थ डे झाला आवडलं मला, पण सचिवांकडे प्रत्येक नगरसेवकांच्या जन्म तारखेची नोंद असावी.

रवि व्यास :-

मिरा भाईदर महानगरपालिका विविध ठिकाणी अनेक मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे. त्यापैकी बहुतांश मोबाईल टॉवर यांना मालमत्ता कराची कर आकारणी करण्यात आली आहे. तथापी काही मोबाईल टॉवर यांना कर आकारणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्याकरिता संबंधित आस्थापनांनी महानगरपालिकेकडून परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कर आकारणी तसेच परवानगी यामध्ये तफ़ावत आली आहे.

तसेच बहुतांश मोबाईल टॉवर आस्थापनांनी परवानगी प्राप्त करून घेण्याकरीता महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू परवानगी प्राप्त न झाल्याने कर विभागाने अशा मोबाईल टॉवर यांना अनधिकृत बांधकामावर लावावयाच्या शास्ती रक्कमेची आकारणि केली आहे. त्यामुळे सदर मोबाईल टॉवर आस्थापना यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल करून निव्वळ कराचा भरणा करीत आहे त्यामुळे शास्ती रक्कम व त्यावरील व्याजाच्या रक्कमेत वाढ होऊन मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फ़ुगवटा निर्माण होत आहे. तसेच कर विभागातील कर्मचारी यांनी निवडणुका/जनगणना व इतर कार्यालयीन कामाचे अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने महानगरपालिकाहद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे महानगरपालिका कर्मचा-यांमार्फ़त सर्व्हेक्षण करून कराची वसुली करणेस अशक्य होत आहे.

वरील बाबींचा विचार करून महानगरपालिका हद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे सर्व्हेक्षण करणे,सदर मोबाईल टॉवर यांना परवानगी आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, परवानगी नसल्यास संबंधित मोबाईल टॉवर आस्थापना यांचेशी समन्वय साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून राज्य शासनाच्या धोणानुसार परवानगी प्राप्त करून घेणे, मोबाईल टॉवर अस्तित्वात असल्यास नियमानुकुल करणे, परवानगी देणे शक्य नसल्यास टॉवर निष्कासित करणेबाबत अतिक्रमण विभागास सुचित करणे, आवश्यक परवानगी शुल्काचा भरणा करून घेणे, परवानगी प्राप्त करून घेतले नंतर कर विभागाशी समन्वय साधून मालमत्ता कर आकारणी करून घेणे व कर वसुली करणे इत्यादी कामे करणेकामी अभिकर्ता नेमणे योग्य होईल. सदर अभिकर्ता नेमल्यास उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरची परवानगी, कर आकारणी, कर वसुली, इ.कामे सुलभ रित्या होऊन, मोबाईल टॉवरच्या परवानगी शुल्क व मालमत्ता कराच्या वसुली रक्कमेत वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणे शक्य होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरचे सर्व्हेक्षण, परवानगी, नियमितीकरण, कर आकारणी व वसुली करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६(अ) व ७३ नुसार निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे. महानगरपालिकेच्या हितार्थ अभिकर्ता नेमणेबाबतचे अटीशर्ती ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.

अश्विन कासोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय साहेब एल.बी.टी बंद झाली आपल्याकडे कर्मचारी वर्ग एल.बी.टी. मधून भरपूर आपल्याला आपल्याकडे वर्ग झाला आहे. हे सगळ काही असताना या शहरामध्ये मोबाईल टॉवर किती असतील साहेब ५००, १००० याच्यापलीकडे तर नसणार ना? पालिकेचे अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून हे काम होऊच शकत नाही. हे तुम्हाला तरी पटत का? मला एवढं सांगा. त्याच्यासाठी सुध्दा आपल्याला एक ठेकेदार पाहिजे म्हणजे ठेकेदार असला की कुठेतरी तो त्याचा उत्पन्न त्याची बाजू असणारचं. म्हणजे ठेका बाजुलाच पालिकेला त्याचा नुकसान. आम्ही डायरेक्ट त्याच्याकडून वसूल करुन घेऊ शकत नाही किंवा तस करता येत नाही. कोणत्या आधारावर तुम्ही हा विषय महासभेसमोर आणला. १००० पेक्षा जास्त मला तरी वाटत नाही की कुठले मोबाईल टॉवर या शहरामध्ये असतील. हजार एक लोक असून आपल्याला वसूली करता येत नाही किंवा त्याच सर्व्हेक्शन होत नाही. हे साहेब आपल्याला पटले का सांगा. प्रशासनाने हा विषय आणला आणि आम्हाला त्याची साहेब म्हणजे कळकळ लागते की प्रशासनाने सर्वच काय विषय आता ठेके पध्दतीवरच द्यायचे तर मग आयुक्त साहेब अधिकारी वर्ग सुध्दा ठेक्यावरच घ्या. उद्या मा. आयुक्त सुध्दा येत असतील तर बघा.

मा. आयुक्त :-

प्रशासनाने विषय आणला तर का आणला नाही आणला तर का नाही आणला.

जुबेर इनामदार :-

आम्हाला महानगरपालिकेची काळजी आहे ना साहेब.

मा. आयुक्त :-

आम्ही पण तुम्हाला उत्तर देतो ना. तुम्हाला समाधान वाटल तर मंजूरी द्या. मा. महापौर मॅडम महिन्याला २ महिन्याला आमची आयुक्तांची बैठक होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिकेमध्ये दैनंदिन कामे आपल्या कर्मचाऱ्यांच्या पाठिमागे एवढी असतात. दररोज नागरिकांच्या तक्रारी असतात त्याच्यानंतर आपल्या सन्मा. नगरसेवकांच्या तक्रारी असतात की आमचं हे काम होत नाही ते काम होत नाही. अगोदरच इंजिनिअर आपल्याकडे कमी आहेत. त्याच्यानंतर शासनाच्या जी.आर प्रमाणे आपल्याला काही भरती सध्या ५० टक्के रिक्त पदांच्या करावी किंवा मग जेवढे पद मंजूर आहेत आस्थापनावर त्याच्या ५० टक्के किंवा रिक्त पदाच्या ४ टक्के अस करुन एकदम कमी प्रमाणामध्ये आपण भरती सध्या जास्तीची करु शकत नाही आणि सध्या आपल्याकडे महानगरपालिकेचा जो स्टाफ आहे तो आकृतीबंध आपण मंजूरीला पाठविलेला आहे. त्याला शासनाकडून मंजूरी येईल ती आल्यानंतर आपण पुढील कारवाई करणारच आहोत. तो प्रस्ताव तुमच्या समोर येईलच परंतु हे अस असताना महानगरपालिकेच फार मोठ नुकसान होत आहे हे लक्षात आल्यामुळे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिकेमध्ये म्हणजे मी तेथील आयुक्तांबरोबर चर्चा केली की अशा पध्दतीने त्यांनी जे टेंडर फ्लॅश करुन केले त्याच्यामध्ये संपूर्ण सर्व्हे त्यांनी करायचा आहे. सर्व्हे केल्यानंतर पुन्हा त्या टॉवरला टॅक्स लागलेला आहे. कोणत्या टॉवरला लागलेला नाही ही सगळी शहानिशा त्यांनी करायची आहे. टॅक्स वसुली त्यांनी करायची आहे आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये भरायची आहे. त्याच्या बदलामध्ये त्याला आपण १ टक्के, २ टक्के, ३ टक्के, ४ टक्के, ५ टक्के जे काही स्टॅन्डिंग कमिटी मान्यता देईल त्या पध्दतीने आपण त्याला इन्सेन्टीव्ह देणार आहोत की समजा त्याने आपल्याला १०० रुपये वसुल करुन दिले तर त्याला २ रुपये द्यायचे, ३ रुपये द्यायचे का ४ रुपये द्यायचे का ५ हे तुम्ही ठरवणार आहात. महानगरपालिकेच आर्थिक हित जर याच्यामध्ये होत असेल तर मला वाटत नाही की हा विषय काही वेगळा आहे म्हणून. त्यामुळे आपण याला मंजूरी द्यावी ही माझी विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब म्हणजे पालिकेच्या उत्पन्नातूनच आपल्याला ठेकेदाराला द्यायचे आहे. विषय तोच आहे ना कुठून तरी पैसा आपल्याला ठेकेदाराला पोचवायचा आहे इथून. साहेब आपल्याकडे ३ उपायुक्त आहेत या महानगरपालिकेमध्ये ३ उपायुक्त २५ स्क्वेअर मीटरचा क्षेत्र आहे ८० स्क्वेअर मीटरमधुन २५ स्क्वेअर मीटर फक्त विकसित झालेला क्षेत्र आहे. याच्यामध्ये आपल्याला कर्मचारी वर्ग काय कमी आहे साहेब. आरोग्य आपण ठेक्यावर चालवतो वृक्ष प्राधिकरण आपण ठेक्यावर चालवतो.

मा. आयुक्त :-

बघा भिवंडी महानगरपालिकेचा एरिया किती आहे २६ पॉईंट समथिंग आणि आपला ७९ स्क्वेअर मीटर एरिया आहे.

जुबेर इनामदार :-

७९ असला तरी साहेब आपल्याकडे विकसित क्षेत्र फक्त २५ स्क्वेअर मीटर आहे.

मा. आयुक्त :-

ती ड वर्ग महानगरपालिका आपली ड वर्ग ४५०० कर्मचारी आहेत आपल्याकडे. डेप्युटी इंजिनिअर ४ आहे २ एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर आहेत. तिथे २५ डेप्युटी इंजिनिअर आहेत आणि ५० च्या जवळपास ज्युनिअर इंजिनिअर आहेत. तेव्हा तेथील काम होते. म्हणजे अशी परिस्थिती आहे. आपला आकृतीबंध मंजूर होऊन आल्यानंतर आपल्याला पण त्याच परिस्थितीमध्ये जावे लागणार आहे. आज आपल्याकडे स्टाफ फार कमी आहे साहेब आणि एवढ्या कमी स्टाफमध्ये आपण एवढं व्यवस्थित काम करुन घेत आहोत.

जुबेर इनामदार :-

आपल्या आस्थापनाचा जर आपण खर्च मोजला तर ६० टक्केच्यावर जाईल. ठेका पध्दती त्याच्यामध्ये घेतली तर पूर्ण आरोग्य विभाग आज तुम्ही वृक्ष प्राधिकरण सुध्दा ठेक्यावर द्यायला विषय आणला आहे.

मा. आयुक्त :-

एकाच प्रश्नामध्ये तुमच समाधान होईल. महाराष्ट्र राज्यामध्ये ज्यावेळेला जकातीमध्ये फार चोरी होते वगैरे वगैरे प्रकार पुढे आल्यामुळे महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला की जकातीचे खाजगीकरण करावे. त्याच्यानंतर एल.बी.टी. लागला एल.बी.टी. बंद झाली तो विषय सोडा पण खाजगीकरण करण्याचे कारण काय होते की समजा ज्या नाक्यावरती महिन्याला ४ कोटी रुपये वसुल व्हायचे त्याचे खाजगीकरण केल्यानंतर ७-७ कोटी वसुल झाले म्हणजे अशी परिस्थिती निर्माण झाली. २-३ कोटीचा भ्रष्टाचार असायचा अस असल्यामुळे याच्यामध्ये महानगरपालिकेला जर समजा आता टॉवरकडून आपल्याला वर्षाकाठी ५० लाख रुपये भेटत असतील आणि हे टेंडर काढल्यामुळे जर हे कोटी दिड कोटी भेटत असतील तर त्याच्यामध्ये तुम्हाला वाईट वाटायचे कारण नाही.

जुबेर इनामदार :-

साहेब म्हणजे पालिका निष्क्रिय आहे कामाला अस तुमचं बोलायचं मत आहे का? पालिका कर्मचारी काम करत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा. आयुक्त :-

एवढ्या फोर्सफुली वसुल करण्याची यंत्रणा नाही त्याच्यामुळे आपण हे केले पण महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणार आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब आपल्याकडे संख्या आहे का मोजलेली की किती टॉवर असतील १००० पेक्षा जास्त नसतील.

मा. आयुक्त :-

पण त्याच सर्व्हेक्शन केल्यानंतर कळेल आपल्याला.

जुबेर इनामदार :-

आणि तितकं करायला आपल्याला त्याच्यासाठी खाजगीकरण करायचं.

नरेंद्र मेहता :-

दर विषयाला विरोध.

जुबेर इनामदार :-

दर विषयाला विरोध करत नाही. आमदार साहेब हा विरोध नाही. ही चर्चेची बाजू आहे. आपल्याला प्रत्येक विषय फक्त खाजगीकरणाच्या माध्यमातून करायचे आहेत. ठेकेदारच पाहिजे तुम्हाला.

भगवती शर्मा :-

अभी साहबने कहाँ की पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड का एरिया कितना बडा है। वहाँ की तुलना यहाँ की महानगरपालिका से नही की जाती है।

मा. आयुक्त :-

उसके उपर जाना चाहिए ना। अच्छी महानगरपालिका का उदाहरण नही चलता है क्या? आशिया खंडामध्ये सगळ्यात चांगली महानगरपालिका असेल ती ही म्हणून तेथील उदाहरण घेतले आहे.

भगवती शर्मा :-

साहब पिंपरी चिंचवड महानगरपालिका की नही मैं तो मुंबई महानगरपालिका की परिकल्पना करता हूँ। लेकिन कही तो ध्यान देना चाहिए ना महापौर मॅडम। अभी आप जैसे बोले, जुबेरजी बोले की इसका भी खाजगीकरण। इसके पहले १३/५/२०१५ की मिटींग में जब टॅक्स आढावा की मिटींग थी उसके अंदर में भी एजन्सी की नेमणुक की गयी थी। अपना स्टाफ वहॉ टॅक्स डिपार्टमेंट मे काम नही कर रहे है। डिपार्टमेंट परवाना विभाग के अंदर में भी काम नही करेंगे प्रभाग क्रमांक १६ के अंदर में भी परवाना विभाग के अंदर में भी ऐसे ही खाजगीकरण का किया जा रहा है। इसमें भी खाजगीकरण किया जा रहा है। तो कहने का मतलब यह है की कही ना कही ऐसा महसूस हो रहा है की, विभाग के कर्मचारी काम नही कर रहे है। क्योंकी सब चीज का खाजगीकरण करने के बाद में बचेगा क्या? दुसरा सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी ने कहाँ की बहुत जल्दी ही आकृतीबंध मंजूर होके अपने सामने आनेवाला है। तो क्यों नही इंतजार कर रहे है। तब तक कर्मचारीयों से काम लिजीए ना। साहब हम एक प्रभाग के अंदर के अंदर में कर्मचारी को कितनी पगार दे रहे है सालाना कोटी रुपये पगार दे रहे है। उनसे काम हम नही ले पा रहे है। ना वो टॅक्स का कर रहे है ना वो मोबाईल टॉवर का कर रहे है। ना वो परवाना कर रहे है।

मा. आयुक्त :-

हम ही वसुल कर रहे है ना कौन नही कर रहा?

भगवती शर्मा :-

किसका? साहब आप टॅक्स में वसुली के अंदर में आज तक आपके पास के अंदर में डिमांड रजिस्टर तक नही हो पाएगा की हमारी डिमांड क्या है। उसके लिए भी हम एजन्सी की नेमणूक करने के लिए ठराव किया है तो हर जगह के अंदर में हम प्रायव्हेट में ही जा रहे है ना सर। तो कही तो अधिकारी

से, कर्मचारीयोंसे काम लेने की जब तक मन से नही करेंगे तब तक हो नही पाएगा। इसलिए हमारा सीधा सीधा विरोध है की इस खाजगीकरण के विरुध्द में कर्मचारी के माध्यम से काम होना चाहिए।

मा. महापौर :-

आपको अपना ठराव मांडना है।

भगवती शर्मा :-

हा।

मा. महापौर :-

मांडिए।

लियाकत शेख :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी अनेक मोबाईल टॉवर उभारण्यात आलेली आहे. त्यापैकी बहुतांश मोबाईल टॉवर यांना मालमत्ता कराची कर आकारणी करण्यात आलेली आहे. तथापी काही मोबाईल टॉवरांना कर आकारणी झाली नसल्याचे दिसुन आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्या करीता संबंधीत अस्थापनानी महापालिकेकडुन परवानगी घेतली नसल्याचे दिसुन आले आहे.

बहुतांश मोबाईल टॉवर अस्थापनाने परवानगी प्राप्त करुन घेण्याकरीता पालीकेकडे पत्र व्यव्हार केला आहे. परंतु परवानगी प्राप्त न झाल्याने कर विभागाने अश्या मोबाईल टॉवरांना अनाधिकृत बांधकामांवर लावायची शास्तीची  कर आकारणी केली आहे. त्यामुळे सदर मोबाईल टॉवर अस्थापना यांनी मा. न्यायालयात याचीका दाखल करुन निव्वळ कराचा भरणा करीत आहे. असे प्रशासनाने गोषवा-यात नमुद केले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करीता कर्मचारी व अधिकारी यांनी आपले कतर्व्य व कामे करण्यात कामचुकार पणा व हलगरजी पणा केल्याचे दिसुन येत आहे. मा. आयुक्तांनी याची सखोल चौकशी करुन अश्या कमर्चा-यांवर कार्यवाही अपेक्षीत असताना त्यावर पाघरुन टाकून खाजगी ठेकेदार उभा करुन मनपाचे नुक्सान करण्याचे ठरविले आहे असे दिसते.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात मा. आयुक्तांनी कर वसुली ९० टक्के पेक्षा जास्त झाली आहे. असे सांगीतले असताना मोबाईल टॉवर्सच्या कर आकारणी बाबत खाजगी ठेकेदार नियुक्त करणे चुकीचे वाटते त्यामुळे सदर वसुलीची जबाबदारी प्रभाग अधिका-यांवर निर्धारीत करुन कठोर पावले उचलल्यास वसुली होईल त्यामुळे खाजगी ठेकेदाराची  नेमणुक करु नये असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम तुम्ही अलमोस्ट एक वर्षानंतर आम्हाला परमिशन दिली पेढा खायला. थँक यू सभागृहामध्ये पण एक लंच ब्रेकचे पण मला सांगायचे आहे कोणी जर लेट गेले लंच ब्रेकसाठी तर एवढी गर्दी असते तिकडे मी आज थोडी लेट गेले तर अलमोस्ट एव्हरीथिंग इज ओवर ॲन्ड कुठून लोक येतात काही माहित नाही. आम्हाला एवढी तुटून पडतात तिकडे जेवणासाठी मी हरिभाऊंना कम्पलेन्ट केली. तर तुम्ही हे जे नियम काढलेले आहेत व्हेरी गुड एक्सीलेंट जे पण आहे पण आमच्यासाठी पण काही विचार करा आम्ही बसायचे कुठे? आम्हाला लाईनमध्ये बोर्डिंग स्कूलची आठवण येते, हॉस्टेलची की प्लेट घेऊन उभे रहा, पुढे जा, व्हेज इथे, नॉन व्हेज तिथे, सब्जी इकडे, राइस भाकरी तिकडे तर हे काही तरी तुम्ही व्यवस्था करा. तुम्ही जस व्यवस्थित जेवता तर आम्हाला पण व्यवस्थित जेवायला काही तरी अरेंजमेन्ट करा.

मा. महापौर :-

जोपर्यंत सन्मा. नगरसेवक जेवण घेत नाहीत तोपर्यंत तुम्ही बाहेरच्यांना एन्ट्री देऊ नये असे मी निर्देश देते त्यांना. पहिले सन्मा. नगरसेवकांनी जेवण करायचे आहे मग दुसऱ्यांनी जेवण करायचे आहे.

मर्लिन डिसा :-

बसायला पण कुठे तरी व्यवस्था करावी थँक यू.

मा. आयुक्त :-

अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांमध्ये भेदभाव करायला नको. सर्व लेडिजला प्रथम पहिला मान. लेडिजला जेवढे पण ऑफिसचे असतील आणि सन्मा. नगरसेविका असतील त्यांना अगोदर नंतर पुरुषांनी जेवण घ्यावे अशी विनंती.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. रवि व्यास दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख. अनुक्रमे दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख यांचा ठराव मी मतदानास टाकतो. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. रवि व्यास यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. रवि व्यास यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४७, विरोधात २५ इतकी मते पडलेली आहेत. श्री. रवि व्यास यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. १० :-

महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर संबंधित कामे करण्यासाठी खाजगी संस्थेकडून निविदा मागविणेबाबत.

ठराव क्र. ११ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध ठिकाणी अनेक मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे. त्यापैकी बहुतांश मोबाईल टॉवर यांना मालमत्ता कराची कर आकारणी करण्यात आली आहे. तथापी काही मोबाईल टॉवर यांना कर आकारणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्याकरिता संबंधित आस्थापनांनी महानगरपालिकेकडून परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कर आकारणी तसेच परवानगी यामध्ये तफ़ावत आली आहे.

तसेच बहुतांश मोबाईल टॉवर आस्थापनांनी परवानगी प्राप्त करून घेण्याकरीता महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू परवानगी प्राप्त न झाल्याने कर विभागाने अशा मोबाईल टॉवर यांना अनधिकृत बांधकामावर लावावयाच्या शास्ती रक्कमेची आकारणि केली आहे. त्यामुळे सदर मोबाईल टॉवर आस्थापना यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल करून निव्वळ कराचा भरणा करीत आहे त्यामुळे शास्ती रक्कम व त्यावरील व्याजाच्या रक्कमेत वाढ होऊन मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फ़ुगवटा निर्माण होत आहे. तसेच कर विभागातील कर्मचारी यांनी निवडणुका/जनगणना व इतर कार्यालयीन कामाचे अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने महानगरपालिकाहद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे महानगरपालिका कर्मचा-यांमार्फ़त सर्व्हेक्षण करून कराची वसुली करणेस अशक्य होत आहे.

वरील बाबींचा विचार करून महानगरपालिका हद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे सर्व्हेक्षण करणे,सदर मोबाईल टॉवर यांना परवानगी आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, परवानगी नसल्यास संबंधित मोबाईल टॉवर आस्थापना यांचेशी समन्वय साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून राज्य शासनाच्या धोणानुसार परवानगी प्राप्त करून घेणे, मोबाईल टॉवर अस्तित्वात असल्यास नियमानुकुल करणे, परवानगी देणे शक्य नसल्यास टॉवर निष्कासित करणेबाबत अतिक्रमण विभागास सुचित करणे, आवश्यक परवानगी शुल्काचा भरणा करून घेणे, परवानगी प्राप्त करून घेतले नंतर कर विभागाशी समन्वय साधून मालमत्ता कर आकारणी करून घेणे व कर वसुली करणे इत्यादी कामे करणेकामी अभिकर्ता नेमणे योग्य होईल. सदर अभिकर्ता नेमल्यास उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरची परवानगी, कर आकारणी, कर वसुली, इ.कामे सुलभ रित्या होऊन, मोबाईल टॉवरच्या परवानगी शुल्क व मालमत्ता कराच्या वसुली रक्कमेत वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणे शक्य होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरचे सर्व्हेक्षण, परवानगी, नियमितीकरण, कर आकारणी व वसुली करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६(अ) व ७३ नुसार निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे. महानगरपालिकेच्या हितार्थ अभिकर्ता नेमणेबाबतचे अटीशर्ती ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.

सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | विराणी रेखा अनिल | निरंक |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | अनिता जयवंत पाटील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | लियाकत ग. शेख | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | भोईर कमलेश यशवंत | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | अशोक तिवारी | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | तारा विनायक घरत | | | |
| २८ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २९ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३० | परमार अनिता भरत | | | |
| ३१ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३२ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३३ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३४ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३५ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३८ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ४० | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ४१ | भोईर भावना राजु | | | |
| ४२ | भोईर राजु यशवंत | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | मुन्ना सिंग | | | |
| ४५ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४६ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४७ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ११, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेचे ठिकाण स्थलांतरीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मा. आयुक्त :-

प्रशासनाने हा विषय माघार घेतला आहे. मी थोडक्यात खुलासा करतो आपण हा विषय माघार का घेतला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याचे ठिकाण स्थलांतरीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्याबद्दलचा प्रस्ताव आपण दिला होता पण मेन टाईममध्ये त्याला शासनाकडून मान्यता मिळाली. पुतळा ज्या ठिकाणी अगोदर आपण नियोजीत केला होता त्या ठिकाणी पुतळा बसूवन झालेला आहे आणि त्याच्यावर आम्ही झाकून ठेवलेले आहे. आता थोडक्यात दिवसामध्ये मान्यवरांच्या हाताने त्याच उद्घाटन होईल त्यामुळे हा विषय मी परत घेत आहे.

वंदना चक्रे :-

याच विषयाला धरुन महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते प्रथम तर मी ज्या ठिकाणी अनेक वर्षापासून मागणी त्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या भारताचे घटनाकार आहेत हे सगळ्यांना माहित आहे त्यांचा पुतळा त्या ठिकाणी बसला काल, मलाच नाही तर सगळ्यांना मनापासून आनंद झाला असेल तरी काही लोकांना नसेल झाला. बऱ्याच दिवसापासून ते थांबलेले काम होते आणि ते बसायलाच पाहिजे होते त्या ठिकाणी मागणी होती आणि आणखी काही ठिकाणी मागणी आहे तर माझी आपणांस यात एक विनंती आहे ते समाविष्ट करुन घ्यावे. पुढच्या ईस्टमध्ये पण मागणी केलेली आहे त्या ठिकाणी पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवावा आणि काल ज्या ठिकाणी एवढ्या तातडीने आज तो विषय महासभेला होता आणि एवढ्या घाईत केले तर आम्हाला ते आश्चर्य वाटलं. मी आयुक्त महोदयांना किती वेळा येऊन भांडली किती वेळा येऊन त्या विषयावर चर्चा केली. अनेक वेळा पत्र दिले,

सचिवांकडे दिले, प्रधान सचिवांकडे पत्र दिले, कलेक्टरकडे दिले, मुख्यमंत्र्यांना दिले आम्ही हे फॉलो अप केले आणि आमच्याफॉलो अपला यश आले त्याच मनापासून अभिनंदन धन्यवाद करते हेच मला या ठिकाणी बोलायचे होते आणि दुसऱ्या पुतळ्याची जी मांग केली आहे त्या ठिकाणी पण पुतळा बसवावा ही सुध्दा मी या ठिकाणी सुचना करते धन्यवाद.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १२, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, चौपाट्या, नर्सरी, दुभाजक इ. ची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत.

प्रेमनाथ पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील खालील मालमत्तांची उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत दैनंदिन निगा व देखभाल करणेकामी मंजूर पूरवठा करून त्यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

| अ.क्र | मालमत्तांचे वर्णन | संख्या |
|---|---|---|
| १) | उद्याने | ६० |
| २) | मैदाने | ११ |
| ३) | स्मशाने | १४ |
| ४) | दुभाजके | १६ कि.मी. लांबीचे |
| ५) | चौपाट्या | ०२ |
| ६) | नर्सरी | ०१ |

वरील मालमत्तांच्या ठिकाणी मजूरामार्फत आवश्यकतेनूसार पाणी देणे, साफसफाई करणे, वाढलेले गवत काढणे, वृक्षांची छाटणी करणे, शोभिवंत फुलझाडे व गवत लावणे, शेणखत देणे, माती टाकणे, औषधे देणे, पाथवेची सफाई करणे इ. कामे करण्यात येत आहेत. यासाठी महानगरपालिकेमार्फत वार्षिक दराच्या निविदा मागवून कंत्राटदार नेमुण त्यांच्या मार्फत मजूर व हत्यारे, संसाधने, औषधे पुरवठा करून घेण्यात येत आहेत. तसेच २३० मजूरांपैकी मा. महासभेच्या ठरावानूसार ५०मजूर कपात केल्यानंतर ०१ एप्रिल २०१६ पासून सद्यस्थित दररोज १८० मजुर काम करीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता प्रशासनामार्फत देखभाल व दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) उद्याने, मैदाने, दुभाजक व इतर कामाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सेवाभावा, खाजगी संस्था विकासकाना कामे देण्यात यावीत सदर संस्था स्वतःची अथवा वाणिज्य स्वरुपाच्या जाहिराती करु शकतील त्यासाठी महानगरपालिकेने त्यांना जागा निश्चित करुन द्यावे. राजकीय स्वरुपाच्या जाहिराती करता येणार नाही.

२) वरीलपैकी संस्थांनी देखभाली साठी काही सुविधा व मदत मागितल्यास त्याची शहानिशा करुन आवश्यकता असल्यास सदर सुविधा व मदत देण्यात यावे तथापि सदर खर्च महापालिकेमार्फत होणाऱ्या देखभाल दुरुस्ती पेक्षा कमी राहिल याची दक्षता घ्यावी.

३) काही ठिकाणी आवश्यकतेनूसार मजुर पुरवठा करुन घ्यावा त्यासाठी नव्याने निविदा मागविण्यात याव्यात.

४) इतर आवश्यक उद्याने,मैदाने, देखभालीच्या कामासाठी प्रति चौरस मीटर प्रमाणे किंवा मालमत्ता निहाय मागवून कंत्राट निश्चित करावे.

वरील प्रमाणे मा. आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

प्रभात पाटील :-

याची प्रोसीजर कशी करणार म्हणजे निविदा मागवून की काय पध्दत काय लावणार याला.

मा. आयुक्त :-

आपण पेपरमध्ये जाहिर प्रगटन देऊन ज्या संस्था इंटरेस्टेड आहेत त्यांच्याकडून कोटेशन मागवू आणि पारदर्शीपणे आपला उद्देश असा आहे की महानगरपालिकेची आर्थिक बचत व्हावी आणि एखादी संस्था पुढे होऊन करत तर त्यांनी काम करावे. अहमदनगर महानगरपालिकेमध्ये स्मशानभुमीचे काम इतके सुंदर केले होते एका संस्थेमार्फत की महानगरपालिकेला एक रुपया पण खर्च नाही. एक्स.वाय.झेड संस्था तेथील संस्था तेथील सगळी मॅनेजमेंट बघते आणि महानगरपालिका फक्त त्याला पाणी पुरवते. लाईटची व्यवस्था वगैरे सगळं देते फक्त तेथील सगळ विधी वगैरे देण्याचे काम ती संस्था करते त्यांच्या माणसांमार्फत तर चांगली गोष्ट आहे ना. जर सेवा चांगली भेटत असेल तर.

जुबेर इनामदार :-

निविदा प्रक्रीया करुन अस तुमचं मत आहे.

मा. महापौर :-

इन्वीटेशन.

मा. आयुक्त :-

निविदा मागवणार ना साहेब.

मा. महापौर :-

निविदा कशाला साहेब एखादी संस्था करायला तयार असेल तर.

भगवती शर्मा :-

इन्वीटेशन आणि निविदामध्ये फार फरक आहे.

नरेंद्र मेहता :-

सभागृहाला विनंती अशी राहील की जे सामाजिक संस्था आहे चांगली संस्था आहे त्यांना तुम्ही टेंडर प्रोसेसमध्ये टाकल तर ते येणारच नाही. ते बोलले जाऊ द्या कशाला आपल्याला आ बैल मुझे मार. चांगल तुम्ही पेपर जाहिरातीच्या माध्यमातून जाहिरात प्रसिध्द करावी की अशा-अशा महानगरपालिकेने मानसिकता ठरवली आहे. ज्या कोणाला अर्ज करायचा असेल त्यांनी अर्ज करा त्यांच्या सिनियारीटी वाईज, क्रायटेरीया वाईज. तुम्ही आयुक्तांनी ते ठरवावं आणि त्याला ते द्यावं. त्याचा मुळ हेतु हा होता की २०-२०, २२-२२ हजार रुपये पगार द्यायचं आणि एखादी खाजगी संस्था आली त्याला ते त्यांच्या पध्दतीने जे काय माणसे ठेवता येईल त्यांचा पगार देता येईल. त्याने आपल्या संस्थेची जाहिरात करावी संस्थेच्या माध्यमातून डे टू डे एक संस्था असणार झाड लागलं की नाही लागल, पाणी दिलं की नाही दिलं हे देखभाल करण्यासाठी एक कोणतरी माणूस असतं. आज आपल्याकडे जबाबदार व्यक्तीच नाही माणसं निघतात पाणी द्यायला देतात नाही देतात, छाटणी करतात नाही करतात त्यासंदर्भात आपल्याला देखील निविदा प्रक्रियात जाऊन एखादा आपल्याला यश नाही मिळाले असे वाटले तर त्यामध्ये म्हटले आहे की कधीही आयुक्तांना ते रद्द करता येईल. एखाद्या संस्थेने म्हटल्याप्रमाणे ठरल्याप्रमाणे कामकाज नाही केले तर ते रद्द करता येईल.

जुबेर इनामदार :-

साहेब क्रायटेरीया काय ठरवाल त्याच्यामध्ये.

नरेंद्र मेहता :-

आयुक्त.................

जुबेर इनामदार :-

साहेब हा विषय याच्याआधी आला होता. हा पहिल्यांदा आलेला नाही महासभेमध्ये साहेब. निविदा प्रक्रिया झाली होती. मैदाने उद्याने द्यायची तयारी झाली होती. मा. सन्मा. सदस्यांनीच त्याचा विरोध केला होता भरपूर.

नरेंद्र मेहता :-

ते आपण बघितलं तर ते आरक्षणाचा विषय होता आणि आरक्षण ते आरक्षण एक रुपया भाड्यावर देऊन टाकायचं. हा सगळा तो विषय होता त्यामध्ये आणि हे आपले जे काही आहे ते देखभाल करायचे आहे की आपण त्यांना द्यायचं एक जबाबदार व्यक्ती संस्था म्हणून आपण त्यांची अपॉईंटमेंट करतो आपण काय त्यांना देत नाही आणि म्हटलं आहे ज्या दिवशी आयुक्तांना वाटलं त्यांनी ते नियमाप्रमाणे नाही केल कधीही त्यांना रद्द करता येईल.

जुबेर इनामदार :-

साहेब काय कारण गोषवाऱ्यामध्ये हे नमूद नाही विषय जो यांनी ठरावामध्ये समाविष्ट केला आहे म्हणून आम्हाला ती शंका आहे किंवा तो गोषवाऱ्याला विसंगत आहे विषय टोटल. कसं आहे आयुक्तांनी याच्या आधी सांगितल आहे आम्हाला की गोषवाऱ्यामध्ये जे काही असेल त्यावरच मी निर्णय घेईल. तुम्हाला साहेब तसा काही प्रस्ताव आणायचा होता तर गोषवाऱ्याच्या माध्यमातून आणायचा होता ना. गोषवाऱ्याच्या माध्यमातून आला पाहिजे होता. तसा प्रस्ताव नाही तुम्ही प्रस्ताव आणला आहे उद्याने दुभाजके कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने त्यांची देखभाल दुरुस्ती जतन करण्यासंदर्भात आणि हा विषय आज ठरावामध्ये यांनी जो मांडला आहे तो विसंगत आहे.

मा. महापौर :-

जुबेरजी आपको कोई आपका ठराव रखना है?

जुबेर इनामदार :-

ऐसा नही ना महापौर मॅडम खाली ठराव पे दुकान बंद नही होती है ना। बात तो करना है। चर्चा तो करनी पडेगी ना। अरे शहर के उद्यान उठाके देने की बात हो रही है वापस इधर।

नरेंद्र मेहता :-

आयुक्तांनी किती ही उत्तर दिले महापौर मॅडम तरी आम्ही आमची भूमिका आयुक्त बदलू शकत नाही ना. आम्ही आमची भूमिका मांडली त्यांनी जे प्रश्न विचारले आम्ही केलेले निर्णय जर आयुक्तांना विचारले तर कसं होईल. गोषवारा संदर्भात विचारलं तर आयुक्त उत्तर देतील आता आम्ही जो ठराव दिला त्यात आयुक्त काय संभाषण करणार.

जुबेर इनामदार :-

आयुक्त तुमची भाषा बोलत होते म्हणून मी आयुक्तांना विचारलं याच्या आधी गोषवाऱ्यामध्ये जितक काही नमूद आहे त्यावर कारवाई होईल असच आयुक्त बोलतात आणि आता हा विषय जो आहे त्यांनी केलेला...............

दिपक खांबित :-

साहेब गोषवाऱ्याच्या शेवटच्या २ लाईन वाचा ना त्यात सगळ म्हटलं आहे.

मा. आयुक्त :-

शेवटच्या २ लाईनमध्ये म्हटलं आहे शहरातील दुभाजक वाहतूक बेटे उद्याने व मैदाने देखभाल व दुरुस्तीसाठी शहरातील खाजगी / सेवाभावी संस्था विकासक व अन्य संस्थांना आव्हान करुन दिल्यास महानगरपालिका निधीची बचत होईल. तरी सदर प्रस्ताव निर्णय होणेस शिफारस आहे.

प्रमोद सामंत :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील खालील मालमत्तांची उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत दैनंदिन निगा व देखभाल करणेकामी मंजूर पूरवठा करून त्यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

| अ.क्र | मालमत्तांचे वर्णन | संख्या |
|---|---|---|
| १) | उद्याने | ६० |
| २) | मैदाने | ११ |
| ३) | स्मशाने | १४ |
| ४) | दुभाजके | १६ कि.मी. लांबीचे |
| ५) | चौपाट्या | ०२ |
| ६) | नर्सरी | ०१ |

वरील मालमत्तांच्या ठिकाणी मजूरामार्फत आवश्यकतेनूसार पाणी देणे, साफसफाई करणे, वाढलेले गवत काढणे, वृक्षांची छाटणी करणे, शोभिवंत फुलझाडे व गवत लावणे, शेणखत देणे, माती टाकणे, औषधे देणे, पाथवेची सफाई करणे इ. कामे करण्यात येत आहेत. यासाठी महानगरपालिकेमार्फत वार्षिक दराच्या निविदा मागवून कंत्राटदार नेमुण त्यांच्या मार्फत मजूर व हत्यारे, संसाधने, औषधे पुरवठा करून घेण्यात येत आहेत. सद्यस्थितीत दररोज २३० मजूर काम करीत आहेत. सद्यस्थितीत मजूर पुरवठा करणेसाठी नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेमध्ये कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमुद करुन नये म्हणजेच किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल, असे नमुद करुन देखील एक निविदाकार वगळता इतर निविदाकारांनी किमान वेतनापेक्षा कमी दराने निविदा सादर केल्या आहेत. शासन नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२४/नवि-२०, दि. २२ जानेवारी २०१६ नुसार शासनाने कामागारांना देणेसाठी किमान वेतन दर निश्चित केलेले आहेत. त्यानुसार वेतन देणे बंधनकारक असून कामगार कायदा १९७७ चे कलम २१ नुसार कंत्राटदार किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा करतात किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी Principal Employ म्हणून महानगरपालिकेची आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता किमान वेतन अदा करणे बंधनकारक करुन मजूर पुरवठा करणेची निविदा मागविणे अथवा सर्व मालमत्तांच्या निगा व देखभालीची कामे क्षेत्रफळाच्या आधारे दर ठरवून कंत्राटदार नेमून त्यांना निश्चित करुन देणेकामी निविदा मागविण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

लियाकत शेख :-

माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १२ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रेमनाथ पाटील, दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. प्रमोद सामंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ. सुचक श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ.

मा. महापौर :-

श्री. प्रेमनाथ पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४७, विरोधात २५ इतकी मते पडली आहेत. श्री. प्रेमनाथ पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने मी या ठरावाच्या अनुषंगाने एक निवेदन आहे ते सादर करु इच्छितो महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि वनमंत्री मा. सुधीरजी मनगुंटीवार साहेब यांनी जलित शिवारच्या धर्तीवरती वनयुक्त शिवार अशी योजना घोषित केलेली आहे आणि १/७/२०१६ या दिवशी राज्यामध्ये किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचा तसा मानस आहे त्यास अनुसरुन प्रत्येक महानगरपालिकेसाठी शासनाने इष्टांक निश्चित केलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत दरवर्षी १० हजार झाडे लावण्याचा इष्टांक देण्यात येत होता. परंतु आपल्या सर्वांच्या सहकार्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने या वर्षी २५००० झाडे लावण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे त्यासाठी महानगरपालिका १/७/२०१६ ते ७/७/२०१६ या कालावधीत वन महोत्सव साजरा करणार आहे. १/७/२०१६ रोजी १०,००० झाडे लावण्याचा महानगरपालिकेचा निर्धार आहे. म्हणजे १ तारखेला आपण

१०,००० झाडे लावणार आहोत उर्वरीत १५००० जी आहेत ती या पावसाळ्यामध्येच पुढे कन्टीन्युशन मध्ये लावणार. यासाठी महानगरपालिकेच्या शाळा, सामाजिक संस्था, महाविद्यालय व आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. महानगरपालिकामार्फत ज्या झाडांना ॲस्थॅटिक व्हॅल्यु आहे अशा झाडांचा समावेश त्यामध्ये असावा असा शासनाचे निर्देश आहे. वड, पिंपळ, निम, केशीया, रेंत्री, गुलमोहर, मोहगणी, बदाम, बकुळ, पेट्रोफार्म, कांचन, लेजीस्टेनीया, टबोमिया, डॉलीचंदन, सप्तपर्णी इ. प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. नागरिकांसाठी विनामुल्य रोपे वाटप करण्यात येणार आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रात खालील ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. रस्त्यालगत दुतर्फा वृक्ष लागवडचे उद्दीष्ट आपले ३००० रोपाच आहे. महानगरपालिका शाळा, महानगरपालिका उद्याने आणि मैदाने आरक्षित भूखंड स्मशाने या ठिकाणी ५००० रोपाचं उद्दीष्ट आहे. मा. नगरसेवक, नगरसेविका, गृह निर्माण संस्था, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, अशासकीय संस्था, खाजगी उद्योजक, उद्योजकता, सामाजिक दायित्व, सहकारी संस्था विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असल्याने मंडळे व संस्था विविध आस्थापना ज्येष्ठ नागरीक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधी इ. मार्फत आपण १७००० रोपे लावण्याचे उद्दीष्ट असे एकूण आपण २५००० रोप आपण फरगट केले आहे. वन महोत्सव साजरा करण्यासाठी आपण स्थानिक मा. आमदार, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. खासदार, मा. महानगरपालिका, मा. नगरसेवक, पदाधिकारी, मा. नगरसेविका यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पाडावयाचे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभागीय मा. सभापती, प्रभाग समिती, स्थानिक नगरसेवक, नगरसेविका, मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य, शाळेचे विद्यार्थी, गृहनिर्माण संस्था व महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्याने अधिकाधिक झाडे लावण्याचा संकल्प आपण केलेला आहे. त्यासाठी आपण संपर्क दिपक खांबित, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग त्यांचा नंबर वगैरे दिलेला आहे. भाईंदर (प.) व भाईंदर (पूर्व) विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नागेश विरकर, गणेश गोडगे आणि कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक त्यांचा दिलेला आहे. हंसराज मेश्राम, उद्यान अधिक्षक यांचे जे लोक संपर्कातले आहेत ते लहु चौधरी, रणजीत भामरे आणि कार्यालयीन त्यांचा दुरध्वनी दिलेला आहे. यासाठी बांधकाम विभागामार्फत सर्व कार्यवाही चालु आहे म्हणजे खड्डे खोदण्याचे काम चालु आहे १०००० खड्डे उद्या परवापर्यंत आमचे पूर्ण होतील आणि सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा आणि वनांचे महत्व लक्षात घेऊन कारण महाराष्ट्र राज्यामध्ये ३३ टक्के वन असायला पाहिजे. परंतु आजच्या तारखेला २० टक्केच आहे. त्याच्यामुळे हे आपल्याला १० टक्के, १३ टक्के आपल्याला भरुन काढायचे आहेत. म्हणून एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये पहिल्यांदाच महाराष्ट्र शासनाने असा निर्णय घेतला. फार मोठ्या प्रमाणात एकाच दिवशी वृक्ष लागवड करायची आहे. म्हणजे त्या दिवशी करुन थांबायचे नाही. पुढे कन्टीन्युशनमध्ये जिथे रिकामी जागा दिसेल तेथे ते वृक्ष लावणे आणि जगविणे आणि त्या विद्यार्थ्यांना आणि आपण प्रत्येकांनी महानगरपालिकेने एक संकल्प केलेला आहे एक व्यक्ती एक झाड त्यामुळे आपण आपल्या प्रभागामध्ये सन्मा. नगरसेवक, नगरसेविकांनी जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणावरती कार्यक्रम घेऊन आपल्या प्रभागामध्ये जास्तीत जास्त झाडे लागतील याच्याकडे आपण कटाक्षाने लक्ष द्यावे अशी नम्रतेची विनंती आहे. आपण सर्वजण या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे आमच्याकडून जी रुपरेषा कार्यक्रमाची ठरेल ती सर्वांना कळविण्यात येईल आणि प्रभाग समितीचे सभापती आणि त्या एरियातले नगरसेवक त्यांनी पण त्या दिवशी त्यांच्या एरियामध्ये हा कार्यक्रम घ्यायचा आहे आणि जास्तीत जास्त झाडे लावून महानगरपालिकेचा आपला इष्टांक पूर्ण करायचा आहे आणि ती झाडे जगवण्याची आपल्याला शपथ घ्यायची आहे. नुसती झाडे लावून सोडायची नाही तर ती झाडं आपण जगविली पाहिजे आणि विद्यार्थ्यांना वगैरे आपण त्याला टॅग बांधून त्याला दररोज किती ४ पान, ५ पान, १० पान वाढली, १५ झाली झाड मोंठे झाले, ५ फुट झाड असेल तर ६ झालं, ७ झालं अस करत एकदा झाड बळकट झाल की ते पुन्हा जाणार नाही. त्याच्यामुळे आपल्याकडे जी दुष्काळाची परिस्थिती मराठवाडा विदर्भाच्या एरियामध्ये झाली गेल्या वर्षी त्यामुळे हा संकल्प केलेला आहे कारण पावसाचे प्रमाण वर्षानुवर्षे कमी होत आहे. झाडाच आणि पावसाचं डायरेक्ट रिलेशन असल्यामुळे आपल्याला हे करणं भविष्यात आपल्या पाल्यांसाठी गरजेचे आहे. हे लक्षात ठेवून आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो. आणि माझे निवेदन संपवतो. धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

साहेब याच्यामध्ये एक छोटीशी सूचना राहील ट्री गार्डस् झाड आम्ही लावणी घेऊ एक चांगला प्रकल्प आपल्याला राबवायचा आहे. या शहरामध्ये मात्र ट्री गार्डस्चा एक इश्यू असतो तयारी नसेल तर कमीत कमी ती करुन घ्या साहेब.

मा. आयुक्त :-

ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तिथे आपण महानगरपालिकेतर्फे ट्री गार्ड देतो परंतु आता शाळेचे कम्पाऊंड आहे आपलं मैदान आहे मोठ.

जुबेर इनामदार :-

सार्वजनिक जागेवरच लागेल साहेब ट्री गार्ड.

मर्लिन डिसा :-

मॅडम तुमच्या परवानगीने मुंबई महानगरपालिका तिकडे वृक्ष प्राधिकरण डिपार्टमेंटने प्रत्येक सोसायटीला मॅसेज दिले आहेत तसे आपण पण प्रत्येक सोसायटीला मॅसेज देऊन त्यांच्याकडून आपण वृक्ष रोपणाचे प्रोग्राम करु शकतो.

मा. महापौर :-

आपण पेपरला ते प्रसिध्दी देणारच आहोत.

प्रकरण क्र. १२ :-

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, चौपाट्या, नर्सरी, दुभाजक इ. ची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत.

ठराव क्र. १२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील खालील मालमत्तांची उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत दैनंदिन निगा व देखभाल करणेकामी मंजूर पूरवठा करून त्यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

| अ.क्र | मालमत्तांचे वर्णन | संख्या |
|---|---|---|
| १) | उद्याने | ६० |
| २) | मैदाने | ११ |
| ३) | स्मशाने | १४ |
| ४) | दुभाजके | १६ कि.मी. लांबीचे |
| ५) | चौपाट्या | ०२ |
| ६) | नर्सरी | ०१ |

वरील मालमत्तांच्या ठिकाणी मजूरामार्फत आवश्यकतेनूसार पाणी देणे, साफसफाई करणे, वाढलेले गवत काढणे, वृक्षांची छाटणी करणे, शोभिवंत फुलझाडे व गवत लावणे, शेणखत देणे, माती टाकणे, औषधे देणे, पाथवेची सफाई करणे इ. कामे करण्यात येत आहेत. यासाठी महानगरपालिकेमार्फत वार्षिक दराच्या निविदा मागवून कंत्राटदार नेमुण त्यांच्या मार्फत मजूर व हत्यारे, संसाधने, औषधे पुरवठा करून घेण्यात येत आहेत. तसेच २३० मजूरांपैकी मा. महासभेच्या ठरावानूसार ५०मजूर कपात केल्यानंतर ०१ एप्रिल २०१६ पासून सद्यस्थित दररोज १८० मजुर काम करीत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता प्रशासनामार्फत देखभाल व दुरुस्तीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) उद्याने, मैदाने, दुभाजक व इतर कामाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सेवाभावा, खाजगी संस्था विकासकाना कामे देण्यात यावीत सदर संस्था स्वतःची अथवा वाणिज्य स्वरुपाच्या जाहिराती करु शकतील त्यासाठी महानगरपालिकेने त्यांना जागा निश्चित करुन द्यावे. राजकीय स्वरुपाच्या जाहिराती करता येणार नाही.

२) वरीलपैकी संस्थांनी देखभाली साठी काही सुविधा व मदत मागितल्यास त्याची शहानिशा करुन आवश्यकता असल्यास सदर सुविधा व मदत देण्यात यावे तथापि सदर खर्च महापालिकेमार्फत होणाऱ्या देखभाल दुरुस्ती पेक्षा कमी राहिल याची दक्षता घ्यावी.

३) काही ठिकाणी आवश्यकतेनूसार मजुर पुरवठा करुन घ्यावा त्यासाठी नव्याने निविदा मागविण्यात याव्यात.

४) इतर आवश्यक उद्याने,मैदाने, देखभालीच्या कामासाठी प्रति चौरस मीटर प्रमाणे किंवा मालमत्ता निहाय मागवून कंत्राट निश्चित करावे.

वरील प्रमाणे मा. आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | अनिता जयवंत पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | लियाकत ग. शेख | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | भोईर कमलेश यशवंत | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | अशोक तिवारी | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | तारा विनायक घरत | | | |
| २८ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २९ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३० | परमार अनिता भरत | | | |
| ३१ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३२ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३३ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३४ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३५ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३६ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३७ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३८ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ४० | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ४१ | भोईर भावना राजु | | | |
| ४२ | भोईर राजु यशवंत | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | मुन्ना सिंग | | | |
| ४५ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४६ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४७ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३, मिरारोड रेल्वेस्टेशन जवळील गांवदेवी नं. १ झोपडपट्टीतील डि.पी. रोडवर वसलेल्या झोपड्यांच्या पुर्नवसनाबाबत.

प्रशांत दळवी :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे समांतर गांवदेवी नगर नं.१ येथील १५.०० मीटर विकास योजनेतील रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर झोपडपट्टीतील डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपडीधारकाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपड्याची संख्या ३६ आहे. या ३६ झोपडीधारकांपैकी ३० घरे व ०६ दुकाने आहेत. दिनांक.०१/०१/२००० अन्यथा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल कागदपत्रे तपासून पात्र किंवा अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | घर/दुकान | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| १ | नरेश नामदेव भोईर | घर | पात्र |
| २ | तारामती रमेश माछी | घर | पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | लक्ष्मी रोहिदास माछी | घर | पात्र |
| ४ | जगदीश प्रकाश माछी | घर | पात्र |
| ५ | गिरीश रोहिदास माछी | घर | पात्र |
| ६ | सुधिर पांडु पटेल | घर | पात्र |
| ७ | त्रिभवन नागीनभाई मिटना माछी | घर | पात्र |
| ८ | कुंदन नंदन माछी | घर | पात्र |
| ९ | आरती रोहिदास माछी | घर | पात्र |
| १० | रविंद्र ईश्वर माछी | घर | पात्र |
| ११ | मालती संतोष चौरसिया | घर | पात्र |
| १२ | चंदन सुंदर माछी | घर | पात्र |
| १३ | सोनल रमेश मृपाल | घर | पात्र |
| १४ | धनसुख अृमृत माछी | घर | पात्र |
| १५ | आशा अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची पत्नी आहे) |
| १६ | विजय अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची अल्पवयीन मुलगा आहे) |
| १७ | रवि मनी पाटील | घर | पात्र |
| १८ | सुरेश मनी पाटील | घर | पात्र |
| १९ | मुक्ता मनी पाटील | घर | पात्र |
| २० | प्रेमा राजा मदेसिया | घर | पात्र |
| २१ | कमलेश दिपक माछी | घर | पात्र |
| २२ | जिगा प्रकाश माछी | घर | पात्र |
| २३ | अशोक पोकर सिंग बिनिवाले | घर | पात्र |
| २४ | बबन बाबर | घर | पात्र |
| २५ | मंजुलता शर्मा | घर | पात्र |
| २६ | भाविका जयेश माछी | घर | पात्र (तुलसी ईश्वरमाछी(मृत) यांची नात) |
| २७ | फुलाबाई सुकार माछी | घर | पात्र |
| २८ | इंद्रजित सुधाशु रॉय | घर | पात्र |
| २९ | निलेश देवराम माछी | घर | पात्र |
| ३० | ईश्वर ताराजन मिटना माछी | घर | पात्र |
| ३१ | भारती महादेव भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थी अपात्र करण्यास येत आहे) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | शुभांगी नरेश भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३३ | मोहित नरेश भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३४ | नरेश महादेव भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २०१५ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३५ | राजा धनुशधारी मधेसिया | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३६ | जगदीश रमेश माछी | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |

सदर विकास कामामध्ये येणाऱ्या झोपडीधारकांना पर्यायी सदनिका देवून सदर भाग खाली करणे गरजेचे आहे. बेघरांना घरे (House for Dishoused) अंतर्गत मौजे.नवघर येथील आ.क्र. २२२ व २२२-अ येथील इमारतीमध्ये २७ सदनिका उपलब्ध आहेत. तरी सदनिकांमध्ये डि.पी. रस्त्यामधील बाधीत लाभार्थींना स्थलांतरीत करावे लागेल. तरी सदर लाभार्थींना सर्व्हेक्षणाच्या व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पात्र लाभार्थींना बेघरांना घरे या आरक्षणात प्राप्त असलेल्या १९.३३ चौ.मीटर क्षेत्राच्या सदनिका करारनामा करुन कायम स्वरुपी हस्तांतर करणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच रस्ता रुंदीकरणामधील चामुंडा इमारत ते पांडुरंगवाडी / अजित पॅलेस ते सृष्टी / प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे येथील पात्र लाभार्थींना रेंटल हाऊसिंग स्किम मधील तात्पुरत्या स्वरुपात सदनिका देण्यात आलेल्या आहेत . सदर लाभार्थींना कायमस्वरुपी बेघरांना घरे या आरक्षणा अतंर्गत सदनिका देऊन पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर पात्र लाभार्थ्यांची यादी खालील प्रमाणेः-

चामुंडा इमारत ते पाडुरंग वाडी रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्रीम. कविता शनी वाघरी | पात्र |
| २ | श्रीम.कमुबाई देवजी वाघरी | पात्र |
| ३ | श्री.नाथा वाघरी | पात्र |

अजित पॅलेस ते सृष्टी विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल अजिज अशीक अली कुरेशी | पात्र |
| २ | श्रीम. शारदा राजु अचन | पात्र |
| ३ | श्री. प्रकाश रजनराव सुर्वे | पात्र |
| ४ | सौ.वंदना सुभाष खिलारे | पात्र |
| ५ | श्रीम. साळुबाई नामदेव वाघमारे | पात्र |

प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे पर्यंत विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | सौ.यशोदा भास्कर सुनिल | पात्र |
| २ | सौ.अनम्मा वर्गीस | पात्र |
| ३ | श्री.के. रामचंद्रन | पात्र |

सदर पात्र लाभार्थ्यांना बेघरांना घरे (House for Dishoused) या आरक्षणाच्या प्राप्त व भविष्यात प्राप्त होणाऱ्या सदनिका कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी महानगरपालिकेमार्फत पंडीत भीमसेन जोशी रुग्णालय, टेंभा येथील हॉस्पिटल इमारतीच्या आवारातील रहीवाशी तसेच भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानासमोरील ४५ मीटर रुंद रस्त्यामधील पात्र बाधितांना बेघरांना घरे (House for Dishoused) या आरक्षणातील भाड्याने देण्यात आलेली आहेत. सदर इमारतीची दुरावस्था झाली असून मोठ्या प्रमाणावर खर्च होणार आहे. अशा रहिवाश्यांची मा. आयुक्त यांनी भेट, तपासणी करुन जे लाभार्थी/रहिवासी पात्र आहेत व त्यांना घरे देणेची महानगरपालिकेची जबाबदारी असलेल्यांना कायमस्वरुपी घरे देण्याची प्रक्रिया करावी, इतर सदनिका रिकाम्या करुन ताब्यात देण्यात याव्यात या सर्व कार्यवाहीचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ इमारती समोरील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या लाभार्थ्यांना भाड्याने गाळे वाटप करण्यात आले आहेत. सदर गाळेधारकांना सदर गाळे कायमस्वरुपी देण्याचे अधिकार देखील आयुक्त यांना देण्यात येत आहेत. सदर सदनिका/गाळे कायम स्वरुपी हस्तांतर करताना सदर एका सदनिकेची किंमत रु.१००/- ठरविण्यात येत असून त्यानुसार सदनिका/गाळे नोंदणीची प्रक्रिया पार पाडावी.

अरविंद ठाकूर :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम बेघरांना आपण घरे देत आहोत या ठिकाणी आयुक्त महोदय सन्मा. दोन्ही आमदार यांची या शहरामध्ये महापौर मॅडम आपलही उपमहापौरांचही काम चांगल चाललेले आहे बेघरांना घरे देत आहोत. आपण रस्त्यामध्ये जे बाधित होतात ते दुकाने त्यांना आपल त्यांची दुकानांची व्यवस्था करतोय त्याबद्दल मी तुमच अभिनंदन करतो परंतु महापौर मॅडम एक गोष्ट सांगाविशी वाटते २०१४ मध्ये आपण मिरारोड स्टेशन सुशोभिकरण करणे हा ठराव पारित केला होता. हा ठराव पारित करीत असताना सन्मा. आमदार मेहता साहेब आणि मी स्वतः त्या ठिकाणी सूचना मांडली होती ज्या वेळेला आपण तिकडे ८ करोड रुपये खर्च करुन मिरारोड स्टेशन सुशोभिकरण करतोय आपल्या पालिकेला पैसा खर्च करतोय त्या ठिकाणी तर तेथील अतिक्रमण हटले गेले पाहिजे. प्रामुख्याने आम्ही त्यामध्ये म्हटले होते मग ती रिलायन्सची केबीन असेल बिल्डरचे ऑफिस असेल जे काही अतिक्रमण असेल ते पूर्णतः हटविण्यात यावे आणि त्यानंतर आपण सुशोभिकरणाचे कामाला सुरुवात करावी. परंतु महापौर मॅडम तस न होता अगोदरच त्या कामाला सुरुवात झाली व मध्ये अडथळा आला की ते अतिक्रमण हटवले गेले नाही तिकडे रिक्षावाल्यांची वर्दळ असते काही गुमास्ता लायसन्स देऊन टपऱ्या काही तिकडे टाकल्या गेल्या होत्या. महापौर मॅडम, आयुक्त महोदय मी स्टॅन्डिंग कमिटी २ वर्ष असताना सदर टपऱ्यांबाबत मी वारंवार चर्चा केली. विधी विभागाशी बोललो परंतु ते कोर्ट मॅटर आहे. आयुक्त महोदय कोर्ट मॅटर आहे प्रत्येक गोष्टीत कोर्ट मॅटर मग आपलं विधी विभाग काय करते. आयुक्त महोदय तुम्हाला एक सांगतो की त्या गन्ना ज्युस वाल्याची स्वतःची टपरी होती त्याला आपण गुमास्ता लायसन्स दिले होते त्या २०० फुटाच्या जागेवरती त्याने स्टे घेऊन आला तो ४ वर्षापूर्वी आयुक्त महोदय त्याच्यानंतर त्याने बाजूला आणखी २०० मीटरची जागा त्याने व्यापली गेली आणि त्या ठिकाणी वडापाव सेंटर चालू केले. ४०० फुटावर म्हणजे २०० अगोदर नंतरचे २०० असे ४०० फुटावर तो स्टे घेऊन आला. आजही तो स्टे आपण वेकेंट करु शकलो नाही. आयुक्त महोदय त्याच अस कोणता सातबारा होता. त्याने असा कोणता तिकडे गाळा खरेदी केला होता की त्या ठिकाणी आपण त्याला त्याचा मोबदला देतो. आयुक्त महोदय आजही त्याने आपल्या ऊरावरती बसून आयुक्त महोदय त्याला एवढा माज चढलेला आहे. कोणाची परवानगी न घेता आज ठिक आहे टेम्परररी तुम्ही त्यांना गाळे बांधायला परवानगी दिली असेल किंवा नसेल मला माहिती नाही पण कागदपत्राच्या आधारे तुम्हाला सांगु इच्छितो की त्या गाळेधारकांना परवानगी नाही. आज आपण ८ करोड रुपये खर्च करतो. तिकडे मिरारोड सुशोभिकरण फार मोठा दिखावा आपण तिकडे मांडला होता. आपण होर्डिंग्ज वगैरे पण मोठे लावले होते की आपलं मिरारोड स्टेशन अस दिसेल याप्रकारे दिसेल परंतु आयुक्त महोदय या ठिकाणी आपले आई बहिण आपण सगळे लाखो लोक आज तिकडे ये-जा करतात. प्रवेशद्वारापासून त्या ठिकाणी असे ज्युस सेंटर आणि हे असे जर फेरिवाले बसणार असतील आयुक्त महोदय तर मग आपण केलेला तो खर्च वाया जाणार आहे. आयुक्त महोदय म्हणून माझी विनंती आहे तुम्हाला जे काही परवानगी दिली असतील ती परवानगी बेकायदेशीर आहे अस मला वाटते तुम्हाला काय वाटते मला माहित नाही. परंतु स्थानिक नगरसेवक म्हणून आपल्याला त्या बद्दलची कल्पना देतो आयुक्त महोदय यांनी तिकडे आता रिलायन्सची केबल टाकुन घेतले. पाण्याची लाईन काढून घेतली पूर्ण आपले ते रस्ते आपण जो डी.पी. रोडचा रस्ता बनवतोय तो रस्ता पूर्ण खोदला गेला. आयुक्त महोदय मी तुम्हाला सांगतो त्यावेळेला मी सचिन पाटील त्यांना पण मी फोन करुन सांगितले होते. इंजिनिअरला की हे आपले आपण बांधलेले रस्ते विना परवाना रस्ते खोदून पाईप लाईन टाकतात इलेक्ट्रीक्टची केबल टाकलेली आहे एवढेच नाही तर आयुक्त महोदय आपण त्या ठिकाणी त्या शांतीस्टार बिल्डरला आपण भाग पाडल जे कोणी करता आल नाही ते आपण करुन दाखवलं की तो रस्ता आपण डी.पी. रोड तातडीने त्यांचे कार्यालय हटवले गेले. त्याबद्दल आपल अभिनंदन करतो आयुक्त महोदय पण त्या ठिकाणी जी शांती शॉपिंग सेंटरची पार्किंग होती आजही आयुक्त महोदय शांती शॉपिंग सेंटरची पार्किंग तेथे बसली जाते. आयुक्त महोदय कोणी त्याशांती शॉपिंग सेंटरला ते पे ॲन्ड पार्कचे टेंडर दिले आहे. जागा

आपली आणि हे आपल्या जागेवरती पे ॲन्ड पार्क चालवता. आयुक्त महोदय त्या ठिकाणी ज्या ओपन स्पेसच्या जागा असतात मोठ कन्टेनर आणुन ठेवलय आयुक्त महोदय तुम्ही जर जाऊन बघाल तिकडे तर कन्टेनर आणुन ठेवलय त्या जागेवरती आपण काय करायला चाललो आहे आणि काय होतय तिकडे ज्यांना टॉयलेटचे बांधकाम दिले आहे. त्यांनी मोठ कन्टेनर आणुन ठेवलय त्याच्याही पुढे जाऊन सांगेन आयुक्त महोदय तुम्हाला की ७ ते ८ दिवसांपूर्वी तुम्हाला पत्र दिले आहे त्या ठिकाणी ३-४ टपऱ्या आणुन ठेवल्या आहेत. आयुक्त महोदय हे नंतर आपल्याला फार जड जाणार आहे. सगळ्या गोष्टी आता जर कारवाई नाही झाली तर उद्या आपल्याला हे जड जाणार आहे. कारण त्या प्रत्येक टपऱ्या वेगवेगळ्या नावाने वसलेल्या आहेत. पूर्ण पॅक बंद टपऱ्या तिकडे आणुन ठेवल्या आहेत. आयुक्त महोदय आणि लवकरच त्याचे उद्‌घाटन ही होणार आहेत. माझी एक कळकळीची विनंती आहे महापौर मॅडम, आयुक्त महोदय आपल्याला की आपण एवढे करोडो रुपये तिकडे खर्च करतो त्या टपरी धारकांना आपण त्यांचे गुमास्ता लायसन्स २००० चे असो की २०१० चे असो त्यांनी आपल्यावर दावा दाखल केला आहे. वर्षानुवर्षे दावा आपल्या विरोधात चालु आहे. म्हणजे त्यांनी ब्लॅक मेल करावे आणि आपण त्यांना तिकडे दुकाने थाटून द्यावी. आयुक्त महोदय तुमच्या नियमावली नुसार जर त्यांना दुकान द्यायची असेल तर तो डी.पी. रोड सोडून अन्य ठिकाणी आपण त्यांना नियमानुसार देण्यात यावी. परंतु जो प्रवेशद्वार आहे मिरारोड स्टेशनचा आज आपण एवढं मोठे सुंदरीकरण करतोय त्या ठिकाणी आयुक्त महोदय माझी स्थानिक नगरसेवक म्हणून एक विनंती आहे की त्या ठिकाणी त्या गाळेधारकाने अनधिकृतपणे केलेले बांधकाम निष्कसित करण्यात यावे धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, महापौर मॅडम मिरारोड स्टेशनचा विषय या शहरामध्ये एक अशी वास्तविकता निर्माण होत आहे त्याची सत्‌कल्पना आमदार मुजफ्फर हुसेन साहेबांनी बघितली. त्यांनी त्याची सुरुवात केली आज प्रत्येक व्यक्ती त्याला आपला हातबोट लावतो. प्रत्येक व्यक्तीचा सिंहाचा वाटा असावा त्यामध्ये आणि असणारच कारण एक चांगली वास्तु निर्माण मिरारोड स्टेशन लोक बघायला येतील अशाप्रकारे तयार होत आहे. २०० मीटरपेक्षा जास्त ओपन एरिया फ्रंटेज मला वाटते कुठल्याही स्टेशनला नसणार आणि अशा चांगल्या वास्तुला एक शौचालय आयुक्त महोदय आम्ही सातत्याने तुमची या विषयावर आपलं बोलण झाल आहे. आज लोक प्रतिनिधी सर्वच इथे उपस्थित आहे त्यांच्यासमोर परत एकदा तुम्हाला विनंती करेल की ती वस्तु तिथे बांधायला देऊ नका. परवानगी तुम्ही दिलेली नाही योग्य परवानगी नाही तरी देऊ नका कारण कितीही फाईव्ह स्टार शौचालय बांधला तरी ते शौचालय फाईव्ह स्टार राहणार नाही ते घाण होणार ते सार्वजनिक होणार.

मा. आयुक्त :-

तुमच्या एरियात त्या ठिकाणी जनजागृती केली पाहिजे. फाईव्ह स्टार शौचालय महानगरपालिका बांधून देते तर त्याची हिफाजत सुध्दा केली पाहिजे. राहणार नाही म्हणजे नागरिकांना तुम्ही प्रशिक्षण द्या.

जुबेर इनामदार :-

साहेब तुम्हाला आम्हाला तिथे वॉचमनगिरी करावी लागणार तिथे अस शौचालय याच्याआधी तिथे होते. आणि ते तोडावे लागले होते. कारण त्याच गोडाऊन झाल होत तयार फेरिवाल्यांचे गोडाऊन तयार होणार आहे. तिथे शौचालयाची गरज होती आणि शौचालय बांधायचच होत तर आपल्याकडे पुढे जागा होती कोणाच्या जिद्दीला पेटून तुम्ही तिथेच बांधून घेतल ते परमेश्वराला माहिती आणि तुम्हाला माहिती मात्र साहेब विषय मिरारोड स्टेशनचा आपल्याकडे गावदेवी झोपडपट्टी बाकीच्या डी.पी. रस्त्यावरती बाधित जे घर आहेत त्याला हौसिंग डिसहाऊस मध्ये त्यांना समावेश करुन घ्यायचा आहे. त्याचा विषय महासभेमध्ये चर्चेसाठी मंजूरीसाठी, साहेब हा विषय महासभेमध्ये मंजुरीसाठी असताना याच महिन्याच्या १४ तारखेला महानगरपालिकेचा फौजफाटा पाऊस चालु असताना त्या गावदेवी झोपडपट्टी किंवा ते झोपडपट्टी मी नाही बोलणार साहेब त्या जुन्या चाळी आहेत जुने घरे, बैठी घरेच आहेत ते आणि ते आजचे नाही. ते ६०-६५ वर्ष जुने गाव आहे आणि त्या गावामध्ये राहणाऱ्या लोकांना बेघर करण्यासाठी या प्रकारे महानगरपालिकेने भुमिका घेतली ती योग्य नव्हती साहेब आणि त्याचा मी निषेध करतो. परत त्या विषयावर येणार साहेब कारण तुम्हाला ते करताच येत नव्हतं तरीही कोणत्या नियमाच्या आधारावर आणि का इतकी घाई कशाची झाली होती ते समजून आले नाही त्या दिवशी. सातत्याने आम्ही आपल्याला फोन करत होतो ज्यांना तुम्ही काम सोपवल होते बांधकामचे इन्चार्ज खांबित साहेब तेही तिथे स्थळी उपस्थित होते ती परिस्थिती त्यांनी बघितली लॉ एन ऑर्डरचा प्रॉब्लेम निर्माण झाला होता त्या परिसरामध्ये लोकांना घरातून बेघर करायला निघाले त्यांना घरे तुम्ही अजून दिले नाही. त्याच पुर्नवसन झाल नाही त्यांना ॲग्रीमेंट करुन दिले नाही. अलॉटमेंट पेक्षा ॲग्रीमेंट महत्वाच अलॉटमेंट दिले आजचा माणूस उद्या मेलं तर त्याच काय? त्याच्या बाकीच्या कुटुंबानी काय करायचे म्हणून ॲग्रीमेंट महत्वाचं. एका माणसाचे ५००-६०० स्क्वेअर फिटचे तुम्ही घर घेता आणि त्याला १८० स्क्वेअर फुटच्या घरामध्ये स्थलांतरीत करताय साहेब त्याच्या मनावर काय बितत असेल तुम्हाला आणि आम्हाला समजून घेतलं पाहिजे. ते अतिक्रमण नाही साहेब ते जुने गावकरी आहेत आणि डी.पी. रोडचे आरक्षण त्याच्यामध्ये टाकलं ९७ साली आरक्षण टाकल भूसंपादन केले पाहिजे होते, लॅन्ड ॲक्वीजीशन गरजेचे होते ते सगळ काही डावलून ज्याप्रकारे पूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये आज विनाशाची भूमिका साहेब प्रशासनाने घेतली त योग्य नाही.

मा. आयुक्त :-

विषया पुतरचं बोला कारण त्याच्यावर विशेष सभा लागणर आहे मिरा भाईंदर बद्दल.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

त्यांना तुम्हाला परत त्यांच बांधकाम करुन द्यावे लागणार आहे. तुमच्याकडे साहेब किती अर्ज आले पालिकेकडे अर्ज आले असतील पूर्ण शहराकडून की आमच नुकसान झाल त्याची भरपाई करुन द्या. किती आले अर्ज साहेब तुमच्या दफ्तरी अर्ज आलेलेत.

मा. आयुक्त :-

हा जनरल पूर्ण मिरा भाईंदर शहराचा विषय आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब शहरामधलाच भाग आहे तो.

मा. आयुक्त :-

आपल्याला काय बोलायचं तुमचा विषय मला समजला. मी उत्तर देत आहे आपण कृपा करुन बसावे. विनाकारण टाईमपास न करता...........

जुबेर इनामदार :-

विनाकारण टाईमपास साहेब लोकांची घरे उद्ध्वस्त केली, गाळे उद्ध्वस्त केलेत.

मा. आयुक्त :-

साहेब याच उत्तर देतो आपल्याला.

जुबेर इनामदार :-

साहेब लोकांना रस्त्यावर आणल लोकांचे कामकाज ठप्प होऊन गेले लोकांचे गाळे तोडून टाकले, लोकांची घरे उद्ध्वस्त केली लोकांना बेघर केल हा टाईमपास.

मा. महापौर :-

जुबेरजी आप विषय पे बोलिए।

जुबेर इनामदार :-

हा शब्द मागे घ्या साहेब. म्हणजे आम्ही ती लोकांची कळकळ सांगायची तुम्हाला शहरामध्ये झालेली वस्तुस्थिती तुमच्या समोर आणुन द्यायची.

मा. आयुक्त :-

वस्तुस्थिती तुम्हाला माहित नाही माझं उत्तर ऐकल्यानंतर तुम्ही गप्प बसलात.

जुबेर इनामदार :-

तुम्ही कोणत्या कायद्या अंतर्गत केले ते तुम्हाला सांगावेच लागेल.

मा. आयुक्त :-

मी सांगतो आपल्याला महोदय आपण बसावे, विषय आला माझ्या लक्षात तुम्हाला उत्तर देतो मी.

दिप्ती भट्ट :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते साहेब मी २०१५ मध्ये १/१२ ला आपल्यला पत्र दिले होते. दुसरं पत्र २५/२०१६ मग आपल्याकडून पण पत्र आले आहे. आणि आपल्याला पण माहित असेल की त्यांची प्रोसेस आपण कम से कम एवढ्या टाईमपासून करतोय आणि तो डी.पी. रोड आहे तर मी तिकडची स्थानिक नगरसेवक २००७ पासून आहे आणि थँक यू की प्रशासन आता तरी जागल आणि ते २००९ मध्ये मला नोटिस बिल्डरला पण पाठवलेली आणि त्याची कॉपी मला दिलेली की बिल्डरने स्वतःहून त्याची इललिगल ऑफिस काढावे. तर आता आपण काढले. म्हणून धन्यवाद. आणि वारंवार माझी कम्पलेन्ट असताना नव्हत झालं म्हणून आणि दुसरी गोष्ट साहेब की जेव्हा ते प्लान चालू केले की ते रोड चालू डी.पी. प्लानच्या हिशोबाने रोड करायचा आहे तर माझं १/१२/२०१५ चे पत्र होत त्याला लागून आपण लोकांना समजावलं होत आम्ही आणि मग नंतर आपण सहकार्य केल आपल्याकडे आम्ही सगळे लोक आलो. आणि आपण महासभेमध्ये हा प्रस्ताव घेण्यासाठी आणि कायमस्वरुपी घर देण्यासाठी हे नक्की केल त्याच्यासाठी पण खास सगळ्यांतर्फे आणि दुसरे की इंद्रलोकमध्ये आम्ही स्वतः लोकांबरोबर जाऊन आलेलो आणि ॲग्रीमेंट बनविण्यासाठी आम्ही त्यांना बोलावले ते लोक येत होते पण काय माहिती कोणी भडकवल त्यांना आणि हा विषय अख्खा गोंधळ झाला आणि एवढा बबाळ झाला जे शांतीने करायला पाहिजे त्याच्यामध्ये मिसगाईड केले की हे रि-डेव्हलपमेंट आणि जे स्टेशनचे नुतनीकरण होते ते कोणी पर्सनल रितीने करतय तस नाही कारण हे महासभेच आहे आणि आमचा वॉर्ड तेव्हा पण होता २००७ ला तर माझ सांगण हे आहे की कोणी पर्सनल न घेता आणि याच्यामध्ये राजकारण न करता कारण की याचे सगळे पत्रव्यवहार माझ्याकडे आहे आणि त्या लोकांना घेऊन मी त्यांच्या संगती बसली होती तेथे. ऑफिसमध्ये आणि त्यांचे पेपर चेक करत होतो आम्ही. एवढे दिवस सगळे झोपलेले होते आणि जेव्हा त्यांना घरे द्यायची पाळी आली आज सगळे हात जोडतात की आम्ही केल हे स्टेशनचे वॉर्ड आहे पण हे करताना पण कुठे पण हे स्टेशनचे नुतनीकरण जेव्हा काम होते त्याची एक घटना पण सांगितल नाही ओपनिंग करायला पण आम्हाला बोलावले नाही म्हणजे ही चुकीची गोष्ट आहे की अस जर आमच्या वॉर्डमध्ये काम असेल माझं काय कोणाच्या पण वॉर्डमध्ये जर काम होत असेल तर कुठल्या पण कॉन्ट्रॅक्टरला सांगा की त्यांनी सूचना देण्यात यावी कारण की आमचा पण त्याच्यामध्ये कुठेना कुठे पत्रव्यवहार करण्यात हातभार असतो. आम्हाला

न बोलावता डायरेक्ट काम होत आहेत. काम करा पण आम्ही एवढी मेहनत केली स्थानिक नगरसेवकांना तुम्ही बोलवा.

जुबेर इनामदार :-

इन्वीटेशन बाकी आहे.

दिप्ती भट :-

गप्प रहा तुम्ही जे गोंधळ केले आहे ना ते चांगले नाही केले. त्यांनी जो केला आहे ना तमाशा लोकांच्या भावना दुखावल्या आहेत.

(सभागृहात गोंधळ)

प्रमोद सामंत :-

लोकांना अजून ॲग्रीमेंट का नाही दिली ते सांगा.

दिप्ती भट :-

एवढच की आम्ही फोटोग्राफी केली नाही. तुम्ही दिपाली मॅडम, पवार मॅडमला विचारा. प्रभाग समितीमध्ये ४ दिवस याची प्रोसेस चालली आणि सगळ्यांचे ज्याचे नाव होते त्यांच पण किती कोशिश करुन जी एक लहान मुलगी होती तिचे आई वडील नाही तरी पण पंचनामा करुन त्यांच केलं आहे की नाही त्या मुलीला वारस द्या अस म्हणजे पूर्ण मेहनत केली आहे नाही केली अस नाही. हात ठेवायला सगळे येतील आता.

प्रमोद सामंत :-

पालिका तोडायला आली तेव्हा हे कुठे होते.

दिप्ती भट :-

आम्ही बरोबर होतो.

मा. आयुक्त :-

मी खुलासा करत आहे. मा. महापौर मॅडम मिरारोड स्टेशनजवळ गावदेवी नं. १ झोपडपट्टीमधील डी.पी. रोड बसलेल्या झोपडपट्टयांच्या व विकास योजनांच्या रस्त्यावरील बाधितांच्या पुर्नवसनाबाबत भट्ट मॅडमने बऱ्याच वेळा माझ्याकडे पाठपुरावा केला त्या अनुषंगाने संबंधित झोपडीधारकांची बैठक माझ्या केबीनला मी स्वतः घेतली आहे आणि या लोकांची बैठक २ महिन्यांपूर्वी घेतली. गरिब लोकांची आम्हाला जाणीव आहे. मला त्यांच घर उद्‌ध्वस्त करायचे नव्हत म्हणून मी त्यांना माझ्या केबीनला बोलावून त्यांची बैठक घेतली त्याचे लोक किती आहेत खांबितला विचारा. सगळे २७-२८ जे काही लोक आहेत त्यांना बोलावलं त्यांना सांगितल ते लोक हो भरले माझ्याकडे. हो भरल्यानंतर परत घरी गेले. घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी आम्ही त्यांना सांगितल की आमच्याकडून चावी घेऊन जा. पुन्हा नंतर त्यांना कुणी बिचकावले मला माहित नाही परंतु त्यांनी म्हटलं की आम्हाला छोट घर आहे आम्ही इथे राहणार नाही पण शासनाच्या निकषाप्रमाणे जे घर केवळ तेवढ्या लोकांसाठी नाही आपल्याकडे इंद्रलोक मध्ये जे काही लोकांना आपण शिफ्ट केले आहे त्या ठिकाणी त्यांना घर द्यायच ठरलं. २७ लोकांची चावी आमच्याकडे तयार होती हे सगळ केल्यानंतर कुणीतरी त्यांच्यामध्ये काहीतरी टेंबा टाकण्याचा कार्यक्रम केला आणि त्या लोकांना बिचकावलं आणि त्यामुळे त्या लोकांनी त्या दिवशी विरोध केला वगैरे तरी आमची भावना नसती तर आम्ही त्या लोकांच्या हातात चावी द्यायला तयार झालो नसतो. एवढ्या गरीब लोकांच तर उद्‌ध्वस्त करुन आम्हाला काय भेटणार आहे.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

देशाच्या घटनाच्या आधारे ज्यांचा पुतळा तुम्ही बसवता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्याच्या घटनाच्या आधारे एका माणसाला तुम्ही त्याच्या घरातून काढून टाकू शकत नाही.

रवि व्यास :-

महापौर मॅडम, इनको बोलो बैठने के लिए इस तरीके से चिल्लाए नही। चिल्लाना हमको भी आता है।

प्रमोद सामंत :-

गरिबांच घर मोडून विदाऊट नोटिस विदाऊट कुठली कारवाई न करता एम.आर.टी.पी. ची कारवाई न करता.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सभी बैठ जाइए। आपल्याला ठराव मांडायचा असेल तर मांडा.

प्रमोद सामंत :-

तुम्ही चुकीची माहिती देवू नका.

मा. आयुक्त :-

सभागृहाचं पावित्र्य तुम्ही खराब करु नका. तुम्ही काय म्हणताय की प्रशासन झोपलं आहे म्हणून.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रमोद सामंत :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे समांतर गांवदेवी नगर नं.१ येथील १५.०० मीटर विकास योजनेतील रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर झोपडपट्टीतील डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपडीवजा रहिवाश्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपड्याची संख्या ३६ आहे. या ३६ झोपडीधारकांपैकी ३० घरे व ०६ दुकाने आहेत. दिनांक.०१/०१/२००० अन्यथा त्यापूर्वीपासूनची रहीवास सध्या तेथे अस्तित्त्वात असल्याबद्दल कागदपत्रे तपासून पात्र किंवा अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | घर/दुकान | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| १ | नरेश नामदेव भोईर | घर | पात्र |
| २ | तारामती रमेश माछी | घर | पात्र |
| ३ | लक्ष्मी रोहिदास माछी | घर | पात्र |
| ४ | जगदीश प्रकाश माछी | घर | पात्र |
| ५ | गिरीश रोहिदास माछी | घर | पात्र |
| ६ | सुधिर पांडु पटेल | घर | पात्र |
| ७ | त्रिभवन नागीनभाई मिटना माछी | घर | पात्र |
| ८ | कुंदन नंदन माछी | घर | पात्र |
| ९ | आरती रोहिदास माछी | घर | पात्र |
| १० | रविंद्र ईश्वर माछी | घर | पात्र |
| ११ | मालती संतोष चौरसिया | घर | पात्र |
| १२ | चंदन सुंदर माछी | घर | पात्र |
| १३ | सोनल रमेश मृपाल | घर | पात्र |
| १४ | धनसुख अृमृत माछी | घर | पात्र |
| १५ | आशा अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची पत्नी आहे) |
| १६ | विजय अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची अल्पवयीन मुलगा आहे) |
| १७ | रवि मनी पाटील | घर | पात्र |
| १८ | सुरेश मनी पाटील | घर | पात्र |
| १९ | मुक्ता मनी पाटील | घर | पात्र |
| २० | प्रेमा राजा मदेसिया | घर | पात्र |
| २१ | कमलेश दिपक माछी | घर | पात्र |
| २२ | जिगा प्रकाश माछी | घर | पात्र |
| २३ | अशोक पोकर सिंग बिनिवाले | घर | पात्र |
| २४ | बबन बाबर | घर | पात्र |
| २५ | मंजुलता शर्मा | घर | पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | भाविका जयेश माछी | घर | पात्र (तुलसी ईश्वरमाछी(मृत) यांची नात) |
| २७ | फुलाबाई सुकार माछी | घर | पात्र |
| २८ | इंद्रजित सुधाशु रॉय | घर | पात्र |
| २९ | निलेश देवराम माछी | घर | पात्र |
| ३० | ईश्वर ताराजन मिटना माछी | घर | पात्र |
| ३१ | भारती महादेव भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थी अपात्र करण्यास येत आहे) |
| ३२ | शुभांगी नरेश भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३३ | मोहित नरेश भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३४ | नरेश महादेव भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २०१५ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३५ | राजा धनुशधारी मधेसिया | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३६ | जगदीश रमेश माछी | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे.  लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |

सदर विकास कामामध्ये येणाऱ्या झोपडीवजा रहिवाश्यांना पर्यायी सदनिका देवून सदर भाग खाली करणे गरजेचे आहे. बेघरांना घरे (House for Dishoused) अंतर्गत मौजे.नवघर येथील आ.क्र. २२२ व २२२-अ येथील इमारतीमध्ये २७ सदनिका उपलब्ध आहेत. तरी सदनिकांमध्ये डि.पी. रस्त्यामधील बाधीत लाभार्थींना स्थलांतरीत करावे लागेल. तरी सदर लाभार्थींना सर्व्हेक्षणाच्या व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पात्र लाभार्थींना बेघरांना घरे या आरक्षणात प्राप्त असलेल्या १९.३३ चौ.मीटर क्षेत्राच्या सदनिका करारनामा करुन कायम स्वरुपी हस्तांतर करणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच रस्ता रुंदीकरणामधील चामुंडा इमारत ते पांडुरंगवाडी / अजित पॅलेस ते सृष्टी / प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे येथील पात्र लाभार्थींना रेंटल हाऊसिंग स्किम मधील तात्पुरत्या स्वरुपात सदनिका देण्यात आलेल्या आहेत . सदर लाभार्थींना कायमस्वरुपी बेघरांना घरे या आरक्षणा अतंर्गत सदनिका देऊन पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर पात्र लाभार्थ्यांची यादी खालील प्रमाणे:-

चामुंडा इमारत ते पाडुरंग वाडी रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्रीम. कविता शनी वाघरी | पात्र |
| २ | श्रीम.कमुबाई देवजी वाघरी | पात्र |
| ३ | श्री.नाथा वाघरी | पात्र |

अजित पॅलेस ते सृष्टी विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल अजिज अशीक अली कुरेशी | पात्र |
| २ | श्रीम. शारदा राजु अचन | पात्र |
| ३ | श्री. प्रकाश रजनराव सुर्वे | पात्र |
| ४ | सौ.वंदना सुभाष खिलारे | पात्र |
| ५ | श्रीम. साळुबाई नामदेव वाघमारे | पात्र |

प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे पर्यंत विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | सौ.यशोदा भास्कर सुनिल | पात्र |
| २ | सौ.अनम्मा वर्गीस | पात्र |
| ३ | श्री.के. रामचंद्रन | पात्र |

सदर लाभार्थ्यांना तसेच मिरारोड स्टेशन जवळ गावदेवी नगर नंबर एक येथील (१) आशा अशोक बिनीवाले (२) विजय अशोक बिनीवाले व परिशिष्टामधील अनुक्रमांक ३१ ते ३६ दुकानदार यांच्याकडेसन-२००० नंतरचा गुमास्ता-असल्याकारणे अपात्र ठरविले आहे, ज्यांना अपात्र ठरविले त्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन सदर प्रस्तावामध्ये समाविष्ट करावे व अनुकूल परिस्थितीत (बेघरांना घरे) (House for Dishouse) या योजने अंतर्गत सदनिकांची कमतरता असल्यास, लाभार्थ्यांना रेंटल हाऊसिंग स्कीम मधील उपलब्ध सदनिकांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करावे. तसेच (बेघरांना घरे)(House for Dishouse)या आरक्षणात प्राप्त असलेले व भविष्यात उपलब्ध होणा-या सदनिका कायमस्वरुपी टप्याटप्याने हस्तांतरीत करण्यात यावे,

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर होवून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र.टिपीएस/१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून त्यामधून उत्तन, पाली, चौक, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण मोहीम म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती झालेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन शहरातील मंजूर आराखड्यातील १७ रस्ते रुंदीकरण करण्याची कामे हाती घेतली आहेत. सदरच्या रस्त्यांवर ग्राम पंचायत काळापासून अस्तित्वात असलेले व्यवसायीक गाळे व रहिवाशी इमारती आहेत व ते सन-१९९७ साली मिरा भाईंदर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा अमंलात येण्या पुर्वी पासुनच आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम अंतर्गत बाधीत विकास आराखड्यातील रस्ते भूसंपादन करणे गरजेचे आहे. मनपाला बळजबरीने जागा ताब्यात घेता येत नाही व जागा मालकाला, पट्टा धारकाला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय चटई क्षेत्र किंवा विकास हक्क प्रमाणपत्र मोबदल्याच्या स्वरुपात प्रदान करता येत नाही. भूसंपादन अधिनियम १९९४ (पुढे काही बदल झाल्यास) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९९६ ला अनुसरुन द्यावे लागेल. भारतीय घटना आर्टिकल ३००अ अनुसार कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जाग्यामधून काढता येत नाही. महानगरपालिकेला आरक्षीत जागा विकसीत करावयाची असल्यास भूसंपादन कायदा अन्वये न्याय प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे व कायदेशीर प्रक्रिया अवलंबूनच पुढील कारवाई करणे नियमाप्रमाणे अनिवार्य आहे. त्याचधर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेला मंजूर विकास शहर आराखड्यामधील आरक्षीत जागा भूसंपादन करुन घेणे असल्यासन्याय प्रक्रिया पूर्ण करावीच लागेल.

ज्याअर्थी मूळ जागा मालकाने इमारतीच्या गृहसंकूळ संस्थेना किंवा व्यवसायीक गाळे धारकांना जागा हस्तांतर केलेली नाही त्याअर्थी अशा परिस्थितीत लाभार्थ्यांना मोबदल्याच्या स्वरुपात जागा किंवा विकास हक्क प्रमाणपत्र कोणत्या नियमाच्या अखत्यारीत प्रदान करण्यात येईल, हे स्पष्ट होत नाही किंबहुना महापालिका प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे दिशाभूल करणारे निवेदन सदर विषयाबाबत करु नये. तसेच बेकायदेशीरपणे सुरु असलेली विकास आराखड्यातील रस्ते रुंदीकरणाची कामे थांबवावीत. बाधीत व ज्यांच्यवर तोडक कारवाई प्रशासनाने केली आहे त्यांना योग्य मोबदला देण्यासाठी कायदेशीर उपाययोजना करावी व उपरोक्त विषयी  कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी, असा मी ठराव मांडत आहे.

लियाकत शेख :-

माझे अनुमोदन आहे.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम आपण आजवर शब्द वापरलेला आहे तो तांत्रिक दृष्ट्या कधीतरी अडचणीचा ठरू शकेल आयुक्त साहेब झोपडपट्टी आपण वापरला आहे ही झोपडी वजा लोकांची घरे आहेत. नविन झोपडपट्टी जी वसते त्यांची व्याख्या वेगळी आहे आणि ज्या आदिवाश्यांची किंवा ग्रामीण म्हणून ज्याला म्हणतो आपण त्यांची झोपडी वजा जी घरे असतात तो झोपडी वजा शब्द यायला पाहिजे. अशी माझी सूचना आहे साहेब ती दुरुस्ती करुन घ्या. नाहीतर काहीतरी तांत्रिक अडचणी येतील त्यामध्ये...............

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत. अनुक्रमे दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. प्रमोद सामंत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी. सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी.

मा. महापौर :-

श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६, विरोधात २६ इतकी मते पडली आहेत. श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १३ :-

मिरारोड रेल्वेस्टेशन जवळील गांवदेवी नं. १ झोपडपट्टीतील डि.पी. रोडवर वसलेल्या झोपड्यांच्या पुर्नवसनाबाबत.

ठराव क्र. १३ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे समांतर गांवदेवी नगर नं.१ येथील १५.०० मीटर विकास योजनेतील रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर झोपडपट्टीतील डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपडीधारकाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपड्याची संख्या ३६ आहे. या ३६ झोपडीधारकांपैकी ३० घरे व ०६ दुकाने आहेत. दिनांक.०१/०१/२००० अन्यथा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल कागदपत्रे तपासून पात्र किंवा अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | घर/दुकान | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| १ | नरेश नामदेव भोईर | घर | पात्र |
| २ | तारामती रमेश माछी | घर | पात्र |
| ३ | लक्ष्मी रोहिदास माछी | घर | पात्र |
| ४ | जगदीश प्रकाश माछी | घर | पात्र |
| ५ | गिरीश रोहिदास माछी | घर | पात्र |
| ६ | सुधिर पांडु पटेल | घर | पात्र |
| ७ | त्रिभवन नागीनभाई मिटना माछी | घर | पात्र |
| ८ | कुंदन नंदन माछी | घर | पात्र |
| ९ | आरती रोहिदास माछी | घर | पात्र |
| १० | रविंद्र ईश्वर माछी | घर | पात्र |
| ११ | मालती संतोष चौरसिया | घर | पात्र |
| १२ | चंदन सुंदर माछी | घर | पात्र |
| १३ | सोनल रमेश मृपाल | घर | पात्र |
| १४ | धनसुख अृमृत माछी | घर | पात्र |
| १५ | आशा अशोक बिनिवाले | घर | अपात्र<br>(अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची पत्नी आहे) |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | विजय अशोक बिनिवाले | घर | अपात्र<br>(अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची अल्पवयीन मुलगा आहे) |
| १७ | रवि मनी पाटील | घर | पात्र |
| १८ | सुरेश मनी पाटील | घर | पात्र |
| १९ | मुक्ता मनी पाटील | घर | पात्र |
| २० | प्रेमा राजा मदेसिया | घर | पात्र |
| २१ | कमलेश दिपक माछी | घर | पात्र |
| २२ | जिगा प्रकाश माछी | घर | पात्र |
| २३ | अशोक पोकर सिंग बिनिवाले | घर | पात्र |
| २४ | बबन बाबर | घर | पात्र |
| २५ | मंजुलता शर्मा | घर | पात्र |
| २६ | भाविका जयेश माछी | घर | पात्र (तुलसी ईश्वरमाछी(मृत) यांची नात) |
| २७ | फुलाबाई सुकार माछी | घर | पात्र |
| २८ | इंद्रजित सुधाशु रॉय | घर | पात्र |
| २९ | निलेश देवराम माछी | घर | पात्र |
| ३० | ईश्वर ताराजन मिटना माछी | घर | पात्र |
| ३१ | भारती महादेव भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थी अपात्र करण्यास येत आहे) |
| ३२ | शुभांगी नरेश भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३३ | मोहित नरेश भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३४ | नरेश महादेव भोईर | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २०१५ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३५ | राजा धनुशधारी मधेसिया | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३६ | जगदीश रमेश माछी | दुकान | अपात्र<br>(गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |

सदर विकास कामामध्ये येणाऱ्या झोपडीधारकांना पर्यायी सदनिका देवून सदर भाग खाली करणे गरजेचे आहे. बेघरांना घरे (House for Dishoused) अंतर्गत मौजे.नवघर येथील आ.क्र. २२२ व २२२-अ येथील इमारतीमध्ये २७ सदनिका उपलब्ध आहेत. तरी सदनिकांमध्ये डि.पी. रस्त्यामधील बाधीत लाभार्थींना स्थलांतरीत करावे लागेल. तरी सदर लाभार्थींना सर्व्हेक्षणाच्या व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पात्र लाभार्थींना बेघरांना घरे या आरक्षणात प्राप्त असलेल्या १९.३३ चौ.मीटर क्षेत्राच्या सदनिका करारनामा करुन कायम स्वरुपी हस्तांतर करणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच रस्ता रुंदीकरणामधील चामुंडा इमारत ते पांडुरंगवाडी / अजित पॅलेस ते सृष्टी / प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे येथील पात्र लाभार्थीना रेंटल हाऊसिंग स्किम मधील तात्पुरत्या स्वरुपात सदनिका देण्यात आलेल्या आहेत . सदर लाभार्थीना कायमस्वरुपी बेघरांना घरे या आरक्षणा अतंर्गत सदनिका देऊन पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर पात्र लाभार्थ्यांची यादी खालील प्रमाणेः-

चामुंडा इमारत ते पाडुरंग वाडी रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्रीम. कविता शनी वाघरी | पात्र |
| २ | श्रीम.कमुबाई देवजी वाघरी | पात्र |
| ३ | श्री.नाथा वाघरी | पात्र |

अजित पॅलेस ते सृष्टी विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल अजिज अशीक अली कुरेशी | पात्र |
| २ | श्रीम. शारदा राजु अचन | पात्र |
| ३ | श्री. प्रकाश रजनराव सुर्वे | पात्र |
| ४ | सौ.वंदना सुभाष खिलारे | पात्र |
| ५ | श्रीम. साळुबाई नामदेव वाघमारे | पात्र |

प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे पर्यंत विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | सौ.यशोदा भास्कर सुनिल | पात्र |
| २ | सौ.अनम्मा वर्गीस | पात्र |
| ३ | श्री.के. रामचंद्रन | पात्र |

सदर पात्र लाभार्थ्यांना बेघरांना घरे (House for Dishoused) या आरक्षणाच्या प्राप्त व भविष्यात प्राप्त होणाऱ्या सदनिका कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी महानगरपालिकेमार्फत पंडीत भीमसेन जोशी रुग्णालय, टेंभा येथील हॉस्पिटल इमारतीच्या आवारातील रहीवाशी तसेच भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानासमोरील ४५ मीटर रुंद रस्त्यामधील पात्र बाधितांना बेघरांना घरे (House for Dishoused) या आरक्षणातील भाड्याने देण्यात आलेली आहेत. सदर इमारतीची दुरावस्था झाली असून मोठ्या प्रमाणावर खर्च होणार आहे. अशा रहिवाश्यांची मा. आयुक्त यांनी भेट, तपासणी करुन जे लाभार्थी/रहिवासी पात्र आहेत व त्यांना घरे देणेची महानगरपालिकेची जबाबदारी असलेल्यांना कायमस्वरुपी घरे देण्याची प्रक्रिया करावी, इतर सदनिका रिकाम्या करुन ताब्यात देण्यात याव्यात या सर्व कार्यवाहीचे अधिकार आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ इमारती समोरील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या लाभार्थ्यांना भाड्याने गाळे वाटप करण्यात आले आहेत. सदर गाळेधारकांना सदर गाळे कायमस्वरुपी देण्याचे अधिकार देखील आयुक्त यांना देण्यात येत आहेत. सदर सदनिका/गाळे कायम स्वरुपी हस्तांतर करताना सदर एका सदनिकेची किंमत रु.१००/- ठरविण्यात येत असून त्यानुसार सदनिका/गाळे नोंदणीची प्रक्रिया पार पाडावी.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. अरविंद ठाकुर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | अनिता जयवंत पाटील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | रकवी सुहास माधवराव | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | लियाकत ग. शेख | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | भोईर कमलेश यशवंत | |
| २६ | तारा विनायक घरत | २६ | अशोक तिवारी | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३३ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३५ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३६ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३७ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३८ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३९ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ४० | भोईर भावना राजु | | | |
| ४१ | भोईर राजु यशवंत | | | |
| ४२ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | | |
| ४४ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४५ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४६ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रमोद सामंत :-

महापौर मॅडम आयुक्त महोदय मी विचारलेला आहे प्रश्न त्याबाबतीत काय करणार आहात टपरीधारकांनी जे गाळे बांधले आहेत ते जबरदस्ती बांधले आहेत की आपण परवानगी दिली आहे आणि पूर्ण रस्ता महापौर मॅडम त्या पे ॲन्ड पार्क वाल्यांनी व्यापला आहेना. आजही तिकडे चालू शकत नाही माणूस.

दिपक खांबित :-

३ जणांना तात्पुरत्या स्वरुपात परमिशन दिली आहे तिकडे.

प्रशांत दळवी :-

३ जणांना मग आपले नगररचना विभाग खोटे बोलते का? नगररचना विभागाने मला पत्र पाठविले आहे की ते डी.पी. रोड असल्यामुळे आम्ही कोणत्याही गाळेधारकांना परमिशन देण्यात आलेली नाही. नगरचना विभागाने दिशाभूल केली आहे का?

मा. आयुक्त :-

दळवी साहेब रस्ता रुंदीकरणामध्ये हे बाधित होत होते आणि बऱ्याच वर्षापासून ते लोक तिथे राहत होते. त्याच्यामुळे महानगरपालिका नगरपालिका असताना त्यांना तेथे परवानगी दिली होती हे पेपर बघून आम्ही त्यांना तात्पुरत्या स्वरुपामध्ये आपल्याकडे दुसरी पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे त्या ठिकाणी परवानगी बांधकाम विभागामार्फत दिलेली आहे.

प्रशांत दळवी :-

आयुक्त महोदय माझ फक्त एकच ऐका त्या गावदेवी नं. १ मध्ये माझा ही जन्म झालेला आहे. त्यामुळे त्या परिसरामध्ये हे काही ७/१२ घेऊन त्यांचे काही एफ.एस.आय. देऊन यांनी काही बांधकाम परवानगी घेऊन गाळे नव्हते बांधलेले हे टपरीधारक तिकडे टपरी घेऊन बसले आपल्याकडून गुमास्ता लायसन्स त्यांनी प्राप्त करुन घेतला आणि वर जेव्हा आपल्याला गरज लागली आपण त्याला अनधिकृत म्हणून तोडायला गेलो तेव्हा हे ४-४, ६-६ वर्षापासून कोर्टामध्ये आपल्या विरुध्द दावा दाखल करुन बसले आणि तो त्यांनी दावा मागे घ्यावा म्हणून आपण त्यांना ते बांधकाम करुन दिले. आयुक्त महोदय हे चुकीचे आहे ना.

मा. आयुक्त :-

आपल्याकडे पर्यायी व्यवस्था नव्हती त्यांना कुठेतरी स्थलांतरित करायचे होते नसल्यामुळे आपण त्यांना तात्पुरत्या स्वरुपात दिले आहे. त्यांना आपण कधीही काढू शकतो. पण त्यांना पर्यायी व्यवस्था कुठेतरी करावी लागेल. म्हणून आपण आपलं रस्त्याचं काम करण तेथील जरुरी होत. बाकीच्या ज्या टपऱ्या भरल्या त्या उचलून टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

प्रशांत दळवी :-

पण साहेब हे गाळे स्टेशनच्या जवळ जेथून आपण एवढे मोठे सुशोभिकरणाचे काम................

मा. आयुक्त :-

मला तुमची भावना लक्षात आलेली आहे. परंतु महानगरपालिकेकडे पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात दिले आहे. त्याला आपण कधीही हटवू शकतो.

दिप्ती भट्ट :-

साहेब नंतर त्यांची पर्यायी व्यवस्था करा.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १४, केंद्रशासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण, संचलन/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत.

अनिल भोसले :-

संदर्भ :- १) नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.
एन.यु.एल.एम.-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४
२) क्र.रानाउअ-२०१५/निवारा/सुचना/का-१६ नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई-३० दि.२०/०२/२०१५
३) मा. महासभा दि.३०/०१/२०१६ (दि.१८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा.महासभा)
प्रकरण क्र.१४९, ठराव क्र.११५

मिरा भाईंदर महानगरपालिका संदर्भ क्र.१ अन्वये "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१९६/२००१ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागातील बेघर व निराक्षित नागरीकांकरीता रात्र निवारे सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने शहरी भागात रात्र निवारे कार्यान्वीत करणे, त्यांचे संचलन व देखभाल या विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहे. शहरी बेघर, निराक्षित, अल्पवयीन मुले असलेली निराधार स्त्री, वृध्द व्यक्ती, अपंग व्यक्ती, मानसिक विकलांग व्यक्ती इत्यादी नागरीकांना कायम स्वरुपी निवारा उपलब्ध करुन देणे हे या घटकाचे मुख्य उद्दीष्टय आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

निवाऱ्यामध्ये अत्यावश्यक सोयी सुविधा जसे पाणी, वीज, स्वयंपाक करण्याची जागा तसेच स्वयंपाकासाठी आवश्यक उपकरणे, स्वच्छता स्नानगृहे, अग्निशमन व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा,

अंगावर घ्यावयाची पांघरुणे, अंथरण्याकरीता संतरज्या व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच निवाऱ्यांची ठिकाणे शक्यतो रेल्व स्टेशन, बसडेपो, बाजार इत्यादी जवळ असावी, सदर निवारे निवासी, व्यापारी, औद्योगिक आणि सार्वजनिक वापरावयाच्या ठिकाणी असावीत.

निवाऱ्याचे व्यवस्थापन व दैनंदिन निगेचे काम संबंधित नागरी संस्था अथवा नागरी संस्थेने नियुक्त केलेल्या संस्था पाहु शकतील असे नमुद केलेले आहे. त्याअन्वये मा. अति. आयुक्त सो. यांच्या दि.०७/०५/२०१५ रोजीच्या मंजुरीनुसार दि.१४/०५/२०१५ रोजीच्या ''दै. लोकमत'' वृत्तपत्रातुन जाहिरात देवुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ०५ ठिकाणी बांधुन तयार असलेल्या निवाऱ्याच्या संचलन व व्यवस्थापनासाठी शासकीय व निमशासकीय नोदंणीकृत सामाजिक संस्थेकडुन अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक २०/०६/२०१५ रोजी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी रात्रनिवारे (शहरी बेघर निवारा) साठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या.

| अ.क्र. | रात्र निवारे (शहरी बेघर निवारा) |
|---|---|
| १ | भाईंदर (पु) खारीगांव शाळा इमारत, १ ला मजला |
| २ | मिरा रोड, आरक्षण क्र.१८१, १ ला मजला |
| ३ | काशिगांव, आरक्षण क्र. ३१८, २ रा मजला |
| ४ | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१,ॲमिनीटी स्पेस तळ व १ ला मजला, मिरा रोड(पु) |
| | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१, ॲमिनीटी स्पेस २ रा मजला |
| ५ | अग्निशमन केंद्र, २ रा मजला, भाईंदर (प.) |

परंतु वरील सर्व इमारतीमध्ये मनपा क्षेत्रातील विदयार्थ्यांच्या/लोकांच्या सोयीकरीता अभ्यासिका, बाजार (मार्केट) व इतर विविध उपक्रम महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत आहेत. त्यासाठी त्या इमारती व्यतीरिक्त केंद्र शासन व राज्य शासन यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार इतर ठिकाणी पर्यायी व्यवस्था करुन शहरी बेघर निवारा चालु करण्यासाठी मा. आयुक्त सो. यांना ही सभा अधिकार प्रदान करत आहे.

यशवंत कांगणे :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, यह कोर्ट के निर्णय के हिसाब से यह रात्री निवारा करना यह निश्चित बात है। इसमें कोई फेरबदल नही हो सकता है। लेकिन पिछली बार भी ऐसे ठराव हमने करके दिए थे और इनके अंदर में जो बेघर लोग है, जो-जो क्रायटेरिया इसमें निश्चित किया है उनको घर भी दिए थे। उनकी देखभाल करने के लिए संस्था को दिए थे लेकिन प्रत्येक स्तोत्र के अंदर में वहाँ पे उस जगह का दुरुपयोग हुआ था। कई सदस्यों ने मिरारोड के लिए भी कहाँ था और हमने वेस्ट के लिए भी कहाँ था की वहाँ पे जो-जो लोग जाते है वो वहाँ पे रात में नशाखोरी दारु इस टाईप की वहाँ पे बॉटल भी पायी गई। बहुत लोगो की शिकायत हुई थी और आयुक्त साहब को उस समय बोला गया था और कुछ जगह के अंदर में बंद करने की भी शिफारस की थी जिसको मान के बंद भी किया गया था। कानुन के तहत के अंदर में उनको करना अनिवार्य है लेकिन उन पिछली बातों को ध्यान में रखते हुए जिनको भी दिया जाए उनकी पूर्णतः जाँच करके और ऐसे असामाजिक तत्वों के नही दिया जाए इसका पूर्ण ध्यान रखा जाए।

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. १४ :-

केंद्रशासन पुरस्कृत ''राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान'' “National Urban Livelihood Mission” ''शहरी बेघर निवारा नुतनीकरण, संचलन/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत.

ठराव क्र. १४ :-

संदर्भ :- १) नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.
एन.यु.एल.एम.-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४
२) क्र.रानाउअ-२०१५/निवारा/सुचना/का-१६ नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई-३० दि.२०/०२/२०१५
३) मा. महासभा दि.३०/०१/२०१६ (दि.१८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा.महासभा)
प्रकरण क्र.१४९, ठराव क्र.११५

मिरा भाईंदर महानगरपालिका संदर्भ क्र.१ अन्वये ''राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान'' ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१९६/२००१ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागातील बेघर व निराक्षित नागरीकांकरीता रात्र निवारे सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने शहरी भागात रात्र निवारे कार्यान्वीत करणे, त्यांचे संचलन व देखभाल या विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहे. शहरी बेघर, निराक्षित, अल्पवयीन मुले असलेली निराधार स्त्री, वृध्द व्यक्ती, अपंग व्यक्ती, मानसिक विकलांग व्यक्ती इत्यादी नागरीकांना कायम स्वरुपी निवारा उपलब्ध करुन देणे हे या घटकाचे मुख्य उद्दीष्टय आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

निवाऱ्यामध्ये अत्यावश्यक सोयी सुविधा जसे पाणी, वीज, स्वयंपाक करण्याची जागा तसेच स्वयंपाकासाठी आवश्यक उपकरणे, स्वच्छता स्नानगृहे, अग्निशमन व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा, अंगावर घ्यावयाची पांघरुणे, अंथरण्याकरीता संतरज्या व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच निवाऱ्यांची ठिकाणे शक्यतो रेल्व स्टेशन, बसडेपो, बाजार इत्यादी जवळ असावी, सदर निवारे निवासी, व्यापारी, औद्योगिक आणि सार्वजनिक वापरावयाच्या ठिकाणी असावीत.

निवाऱ्याचे व्यवस्थापन व दैनंदिन निगेचे काम संबंधित नागरी संस्था अथवा नागरी संस्थेने नियुक्त केलेल्या संस्था पाहु शकतील असे नमुद केलेले आहे. त्याअन्वये मा. अति. आयुक्त सो. यांच्या दि.०७/०५/२०१५ रोजीच्या मंजुरीनुसार दि.१४/०५/२०१५ रोजीच्या "दै. लोकमत" वृत्तपत्रातुन जाहिरात देवुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ०५ ठिकाणी बांधुन तयार असलेल्या निवाऱ्याच्या संचलन व व्यवस्थापनासाठी शासकीय व निमशासकीय नोदंणीकृत सामाजिक संस्थेकडुन अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक २०/०६/२०१५ रोजी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी रात्रनिवारे (शहरी बेघर निवारा) साठी जागा राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या.

| अ.क्र. | रात्र निवारे (शहरी बेघर निवारा) |
|---|---|
| १ | भाईंदर (पु) खारीगांव शाळा इमारत, १ ला मजला |
| २ | मिरा रोड, आरक्षण क्र.१८१, १ ला मजला |
| ३ | काशिगांव, आरक्षण क्र. ३१८, २ रा मजला |
| ४ | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१,ॲमिनीटी स्पेस तळ व १ ला मजला, मिरा रोड(पु) |
| | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१, ॲमिनीटी स्पेस २ रा मजला |
| ५ | अग्निशमन केंद्र, २ रा मजला, भाईंदर (प.) |

परंतु वरील सर्व इमारतीमध्ये मनपा क्षेत्रातील विदयार्थ्यांच्या/लोकांच्या सोयीकरीता अभ्यासिका, बाजार (मार्केट) व इतर विविध उपक्रम महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत आहेत. त्यासाठी त्या इमारती व्यतीरिक्त केंद्र शासन व राज्य शासन यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार इतर ठिकाणी पर्यायी व्यवस्था करुन शहरी बेघर निवारा चालु करण्यासाठी मा. आयुक्त सो. यांना ही सभा अधिकार प्रदान करत आहे.

सुचक :- श्री. अनिल भोसले अनुमोदक :- श्री. यशवंत कांगणे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र. ३५२-अ या शासनाच्या जमिनीवर जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) विकसित करणेबाबत.

राकेश शहा :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे टुरीझम कॉम्पलेक्स फॉर एम.टी.डी.सी. (पर्यटक केंद्र) यासाठी राखीव आहे. मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण क्षेत्र ९९.९२ हेक्टर जागेपैकी ३१ हेक्टर जागेवर जैव विविधता उद्यानाची (Bio Diversity Park) निर्मिती करण्यासाठी महानगरपालिकेने मे. टेरेकॉन इकोटेक प्रा.लि. यांची तांत्रिक सल्लागार म्हणून (क़्ब्ड) तयार करणेकामी नेमणूक करण्यात आली होती.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण ९९.९२ हेक्टर जागेपैकी ६ हेक्टर जागा क्र.महसुल/क-१/टे/एलाबपा/आत संरक्षण/एसआर-०४/१० जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे दि.०७/१०/२०१० अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे संरक्षणासाठी हस्तांतर केलेली आहे. जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) तयार करणेकामी ३१

हेक्टर जागेची आवश्यकता लागणार असुन उर्वरीत जागा ताब्यात घेण्याकरीता मा. जिल्हाधिकारी ठाणे, यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तरी (Bio Diversity Park) पर्यटन विभाग अथवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करण्यासाठी सदर विभागांना महापालिकेच्या ताब्यातील जागा ताब्यात देण्यात यावी, सदर प्रकल्प राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

दिप्ती भट्ट :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम गोषवारे के अंदर में पुरी जगह हस्तांतरीत नही की गई है। ऐसा उल्लेख किया गया है। तो उसकी प्रक्रिया कहाँ तक हुई है। अच्छा विषय है समर्थन करते है लेकिन पूर्ण रुप से हस्तांतरीत नही हुआ है तो उसकी यह प्रक्रिया कहाँ तक पहूँची है।

मा. आयुक्त :-

मैं कुछ समझा नही।

भगवती शर्मा :-

पूरी जगह अपने पास में ताबे में नही है। कलेक्टर के पास में है। गोषवारे में लिखा गया है उसकी हस्तांतरण की प्रक्रिया अभी चालू है। कहाँ तक पहूँची क्या हुआ?

लियाकत शेख :-

खांबित साहेब टोटल ९९ एकर जमिन आहे एम.टी.डी.सी साठी रिझर्व्हेशन होती. याच्यापैकी ३१ हेक्टर जमीन तुमच्या या प्रोजेक्टसाठी लागणार आहे त्यापैकी १६ हेक्टरच जमिन आपल्याला अलॉट झालेली आहे. कारण बाकी जमीन आणखी किती काळ लागेल.

दिपक खांबित :-

६ एकर जे झालं आहे ना ती फक्त संरक्षणा करिता दिली आहे आपल्याला. आपल्याला ती पूर्णपणे हस्तांतर नाही केली आपण पूर्ण ३१ हेक्टर त्यांच्याकडे मागतो आहे. प्रोसिजर सुरु आहे मधल्या काळात कलेक्टर मॅडमने एम.एम.आर.डी.ए चा अभिप्राय मागितला होता. एम.एम.आर.डी.ए ने उत्तर दिले की ती जमीन कशासाठी राखीव आहे आणि डी.पी.आर जो केला आपण ती माहिती सगळी दिलेली आहे. दरम्यानच्या काळात माहिती दिल्यानंतर कलेक्टर मॅडमची बदली झाली. आता नविन कलेक्टर साहेब आले त्यांना आता जाऊन भेटणार आहोत या आठवड्यामध्ये ते लवकरच हस्तांतरीत होईल. त्यानंतर आपण ते पर्यटन विभाग किंवा एम.एम.आर.डी.ए. ला देणार आहोत. डेव्हलप करण्याकरिता देणार आहोत आपण.

मा. आयुक्त :-

आपल्याकडे हस्तांतरीत झाल्यानंतर पर्यटन विभागामार्फत हे बायोडायर्व्हसिटी पार्क डेव्हलप केले जाणार आहे. त्यांच्याकडे आपण देणार आहोत.

लियाकत शेख :-

लवकरात लवकर करा अशी विनंती आहे.

प्रकरण क्र. १५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र. ३५२-अ या शासनाच्या जमिनीवर जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) विकसित करणेबाबत.

ठराव क्र. १५ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे टुरीझम कॉम्पलेक्स फॉर एम.टी.डी.सी. (पर्यटक केंद्र) यासाठी राखीव आहे. मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण क्षेत्र ९९.९२ हेक्टर जागेपैकी ३१ हेक्टर जागेवर जैव विविधता उद्यानाची (Bio Diversity Park) निर्मिती करण्यासाठी महानगरपालिकेने मे. टेरेकॉन इकोटेक प्रा.लि. यांची तांत्रिक सल्लागार म्हणून (क्ष्ब्ङ) तयार करणेकामी नेमणूक करण्यात आली होती.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण ९९.९२ हेक्टर जागेपैकी ६ हेक्टर जागा क्र.महसुल/क-१/टे/एलाबपा/आत संरक्षण/एसआर-०४/१० जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे दि.०७/१०/२०१० अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे संरक्षणासाठी हस्तांतर केलेली आहे. जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) तयार करणेकामी ३१ हेक्टर जागेची आवश्यकता लागणार असुन उर्वरीत जागा ताब्यात घेण्याकरीता मा. जिल्हाधिकारी ठाणे, यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तरी (Bio Diversity Park) पर्यटन विभाग अथवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करण्यासाठी सदर विभागांना महापालिकेच्या ताब्यातील जागा ताब्यात देण्यात यावी, सदर प्रकल्प राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्रीम. दिप्ती भट

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६, परवाना विभागाच्या देयकांबाबत.

शरद पाटील :-

मिरा भाईदर क्षेत्रात परवाना विभागामार्फ़त विविध व्यापारी आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार परवाने दिले जातात. सद्य स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर विभागाचे माहितीनुसार एकूण ५०२८० व्यापारी आस्थापना असून परवाना विभागामार्फ़त केवळ अंदाजे १७०० परवाने दिले गेले आहेत.

परवाना विभागात केवळ १ वरिष्ठ लिपिक,१ लिपिक व १ शिपाई कार्यरत असून व्यापारी आस्थापनांना वेळोवेळी भेटी देणे, त्यांचे कागदपत्रे गोळा करणे व लायसन्स तयार करणे, लायसन्स फ़ी स्विकारुन संबंधितांना परवाना देणे इ अनेक कामे परवाना विभागात विहित आहेत. परवाना विभागात कमी कर्मचारी असल्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाणे, परवाना वाटप, वसुली इ. कामे जलदरित्या प्रभावीपणे होत नाही.महापालिका क्षेत्रात व्यापारी आस्थापना वाढत आहे. परंतू कर्मचा-यां अभावी नविन परवाना देणे व परवाना फ़ी वसुल करणे इ.कामे जलदगतीने होत नाही.

तरी सदर बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमणुक करणेबाबत तरतूद आहे. मिरा भाईदर क्षेत्रातील सर्व आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देणे, व्यापारी आस्थापनांचे मोजमाप घेणे त्यानुसार कागदपत्रे गोळा करणे, परवाण्यासाठी प्रस्तावित करणे, वितरीत करणे व वसुली करणेकामी महापालिकेस मदत करणे इ. कामी अभिकर्ता नेमून सदर अभिकर्त्यामार्फ़त उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास परवाना देणे, नुतनीकरण करणे इ. कामे सुलभ होईल व परवाना फ़ी वसुली मध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमेणेची तरतूद आहे. ७३अ नुसार सदर कामी निविदा मागविता येतील. तरी मा.महासभेची मान्यता घेऊन निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी ही महासभा मंजुरी देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

लियाकत शेख :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ५०२८० व्यापारी आस्थापना असुन केवल अंदाजे १७०० परवाने दिले आहे. सदरची संख्येत चुक असून संयुक्तिक वाटत नाही तसेच पालीकेने परवाना करीता जाचक अटी व कागद पत्राच्या पुर्ततेची अट टाकली आहे. ती शिथिल केल्यास व Single Window System आमलात आणल्यास नवीन परवाना देणे व वसुली जलद गतीने होईल परंतु अभिकर्ता नेमल्यास जकात ठेकेदाराकडुन व्यापारी व जनतेची पिळवणूक झाली होती व अनेक तक्रारी आल्या होता. त्याप्रमाणे परवाना ठेकेदार सुध्दा व्यापारांची पिळवणूक करेल यात शंका नाही. म्हणून आपण Single Window System व परवान्याची अटी शर्ती शिथिल करुन मागेल त्यास परवाना या धरतीवर काम करावे असा ठराव मी मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम ३ विषय तर असे आहेत की आपण प्रत्येक विभागाकरिता कंत्राटी माणसच घेत आहोत. मला हे कळत नाही मग इतकी वर्ष कामकाज चालत होत ना पण ते रुळावर नव्हत. ठिक आहे समाधानकारक नव्हतं पण आता मला अस वाटत कर डिपार्टमेंट हे दोन आस्थापनाने वेगळ केल परवाना केला आता मागच्या ठरावामध्ये आपण मोबाईल टॉवर केलं मग यांची १०० टक्के वसुली होणार याची खात्री देतात का त्या? मला सांगा ना आतापर्यंत महानगरपालिकेचा २५ वर्षाचा इतिहास सांगतो की यांच्याकडे ५० टक्केच्या वर कर वसुली कधी झालीच नाही. मला वाटते हरिभाऊ असताना नगरभवनला बसायचे तेव्हा चांगली वसुली होती त्याच्यानंतर महानगरपालिका आल्यापासून तर कधीही याची वसुली नाही ती होणार आहे याची खात्री देतात का तुम्ही. त्यांच्याकडे १७६० प्रकरण पेंडींग आहेत. प्रत्येक प्रकरणासाठी एक तर दलाल जातात, एकतर नगरसेवक जातात किवां संबंधित माणसं जातात परंतु यांचा पेपर इथून तिथून हालत नाही. लोक पैसा द्यायला तयार आहेत या महानगरपालिकेला, टॅक्स द्यायला तयार आहेत पण आपल्याकडून प्रोसीजर होत नाही. आणि वरुन मग आपण त्यांना चांगली मुभा देतोय ना. आपल्या हरिभाऊंना आपण एखादा कर्मचारी देतो का? हरिभाऊ इथे उद्या रिटायर्ड व्हायला आलेत. त्यांना आपण एक एक्स्ट्रा कर्मचारी दिला का? मग बाहेरच्या लोकांचे आपण पाहिजे तसे चोचले पुरवतोय.

मा. महापौर :-

ताई आपल्याकडे कदाचित माणसांची कमी आहे म्हणून.............

प्रभात पाटील :-

माणसे कमी आहेत तुम्ही बोला मला मान्य आहे. पण मॅडम किती माणसे कमी आहेत? जी माणसे कमी आहे त्यांचा अजुन आपण विकेंद्रीकरण करु. आहे त्या माणसांच्या अंगावर मुठ भर मास चढवायचा आहे. माझ्यासारख बसवून त्यांना लावा ना कामाला, त्यांना कामाला का नाही लावत? माझ्यावर मास चढल्याने मला काम करु देत नाही त्यांच्यावर चढवायचा आहे का आणखी? माझे या प्रकरणाशी तुम्हाला संकेत आहे तुम्ही एक तर पालिकेच्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण नाही की त्यांनी हे काम केले पाहिजे त्यांना आपण टारगेट ठरवले नाही. कुठेतरी कामाचे नियोजन व्हायला पाहिजे. टारगेट त्यांना ठरवून द्यायला पाहिजे. त्यांच्यावर आपण मेहेरबान झालो.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम टॅक्सची पण कुठलीही कामे होत नाही. जरी टॅक्सची फाईल मॅडमकडे आली तर मॅडम रिटन करतात त्यांच्याकडे मग ते वसुलीच काम काय करणार मॅडम कुठलीही टॅक्स ट्रान्सफरची असेल जर मी हस्तांतर केल असेल तर माझ्या नावावर टॅक्स पावती येतच नाही. जुन्या माणसाच्या नावानेच टॅक्स पावती येते. यांच्यावर काहीतरी दबाव टाकायला पाहिजे आणि मॅडम दलाला थ्रु एवढी कामे होतात आम्ही नगरसेवक असून आमची कामे होत नाही.

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम एक एक्झाम्पल है। लास्ट विक मे छट्टे महिने के अंदर में मैंने मॅडम को तक्रार किया था की यह सर्व्हे बराबर नही है। तो जाँच करके वो बताया जाए। लगातार २० बार जाने के बाद भी मॅडम कुछ नही कर पाई। लास्ट में जब अभी बात चल रही थी टॅक्स का प्रायव्हेट करना चाहिए तो मैंने एक्झाम्पल दिया तो मॅडमने उसपे काम किया और साडे तीन लाख का रिकव्हरी का नोटिस निकाला है अभी तक नही। लास्ट एक दस दिन पहले डिपार्टमेंट का काम नही करता और उसका हमे भूगतना पडता है। हमे प्रायव्हेट आदमी लगाने पडते है। अभी हम परवाना का लेकर आ जाऐंगे बादमें वो सर्व्हे करेंगे। उनका पुरा सर्व्हे डेटा आ जाएगा और उसके अंदर जो डिफरन्स निकलेगा उसकी जिम्मेदारी किसकी उसको वसुल करेंगे उनको टरमीनेट करेंगे बरखास्त करेंगे इन लोगो को। यह नही है की यह लोग काम नही कर पाते है यह लोग काम नही कर रहे है। संख्याबल नही कम है। अगर असेसमेंट होएगा इसका ऐसे तुम्हारे पास मालुम पडेगा की यह लोग काम कर सकते थे, उसका क्या करेंगे? उसका प्रावधान होना चाहिए यह लोग काम नही करते है। इसके लिए हमे करना पडता है। और यह काम कर सकते थे। यह असेसमेंट हो जाएगा तो इनको सजा क्या देंगे हम इसका मुझे बताइए आप।

सुहास रकवी :-

महापौर मॅडम आता नुकतच त्यांनी त्या ठरावाच्या अंतर्गत ५०२०० व्यापारी आहेत हे तर शोधून काढले ना त्यांनी म्हणजे त्यांना वसुली करायला काय कठीण आहे. जर तुम्ही संख्या काढू शकता म्हणजे फक्त टेंडर काढण्याकरिता हा विषय आहे का? एवढा खटाटोप कशाकरिता? तुम्ही संख्या काढलेली आहे. तुमची माणसे नेमणुक केलेली आहेत. मग त्याच्यावर कारवाई करायची त्या परवानाचे शुल्क जमा करायचे.

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, ऑलरेडी सर्वांना दुकानदारांना परवाना बिले २५०-२५० दिलेलेच आहेत. २५०-२५० म्हणजे ५०० रुपये दिलेले आहेत आणि त्यांनी पैसे पेड केलेले आहेत.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम दुसरी गोष्ट हे जे तात्पुरत्या स्वरुपात तुम्हाला जर मागवायचे असेल तर तात्पुरत्या स्वरुपात निविदा मागवा कारण त्याच्यामध्ये भ्रष्टाचार होण्याची फार मोठी शक्यता आहे. म्हणजे नाकारता येणार नाही कारण हे जे टेंडर दिल्यानंतर तो जो अभिकर्ता आहे तो डायरेक्ट परस्पर वसुल करेल. हे म्हणतील की आम्हाला तेवढेच येत होते १७०० चे. आता ३४०० झाले. बाकीचे त्याने घेतल्यानंतर जबाबदार व्यक्ती म्हणून कोण आहे. हे घेणार आहेत का? या सगळ्याची जबाबदारी घेणार असेल किंवा त्याच्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात ही निविदा द्यावी अशी माझी सूचना आहे.

राजेंद्र जैन :-

महापौर मॅडम गलती तो ऐसी है की जब मॅडम से लास्ट टाईम पूछा गया की साहब यह गलती पकड में आ गई थी क्योंकी ऐसा लगा और कोई कारवाई नही की तो मॅडम बोली मैं नोटिस दिया था। मैंने नोटिस देखा उसमें लिखा था ४८ घंटे मे जवाब दो। साहब ने शाम को पूछा ४८ घंटे मे जवाब नही तो आपने क्या किया? बोले साहब मैं भूल गयी। एक साल तक कारवाई नही की। नोटिस देखकर खानापूर्ती कर ली इसका मतलब क्या है की निचे से उपर तक साठ गाठ है की काम नही करते है और वो हमें भुगतना पड रहा है। अभी २ करोड की इन्कम अगर टॅक्स की है २०० करोड हो भी जाएगी। तो १०० करोड का १० टक्का १० करोड बेकार जाएगा। अगर हमारा टॅक्स डिपार्टमेंट काम करेंगे, परमनन्ट काम करेंगे तो जो इन्कम आएगी एक्स्ट्रा उसको टक्का हमारा कम जाएगा ना। यह काम नही करते है तो सजा हमें भूगतनी पड रही है। क्या कारवाई करेंगे क्या सजा देंगे उनको?

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम एक माझी सूचना आहे आपला जे परवानाचे कलेक्शन आहे हे तिसऱ्या माळ्यावर केली जाते. म्हणजे तिसऱ्या माळ्यावर जाण्यासाठी दिड ते अडीचचा टाईम आहे. एक तासामध्ये तुमचे किती लोक तिकडे येऊन बसणार सांगा बर. कलेक्शन करायला त्यापेक्षा तुम्ही तो कलेक्शन करणारा व्यक्ती

आहे. तिसऱ्या माळ्यावर बसणारा त्याला ग्राऊंडला बसवा ना. सी.एफ.सी. मध्ये बसवा त्याला तिथे कलेक्शन करुन घ्या.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम आणखी एक शंका आहे जरा. ५०००० फक्त दुकाने आहेत मिरा भाईंदरमध्ये. त्यांनी व्यापारीच सांगितल पण ५०००० आपण रेव्हेन्यु घेतो. टॅक्स घेतो. कर्मशियल टॅक्स बघायला पाहिजे ना. टॅक्सची जी संख्या आहे ते आणि हे व्यापारी याचा जर ताळमेळ बघितला मिरा भाईंदर का भाईंदर ईस्टलाच जवळ-जवळ एक ते दिड लाख ते व्यापारी असतील. भाईंदर ईस्टला मिरारोड, भाईंदर वेस्ट मॅडम याचा अर्थ काय आहे आपण जाणुन बुझून हा व्यापारी लोकांना पिळवणुक करण्याचा त्यांनी खाजगी ठेका घेतला आहे का हा प्रस्ताव आणला आहे अस वाटतयं त्याच्यावर तुम्ही विचार करा.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम हे जे सगळ खाजगीकरण चाललं आहे जे कर्मचारी काम करतात त्यांना हव असलेल साहित्य आपण देतो का? जेव्हा टॅक्सचे आपण बिल काढतो कोणत्याही प्रभाग ऑफिसमध्ये ३ नंबरच तर नक्की सांगतो त्यांच प्रिंटर चालत नाही त्यांच कम्प्युटर चालत नाही. त्या सिस्टम चालतच नाही स्टॅन्ड बाय. आपल्याकडे कोणतीही व्यवस्था नाही किंवा या प्रभाग ऑफिसमध्ये ३ प्रिंटर असतात कामास चौथ स्टॅन्ड बाय असावं किंवा हेड ऑफिसमधून ताबडतोब तिथे कुणी घेऊन जाईल अशी कोणतीही आपली व्यवस्था नाही. आपण पर्चेस करतो मटेरियल मग ते कोणासाठी करतो जे आपली वार्षिक पर्चेस होते किंवा मासिक पर्चेस होते त्या ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये चालणाऱ्या लोकांना साहित्य द्यायला पाहिजे का नाही द्यायला पाहिजे. असही एक चित्र दिसून येते की काम करणारी माणसे असतात पण त्या मशिन चालत नाही. लोक ओरडत राहतात. आपण कोणत्याही कामासाठी त्या प्रभाग ऑफिसमध्ये गेलो की ते चूप राहतात. आपल्याकडे उत्तरच नसते आपण फोन केले २ दिवसांनी येणार आहे त्याची नीट व्यवस्था करण्याचे आदेश द्यावे एवढी विनंती आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम सभागृहात जे काही टॅक्स बद्दल आपली मते मांडली ते सत्य आहेत. पण आता विषय एकंदरीत सभागृहामध्ये अस दिसते की सगळच काही प्रायव्हेटीझम चालले आहे की या संदर्भात गंभीर आहे. महापौर मॅडम पहिला आपण विषय आणला मोबाईल टॉवरचे ठेका पध्दतीने पैसे वसुल करायचे अनेकदा आपण बजेटमध्ये तरतूद करतो त्यांची सत्ता असू द्या की आपली सत्ता असू द्या आजपर्यंत यश आपल्याला प्राप्त झालेले नाही. परवानाचे ५०००० इस्टॅब्लीशमेंट अंदाजे तर आपण कधी २००० च्या पुढे गेलो नाही. दरवेळी बजेटला तरतूद करतो डिप्रेशिएट येते यांनी ही प्रयत्न केले आपण ही प्रयत्न केले. मॅनपावर त्यावेळी होत यावेळी ही आहे. आता दिवसेंदिवस आपले वरिष्ठ अधिकारी एक एक करुन रिटायर्ड होत चालले. अजित पाटील असू द्या, राणेजी असू द्या, मोरेजी असू द्या आता हरिभाऊ सुध्दा रिटायर्ड होणार आहोत. त्यानंतर अजून एखादा अधिकारी विजय पाटील टॅक्समधून रिटायर्ड होणार आहेत. रिटायर्ड होत चालले आपले अधिकारी कोणालाही आपण विचारलं कुठल्याही विभागाला कोणीही सन्मा. सदस्य नाकारु शकत नाही की सर्वात जास्त आपल्याकडे कमी आहे ते मॅनपावर कोणालाही विचारा टॅक्सवाले बोलतील मॅन पावर नाही. खांबित साहेबांना विचारलं मॅन पावर नाही. टाऊन प्लानिंगला विचारलं मॅन पावर नाही, मॅन पावर नाही यासाठी सगळे काम खोळंबीत आहेत. आता दोन प्रकार आहे आयदर आपण जस चालतय तस चालवायच भलेही त्या २ कोटीची रिकव्हरी आपली ५० लाख होऊ द्या की २५ लाख होऊ द्या. आयदर ठेका पध्दतीने अपॉईंट करायचं त्यांना २ पैसे मिळतील ते मिळतील पण आपल पण उत्पन्न वाढणार आहे. हे २ आपल्याकडे मार्ग आहेत की जो मिलता है वह आने दो नगरपालिका का जो इन्कम है वो रहने दो बाकी होवे ना होवे तेल लेने गया। २००० असेल तर २००० आयदर आपण ठेका पध्दतीने जाऊन ते आपण १०० टक्के नाही ५० टक्के वर आणु शकतो का? आणि तीसरी गोष्ट हे कायमस्वरुपी आपण करत नाहीत एखादा सिस्टम तयार असेल तर त्याला चालवणे ईझी होते. पूर्ण नविन सिस्टम एखाद ५०००० दुकानदारांची नोंदणी करायची आपले अधिकारी किती दिवस करतील ५०००० होतील. आपण रोजचे १० गेलो तरी किती १० x ३६५ दिवस ३००० लोक म्हणजे १० वर्ष लागतील या इथपर्यंत पोहोचायला अजून दुसरे १०००० होतील तुम्ही २० ची संख्या केली तर कदाचित ५ वर्ष लागतील आणि त्यांचे कागद घेणे त्यांचे हे करणे त्यासाठी हा इन्कमचा ही भाग पेक्षा ना हरकत दाखला देणे हे त्या व्यक्तीला सिस्टम खाली आणणं हे महत्वाचं आहे. मोबाईल टॉवर मध्ये पण साधारण २ कोटी रुपये आपण तरतूद करतो. आपल्याला १० लाख १५ लाख पेक्षा येत नाही. ठेकेदार अपॉईंट केल्यानंतर आम्हाला १ कोटी आलं तरी काही नुकसान आहे का? एकदा हे सिस्टमॅटिक झाल्यानंतर आपल्याला ते ॲडॉप्ट करता येईल ठेकेदाराला घरी पाठवता येईल आणि नंतर महानगरपालिकेचा स्टाफ त्याला ॲडॉप्ट करतील ते चालवता येतील. सध्या एकदम विस्कटलेल आहे आपल्याकडे तेवढं मॅनपावर नाही की आपण सगळे शोधून त्यांना नियमाखाली आणू शकतो. यासाठी हे करणं गरजेच आहे. आणि यासाठी तो प्रस्ताव आला त्यासाठी आपले धन्यवाद करतो आणि नक्कीच आपण पुढच्या बजेटमध्ये बघा गेल्या ३ वर्षांची तुलना केल्यास यावेळी उत्पन्न जास्त मिळेल हे सभागृहाला खात्रीने सांगतो.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते आयुक्त महोदय आपण पण ऐकून घ्या. टॅक्स वसुली करणाचा विषय आहे. टॅक्स आणि परवाना एकच झालं वसुली आहे ना.

मा. आयुक्त :-

महानगरपालिकेची वसुली अनेक प्रकारची असते टॅक्स वसुली नाही.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब प्रशासन कही ना कही आपको भी दिशाभूल कर रहे है। अभी इच ॲन्ड एव्हरी व्यक्ती जिसके पास कर्मशियल गाले है मिरा भाईंदर महानगरपालिका की तरफ से प्रत्येक व्यक्ती को परवाना का एक बिल गया है ५०० रुपये का आप प्रत्येक व्यक्ती को भेजने के बाद में वो मल्टीप्लाय करेंगे कितने को भेजा है। मेरे को कर्मशियल की जानकारी नही है। टॅक्स विभाग में बोलिए उसके अनुसार उन्होंने भेजा है। इच ॲन्ड एव्हरी व्यक्ती जो वहाँ पे धंदा कर रहे है वो आपके पास आ रहे है यह मेरा ५०० रु. है मैं इस दायरे में हूँ जो नही है। वो ऐसे बता रहे है की मैं वहाँ पे कोई व्यापार भी नही कर रहा हूँ। खाली सिस्टम एक ही करने की जरुरत है। की वहाँ पे कागदपत्र की जादा मागणी न करके पिछली बार भी हमने ठराव के अंदर में कहाँ था की कोई भी व्यक्ती जादा तर अक्षत दुकानो में भाडोत्री व्यक्ती रहते है। उससे अगर हम पूछेंगे की आपने उसके अंदर में रेजिस्ट्रेशन किया है क्या? स्टॅम्प ड्यूटी भरा है क्या? कोई भरता नही है। बहुत से लोग ॲग्रीमेंट भी नही करते है लेकिन ऐसे में थोडी सवलियत दे करके अगर किया जाए तो आपको यह प्रायव्हेट खाजगीकरण करने की आवश्यकता नही है। चलाचलाके लोग टॅक्स भरने को तो क्यों नही भर रहे थे परवाना के अंदर में तब शुल्क जादा था। शुल्क कम करने का ठराव करने के बाद आज इच ॲन्ड एव्हरी व्यक्ती अभी इन्होंने बिल भेजे है वो १-१ करके भर रहे है। तो मेरा आपसे अनुरोध रहेगा की इस विषय को खाजगीकरण न करते हुए प्रशासन जो कारवाई कर रहा है। तो उनको आप और थोडा आयुक्त साहब प्रेशर से काम करने को बोलेंगे तसे यह रिकव्हरी भी होगी और वो उस दायरे में लिया जाएगा।

प्रेमनाथ पाटील :-

महापौर मॅडम, परवाना तिसऱ्या माळ्यावर आहे त्यांना खाली येऊन बसायचे आदेश द्या ना.

मा. महापौर :-

ठिक आहे देतो.

निलम ढवण :-

महापौर मॅडम याच्यासाठी अभिकर्ता नेमणार आहे ते किती वर्षासाठी आहे?

मा. महापौर :-

फक्त त्याने काम संपेपर्यंत. ते आपल्याला ठरवायच आहे. ते धोरण ठरवू या पण आता त्याने फक्त आपल्याला ते काम करुन द्यायचं आहे तो डेटा आणून द्यायचा आहे.

निलम ढवण :-

म्हणजे तो ही व्यक्ती व्यवस्थित काम करतो की नाही ते आपल्याला वर्षभरात त्याची कल्पना येईल म्हणून त्यानुसार त्याचं पिरेड काय आहे हे विचारतेय.

मा. महापौर :-

आपण अजून ते सगळ ठरवायचं आहे. धोरण ठरवायचं आहे मंजूरी दिली की आपण धोरण ठरवू.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. शरद पाटील, दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकत आहे. सुचक श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३९, विरोधात २४ इतकी मते पडलेली आहेत. श्री. शरद पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. १६ :-

परवाना विभागाच्या देयकांबाबत.

ठराव क्र. १६ :-

मिरा भाईदर क्षेत्रात परवाना विभागामार्फ़त विविध व्यापारी आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार परवाने दिले जातात. सद्य स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर विभागाचे माहितीनुसार एकूण ५०२८० व्यापारी आस्थापना असून परवाना विभागामार्फ़त केवळ अंदाजे १७०० परवाने दिले गेले आहेत.

परवाना विभागात केवळ १ वरिष्ठ लिपिक,१ लिपिक व १ शिपाई कार्यरत असून व्यापारी आस्थापनांना वेळोवेळी भेटी देणे, त्यांचे कागदपत्रे गोळा करणे व लायसन्स तयार करणे, लायसन्स फ़ी स्विकारून संबंधितांना परवाना देणे इ अनेक कामे परवाना विभागात विहित आहेत. परवाना विभागात कमी

कर्मचारी असल्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाणे, परवाना वाटप, वसुली इ. कामे जलदरित्या प्रभावीपणे होत नाही.महापालिका क्षेत्रात व्यापारी आस्थापना वाढत आहे. परंतू कर्मचा-यां अभावी नविन परवाना देणे व परवाना फ़ी वसुल करणे इ.कामे जलदगतीने होत नाही.

तरी सदर बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमणुक करणेबाबत तरतूद आहे. मिरा भाईदर क्षेत्रातील सर्व आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देणे, व्यापारी आस्थापनांचे मोजमाप घेणे त्यानुसार कागदपत्रे गोळा करणे, परवाण्यासाठी प्रस्तावित करणे, वितरीत करणे व वसुली करणेकामी महापालिकेस मदत करणे इ. कामी अभिकर्ता नेमून सदर अभिकर्त्यामार्फ़त उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास परवाना देणे, नुतनीकरण करणे इ. कामे सुलभ होईल व परवाना फ़ी वसुली मध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमेणेची तरतूद आहे. ७३अ नुसार सदर कामी निविदा मागविता येतील. तरी मा.महासभेची मान्यता घेऊन निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मिरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | अनिता जयवंत पाटील | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | काझी रशीदा जमील | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | इनामदार जुबेर | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | निरंक |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | सामंत प्रमोद जयराम | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | लियाकत ग. शेख | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | निलम हरिश्चंद्र ढवण | २४ | अशोक तिवारी | |
| २५ | तारा विनायक घरत | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३१ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३५ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३६ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्याबाबत निर्णय घेणे.

कल्पना म्हात्रे :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अत्यंत अपुऱ्या मार्केट इमारती असल्याने व शहरातील लोकसंख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती बांधण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मार्केट इमारतीची कामे सुरु आहेत. सद्यस्थितीत शहरात मोठ्या स्वरुपात विक्रेते रस्त्यावर बसत असून त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यासाठी शहरात विविध ठिकाणी रस्ते सोडून तात्पुरत्या स्वरुपात मार्केटसाठी जागा उपलब्ध करुन व्यवस्था केल्यास रस्त्यावरील फेरीवाल्यांना हटविता येईल. सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे आरक्षणातील ताब्यात आलेल्या व विकसित न केलेल्या भुखंडावर शहरात ठिकठिकाणी क्रॉक्रिटीकरण करुन त्यावर तात्पुरत्या स्वरुपात विक्रेत्यांना बसविता येईल. तरी शहरातील नागरीकांच्या सोयी सुविधेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरूपात फेरीवाले बसविण्यासाठी आरक्षणाच्या प्राप्त जागा विभागवार निश्चित करून सदर जागेवर मार्केटसाठी आवश्यक सुविधा तयार करण्यासाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. विकास योजनेतील आरक्षणाच्या प्राप्त असलेल्या व सद्यस्थितीत सदर आरक्षणे विकसित करण्याचा प्रस्ताव नसल्यास अशा विभागवार जागा निश्चित करण्याचे अधिकार ही सभा मा. आयुक्त यांना देत आहे.

तरी मा. आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे शहरातील खाजगी जागेवर देखील तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे, तात्पुरत्या स्वरुपात पत्राशेड परवानगी देणे सुविधा प्रमाणे विकासक व महापालिका यांनी दर निश्चित करणे यासाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करुन सर्व अधिकार देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

लियाकत शेख :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अमलबजावणी व फेरीवाला समिती गठीत करणे बाकी आहे. तसेच फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे त्यांना लाईसन्स व परवाना देणे अद्याप प्रलंबीत आहे. तातपुरते मार्केट उभारल्यास तेथे कोण्त्या फेरीवाल्यांना स्थान मिळणार हे निश्चित नाही.

पालीकेतर्फे अनाधिकृत फेरीवाल्यांवर कार्यवाही होत नाही. पालीकेने बांधलेल्या काशी गांव येथील मार्केट मध्ये फेरीवाले बसत नाही, मार्केट ओसाड पडले आहे. मग तात्पुरत्या मार्केट मध्ये कोण बसणार अशी शंका आहे. त्यामुळे प्रशासनाने बांधलेल्या मार्केट मध्ये फेरीवाले बसवावे तसेच प्रशासनाने कोणत्या ठिकाणी व कोणत्या आरक्षणामध्ये फेरीवाल्यांना तातपुरते स्वरुपात बसवीणार आहे. हे गोषवा-यात नमुद केले नाही. फेरीवाल्यांचा सर्वे करुन लायसन्स दयावे, राष्ट्रीय फेरीवाले धोरणाची अमलबजावणी करुन त्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट बांधावे. असा ठराव मी मांडत आहे.

प्रमोद सामंत :-

माझे अनुमोदन आहे.

वंदना चक्रे :-

महापौर मॅडम माझी एक सूचना आहे. माझ्या प्रभागामध्ये अग्निशमन दलाच्या जवळ फेरिवाल्यांसाठी दोन माळ्यांची इमारत बांधण्याच तिथे टेंडर निघालेले आहे. आणि ती मागणी मीच केली होती पण अस झाल की जागा अपुरी आहे तिथे शाखा आहे बाजूला. जागा अपुरी असल्याकारणाने त्या जागेवर जर पाहणी केली तर अतिशय वाईट परिस्थिती आहे. अग्निशमन दल आपल्याला अतिशय गरजेचे आहे शहराला. १-१ सेकंदासाठी महत्वाच आहे. जेव्हा अग्निशमन दलाची गाडी निघते बाहेर त्याच ठिकाणी पोल बिल्डींगचे खांबे तिथे जमीन खोदली गेली होती तर ते कॅन्सल करावे अशी माझी त्याच्यात सूचना समाविष्ठ करुन घ्यावी. मला पर्यायी जागा द्यावी माझी विनंती आहे. पर्यायी जागा पण मी सूचविते माझ्या प्रभागामध्ये संघवी नगर त्या साईडची जागा आहे. मागचे २००८-०९ साली आम्ही मागणी केली होती ती मार्केटची जागा आहे आयुक्त महोदय आपण लक्षात घ्यावे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम जैसे उन्होंने बताया था की इसके अंदर में मार्केट शिफ्ट करने की बात की गई थी। उसका शायद टेंडर भी निकला है। जिस तरीके से यहाँ पे अडचण है वैसे में वहाँ पे भी बता देना चाहता हूँ। एक तो वहाँ पे पानी की तंगी है। दुसरा वहाँ पे एक तो आरोग्य विभाग का भी कार्यालय है। तिसरा वहाँ पे फायर का भी कार्यालय है। बहुत सेन्सीटिव्ह जगह होने के कारण से वहाँ पे भी कोई इतनी जगह नही है की मार्केट को वहाँ पे पूर्ण रुप से बना कर के सबको भाईंदर (प.) वालो की भी समाविष्ट कर

सकते है। एकात्मता पूर्ण रुप के अंदर में कुछ लोगो को समाविष्ट कर सकते है। ऐसी अडचण के कारण से मेरा आपसे निवेदन है की उस प्रस्ताव पे फेरविचार करके अन्यत्र कही शिफ्ट करने की योजना करे।

दिनेश जैन :-

महापौर मॅडम अभी यह जो मार्केट का विषय लाया है बहुत अच्छा विषय है। लेकिन जनता की जो मुलभूत जरुरत है फल, भाजी वो चीजों को पहले इसमें प्राधान्य दिया जाए बाद में अगर जगह बचे तो दुसरे को ॲडजस्ट किया जाए।

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम आतापर्यंत जे विषय झाले म्हणजे आता हा मार्केटचा विषय सुध्दा आपण प्रत्येक ठरावामध्ये मला असे वाटते ३ ठराव असे झाले की आयुक्तांना प्राधिकृत केले गेले आहेत. मला त्याबद्दल काही दुमत नाही पण आता हे जे मार्केटच्या संदर्भामध्ये त्यांनी म्हटलं आहे की ते आरक्षण त्यांनीच बघायचे आणि त्यांनीच तेथे सूचवायचे ते बघतील ही परंतु यांची माहिती मला नाही किंवा ४ नगरसेवकांना नाही. कोणीतरी सांगत होत तेथे मार्केट बसलं ते आम्हालाच माहिती नसतं या गोष्टीच जेव्हा इम्पलीमेन्टेशन होईल हे सगळ ठरवाल तेव्हा ते आमच्यापर्यंत पोहोचेल? दुसरा मुद्दा असा हे पोहचवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. ज्यावेळेला ही मार्केट बनतील इथे बरेच नगरसेवक संपूर्ण शहराचे बसलेत. शहराचा जो शहरी भाग आहे किंवा जेथे लोकवस्तीचा भाग आहे तेथील आरक्षण डेव्हलप झाली आहेत. मला वाटते की ९० टक्के, ९५ टक्के आरक्षण डेव्हलप झाली आहेत आणि शहरातच लोकवस्तीच्याच ठिकाणी मार्केटची गरज आहे. मग तेथील भाजीवाले किंवा शहरात लागणाऱ्या गोष्टी ज्या आहेत तेथील फेरिवाले शहराच्या कुठल्या आरक्षणात बसणार. माणूस काय घोडबंदरला जाणार काय वस्तू घ्यायला? तर त्याच नियोजन जर आज येथे झाल असतं तर कदाचित माझ्या सारख्यांनी यांच्या सारख्यांनी कोणीतरी बोललं असतं की तेथे आम्हाला लांब पडणार आहे किंवा जवळ पडणार आहे. तुम्हाला नेमलय त्याच्याबद्दल माझ्या मनात काही दुमत नाही. परंतु मला हे ही म्हणायचं आहे की जेव्हा तुम्ही हा विषय फायनल कराल तेव्हा ते पुन्हा पटलावर आणा. जेणेकरुन नगरसेवकांना जर तिथे काही अडचणी वाटत असेल तर त्याच्यावर चर्चा होऊ शकेल.

मा. महापौर :-

ताई आपली सूचना छान आहे आणि ते नक्कीच माहिती देवू. आपण सर्वांना तशी की कुठे-कुठे मार्केटचे नियोजन झाले आहे. ठराव मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्रीम. कल्पना म्हात्रे, दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकत आहे. सुचक श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. कल्पना म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्रीम. कल्पना म्हात्रे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४२, विरोधात २३ इतकी मते पडली आहेत. श्रीम. कल्पना म्हात्रे यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. १७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्याबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. १७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अत्यंत अपुऱ्या मार्केट इमारती असल्याने व शहरातील लोकसंख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती बांधण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मार्केट इमारतीची कामे सुरु आहेत. सद्यस्थितीत शहरात मोठ्या स्वरुपात विक्रेते रस्त्यावर बसत असून त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यासाठी शहरात विविध ठिकाणी रस्ते सोडून तात्पुरत्या स्वरुपात मार्केटसाठी जागा उपलब्ध करुन व्यवस्था केल्यास रस्त्यावरील फेरीवाल्यांना हटविता येईल. सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे आरक्षणातील ताब्यात आलेल्या व विकसित न केलेल्या भुखंडावर शहरात ठिकठिकाणी क्रॉक्रिटीकरण करुन त्यावर तात्पुरत्या स्वरुपात विक्रेत्यांना बसविता येईल. तरी शहरातील नागरीकांच्या सोयी सुविधेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरूपात फेरीवाले बसविण्यासाठी आरक्षणाच्या प्राप्त जागा विभागवार निश्चित करून सदर जागेवर मार्केटसाठी आवश्यक सुविधा तयार करण्यासाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. विकास योजनेतील आरक्षणाच्या प्राप्त असलेल्या व सद्यस्थितीत सदर आरक्षणे विकसित करण्याचा प्रस्ताव नसल्यास अशा विभागवार जागा निश्चित करण्याचे अधिकार ही सभा मा. आयुक्त यांना देत आहे.

तरी मा. आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे शहरातील खाजगी जागेवर देखील तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे, तात्पुरत्या स्वरुपात पत्राशेड परवानगी देणे सुविधा प्रमाणे विकासक व महापालिका यांनी दर निश्चित करणे यासाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करुन सर्व अधिकार देत आहे.

सुचक :-श्रीम. कल्पना म्हात्रे अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | काझी रशीदा जमील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | सामंत प्रमोद जयराम | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | रकवी सुहास माधवराव | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | लियाकत ग. शेख | निरंक |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | भोईर कमलेश यशवंत | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | अशोक तिवारी | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३५ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३६ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३८ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | |
| ४१ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४२ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १८, शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे योजनेबाबत विनियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेसह त्याअंतर्गत अनुज्ञेय २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल मर्यादित वाढ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.

अनिल भोसले :-

शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय क्र. ज.ने.यो.२००६/प्र.क्र.-४६ /गृनिधो, दि.२५/०६/२००७ नुसार यापुर्वीची राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना या दोन केंद्र शासन पुरस्कृत योजना केंद्र शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे सदर दोन्ही योजनांचा समावेश एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या नविन कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेला आहे.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांचा उद्देश एकसारखा म्हणजे शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावणे व त्यांना पर्याप्त निवारा, मुलभूत सोयी उपलब्ध व त्यांना शहरातील झोपडपट्टीवासीयांचे राहणीमान व जीवनमान सुखावह करुन सभोवतालच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा आहे. वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आर्थिक दृष्टीकोनातून सक्षम ठरत नसल्यास व ती राबविण्यास अडचण येत असल्यास अशा झोपडपट्यांच्या विकासासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या गृहनिर्माण विभागाच्या क्र. एचएसजी/२००२/प्र.क्र. ४/गृनिधो-१, दि.१९/०९/२००२ रोजीच्या निर्णयानुसार २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती तथापि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) राबविण्यात येणा-या योजनेच्या शासन निर्णयामध्ये याप्रकारे तरतूद नसल्यामुळे अशी सवलत महानगरपालिकेच्या / नगरपरिषदेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक असल्याने शासनाने नगरविकास विभागाचे आदेश क्र. टीपीएस-११०७/अनौ.३६/ प्र.क्र.१३५/०८/नवि-९, दि.२४/०८/२००८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माणे व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून काही अटीवर सदर योजनेसाठी २.५० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिलेले असून सदर योजना वर्धनक्षम करण्यासाठी उक्त नमुद २.५० चटईक्षेत्र निर्देशांकामधील काही क्षेत्र विक्री घटकासाठी ज्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार वाणिज्य अथवा निवासी प्रयोजन शक्य असेल त्याप्रमाणे वापरण्यास मुभा देवून सदरचे विक्री घटकांचे गाळे विक्री करुन अथवा भाडेतत्वावर देवून सदर योजना महानगरपालिका / नगरपालिका वर्धनक्षम करु शकते, असे शासनाचे मत झाल्यामुळे दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन नव्याने निर्देश देण्याचे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्यामुळे शासनाने दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने महानगरपालिका / नगरपालिकांना खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

## // निर्देश //

गृहनिर्माण विभागाचा निर्णय दिनांक २५ जून, २००७ नुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निमाण अभियानांतर्गत (JNNURM) शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या उपकार्यक्रमात समाविष्ट केलेले मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे व नांदेड या पाच नागरी समुहासह सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश देण्यात येतो की, त्यांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून खालील अटींवर सदर योजनेसाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन शासनास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करावा.. शासन पुढे असे निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये मंजूरी प्रलंबित असेपर्यंत सदर तरतूद लगेच अंमलात आणावी.

१) सदर निदेश हे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP), शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) व संक्रमण गाळे या शहरी गरीबांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनांकरिता लागू असतील.

२) सदर योजना महानगरपालिकेने / नगरपरिषदेने स्वतः राबवावी.

३) अनुज्ञेय २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल विक्री घटकामध्ये १५% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच या १५% मर्यादित जर एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) योजना सुसाध्य (Viable) होत नसतील तर उपाध्यक्ष, म्हाडा यांच्या सविस्तर छाननीअंती आणखी १०% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा.

४) उक्त मुद्दा क्र. ३ मुळे निर्माण होणारे विक्री घटकातील गाळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

मधील तरतूदीनुसार विक्री करण्यास अथवा भाडेपट्ट्यावर देण्याबाबत महानगरपालिका / नगरपरिषगांना परवानगी देता येऊ शकेल.

५) सदर प्रस्तावात येणारी सर्व आरक्षणे विकसीत करणे आवश्यक राहील. मात्र बांधकाम योग्य आरक्षणे (खुल्या स्वरुपाची आरक्षणे सोडून) समावेशक आरक्षणांच्या माध्यमाच्या धर्तीवर, त्यामध्ये नमुद केलेल्या क्षेत्राइतके सुविधा क्षेत्र घेऊन उर्वरीत बांधकाम गृहबांधणीसाठी करण्याच्या अधिन राहून विकसीत करावी लागतील.

६) शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) योजनांना २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करतांना खुल्या जागा (open spaces), बाजूच्या मोकळ्या जागा (side margins), इत्यादींच्या बाबतीत आवश्यकतेप्रमाणे झोपडपट्टी पुर्नवसन योजना (SRA) प्रमाणे सवलत देण्याची उचित कार्यवाही संबिधित नगरपालिका / महानगरपालिकेचे मुख्य अधिकारी / आयुक्त यांनी करावी.

वरिलप्रमाणेच्या शासन निर्देशाप्रमाणे सदर विनियम मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे २५% क्षेत्र विक्री घटकासाठी अनुज्ञेय केलेले असून महानगरपालिकेच्या दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ३२ अन्वये महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या अंतर्गत सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी वाणिज्य वापरामधून निधी उपलब्ध करुन सदर प्रकल्प पुर्ण करण्यास मान्यता दिलेली असून सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादित महानगरपालिकेस ४६% ते ५०% पर्यंत क्षेत्र विक्री धारकांसाठी अनुज्ञेय करावे लागणार असल्यामुळे सदर मर्यादा २५% ऐवजी ५०% पर्यंत केल्यास महानगरपालिकेस सदर प्रकल्प पुर्ण करणे शक्य होणार आहे. याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

यास्तव शासन निर्देशाप्रमाणेची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणेसह २५% ऐवजी ५०% क्षेत्र विक्री घटकांसाठी अनुज्ञेय करणेबाबत तसेच बी.एस.यु.पी. प्रकल्पासाठीच्या जागेमधील विकास योजना रस्त्याने व दफनभुमीने बाधित क्षेत्रासाठी यापूर्वी मोबदला घेतलेला नसल्यामुळे सदर विकास योजना रस्त्याने व दफनभुमीने बाधीत क्षेत्राचा वापर प्रचलित नियमावलीप्रमाणे त्याच जागेमध्ये करणेसाठी मंजुरी मिळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

मिरादेवी यादव :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. १८ :-

शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे योजनेबाबत विनियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेसह त्याअंतर्गत अनुज्ञेय २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल मर्यादित वाढ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.

ठराव क्र. १८ :-

शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय क्र. ज.ने.यो.२००६/प्र.क्र.-४६ /गृनिधो, दि.२५/०६/२००७ नुसार यापुर्वीची राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना या दोन केंद्र शासन पुरस्कृत योजना केंद्र शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे सदर दोन्ही योजनांचा समावेश एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या नविन कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेला आहे.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांचा उद्देश एकसारखा म्हणजे शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावणे व त्यांना पर्याप्त निवारा, मुलभूत सोयी उपलब्ध व त्यांना शहरातील झोपडपट्टीवासीयांचे राहणीमान व जीवनमान सुखावह करुन सभोवतालच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा आहे. वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आर्थिक दृष्टीकोनातून सक्षम ठरत नसल्यास व ती राबविण्यास अडचण येत असल्यास अशा झोपडपट्यांच्या विकासासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या गृहनिर्माण विभागाच्या क्र. एचएसजी/२००२/प्र.क्र. ४/गृनिधो-१, दि.१९/०९/२००२ रोजीच्या निर्णयानुसार २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती तथापि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) राबविण्यात येणा-या योजनेच्या शासन निर्णयामध्ये याप्रकारे तरतूद नसल्यामुळे अशी सवलत महानगरपालिकेच्या / नगरपरिषदेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक असल्याने शासनाने नगरविकास विभागाचे आदेश क्र. टीपीएस-११०७/अनौ.३६/ प्र.क्र.१३५/०८/नवि-९, दि.२४/०८/२००८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माणे व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून काही अटीवर सदर योजनेसाठी २.५० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिलेले असून सदर योजना वर्धनक्षम करण्यासाठी उक्त नमुद २.५० चटईक्षेत्र निर्देशांकामधील काही क्षेत्र विक्री घटकासाठी ज्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार वाणिज्य अथवा निवासी प्रयोजन शक्य असेल त्याप्रमाणे वापरण्यास मुभा देवून सदरचे विक्री घटकांचे गाळे विक्री करुन अथवा भाडेतत्वावर देवून सदर योजना महानगरपालिका / नगरपालिका वर्धनक्षम करु शकते, असे शासनाचे मत झाल्यामुळे दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन नव्याने निर्देश देण्याचे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्यामुळे शासनाने दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने महानगरपालिका / नगरपालिकांना खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

## // निर्देश //

गृहनिर्माण विभागाचा निर्णय दिनांक २५ जून, २००७ नुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निमाण अभियानांतर्गत (JNNURM) शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या उपकार्यक्रमात समाविष्ट केलेले मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे व नांदेड या पाच नागरी समुहासह सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश देण्यात येतो की, त्यांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून खालील अटींवर सदर योजनेसाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन शासनास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करावा.. शासन पुढे असे निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये मंजूरी प्रलंबित असेपर्यंत सदर तरतूद लगेच अंमलात आणावी.

१) सदर निदेश हे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP), शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) व संक्रमण गाळे या शहरी गरीबांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनांकरिता लागू असतील.

२) सदर योजना महानगरपालिकेने / नगरपरिषदेने स्वतः राबवावी.

३) अनुज्ञेय २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल विक्री घटकामध्ये १५% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच या १५% मर्यादित जर एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) योजना सुसाध्य (Viable) होत नसतील तर उपाध्यक्ष, म्हाडा यांच्या सविस्तर छाननीअंती आणखी १०% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा.

४) उक्त मुद्दा क्र. ३ मुळे निर्माण होणारे विक्री घटकातील गाळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार विक्री करण्यास अथवा भाडेपट्यावर देण्याबाबत महानगरपालिका / नगरपरिषगांना परवानगी देता येऊ शकेल.

५) सदर प्रस्तावात येणारी सर्व आरक्षणे विकसीत करणे आवश्यक राहील. मात्र बांधकाम योग्य आरक्षणे (खुल्या स्वरुपाची आरक्षणे सोडून) समावेशक आरक्षणांच्या माध्यमाच्या धर्तीवर, त्यामध्ये नमुद केलेल्या क्षेत्राइतके सुविधा क्षेत्र घेऊन उर्वरीत बांधकाम गृहबांधणीसाठी करण्याच्या अधिन राहून विकसीत करावी लागतील.

६) शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) योजनांना २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करतांना खुल्या जागा (open spaces), बाजूच्या मोकळ्या जागा (side margins), इत्यादींच्या बाबतीत आवश्यकतेप्रमाणे झोपडपट्टी पुर्नवसन योजना (SRA) प्रमाणे सवलत देण्याची उचित कार्यवाही संबिधित नगरपालिका / महानगरपालिकेचे मुख्य अधिकारी / आयुक्त यांनी करावी.

वरिलप्रमाणेच्या शासन निर्देशाप्रमाणे सदर विनियम मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे २५% क्षेत्र विक्री घटकासाठी अनुज्ञेय केलेले असून महानगरपालिकेच्या दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ३२ अन्वये महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या अंतर्गत सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी वाणिज्य वापरामधून निधी उपलब्ध करुन सदर प्रकल्प पुर्ण करण्यास मान्यता

दिलेली असून सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादित महानगरपालिकेस ४६% ते ५०% पर्यंत क्षेत्र विक्री धारकांसाठी अनुज्ञेय करावे लागणार असल्यामुळे सदर मर्यादा २५% ऐवजी ५०% पर्यंत केल्यास महानगरपालिकेस सदर प्रकल्प पुर्ण करणे शक्य होणार आहे. याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे.
यास्तव शासन निर्देशाप्रमाणेची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणेसह २५% ऐवजी ५०% क्षेत्र विक्री घटकांसाठी अनुज्ञेय करणेबाबत तसेच बी.एस.यु.पी. प्रकल्पासाठीच्या जागेमधील विकास योजना रस्त्याने व दफनभुमीने बाधित क्षेत्रासाठी यापूर्वी मोबदला घेतलेला नसल्यामुळे सदर विकास योजना रस्त्याने व दफनभुमीने बाधीत क्षेत्राचा वापर प्रचलित नियमावलीप्रमाणे त्याच जागेमध्ये करणेसाठी मंजुरी मिळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस व त्याअनुषंगीक पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. अनिल भोसले अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १९, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन ई-वाचनालयासंबंधीचे धोरण ठरविणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने नगरवाचनालय, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, भाईंदर (प.), श्री.पद्मसागर सुरीश्वरजी भवन, तळमजला, प्र.स.का.क्र.०६ रामनगर, मिरारोड (पु.), जांगीड ॲमिनीटी हॉल, दुसऱ्या मजला, मिरा रोड (पु.) व आरक्षण क्र. ३१८ सिल्व्हर सरीता, दुसरा मजला, काशिगांव येथे नविन ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करण्यात आले आहे. ई-वाचनालय ही संकल्पना पुर्णतः नविन असल्यामुळे त्याबाबतचे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात वरील चार ठिकाणी मनपाने बांधकाम विभागामार्फत ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करणेसाठी रक्कम रु.१.८८ कोटी इतका भांडवली खर्च केलेला आहे.

नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक संच, नेटवर्कींग व इतर साहीत्य खरेदी व इंटरनेट डिपॉझीट करणेकरीता मनपाने संगणक विभागामार्फत रु.१३,३५,९९५/- इतका खर्च केलेला आहे. उर्वरीत दोन ठिकाणी देखील याकरीता खर्च होणार आहे.

संगणक विभागाने नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक साहीत्य, देखभाल दुरुस्ती, घसारा व इंटरनेट कामी वार्षिक खर्च रु. ५,३४,४४१/- येणार आहे असे नमुद केले आहे.

बांधकाम विभागाने उक्त ई-वाचनालय / अभ्यासिकेच्या देखभाल दुरुस्ती व वीज बीलापोटी रु. २१.४० लक्ष वार्षिक खर्च येणार आहे असे नमुद केले आहे.

या व्यतिरिक्त उक्त ई-वाचनालय व अभ्यासिका येथे दैनंदिन कार्यकालीन कामकाज, साफसफाई आदी कामांकरीता मनपाचे कर्मचारी नियुक्त करुन त्यांचे वेतनासाठी देखील खर्च होणार आहे. सबब त्यानुसार काही प्रमाणात प्रत्येक विदयार्थ्यांकडुन दरमहा/वार्षिक फी आकारणे उचित होईल.

महानगरपालिकेने उक्तप्रमाणे अभ्यासिका व ई-वाचनालय मध्ये संगणक, फर्निचर, वातानुकुलीत यंत्रणा आदी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सबब खालीलप्रमाणे ई-वाचनालय करीता धोरण व फी ठरविणे तसेच अभ्यासिकांकरीता फी ठरविणे उचित होईल.

अ) ई-वाचनालयाकरीता प्रवेशाबाबतचे धोरण :-

०१) ई-वाचनालयात १२ वी व त्यापुढे शिकणाऱ्या विदयार्थ्यांना प्रवेश देणे.
०२) ई-वाचनालयाकरीता नविन सभासद नोंदणी करुन घेणे.
०३) ई-वाचनालय सकाळी १०.०० ते ५.४५ वाजेपर्यत उघडे ठेवणे.
०४) प्रत्येक ई-वाचनालयाकरीता एका संगणक तज्ञांची नियुक्ती करणे.
०५) प्रत्येक ई-वाचनालयात एका सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे.
०६) ई-वाचनालयातील सभासदास जास्तीत जास्त १ तास संगणक हाताळण्यास परवानगी देणे.
०७) ई-वाचनालयात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश देणे.

ब) ई-वाचनालयाकरीता फी बाबतचे दर :-

०१) ई- वाचनालय प्रवेश फॉर्म फी - रु. ०५/-
०२) मासिक फी - रु. २००/-
०३) अनामत - रु. १०००/-

क) अभ्यासिकेच्या फी बाबतचे दर :-

| अ.क्र. | तपशिल | पुर्वीचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | फॉर्म फी | रु. ०५/- | रु. ०५/- |
| ०२ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरविरहीत) | रु. ०२/- | रु. ५००/- |
| ०३ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरसहीत) | -- | रु. १०००/- |

तरी वरील प्रमाणे नव्याने विकसीत केलेल्या ई-वाचनालय व अभ्यासिकेत प्रवेश व फी बाबत धोरणात्मक निर्णयासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

अश्विन कासोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. १९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन ई-वाचनालयासंबंधीचे धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्र. १९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने नगरवाचनालय, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, भाईंदर (प.), श्री.पद्मसागर सुरीश्वरजी भवन, तळमजला, प्र.स.का.क्र.०६ रामनगर, मिरारोड (पु.), जांगीड ॲमिनीटी हॉल, दुसऱ्या मजला, मिरा रोड (पु.) व आरक्षण क्र. ३१८ सिल्व्हर सरीता, दुसरा मजला, काशिगांव येथे नविन ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करण्यात आले आहे. ई-वाचनालय ही संकल्पना पुर्णतः नविन असल्यामुळे त्याबाबतचे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात वरील चार ठिकाणी मनपाने बांधकाम विभागामार्फत ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करणेसाठी रक्कम रु.१.८८ कोटी इतका भांडवली खर्च केलेला आहे.

नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक संच, नेटवर्कीग व इतर साहीत्य खरेदी व इंटरनेट डिपॉझीट करणेकरीता मनपाने संगणक विभागामार्फत रु.१३,३५,९९५/- इतका खर्च केलेला आहे. उर्वरीत दोन ठिकाणी देखील याकरीता खर्च होणार आहे.

संगणक विभागाने नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक साहीत्य, देखभाल दुरुस्ती, घसारा व इंटरनेट कामी वार्षिक खर्च रु. ५,३४,४४१/- येणार आहे असे नमुद केले आहे.

बांधकाम विभागाने उक्त ई-वाचनालय / अभ्यासिकेच्या देखभाल दुरुस्ती व वीज बीलापोटी रु. २१.४० लक्ष वार्षिक खर्च येणार आहे असे नमुद केले आहे.

या व्यतिरिक्त उक्त ई-वाचनालय व अभ्यासिका येथे दैनंदिन कार्यकालीन कामकाज, साफसफाई आदी कामांकरीता मनपाचे कर्मचारी नियुक्त करुन त्यांचे वेतनासाठी देखील खर्च होणार आहे. सबब त्यानुसार काही प्रमाणात प्रत्येक विदयार्थ्यांकडुन दरमहा/वार्षिक फी आकारणे उचित होईल.

महानगरपालिकेने उक्तप्रमाणे अभ्यासिका व ई-वाचनालय मध्ये संगणक, फर्निचर, वातानुकुलीत यंत्रणा आदी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सबब खालीलप्रमाणे ई-वाचनालय करीता धोरण व फी ठरविणे तसेच अभ्यासिकांकरीता फी ठरविणे उचित होईल.

अ) ई-वाचनालयाकरीता प्रवेशाबाबतचे धोरण :-

०१) ई-वाचनालयात १२ वी व त्यापुढे शिकणाऱ्या विदयार्थ्यांना प्रवेश देणे.
०२) ई-वाचनालयाकरीता नविन सभासद नोंदणी करुन घेणे.
०३) ई-वाचनालय सकाळी १०.०० ते ५.४५ वाजेपर्यत उघडे ठेवणे.
०४) प्रत्येक ई-वाचनालयाकरीता एका संगणक तज्ञांची नियुक्ती करणे.
०५) प्रत्येक ई-वाचनालयात एका सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे.
०६) ई-वाचनालयातील सभासदास जास्तीत जास्त १ तास संगणक हाताळण्यास परवानगी देणे.
०७) ई-वाचनालयात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश देणे.

ब) ई-वाचनालयाकरीता फी बाबतचे दर :-

०१) ई- वाचनालय प्रवेश फॉर्म फी - रु. ०५/-
०२) मासिक फी - रु. २००/-
०३) अनामत - रु. १०००/-

क) अभ्यासिकेच्या फी बाबतचे दर :-

| अ.क्र. | तपशिल | पुर्वीचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | फॉर्म फी | रु. ०५/- | रु. ०५/- |
| ०२ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरविरहीत) | रु. ०२/- | रु. ५००/- |
| ०३ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरसहीत) | -- | रु. १०००/- |

तरी वरील प्रमाणे नव्याने विकसीत केलेल्या ई-वाचनालय व अभ्यासिकेत प्रवेश व फी बाबत धोरणात्मक निर्णयासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २०, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-०४ या संवर्गातील सफाई कामगार पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ पदाचा लाभ देणेकरीता शैक्षणिक अर्हता शिथील करणेबाबत.

निलम ढवण :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन नियमानुसार आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत, सेवेत एकाच पदावर नियमित १२/२४ वर्ष सेवा झाल्यास, त्यांना वरिष्ठ श्रेणी पदाचा लाभ देण्याची कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येते. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देताना सदर वरिष्ठ पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व अर्हता संबंधित कर्मचाऱ्यांने धारण करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून आस्थापनेवरील वर्ग -०४ या संवर्गातील सफाई कामगार, या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकाच पदावर सतत १२/२४ वर्ष सेवा झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समोर सादर केला होता. विभागीय पदोन्नती समिती सभा दि. २२/०३/२०१६ रोजी झाली असता, त्या समितीच्या बैठकीत सफाई कामगार, वर्ग-०४ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास, वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत नमुद करण्यात आलेले असल्याने सदर विभागीय पदोन्नती समितीत जे कर्मचारी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नाहीत. त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पद्धत | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य | सफाई कामगार | नामनिर्देशन १००% | अ) ४ थी उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| २ | | मुकादम | पदोन्नती १००% | इयत्ता ७ वी उत्तीर्ण व महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सफाई कामगार पदाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

तत्कालीन नगरपरिषद काळात (दि.१२/०६/१९८५ ते दि.२८/०२/२००२) नियुक्ती अथवा कायम केलेल्या सफाई कामगारांची शैक्षणीक अर्हता इयत्ता ७ वी पेक्षा कमी आहे. तत्कालीन नगरपरिषद काळातील शासन निर्णय क्र. एमसीके/११९१/सीआर-५७/९१/६, दि. ११ मार्च, १९९१ अन्वये सफाई कामगार यांची शैक्षणिक अर्हता ''साक्षर'' असे नमुद आहे. त्यानुसार साक्षर अशी किमान अर्हता असणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यावेळी नियुक्ती अथवा कायम कलेले आहे. परंतु अशा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यासाठी (मुकादम पदाची) सद्यःस्थितीत महानगरपालिकेचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मधील तरतुदी अन्वये सातवी इयत्ता उत्तीर्ण अशी आहे. सदर अर्हता कर्मचारी धारण करीत नसल्याने त्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करणे शक्य होत नाही. तसेच सदरचे इयत्ता पेक्षा कमी शैक्षणिक पात्रता असणारे कर्मचारी वयोमानानुसार यापुढे पुढील शिक्षण घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे दि. २२/०३/२०१६ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती निवड समितीने, नगरपरिषद महानगरपालिका कालावधीतील नियुक्त अथवा कायम केलेल्या सफाई कामगार कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे करीता महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ अंतर्गत नमुद तृतीय/चतुर्थ श्रेणी कर्मचारी जे दिनांक १३ मार्च-२०१४ पुर्वी नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने सेवेत आहेत अश्या सर्व कर्मचाऱ्यांना शैक्षणिक अर्हतेतून सूट देणे. तथापी शैक्षणिक पात्रतेत शिथीलता देणेस ही सभा मंजूरी देत असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अंतर्गत तरतुदी अन्वये सहा. आयुक्त दर्जापेक्षा कमी वेतनश्रेणीच्या पदावर नियुक्ती करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना निहित असल्याने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ श्रेणी वर्ग- ३ व ४ च्या कामगारांना लागु करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. २० :-

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-०४ या संवर्गातील सफाई कामगार पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ पदाचा लाभ देणेकरीता शैक्षणिक अर्हता शिथील करणेबाबत.

ठराव क्र. २० :-

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन नियमानुसार आश्वासित प्रगती योजेनेअंतर्गत, सेवेत एकाच पदावर नियमित १२/२४ वर्ष सेवा झाल्यास, त्यांना वरिष्ठ श्रेणी पदाचा लाभ देण्याची कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येते. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देताना सदर वरिष्ठ पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व अर्हता संबंधित कर्मचाऱ्यांने धारण करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून आस्थापनेवरील वर्ग -०४ या संवर्गातील सफाई कामगार, या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकाच पदावर सतत १२/२४ वर्ष सेवा झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समोर सादर केला होता. विभागीय पदोन्नती समिती सभा दि. २२/०३/२०१६ रोजी झाली असता, त्या समितीच्या बैठकीत सफाई कामगार, वर्ग-०४ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास, वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत नमुद करण्यात आलेले असल्याने सदर विभागीय पदोन्नती समितीत जे कर्मचारी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नाहीत. त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पद्धत | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य | सफाई कामगार | नामनिर्देशन १००% | अ) ४ थी उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| २ | | मुकादम | पदोन्नती १००% | इयत्ता ७ वी उत्तीर्ण व महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सफाई कामगार पदाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

तत्कालीन नगरपरिषद काळात (दि.१२/०६/१९८५ ते दि.२८/०२/२००२) नियुक्ती अथवा कायम केलेल्या सफाई कामगारांची शैक्षणीक अर्हता इयत्ता ७ वी पेक्षा कमी आहे. तत्कालीन नगरपरिषद काळातील शासन निर्णय क्र. एमसीके/११९१/सीआर-५७/९१/६, दि. ११ मार्च, १९९१ अन्वये सफाई कामगार यांची शैक्षणिक अर्हता ''साक्षर'' असे नमुद आहे. त्यानुसार साक्षर अशी किमान अर्हता असणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यावेळी नियुक्ती अथवा कायम कलेले आहे. परंतु अशा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्यासाठी (मुकादम पदाची) सद्य:स्थितीत महानगरपालिकेचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मधील तरतुदी अन्वये सातवी इयत्ता उत्तीर्ण अशी आहे. सदर अर्हता कर्मचारी धारण करीत नसल्याने त्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करणे शक्य होत नाही. तसेच सदरचे इयत्ता पेक्षा कमी शैक्षणिक पात्रता असणारे कर्मचारी वयोमानानुसार यापुढे पुढील शिक्षण घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे दि. २२/०३/२०१६ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती निवड समितीने, नगरपरिषद महानगरपालिका कालावधीतील नियुक्त अथवा कायम केलेल्या सफाई कामगार कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे करीता महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ अंतर्गत नमुद तृतीय/चतुर्थ श्रेणी कर्मचारी जे दिनांक १३ मार्च-२०१४ पुर्वी नामनिर्देशनाने किंवा पदोन्नतीने सेवेत आहेत अश्या सर्व कर्मचाऱ्यांना शैक्षणिक अर्हतेतून सूट देणे. तथापी शैक्षणिक पात्रतेत शिथीलता देणेस ही सभा मंजूरी देत असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अंतर्गत तरतुदी अन्वये सहा. आयुक्त दर्जापेक्षा कमी वेतनश्रेणीच्या पदावर नियुक्ती करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना निहित असल्याने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ श्रेणी वर्ग- ३ व ४ च्या कामगारांना लागु करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

सुचक :- श्रीम. निलम ढवण        अनुमोदक :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २१, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM या केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस GCC या तत्वावर चालविण्यासाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. (Public Private Partnership)या तत्वावर खाजगी ठेकेदार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा.लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून शहरातर्गंत व शहराबाहेरील बस मर्गावर बसेस चालविणेसाठी JnNURM -I या योजने अंतर्गत प्राप्त ५० बसेस, तत्कालीन खाजगी ठेकेदार मे. महालक्ष्मी इन्फ्रा.प्रा.लि. यांच्या ५२ अशा १०२ बसेस चालविणेचा ठेका पूढील १० वर्षाच्या कालावधीत देणेत आलेला होता.

मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांना पी.पी.पी. तत्वावर ठेका प्रति कि. मिटर रु.१/- या रॉयल्टी तत्वावर देणेत आलेला होता. मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांचे कडुन निविदेद्वारे प्राप्त रॉयल्टी रु.१/- हे दर मे. सी. आय. आर. टी. संस्था (Central Institute of Road Transport) पूणे यांच्याकडे तपासुन ते आलेले दर योग्य असल्याचे सांगण्यात आले होते. यामध्ये मे. केस्ट्रल यांनी बसेस चालविणे, मेनटेनन्स, दुरुस्ती, वंगण- इंधन, व ड्रायव्हर, कंडक्टर, निरिक्षक, प्रवर्तक, तांत्रिक कर्मचारी नियुक्ती व वापर, तिकिटाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास प्रदान करणे हया बाबीचा समावेश होता. त्यानुसार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा.लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. तत्वावर बसेस चालविणेचा ठेका देणेत आला होता. करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार बसेस चालविणे, प्रति कि.मी १/- प्रमाणे रॉयल्टी रक्कम भरणे हे ठेकेदारास बंधनकारक होते. ठेकेदाराने माहे ऑक्टो. २०१० ते नोव्हेंबर २०११ पर्यंत रॉयल्टी रक्कम परिवहन फंडात जमा केली होती. त्यानंतर मात्र सातत्याने त्यांनी काही महिन्यांचा अपवाद वगळता रॉयल्टी रक्कम भरलेली नाही. सन २०१० ते मार्च २०१५ पर्यंत च्या कालावधीतील एकूण रॉयल्टी रक्कम रु.१,८१,७२,०४०/- (अक्षरी एक कोटी ऐक्याऐंशी लाख बहात्तर हजार चाळीस मात्र) इतकी थकीत आहे. पी.पी.पी. ठेकेदाराकडुन मंजूर मार्गावर पूर्ण क्षमतेने बसेस न चालविणे, बसेसची दुरूस्ती न करणे, बसेस मेनटेनन्स न करणे अशा तक्रारी प्रवासी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वांरवार येत होत्या. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून ठेकेदारास नोटीसा बजावण्यात आल्या. रॉयल्टी रक्कम वेळच्या वेळी भरत नसल्याने रॉयल्टी रक्कम भरणेसाठी तसेच शासनाकडील थकीत प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास अदा करणेसाठी नोटीसा बजावण्यात आल्या. परंतू मे. केस्ट्रल यांनी थकीत रॉयल्टी मिरा भाईंदर महानगरपालिका उपक्रमास अदा केली नाही. तसेच शासनाकडेही प्रवासी कर व बालपोषण अधिभार जमा केले नाही. सेवेतही कोणताही बदल न होता सेवा खालावत गेली. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र ४८ नुसार करारनामा रद्द करण्याची नोटीस मे. केस्ट्रल यांस दि. ३१/०१/२०१५ रोजी बजावण्यात आली.त्यानुसार मे. केस्ट्रल यांनी दि. ११/०२/२०१५ रोजीच्या पत्रात करारनाम्यातील अटीशर्तीनुसार लवादाची तरतुद असल्यामुळे लवाद नेमुन पुढील कार्यवाही करणे संदर्भात नमुद केले. त्यानुसार दोन्ही पक्षाच्या संमत्तीने श्री. आशुतोष कुंभकोणी, वरिष्ठ वकिल, उच्च न्यायालय, मुंबई यांची ‘Arbitrator’ म्हणून नियुक्ती केली गेली व पुढील कार्यवाही चालू आहे.

दरम्यानच्या कालावधीत JnNURM -II या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडुन १०० बसेस मंजूर झालेल्या असून डेपो साधन सामुग्री करिता व ITS ची अंमलबजावणीसाठी जागतिक बँककडुन अनुदान मंजूर झाले आहे. सदरच्या कालावधीत वरील परिच्छेदात नमुद केल्यानुसार पी.पी.पी. तत्वावरील बसेस सेवेची स्थिती पाहुन मनपा प्रतिनिधी, World Bank चे प्रतिनिधी, केंद्र शासन नियुक्त Consultant M/S. Deloitee व मनपाने नियुक्त केलेले Consultant UMTC यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या संयुक्त बैठकीत JnNURM -II या योजने अंतर्गत प्राप्त बसेस हया GCC तत्वावर चालविणे आवश्यक असून, GCC तत्वावर नेमलेल्या ठेकेदारास किलोमीटर प्रमाणे निश्चित रक्कम प्राप्त होणार असल्याने ठेकेदाराकडून नागरिकांना दर्जेदार बस सुविधा मिळणार असून GCC तत्वावर बसेस चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आलेल्या मे. UMTC या सल्लागाराकडून NCC (Net Cost Contract) व GCC (Gross Cost Contract) बाबत तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसारः-

अ) NCC - सदर तत्वावर बसेस चालविणेसाठी चालक नेमणे, बसेसचे मेनटेनन्स करणे, दुरूस्ती करणे, इंधन आणि वंगण याचा खर्च करणे, तिकिटाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय कर शासनास प्रदान करणे ही जबाबदारी ठेकेदाराची असते.

सदर तत्वावर बसेस चालविताना NCC ठेकेदाराकडून ज्या बस मार्गावर नफा (Profit) आहे अशाच बस मार्गावर व अशावेळी बसेस चालविल्या जातात. त्यामुळे सेवेवर विपरीत परिणाम होतो. सुरूवातीस चांगली सेवा दिली जाते, परंतू सिस्टीम विस्कळीत होते, ठेकेदारास सहन करावा लागणारा तोटा अनुदानाच्या रूपात उपक्रमाला भरून द्यावा लागतो. हे अनुदान निश्चित करणे, त्याचे पर्यवेक्षण करणे खुप कठीण असते, Frequencyन मिळता तसेच मेनटेनन्स न करता बसेसची Occupancyमिळविण्याकडे ठेकेदाराचा कल असतो. सदर तत्वावर निकृष्ट प्रतीचे मेनटेनन्स करण्याची ठेकेदाराची प्रवृत्ती वाढून काही वर्षानंतर ठेकेदाराकडून सेवा स्थगित केली जाण्याची शक्यता निर्माण होते.

ब) GCC – सदर तत्वामध्ये महानगरपालिकेने ठरविलेल्या बस मार्गावर Schedule प्रमाणे बसेस चालविणे, त्यासाठी वाहन चालक नेमणे , बसेसची दुरूस्ती करणे, मेनटेनन्स करणे, इंधन-वंगण यांचा खर्च करणेची जबाबदारी ठेकेदाराची असते. यामध्ये वाहक, प्रवर्तक, निरिक्षक कार्यालयीन कर्मचारी नियुक्ती करून तिकिट भाडयाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, प्रवासी कर, बालपोषण अधिभार शासनाकडे जमा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असते. यामध्ये काही नुकसान झाल्यास ते महानगरपालिकेकडून भरून दिले जाते. महानगरपालिकेकडून प्रती कि. मी.प्रमाणे निश्चित दर GCC तत्वावर नेमलेल्या ठेकेदारास द्यावे लागते.

मे.UMTC यांनी सादर केलेल्या Financial Analysis नुसार दोन्ही प्रकारच्या तत्वावर बसेस चालविणेसाठी तुट येणार आहे. NCC तत्वावर येणारी तुट भरून काढण्यासाठी महानगरपालिकेस ठेकेदारास अर्थसहाय्य करावे लागणार आहे. सबब World Bank प्रतिनिधी व केंद्रशासन नियुक्त सल्लागार यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार GCC तत्वावर बसेस चालविणे अधिक लाभदायक ठरणार असून नागरिकांना दर्जेदार सेवा देणेसाठी GCCतत्वावर बसेस चालविणे योग्य वाटते.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM -II अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस अधिक काळ पर्यंत चांगली सेवा देण्याकरिता GCC हया तत्वावर चालविणेची शिफारस मा. आयुक्त यांनी केलेली आहे.

तरी आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमा अंतर्गत बससेवा GCC (Gross Cost Contract) या तत्वावर चालविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुनिला शर्मा :-

माझे अनुमोदन आहे.

लियाकत शेख :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात जे.एन.एन.यु.आर.एम.-२ या योजने अंतर्गत मंजूर १०० व जे.एन.एन.यु.आर.एम.-१ या योजनेतील ५० बसेस असे एकूण १०० बसेस शहरांतर्गत व शहराबाहेरील बस मार्गावर चालविणेचे आहेत.

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम.-२ या योजने अंतर्गत मंजूर बसेस व सद्यस्थितीत ५० बसेस चालविणेसाठी NCC (Net Cost Contract) व GCC(Gross Cost Contract) ह्या दोन तत्वापैकी एका तत्वावर महानगरपालिकेच्या बसेस खाजगी Operator मार्फत चालविणेचे आहे. दोन्ही प्रकारापैकी कोणत्याही एका प्रकारात बसेस चालविणेकामी खाजगी ठेकेदाराची नियुक्ती करावी लागणार आहे.

खालीलप्रमाणे दोन्ही तत्वांचे स्वरुप देण्यात येत आहे.

**A) NCC (Net Cost Contract)** :-

१) महानगरपालिका बस खरेदी करुन ठेकेदारास चालविणेस देईल.
२) खाजगी ठेकेदार नेमून महापालिकेने दिलेल्या भाडेदर व बस मार्गावर नियोजीत बसेस चालविणे.
३) खाजगी ठेकेदार तिकीट दर जमा / वसूल करील.
४) महापालिकेला नेमलेल्या ठेकेदाराकडून प्रति कि.मी./ प्रति बस स्वामित्व धन दिले जाईल.
५) यामध्ये महानगरपालिकेला कोणताही कर्मचारी नेमणूक व तद्अनुषंगाने येणारा खर्च करावा लागणार नाही.
६) बसेस चालवित असताना कोणत्याही प्रकारचा धोका,अपघात जोखीम प्रत्यक्ष महानगरपालिकेला सोसावा लागत आहे.
७) यामध्ये ज्यावेळी किंवा नियोजीत मार्गावर कमी उत्पन्न आहे. त्यावेळी किंवा त्या बस मार्गावर ठेकेदाराकडून बसेस न चालविणेची शक्यता नाकारता येत नाही.
८) ठेकेदारास पुरेसे उत्पन्न मिळाले नाही तर दुरुस्ती अभावी बसेस नादुरुस्त स्थितीत राहून त्याचा परिणाम थेट बस ऑपरेटींगवर होतो.

**B) GCC (Gross Cost Contract)** :-

१) महानगरपालिका बस खरेदी करुन ठेकेदारास चालविणेस देईल.
२) महानगरपालिकेच्या बसेस ठेकेदाराकडून चालविण्यात येतील.
३) महानगरपालिकेकडून तिकिट दर जमा/वसूल केला जाईल त्याकरीता वाहक, निरीक्षक, प्रवर्तक, हिशोब ठेवेणेकरीता (जसे रोकड, तिकिट) कर्मचारी वर्ग नेमावा लागेल.
४) महापालिका बसमार्ग, वेळ (Bus Scheduled) देईल त्याप्रमाणे बसेस ठेकेदाराकडून चालविणेत येते, वाहन चालक इंधन, वंगण, दुरुस्ती, अपघात, जोखीम ही बाब ठेकेदाराच्या अधीन असेल.
५) ठेकेदारास प्रति कि.मी. प्रमाणे मंजूर दराप्रमाणे देयक प्रदान केले जाईल (देयक कालावधी साधारणतः १५ दिवस)
६) यामध्ये ठेकेदारास चालविणेत येणा-या बसेसचे निश्चित प्रति कि.मी. प्रमाणे देयक मिळत असल्याने बसेस वेळेनुसार चालविल्या जातात व सुस्थितीत ठेवल्या जातात.
७) बसेस चालवित असताना कोणत्याही प्रकारचा धोका प्रत्यक्ष महानगरपालिकेला सोसावा लागत आहे.

८) महानगरपालिकेस तिकिट विक्री पासून जमा झालेली रक्कम व प्रत्यक्ष ठेकेदारास देय देयक यामध्ये तफावत असल्यास ती रक्कम महानगरपालिकेस स्वतः द्यावी लागेल.
९) ठेकेदारास त्याचे होणारे देयक मिळत असल्यामुळे शहरवासीयांना बसेस सेवा उत्तम दिली जाते.

वरील दोन्ही तत्वांच्या कामाच्या स्वरुपानुसार व दि. ३१/०८/२०१५ रोजी केंद्रशासनामार्फतनियुक्त केलेली मे. डिलॉईट यांचे प्रतिनिधी यांचे समवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार तसेच दि.०८/०९/२०१५ रोजी ESCBS अंतर्गत उपस्थित जागतीक बँकेच्या प्रतिनिधी समवेत झालेल्याचर्चेनुसार GCC with Incetiveवर आधारीत ऑपरेटर नेमावे असे सुचविणेत आले.

वरील दोन्ही तक्त्यांचे पडताळणी केली असता असे निदर्शनात येत आहे, परिवहनउपक्रमजी.सी.सी. तत्वावर चालविल्यास महापालिकेला अनुदानाच्या स्वरुपात मोठी रक्कम द्यावी लागेल व ते महापालिकेला आर्थिक दृष्ट्या हीताचे ठरणार नाही.

एन.सी.सी. तत्वावर बसेस चालविल्यास महानगरपालिकेला आर्थिक भारअतिशय कमी प्रमाणात येईल व राजपद धनही (रॉयलटी) मिळण्याची शक्यताही आहे.

तरी परिवहन उपक्रमासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्राप्त होणा-या नवीन व प्राप्त जुन्या बसेस एन.सी.सी. तत्वावर चालविणे योग्य आहे. इच्छुक ठेकेदारांकडून एन.सी.सी. तत्वावर बसेस चालविण्यासाठी कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव मागवावे. तसेच सदर विषयाबाबत ठेकेदारांबरोबर महापालिकेच्या हीतामध्ये वाटाघाटी करण्यासाठी सर्वपक्षीय गटनेता, पदाधिकारी सक्षम अधिकाऱ्यांची समिती स्थापीत करुन त्यांच्या अहवालानुसार निविदा प्रक्रीया करावी असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आयुक्त साहेब भाईंदर वेस्टला सम नंबर ऑफ वेकेंट बसेस.

मा. महापौर :-

मॅडम एक मिनिट रुट वाईज काही तक्रार असेल तर ते नंबर.

मर्लिन डिसा :-

नाही नाही रुट नाही देर लॉट ऑफ वेकेंट बसेस अनयूज्ड बसेस.

मा. महापौर :-

मॅडम धिस इज फॉर जी.सी.सी. ऑर एन.सी.सी.

मर्लिन डिसा :-

आय जस्ट वॉन्ट टू नो वॉट इज द स्टेट ॲन्ड कंडीशन्स ऑफ दोज बसेस वेदर दे विल बी रिमेनिंग देर ऑन द टाईम.

मा. महापौर :-

आता आपल्याला विषय संपवायचे आहेत. विषयाला धरुन बोलल्या तर बरं होईल.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम इसके पहले जो ठराव हुआ था उसके अंदर में महापौर, उपमहापौर सभी गटनेता के अंतर्गत एक कमिटी बनी थी उसके अंदर में डिसीजन लिया जाए की जीसीसी तत्व पे चले की एन.सी.सी. तत्व पे तो वो जो गटनेता की मिटींग हुई थी आपके अध्यक्षता में उसके अंदर में मेरे खयाल से यह निर्णय एनसीसी तत्व पे होगा ना? तो अभी यह निर्णय बदला क्यों जा रहा है। इसके उपर में भी जरा बोलेंगे तो।

कल्पिता पिंपळे-वडे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते आपल्याला जे काही वर्ल्ड बँकने शिफारस केली होती. केंद्र शासनाचे जे काही प्रतिनिधी होते त्यांच्याबाबत ज्या काही मिटींग झाल्या होत्या त्याच्यामध्ये जी.सी.सी. वर ते चालवावे अस त्यांच मत होत आणि आपण जी काही कन्स्लटन्सी नेमलेली आहे त्यांचही असच मत होत त्यानुसार फेर विचारार्थ आपण हा विषय आता या सभेपुढे ठेवला होता.

भगवती शर्मा :-

निर्णय असा झाला होता ना मॅडम की एनसीसी तत्वावर बस चालवण्यासाठी बहुमताने हा निर्णय झाला होता ना.

जुबेर इनामदार :-

बहुमतानेच निर्णय झाला होता त्याचे मिनिट्स झाले आहेत आणि याच महासभेने गटनेत्यांवर सोपविली होती जबाबदारी की तुम्ही सभा बोलवावी महापौरांच्या अध्यक्षतेखाली तुम्हाला जो योग्य निर्णय असेल तो महासभेमध्ये येईल आणि बहुमताने तो निर्णय मान्य केला जाईल. तुमच्या गोषवाऱ्यामध्ये सुध्दा तसेच नमूद आहे. ते असताना इथे हा निर्णय बदलला कसा? हा निर्णय बदलण्याचा अधिकार कुणी दिला.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम प्रशासनातर्फे हा विषय गटनेत्यांच्या बैठकीने ठरवलं होत की एनसीसी वर जावे. जे काही गटनेत्यांकडे माहिती असेल इथल्या शहराची त्या अनुषंगाने विचारपूर्ण निर्णय घेतला. प्रशासन याच्याने

समाधान नव्हत की एनसीसी वर चालणे शहराच्या हितासाठी होईल म्हणून फेरविचारासाठी हा प्रस्ताव महासभेपूढे पाठवला. महत्वाचे एनसीसी मध्ये जवळचे महानगरपालिका वसई विरार महानगरपालिका या संदभात चर्चा झाली की तिकडे चालु आहे ते एनसीसीवर आहे. या शहराचा लोकप्रतिनधी म्हणून मा. आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याकडे चर्चा केली की आपल्याकडे कुठल्या पध्दतीने बसेस चालू आहेत आणि कशाप्रकारे ठेकेदार चालवतात आम्हालाही शहरामध्ये चालवायला घ्यायची आहे. ठेकेदार त्याने आम्हाला जोडून दिले त्याची भेट करुन दिली. या शहरामध्ये आले त्यांनी सगळ्या शहराची माहिती घेतली आणि त्यांना आम्ही सांगितल की आम्हाला विरार सारख्या एनसीसी चालवायचं आहे तुम्ही काय देणार ते सांगा. विरारला नो प्रॉफीट नो लॉसवर ते चालवतात त्यांनी येऊन परत तेच दिलं आम्हाला की एनसीसी वर मी चालवणार नाही. जीसीसीवरच चालवणार अशी त्याने पूर्ण माहिती दिली परत आम्ही त्यांना कन्वीनीयन्स केले की आम्हाला जीसीसवर जायचं असेल तर हा आमची भूमिका एनसीसीवर तुम्ही काय करणार. मग त्याने काल महानगरपालिकेला त्याला आम्ही सांगितले तुला द्यायचं तुला परवडत नसेल तर काय घेणार त्या कंडीशनमध्ये सांग. त्याने काल ते वर्कआऊट केले आणि अंदाजे माझ्या माहितीप्रमाणे त्याने अेव्हरेज ५ रु. कि.मी. छोट्या बसेसला प्रिमियम बसेसला जास्त आहे २५ करोड रुपये डेफिनेट येईल असं त्याच म्हणणे आहे. या शहराची जे काही त्याने माहिती घेतली वारंवार वर्ल्ड बँक असेल कन्स्लटन्ट असतील शासन असेल त्यांनी हेच सांगितले की जीसीसीवर जा. त्या माणसाच्या चेहऱ्यावरुन असं दिसत होत की त्याला जीसीसवर जास्त इन्ट्रेस्ट आहे एनसीसीवर नाही. त्याने विरारच सांगितले आमचं उदाहरण तिकडे विरारच वेगळे आम्हाला कधीही तिकडे आमच काम होतं कधीही सांगितलं, कुठलही विभाग कधीही बंद. नाही परवडलं बंद करायला सांगतात. तिकीट दर वाढवायला सांगितल तर दुसऱ्या दिवशी आम्हाला तिकीट दर वाढवून मिळतो या सगळ्या बाबी तिकडे आहेत. आणि या शहरामध्ये त्यांची मानसिकता जीसीसीवरच चालवायची आहे त्या विरारच्या ठेकेदाराची आणि काल त्याने आपल्याला ते मेल सुध्दा पाठविले ते बोलले अंदाजीत काय येतील त्याची माहिती तरी दे. तर माझ्या माहितीप्रमाणे त्याने डेफिशिएट दाखवले आहे की एनसीसीवर चालवले तरी डेफीशिएट येणार आणि एनसीसी गेल्यानंतर त्याला जास्तीचे नुकसान झालं तर तो सगळ राग बसेसवर काढणार सेवेवर काढणार आणि आपल्या परत बसेस तसेच होणार जसं पहिलं आपल्याकडे होते एनसीसीवर म्हणून आपल्याला शासनाने जे सुचविले आहे ज्या कन्स्लटन्टने सुचविले आहे या अनुषंगाने या सभागृहाने हा निर्णय घेतला की जीसीसवर गेलेले आपल्याला फायदेशीर राहते. म्हणून हा निर्णय दिला आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय ठेकेदार काय आम्ही अजून नेमला नव्हता की त्याच ठेकेदाराने आपल्याला जी काही माहिती दिली किंवा तो ठेकेदार अशाप्रकारे आता बदलला आहे. हे आम्हाला कल्पना नाही आमच्यासमोर जी चर्चा झाली किंवा आयुक्तांनी त्यांनी जे प्रेझेन्टेशन दिले त्यामध्ये मा. महापौर मॅडम, आयुक्त महोदय स्वतः उपस्थित होते. बाकीचे अधिकारी पर्यटन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तेव्हा त्यांनी आम्हाला ते प्रेझेन्टेशन दिले त्यामध्ये त्यांची भूमिका एनसीसी पध्दतीने चालवायची होती ती कधी बदलली त्याची कल्पना आम्हाला नाही का? दोन अधिकृत बैठकी गटनेत्याच्या लागल्या त्याच्यामध्ये जेव्हा त्याला बोलावण्यात आलं. आम्हाला एनसीसी संदर्भात चांगली भूमिका सांगितली. आम्ही एनसीसी पध्दतीने केले तर शहरामध्ये आपल्याला त्याचा फायदा होईल त्याने आम्हाला माहिती दिली की ११९ बसेस तो वसईमध्ये स्वतःच्या चालवतो १००० रु. रॉयल्टी वर्षाला देतो. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत त्याला प्राप्त ३० बसेस आहेत. त्याचा २५०० रुपये प्रतीमहिना तो रॉयल्टी म्हणून पालिकेला देतो. खर्च त्याला इंधनवंगण त्याच सगळ काही त्याच आम्ही त्याच्यामध्ये अट ठेवली होती की, आमच्याकडे अडचण याच्या आधी झाली होती म्हणजे आम्ही आमचे हात भाजून घेतलेले. एकतर आमच्याकडे डेपो नव्हता साहेब तो एक प्रकार होता किंवा आपल्याला कुठलाही जीसीस करा किंवा एनसीसी करा डेपो उपलब्ध करुन द्यायचा दुसर म्हणजे गाड्याच मेन्टेनन्स झाला नव्हता. आम्ही त्याच्यावर काय अट ठेवली बाबा की समजा तू आण समजा तुम्हीच आलात कोणीही येऊ शकतो. टेंडर केल्यानंतर कोणीही येऊ शकतो. कुठलाही ठेकेदार येऊ शकतो. मात्र आमची अट अशीच राहणार की जे गाड्या आम्ही तुम्हाला देतो ते तुम्ही कंपनीच्या सर्व्हिस स्टेशनमधून सर्व्हिस करुन द्यायची आणि त्याचा ऑडिट आम्हाला प्रत्येक ३ महिन्यामध्ये द्यायचा अहवाल द्यायचा. आणि त्यांनी तो मान्य केला होता. तेव्हा तो त्यांनी मोघम मान्य केला होता कदाचित निविदा प्रक्रिया नंतर दुसरेही ठेकेदार अजून एका ठेकेदाराची आपण काय बांधीलकी नव्हती की त्यालाच द्यायचं आहे. तो एक समोरुन चालुन आला म्हणून त्याच्याशी त्या विषयावर फक्त चर्चा केली अन त्याच धर्तीवर प्रत्येक गटनेत्याच्या बैठकीमध्ये एनसीसीवर समाधानकारक निर्णय घेण्यात आला आणि तो तुम्ही बदलला तर तुम्हाला आम्हाला विश्वासात घ्यायला पाहिजे होते की अस असं घडलेल आहे.

मा. महापौर :-

जुबेरजी तो बदलला नाही आपण फेरविचारसाठी परत महासभेला आणला आहे कारण आपल्याला काहीतरी अडचणी आहेत.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विचार फेरविचारसाठी म्हणजे निर्णयासाठी आलेला विषय गटनेत्याच्या बैठकीमध्ये गटनेते जो निर्णय घेतील तो महासभेला मंजूर असेल कारण गटनेते काही एका पक्षाचे नसतात. सर्वपक्ष गटनेते आणि तुम्ही त्या समितीचे अध्यक्ष होता.

मा. महापौर :-

जुबेरजी आता सांगितल्याप्रमाणे काहीतरी अडचणी असतात. तोच तो वसई विरारवाला जो एनसीसीसाठी एवढ छान आपल्याला तो करत होता आणि आपण सगळेच शायद कबूल झालो एनसीसीसाठी. ते आपण परत फेरविचार करायला का आणलय कारण एवढी मोठी रक्कम डेफिशिएट दाखवतो ते शक्य नाही आपल्याला.

जुबेर इनामदार :-

आपल्याला पालिकेने साडे बारा कोटी रुपयांचा वार्षिक डेफिशिएट दाखवला होता जीसीसी पध्दतीवर त्या अनुषंगाने त्या धर्तीवर केलेल्या चर्चा आणि हे सगळ काही बघितल्यानंतर त्याला मी जेव्हा बोलावलं किंवा तो आला त्याने सांगितले दिड २ कोटी रुपये मला जास्तीत जास्त मला अनुदानाच्या स्वरुपात द्यावे लागतील.

मा. महापौर :-

पण आता तोच जास्त म्हणतोय.

जुबेर इनामदार :-

मान्य आहे पण आम्हाला विश्वासात कधी घेणार. त्याच्यासाठी एका बाजूला गटनेत्याचा निर्णय तुम्ही बोलता दुसऱ्या बाजूला परस्पर करुन घेता हे किती योग्य आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, एनसीसी बद्दल आपल्या गटनेत्यांच्या बैठकीमध्ये चर्चा झाली होती आणि त्यानुसार एनसीसी सगळ्यांनाच चांगल वाटल होत त्यावेळी आणि त्याने आपल्या महानगरपालिकेच्या बाजूलाच वसई विरारला तो चालवतो पण फरक हा आहे की तो स्वतःच्या गाड्या चालवतो आपण त्याला आपल्या बसेस देणार आहे आणि त्याने ॲक्च्युअलमध्ये त्या दिवशी सगळ सांगितलं तोंडी पण जेव्हा त्याला आम्ही सांगितल तु वर्क आऊट करुन आम्हाला सांग तर त्याने २५ कोटी डेफिशिएट सांगितले त्याच्यामध्ये तर त्याच्यामुळे आम्ही परत महानगरपालिकेने याच्यावर फेरविचार करावा म्हणून परत महासभेमध्ये आणले आणि सगळे गटनेता देखील या ठिकाणी हजर आहेत. त्यामुळे आपण परत विचार करावा यावरती दुबार. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये आणि नागरिकांना चांगली सेवा मिळावी. आपली मंजुरी झाल्यानंतर आपण टेंडर फ्लॅश करु त्यावेळेस सगळे कोण-कोण कॉन्ट्रॅक्टर येतील त्यावेळेस आपली अजून त्यावर चर्चा होईल जो आपल्याला चांगली सेवा देणार त्याला देणार आहे आपण टेंडर अस काही अंधारात ठेवून काम करत नाही आपण.

जुबेर इनामदार :-

गरजेप्रमाणे वेळोवेळी महानगरपालिका विशेष समित्या गठित करते जशी गटनेत्यांची समिती गठित झाली महापौरांच्या अध्यक्षतेखाली त्याचा निर्णय एनसीसी पध्दतीने आला. तुमच्या गोषवाऱ्यामध्ये सुध्दा तो नमुद आहे. तो बदलायचाच होता किंवा कदाचित............

मा. आयुक्त :-

बदललेला नाही फेरविचारार्थ आलेला आहे. सभागृहाला विनंती आहे की त्याच्यामध्ये तुम्हाला जो निर्णय घ्यायचा तो तुम्ही घेऊ शकता. आम्ही फेरविचारार्थ याच्यामुळे की महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये. आम्ही कालच ईमेलवर मागवलं आपली महासभा असल्यामुळे की आम्हाला वर्कआऊट करुन दे २५ कोटी रुपयाचा डेफिशिएट जर त्यांनी दाखवला असेल तर आपण परत त्याच्यामध्ये जाण्यामध्ये काय अर्थ आहे. त्याच्यामुळे आपण फेरविचारार्थ महासभेसमोर विषय आणला आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय पण हा आलेला तुमच्या पर्यंतचा विषय तो तुमच्या पर्यंतच राहिला ना तो आमच्यापर्यंत पोहोचलाच नाही.

मा. आयुक्त :-

तो महासभेसमोर आणला ना आता.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब बघा आपण इकडे प्रणाली ठरवतोय डेफिशिएट फायदा त्याच्यात पण होऊ शकते नुकसान याच्यात पण होऊ शकते. एकदा एखाद्या माणसाला गॅरेंटी झाली की माझी इन्कम येणार आहे रात्री बस खाली चालु द्या की पॅसेंजरने चालु द्या त्याला खात्री असेल की मला हे पैसे मिळणार आहे. माझी मेहनतीने मला मिळणार आहे. तो बस चालवणार सुध्दा आणि मेन्टेन सुध्दा करणार. त्यावेळी ही शंका आली की रात्री पॅसेंजर भेटत नाही सकाळी पहाटे पॅसेंजर मिळत नाही तो त्याच्या ट्रीपमध्ये कपात करील तो मेन्टेनमध्ये कुठेतरी काटकसर करायला सुरुवात करेल. कारण त्याला नुकसान झाल तर नुकसान कुठुन भरायचं इकडनच भरायचं कारण आपण आपण काय अनुदान वेगळ देणार नाही. टेंडरमध्ये एकदा भरल्यानंतर त्याच्यावरच काय तुम्ही देऊ शकत नाही. आता १२ कोटी देतो म्हणजे आपण तरतूद केलेली आहे इट इज प्रपोज आता नविनमध्ये कदाचित ते आपल्याला कमी सुध्दा येणार आहे. म्हणजे अस नाही की

ते १२ कोटी येणार आहे. ओनली प्रणाली आपण चेंज करतो. त्या माणसाने पण याव ना. आणि आम्ही ठोकून सांगतोय एनसीसी वर वसईवाला फ्री ऑफ कॉस्ट करायला तयार असेल तर त्याला उद्या देऊन टाका. काय टेंडर असेल ये आणि घे आणि चालव वी आर रेडी पण त्याने सुध्दा नाकारल आहे. आणि जुबेरजी सांगतात आपण एखादा असा प्रेझेन्टेशन घेतला पण ज्या वर्ल्ड बँकच्या संस्था आहेत त्याला कन्सल्टन्ट त्याने पूर्ण देशातल ज्या-ज्या ठिकाणी परिवहन सेवा आहेत त्याने अभ्यास पूर्ण देशाचा केला आहे. आपण एकाचा विचार करतो वसईमध्ये काय? आणि इकडे काय? पण त्याने पूर्ण देशाचा विचार करुन शेवटी हे सूचविले आहे की जीसीसवर तुम्ही करा तरच हे बस तुमच्या मेन्टेन होतील एनसीसवर गेलेत तर भविष्यात तुमच्या या बसेस मेन्टेन होणार नाहीत म्हणून यासाठी हा विषय आणलेला.

मा. महापौर :-

आपण ठराव मांडला आहे. मला वाटते आता खूप चर्चा झाली. ठराव मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २१ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता, दुसरा ठराव सुचक श्री. लियाकत शेख. अनुक्रमे दुसरा ठराव मी मतदानास टाकत आहे. सुचक श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ.

मा. महापौर :-

श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१, विरोधात २४ इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. २१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM या केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस GCC या तत्वावर चालविण्यासाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. २१ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. (Public Private Partnership)या तत्वावर खाजगी ठेकेदार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा.लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून शहरातर्गंत व शहराबाहेरील बस मर्गावर बसेस चालविणेसाठी JnNURM -I या योजने अंतर्गत प्राप्त ५० बसेस, तत्कालीन खाजगी ठेकेदार मे. महालक्ष्मी इन्फ्रा.प्रा.लि. यांच्या ५२ अशा १०२ बसेस चालविणेचा ठेका पूढील १० वर्षाच्या कालावधीत देणेत आलेला होता.

मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांना पी.पी.पी. तत्वावर ठेका प्रति कि. मिटर रु.१/- या रॉयल्टी तत्वावर देणेत आलेला होता. मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांचे कडुन निविदेद्वारे प्राप्त रॉयल्टी रु.१/- हे दर मे. सी. आय. आर. टी. संस्था (Central Institute of Road Transport) पूणे यांच्याकडे तपासुन ते आलेले दर योग्य असल्याचे सांगण्यात आले होते. यामध्ये मे. केस्ट्रल यांनी बसेस चालविणे, मेनटेनन्स, दुरुस्ती, वंगण- इंधन, व ड्रायव्हर, कंडक्टर, निरिक्षक, प्रवर्तक, तांत्रिक कर्मचारी नियुक्ती व वापर, तिकिटाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास प्रदान करणे हया बाबीचा समावेश होता. त्यानुसार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा.लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. तत्वावर बसेस चालविणेचा ठेका देणेत आला होता. करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार बसेस चालविणे, प्रति कि.मी १/- प्रमाणे रॉयल्टी रक्कम भरणे हे ठेकेदारास बंधनकारक होते. ठेकेदाराने माहे ऑक्टो. २०१० ते नोव्हेंबर २०११ पर्यंत रॉयल्टी रक्कम परिवहन फंडात जमा केली होती. त्यानंतर मात्र सातत्याने त्यांनी काही महिन्यांचा अपवाद वगळता रॉयल्टी रक्कम भरलेली नाही. सन २०१० ते मार्च २०१५ पर्यंत च्या कालावधीतील एकूण रॉयल्टी रक्कम रु.१,८१,७२,०४०/- (अक्षरी एक कोटी ऐक्याऐंशी लाख बहात्तर हजार चाळीस मात्र) इतकी थकीत आहे. पी.पी.पी. ठेकेदाराकडुन मंजूर मार्गावर पूर्ण क्षमतेने बसेस न चालविणे, बसेसची दुरूस्ती न करणे, बसेस मेनटेनन्स न करणे अशा तक्रारी प्रवासी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वांरवार येत होत्या. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून ठेकेदारास नोटीसा बजावण्यात आल्या. रॉयल्टी रक्कम वेळच्या वेळी भरत नसल्याने रॉयल्टी रक्कम भरणेसाठी तसेच शासनाकडील थकीत प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास अदा करणेसाठी नोटीसा बजावण्यात आल्या. परंतू मे. केस्ट्रल यांनी थकीत रॉयल्टी मिरा भाईंदर महानगरपालिका उपक्रमास अदा केली नाही. तसेच शासनाकडेही प्रवासी कर व बालपोषण अधिभार जमा केले नाही. सेवेतही कोणताही बदल न होता सेवा खालावत गेली. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र ४८ नुसार करारनामा रद्द करण्याची नोटीस मे. केस्ट्रल यांस दि. ३१/०१/२०१५ रोजी बजावण्यात आली.त्यानुसार मे. केस्ट्रल यांनी दि. ११/०२/२०१५ रोजीच्या पत्रात करारनाम्यातील अटीशर्तीनुसार लवादाची तरतुद असल्यामुळे लवाद नेमुन पुढील कार्यवाही करणे संदर्भात नमुद केले. त्यानुसार दोन्ही पक्षाच्या संमत्तीने श्री. आशुतोष कुंभकोणी, वरिष्ठ वकिल, उच्च न्यायालय, मुंबई यांची 'Arbitrator' म्हणून नियुक्ती केली गेली व पुढील कार्यवाही चालू आहे.

दरम्यानच्या कालावधीत JnNURM -II या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडुन १०० बसेस मंजूर झालेल्या असून डेपो साधन सामुग्री करिता व ITS ची अंमलबजावणीसाठी जागतिक बँककडुन अनुदान मंजूर झाले आहे. सदरच्या कालावधीत वरील परिच्छेदात नमुद केल्यानुसार पी.पी.पी. तत्वावरील बसेस सेवेची स्थिती पाहुन मनपा प्रतिनिधी, World Bank चे प्रतिनिधी, केंद्र शासन नियुक्त Consultant M/S. Deloitee व मनपाने नियुक्त केलेले Consultant UMTC यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या संयुक्त बैठकीत JnNURM -II या योजने अंतर्गत प्राप्त बसेस हया GCC तत्वावर चालविणे आवश्यक असून, GCC तत्वावर नेमलेल्या ठेकेदारास किलोमीटर प्रमाणे निश्चित रक्कम प्राप्त होणार असल्याने ठेकेदाराकडून नागरिकांना दर्जेदार बस सुविधा मिळणार असून GCC तत्वावर बसेस चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आलेल्या मे. UMTC या सल्लागाराकडून NCC (Net Cost Contract) व GCC (Gross Cost Contract) बाबत तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसारः-

अ) NCC - सदर तत्वावर बसेस चालविणेसाठी चालक नेमणे, बसेसचे मेनटेनन्स करणे, दुरूस्ती करणे, इंधन आणि वंगण याचा खर्च करणे, तिकिटाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय कर शासनास प्रदान करणे ही जबाबदारी ठेकेदाराची असते.

सदर तत्वावर बसेस चालविताना NCC ठेकेदाराकडून ज्या बस मार्गावर नफा (Profit) आहे अशाच बस मार्गावर व अशावेळी बसेस चालविल्या जातात. त्यामुळे सेवेवर विपरीत परिणाम होतो. सुरूवातीस चांगली सेवा दिली जाते, परंतू सिस्टीम विस्कळीत होते, ठेकेदारास सहन करावा लागणारा तोटा अनुदानाच्या रूपात उपक्रमाला भरून द्यावा लागतो. हे अनुदान निश्चित करणे, त्याचे पर्यवेक्षण करणे खुप कठीण असते, Frequencyन मिळता तसेच मेनटेनन्स न करता बसेसची Occupancyमिळविण्याकडे ठेकेदाराचा कल असतो. सदर तत्वावर निकृष्ट प्रतीचे मेनटेनन्स करण्याची ठेकेदाराची प्रवृत्ती वाढून काही वर्षानंतर ठेकेदाराकडून सेवा स्थगित केली जाण्याची शक्यता निर्माण होते.

ब) GCC – सदर तत्वामध्ये महानगरपालिकेने ठरविलेल्या बस मार्गावर Schedule प्रमाणे बसेस चालविणे, त्यासाठी वाहन चालक नेमणे , बसेसची दुरूस्ती करणे, मेनटेनन्स करणे, इंधन-वंगण यांचा खर्च करणेची जबाबदारी ठेकेदाराची असते. यामध्ये वाहक, प्रवर्तक, निरिक्षक कार्यालयीन कर्मचारी नियुक्ती करून तिकिट भाडयाच्या रूपात उत्पन्न गोळा करणे, प्रवासी कर, बालपोषण अधिभार शासनाकडे जमा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असते. यामध्ये काही नुकसान झाल्यास ते महानगरपालिकेकडून भरून दिले जाते. महानगरपालिकेकडून प्रती कि. मी.प्रमाणे निश्चित दर GCC तत्वावर नेमलेल्या ठेकेदारास द्यावे लागते.

मे.UMTC यांनी सादर केलेल्या Financial Analysis नुसार दोन्ही प्रकारच्या तत्वावर बसेस चालविणेसाठी तुट येणार आहे. NCC तत्वावर येणारी तुट भरून काढण्यासाठी महानगरपालिकेस ठेकेदारास अर्थसहाय्य करावे लागणार आहे. सबब World Bank प्रतिनिधी व केंद्रशासन नियुक्त सल्लागार यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार GCC तत्वावर बसेस चालविणे अधिक लाभदायक ठरणार असून नागरिकांना दर्जेदार सेवा देणेसाठी GCCतत्वावर बसेस चालविणे योग्य वाटते.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM -II अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस अधिक काळ पर्यंत चांगली सेवा देण्याकरिता GCC हया तत्वावर चालविणेची शिफारस मा. आयुक्त यांनी केलेली आहे.

तरी आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमा अंतर्गत बससेवा GCC (Gross Cost Contract) या तत्वावर चालविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. सुनिला शर्मा

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | निरंक |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | काझी रशीदा जमील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | शेख अशरफ मोहमद इब्राहिम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | रकवी सुहास माधवराव | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | लियाकत ग. शेख | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | अशोक तिवारी | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |
| ४१ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २२, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत माहिमेस मुदतवाढ देणेबाबत.

निलम ढवण :-

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ६(७)(८) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधील भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व ५ वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.२३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये अटीशर्तीच्या आधारे मान्यता दिलेली आहे. सदर मोहिमेची मुदत दि.०१/०४/२०१६ रोजी संपूष्टात आलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जांपैकी बहुतांश प्रकरणामध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असून यापैकी दोन प्रकरणामध्ये सहा इमारतींसाठी मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर केलेल्या प्रकरणासाठी आवश्यक असलेल्या रक्कमेचा भरणा करणेबाबत संबंधित विकासक, वास्तुविशारद व गृहनिर्माण संस्था यांना पत्र देण्यात आलेले असून सदर रक्कमेचा भरणा अद्याप करणेत आलेला नसल्यामुळे प्रकरणे निर्गमीत करणेत आलेले नाहीत.

सदर विशेष सवलत मोहिमेसाठी अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे सदर मोहिमेसाठी पुढील एक वर्षाची मुदतवाढ दिल्यास शहरामधील रहिवाशांना याचा फायदा होणार आहे.

सदर योजनेसाठी अर्ज करतांना आवश्यक कागदपत्राचा व अटीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे किंवा मंजूर चटईक्षेत्राच्या मर्यादित असणे आवश्यक आहे.

२) इमारतीच्या बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमाप्रमाणे अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक आहे.
३) अर्जासमवेत वास्तुविशारदाकडील इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे पुर्ण झालेबाबतचा पुर्णत्वाचा दाखला व संरचना अभियंता (Structural Engineer) यांचेकडील इमारत तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबतचा स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी किंवा इमारतीसाठी मालमत्ता कराची आकारणी कमितकमी पाच वर्षापुर्वीची असावी, म्हणजेच पाच वर्षा पेक्षा कमीचा कालावधी करिता वापरात असलेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी सदर सवलत लागु राहणार नाही.
५) इमारतीच्या बांधकाम परवानगीमध्ये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम किंवा रेन वॉटर हार्वेस्टींगची सुविधा पुरविणेबाबतची अट नमुद असल्यास त्याप्रमाणे सोलार वॉटर हिटींग सिस्टीम व रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वीत केलेली असावी किंवा संबंधीत गृहनिर्माण संस्थेने याबाबतची पूर्तता करणे बाबतचे हमीपत्र सादर करावे.
६) इमारतीसाठीच्या मोकळया जागेच्या कराचा भरणा संपूर्ण केलेला असावा.
७) सदर विशेष मोहिमेनुसार दंडनिय शुल्क रु.२००/- प्रती चौ.मी. आकारण्यात यावी.

सबब वरिलप्रमाणेच्या अटीशर्तीसह व मोहिमेची तेवढी प्रसिध्दी न झाल्याने महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत मोहिमेस दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम आमची सूचना आहे ही मोहिम २०२० पर्यंत करा. तुम्ही घेत असाल तर.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम यह विषय लाया बहुत अच्छा विषय है की, सोसायटी को न्याय मिले। लेकिन बहुतसी सोसायटीयाँ ऐसी है जहाँ पे रहने के लिए दे दिया है बिल्डरने विकासकने लेकिन आज तक उनको भोगवटा दाखला बिल्डर नही देता है और सोसायटी भी उस परिस्थिती में है की वो उतना पैसा भर नही सकती है। जो बिल्डर अगर सक्षम होते हुए भी भोगवटा दाखला नही देता है सोसायटी को तो इसके उपर क्या कारवाई की जानी चाहिए।

प्रमोद सामंत :-

बरोबर आहे आयुक्त साहेब उत्तर द्या.

दिनेश जैन :-

आयुक्त साहेब आमच्या शांती नगर परिसरामध्ये खूप सोसायट्या माझ्या प्रभागामध्ये पण ज्यांना आजपर्यंत भोगवटा दाखला भेटलेला नाही आणि तिथे लोक १०-१५ वर्षापासून राहत आहे आणि आमचे तेथील विकासक पण सक्षम आहेत पैसे भरण्यासाठी पण ते पैसे भरत नाहीत आणि सोसायटी गरीब असून त्यांच्या जवळ पैसे नाहीत म्हणून त्यांना आजपर्यंत भोगवटा दाखला भेटलेला नाही तर आपल्याला या विकासकावर काय कारवाई करता येईल?

मा. आयुक्त :-

या विषयाशी संबंधित विषयच नाही तो.

दिनेश जैन :-

नाही साहेब भोगवटा दाखल्याचा विषय आहे तो. महापौर मॅडम, आपण एका बाजूला सोसायटीला न्याय देतो साहेब.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम, आमचा एक विषय आहे आयुक्त साहेब, हे जे तुम्ही २६७ (अ) प्रमाणे तुम्ही जी शास्ती लावली ज्यांनी भोगवटा घेतला नाही तुम्ही म्हणतात भोगवटा दाखला घेण्याकरिता आपण २०१८ पर्यंत मुदत दिली आहे पण जी लोक आमच्या एरियामध्ये ६-७ मालाच्या बिल्डींग आहेत त्याच्यातले काही विकासकांनी २-३ फ्लॅट इललिगल कन्स्ट्रक्ट केलेत परंतु संपुर्ण इमारतीला शास्ती लावली आहे. आता ॲक्च्युअली १ एप्रिल २००८ चा जी.आर. जो आहे त्यानुसार फक्त ज्यांनी इललिगल कन्ट्रक्शन केले आहे तेवढ्या एरिया करिता तुम्ही शास्ती लावायची आहे. आमच्या विभागात अशा भरपूर बिल्डींग आहेत साहेब. जर ते इललिगल कन्स्ट्रक्शन जे झाले आहे तेवढ्या पुरताच तुम्ही शास्ती लावावी आणि भोगवटा दाखला घेण्याकरिता....

मा. महापौर :-

सुहासजी शायद शास्ती का यह विषय नही है।

दिनेश जैन :-

मै तो विषयपें बोल रहा हुँ महापौर मॅडम की, सोसायटी का क्या गलती है यहाँपे और ऐसा बताया जाए की, जिनको आज तक भोगवटा दाखला नही मिला उसका गलती क्या है। और आगे आपण बिल्डर

को परमिशन दे रहे है उसके उपर कुछ कारवाई नही कर रहे है उसका काम चालु है क्यो नही रुका रहे हो।

सुहास रकवी :-

महापौर मॅडम, तुम्ही जी ओ.सी. देणार आहे ती पार्ट ओ.सी. देणार का संपूर्ण बिल्डींगला देणार. सोसायटी ५ वर्षापुर्वी स्थापित झाली असेल.

दिलीप घेवारे :-

रेग्युलराईज करुन देणार.

सुहास रकवी :-

नाही पण ते इललिगल.................

दिनेश जैन :-

घेवारे साहेब को बोलो खुलासा करे महापौर मॅडम.

नरेंद्र मेहता :-

ओ.सी. चा विषय आहे यासाठी की ज्यांनी घेतली नाही त्याला सवलत दिली म्हणजे कागदपत्र सादर करुन करायचं आहे. ओ.सी. चा कायदा आपण म्हटल तर पहिले बिल्डींग वेकेंट करा नंतर बिल्डरवर एम.आर.टी.पी. या दोन्ही आहे. बिल्डींग आपल्याला वेकेंट करता येणार नाही आणि शहराला एम.आर.टी.पी. लावता येणार नाही. त्यावर हा विषय आहे तर विषय चर्चेला घ्या.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

ज्याने भोगवटा दाखला घेतला नाही त्याला परवानगी देता येते काय? त्याच काम बंद करा ना पहिले भोगवटा दाखला द्या ज्यांचा बाकी आहे त्यांना..............

प्रमोद सामंत :-

आयुक्त साहेब विषय चांगला आहे. मला घेवारे साहेब आणखी एक माहिती द्या त्या बरोबर की आपण जवळ-जवळ एक वर्षापेक्षा जास्त झाल ही सवलत जाहिर करुन या वर्षभरात किती लोकांचे ॲप्लीकेशन आले आणि आपण किती लोकांना ओ.सी. दिल्या हे पण त्यामध्ये सांगावे आणि जो सन्मा. सदस्य दिनेश जैनने विषय काढलेला आहे हा विषय अगदी लक्षपूर्वक जशी विशेष सभा आपण त्या...........

मा. आयुक्त :-

विषय लक्षामध्ये आलेला आहे. खुलासा करायला उभे आहेत ते.

सुहास रकवी :-

तुम्ही प्रायव्हेट ओ.सी. देणार का?

मा. महापौर :-

ते खुलासा करत आहेत ना.

दिलीप घेवारे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो दिनेशजी साहेबांनी जो विषय काढलेला आहे की ओ.सी. ज्या बिल्डरने घेतली नाही त्याच्यावर काय कारवाई करणार आणि तिथे काम दूसरे का सुरु आहे. वास्तविक दोन्ही काम वेगवेगळी आहेत नंबर एक आणि नंबर दोन ज्यांनी आता आम्ही शोध मोहित सुरु केली आहे जेवढ्या परवानग्या दिल्या आतापर्यंत नगरपालिका काळापासून त्यांना सर्वांना आम्ही नोटीस काढतोय आणि ज्या-ज्या लोकांनी ओ.सी. घेतली नाही त्यांना एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार ज्या काही कारवाई करता येतील ते आम्ही करण्याचे प्रयत्न करतो.

दिनेश जैन :-

एकच लेआऊट आहे शांतीनगर. वेगवेगळे लेआऊट नाहीत. दिशाभूल करु नका. महासभेची, सभागृहाची तुम्ही दिशाभूल करु नका ते पूर्ण शांतीनगर एकच लेआऊट आहे. आपल्या म्हणण्याप्रमाणे ते दुकान लेआऊट नाही. आपण विकासकाला का पाठिंबा घालतो.

जुबेर इनामदार :-

त्या गोरगरिबांनी ज्यांनी घरे घेतली त्यांना कशाला वेठीस धरता त्या विकासकावर करा. विकासक गेला निघून.

मा. आयुक्त :-

ते न्यायप्रविष्ठ आहे त्याच्यावर चर्चा कशाला करता.

(सभागृहात गोंधळ)

प्रकरण क्र. २२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत माहिमेस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्र. २२ :-

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ६(७)(८) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधील भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व ५ वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.२३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये अटीशर्तीच्या आधारे मान्यता दिलेली आहे. सदर मोहिमेची मुदत दि.०१/०४/२०१६ रोजी संपूष्टात आलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जांपैकी बहुतांश प्रकरणामध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असून यापैकी दोन प्रकरणामध्ये सहा इमारतींसाठी मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर केलेल्या प्रकरणासाठी आवश्यक असलेल्या रक्कमेचा भरणा करणेबाबत संबंधित विकासक, वास्तुविशारद व गृहनिर्माण संस्था यांना पत्र देण्यात आलेले असून सदर रक्कमेचा भरणा अद्याप करणेत आलेला नसल्यामुळे प्रकरणे निर्गमीत करणेत आलेले नाहीत.

सदर विशेष सवलत मोहिमेसाठी अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे सदर मोहिमेसाठी पुढील एक वर्षाची मुदतवाढ दिल्यास शहरामधील रहिवाशांना याचा फायदा होणार आहे.

सदर योजनेसाठी अर्ज करतांना आवश्यक कागदपत्राचा व अटीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे किंवा मंजूर चटईक्षेत्राच्या मर्यादित असणे आवश्यक आहे.
२) इमारतीच्या बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमाप्रमाणे अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक आहे.
३) अर्जासमवेत वास्तुविशारदाकडील इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे पुर्ण झालेबाबतचा पुर्णत्वाचा दाखला व संरचना अभियंता (Structural Engineer) यांचेकडील इमारत तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबतचा स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी किंवा इमारतीसाठी मालमत्ता कराची आकारणी कमितकमी पाच वर्षापुर्वीची असावी, म्हणजेच पाच वर्षा पेक्षा कमीचा कालावधी करिता वापरात असलेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी सदर सवलत लागु राहणार नाही.
५) इमारतीच्या बांधकाम परवानगीमध्ये सोलार वॉटर हिटींग सिस्टींम किंवा रेन वॉटर हार्वेस्टींगची सुविधा पुरविणेबाबतची अट नमुद असल्यास त्याप्रमाणे सोलार वॉटर हिटींग सिस्टीम व रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वीत केलेली असावी किंवा संबंधीत गृहनिर्माण संस्थेने याबाबतची पूर्तता करणे बाबतचे हमीपत्र सादर करावे.
६) इमारतीसाठीच्या मोकळया जागेच्या कराचा भरणा संपूर्ण केलेला असावा.
७) सदर विशेष मोहिमेनुसार दंडनिय शुल्क रु.२००/- प्रती चौ.मी. आकारण्यात यावी.

सबब वरिलप्रमाणेच्या अटीशर्तीसह व मोहिमेची तेवढी प्रसिध्दी न झाल्याने महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत मोहिमेस दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय भोगवटा दाखल्याचा विषय आहे न्यायप्रविष्ठ काय आहे?

मा. आयुक्त :-

एवढा स्पष्ट खुलासा केल्यानंतर परत तुम्ही शंका..........

(सभागृहात गोंधळ)

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २३, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शासकीय कार्यालयांना भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी महानगरपालिकेमार्फत शासकीय कार्यालगतच्या जागा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे -

| अनु.क्र. | नाव | प्रति महिना | भाड्याने दिल्याचा दिनांक | थकबाकी बाकी |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.), उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय | रु. १६,४७८/- | दि.२७/०१/२००९ | रु.१४,३३,५८६/- |
| २ | भाईंदर (प.), रेल्वेस्थानकाजवळील इमारती मधील राज्य परिवहन महामंडळ (एस.टी. डेपो जागा) | रु. ७४८८/- | दि.०१/०९/२००१ | रु.१३,१०,४००/- |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) पहिला मजला, तलाठी कार्यालय | रु. ८०७२/- | दि.०१/११/१९९९ | रु.१५,९०,१८४/- |
| ४ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील सह.दुय्यम निबंधक कार्यालय | रु. १२१७४७/- | दि.२१/०१/२०१३ ते दि.३१/१२/२०१७ | रु.२८,४८,८८०/- |

वरील सर्व शासकीय कार्यालयांना वेळोवेळी भाडे भरण्याबाबत पत्र व सुचना नोटिसा देवूनही त्यांनी अद्यापपर्यंत भाड्याचा भरणा केलेला नाही. सदर जागा ह्या शासकीय कार्यालयासाठी वापरण्यात येत असल्याने व संबंधीत भाडे भरीत नसल्यास महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करुन जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया करण्यास ही सभा मान्यता देत आहे. शहरात सर्व शासकीय कार्यालयाचे आवश्यक असल्याने एक एकर जागेत अशा सर्व शासकीय कार्यालयाना जागा देणेसाठी विकास योजनेत सदर आरक्षण दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्याचा प्रस्ताव तयार करुन पुढील महासभेत सादर करावा. भाईंदर (पु.) खारीगाव येथील रंगमंच सवलतीच्या दरात ३० वर्ष मुदतीसाठी श्री सत्यनारायण विश्वस्त मंडळ यांना भाड्याने देण्याकरीता तसेच धार्मिक संस्थांना सवलती दरानुसार व महानगरपालिकेस विनामुल्य देण्याच्या अटीशर्तीवर ही सभा मान्यता देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) विनायक नगर समाज मंदीर तसेच इतर ठिकाणी असलेल्या जागा मागणीनुसार योगासन/व्यायाम साठी सवलतीच्या दरात देणेसाठी ही सभा मंजुरी देत असून मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

मुन्ना सिंग :-

माझे अनुमोदन आहे.

सुहास रकवी :-

महापौर मॅडम तुम्ही ज्या योजना आणतात सवलत योजना, अभय योजना तर आमच्या विभागातील त्या सोसायट्यांना तुम्ही अभय देता की मुद्दाम सांगता प्रायव्हेट ओ.सी. मिळणार की नाही ते आम्ही विचारलं.

मा. महापौर :-

जे नियमात नाही ते तुम्ही विचारत आहात.

सुहास रकवी :-

नियमात कसं नाही. तुम्ही अभय योजना याच्या अंतर्गत ठाण्याला जे महानगरपालिकेने अभय योजना प्रायव्हेट ओ.सी. दिलेली आहे.

मा. महापौर :-

प्रायव्हेट ओ.सी. ते देऊच शकत नाही.

सुहास रकवी :-

प्रायव्हेट ओ.सी. ठाण्याला दिलेली आहे मॅडम.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम प्रकरण क्र. २३ वर बोलतो तुम्ही काय ठराव केला प्रॉपर्टी जमा करायचा केला की आपली प्रॉपर्टी आपण ताब्यात घ्यायची काय केले?

नरेंद्र मेहता :-

आयुक्तांना अधिकार दिलेत.

रोहिदास पाटील :-

आयुक्तांना काय अधिकार दिलेत आपल्याला वसुली कसली करणार आहे. आयुक्त पैसे घेऊन बसलेले आहेत.

नरेंद्र मेहता :-

काय?

मा. आयुक्त :-

कशाचे पैसे?

रोहिदास पाटील :-

माझं बोलण मजेमध्ये घेऊ नका. रेकॉर्डींग होत आहे याची मला जाणीव आहे. मी पत्र वाचतोय महापौर मॅडम आयुक्त साहेब माझ्या हातात पत्र आहे. रोहिदास पाटील, नगरसेवक, मिरा भाईंदर महानगरपालिका. विषय मिरा भाईंदर मनपाला देण्यात येणाऱ्या भाड्याच्या थकबाकीबाबत. संदर्भ आपले पत्र क्र.१२०२/२०१६ दि. १०/५/२०१६. महोदय, वरील विषय संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की या कार्यालयामार्फत दि. १/०३/२०१४ ते ३१/१२/२०१५ या कालावधीचे एकूण २२ महिन्याचे जागा भाडे वाजवी भाडे प्रमाणपत्रान्वये प्रतिमहा दर रु.१,२१,७४७ प्रमाणे एकूण रक्कम २६,७८,४३४ इतकी जागा भाडे रक्कम. रक्कम मिरा भाईंदर मनपा त्यांना दिलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया भाईंदर खाते क्र. १०२५४४१९०६३ यावर दि. ४/०३/२०१६ रोजी जमा करण्यांत आलेले आहे. आपल्याकडे भाडे जमा झाले आणि आपण ठराव करतो वसुलीचा मॅडम जागा परत घ्यायचा ते काय आहे?

मा. आयुक्त :-

कुणाचं भाडे.

रोहिदास पाटील :-

हे रजिस्टर्ड ऑफिसच आहे सन जिल्हा निबंधक वर्ग क्र. १............

दिपक खांबित :-

मा. महापौरच्या परवानगीने बोलतो हो जो विषय आणला आहे हा एप्रिल २०१६ मध्ये आम्ही दिला होता महासभेमध्ये घेण्याकरिता आणि ते भाड्याचं पत्र ४-५ दिवसांपूर्वीच आलेले आहे. ज्यांनी भाडे जमा केले असतील त्यांच्यावर कारवाई नाही करणार आपण.

रोहिदास पाटील :-

ऐकून घ्या माझ्याकडे ९ तारखेचे पत्र आहे.

मा. आयुक्त :-

काका आम्ही अगोदर हा विषय महासभेला दिला होता. परंतु आचार संहिता लागली आणि मेन टाईममध्ये जर पैसे भरले असतील तर त्याच्यावर कारवाई करणार नाही. ज्यांनी पैसे भरलेत त्यांच्यावर कशाला कारवाई करु ज्यांनी पैसे भरले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी हा प्रस्ताव आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. २३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शासकीय कार्यालयांना भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबत.

ठराव क्र. २३ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी महानगरपालिकेमार्फत शासकीय कार्यालगतच्या जागा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे -

| अनु.क्र. | नाव | प्रति महिना | भाड्याने दिल्याचा दिनांक | थकबाकी बाकी |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.), उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय | रु. १६,४७८/- | दि.२७/०१/२००९ | रु.१४,३३,५८६/- |
| २ | भाईंदर (प.), रेल्वेस्थानकाजवळील इमारती मधील राज्य परिवहन महामंडळ (एस.टी. डेपो जागा) | रु. ७४८८/- | दि.०१/०९/२००१ | रु.१३,१०,४००/- |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) पहिला मजला, तलाठी कार्यालय | रु. ८०७२/- | दि.०१/११/१९९९ | रु.१५,९०,१८४/- |
| ४ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील सह.दुय्यम निबंधक कार्यालय | रु. १२१७४७/- | दि.२१/०१/२०१३ ते दि.३१/१२/२०१७ | रु.२८,४८,८८०/- |

वरील सर्व शासकीय कार्यालयांना वेळोवेळी भाडे भरण्याबाबत पत्र व सुचना नोटिसा देवूनही त्यांनी अद्यापपर्यंत भाड्याचा भरणा केलेला नाही. सदर जागा ह्या शासकीय कार्यालयासाठी वापरण्यात येत असल्याने व संबंधीत भाडे भरीत नसल्यास महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील

तरतुदीनुसार कार्यवाही करुन जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया करण्यास ही सभा मान्यता देत आहे. शहरात सर्व शासकीय कार्यालयाचे आवश्यक असल्याने एक एकर जागेत अशा सर्व शासकीय कार्यालयाना जागा देणेसाठी विकास योजनेत सदर आरक्षण दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करण्याचा प्रस्ताव तयार करुन पुढील महासभेत सादर करावा. भाईंदर (पु.) खारीगाव येथील रंगमंच सवलतीच्या दरात ३० वर्ष मुदतीसाठी श्री सत्यनारायण विश्वस्त मंडळ यांना भाड्याने देण्याकरीता तसेच धार्मिक संस्थांना सवलती दरानुसार व महानगरपालिकेस विनामुल्य देण्याच्या अटीशर्तीवर ही सभा मान्यता देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) विनायक नगर समाज मंदीर तसेच इतर ठिकाणी असलेल्या जागा मागणीनुसार योगासन/व्यायाम साठी सवलतीच्या दरात देणेसाठी ही सभा मंजुरी देत असून मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २४, विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ दि. ८ मार्च २०१६ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.१० कोटी एवढा ''विशेष निधी'' मंजुर करण्यात आला आहे. सदर १० कोटी रकमेत रु.१०.०० कोटी महानगरपालिकेचा हिस्सा लावून एकूण रु.२०.०० कोटी प्रकल्पावर खर्च करावयाचा आहे. सदर २० कोटी रकमेचे प्रस्ताव तयार करुन त्यास प्रथम महासभेची मान्यता घ्यावी लागेल. तद्नंतर सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय समितीपुढे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस तरतूद करावयाची रु.१० कोटी रक्कम सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कर्ज निधीतून उभारावयाची आहे. त्यानूसार खालील कामे ''विशेष निधी''तून प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | उत्तन येथे मार्केट स्थलांतरीत करण्यासाठी मार्केट मागील नाल्याची बांधणी करणे. | रु.४,१८,००,०००/- |
| २) | मिरारोड (पुर्व) शांतीपार्क बालाजी हॉटेल ते देना बॅक पर्यंतचा रस्ता सीमेंट कॉक्रीटचा तयार करणे. | रु.६,८१,१७,६००/- |
| ३) | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२१ वाचनालय बांधणे. | रु.२,७८,३०,०००/- |
| ४) | मिरारोड (पूर्व) अयप्पा मंदिर शेजारील नाल्यावर स्लॅब टाकणे. | रु.६०,००,०००/- |
| ५) | भाईंदर (प.) गणेश देवल येथे शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ६) | राष्ट्रीय महामार्गालगत आरक्षण क्र. ३६७ शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ७) | मिरारोड (पूर्व) हैदरी चौक ते नरेंद्र पार्क सर्कल कॉक्रीट रस्ता करणे. | रु.२,६२,५२,४००/- |
| ८) | मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क रस्त्यालगत आरक्षण क्र. ३३१ मार्केट शेड बांधणे. | रु.१,००,००,०००/- |
| ९) | भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क येथे कम्यूनिटी हॉल बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| | एकूण | रु.२०,००,००,०००/- |

तरी, शासन निर्णयानूसार महानगरपालिकेस प्राप्त होणारे रु.१०.०० कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा रु.१०.०० कोटीची तरतूद सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करून त्यामधून वरील प्रमाणे प्रस्तावित कामे हाती घेण्यासाठी तसेच सदर निधी व्यतिरीक्त लागणारा निधी पुर्नःविनीयोजनाद्वारे उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील कामांना देखील प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | आरक्षण क्र.२३५ विकसीत करणे | मंजुर अंदाजपत्रकीय खर्च<br>रु.४,९८,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | | सुधारीत अंदाजपत्रक रु.६,८४,००,०००/- |
| २) | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ दहिसर चेक नाका ते काशिमिरा नाक्यापर्यंत सर्व्हीस रस्त्यालगतचा रस्ता रुंदीकरण करुन गटार बांधणे | मुळ अंदाजपत्रक रु.४,१०,२५,५००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.९,५५,२५,४००/- |
| ३) | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर फाऊंटन हॉटेल ते काशिमिरा पोलिस स्टेशन व पुढे ठाकुर मॉल पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे व गटार बांधणे | मुळ अंदाजपत्रक रु.४,२८,५०,४००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.८,५३,२७,७००/- |
| ४) | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते रुंदीकरणाकरीता गटारे, स्लॅब फुटपाथ इ. कामे करणे. | रु.२,००,००,०००/- |
| ५) | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते रुंदीकरणाच्या ठिकाणी रस्ते तयार करणे | रु.२,००,००,०००/- |
| ६) | मिरारोड (पु.) कानुगो इस्टेट (अल्ला हजरत) येथील उद्यानाचा विकास करणे | रु.२०,००,०००/- |
| ७) | मिरारोड (पु.) नयानगर गंगा कॉम्प्लेक्स येथील रस्त्याची दुरुस्ती करणे | रु.१०,००,०००/- |
| ८) | मिरारोड (पु.) नयानगर गंगा कॉम्प्लेक्स येथील सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी गटार बांधणे (बहुल नागरी क्षेत्र) | रु.१०,००,०००/- |

वरील कामांपैकी अ.क्र. १, २ व ३ कामे ही मुळ अंदाजपत्रकातील मंजूर दरानुसार व स्थायी समितीने निविदा मंजूर केलेल्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

सचिव साहेब त्यामध्ये एक सुधारणा करण्यात यावी की मोदी नगर ऐवजी गणेश देवल नगर राखण्यात आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम इसके अंदर ८ नंबर का काम है जिसमें लिखा हुआ है की मिरारोड पूर्व प्लेझेंट पार्क लगत आरक्षण ३३१ मार्केट शेड बांधणे १ कोटी का दिया है। लेकिन यह प्रस्ताव तो अभी फेरबदल के अंदर में किया हुआ है। अभी ३७ का कारवाई करने के लिए वो ठराव हुआ है। यह मार्केट का ३३१ का तो यह क्या है ३३१ मैं?

नरेंद्र मेहता :-

मार्केट त्याच ठिकाणी त्याच ४ आरक्षणामध्ये मार्केट अजून तिकडे आहे.

भगवती शर्मा :-

नही नही वो कितने का किया? आरक्षण का उसमें ३९ का भी ठराव है।

दिपक खांबित :-

मार्केट है वहाँ पे।

भगवती शर्मा :-

मार्केट है तो उसमें कितने क्षेत्र का?

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विषय विकास निधीचा विषय आणलेला आहे. विषय चांगला आहे राज्य शासन पैसे देणार १० कोटी रुपये दिले अतीसुंदर, चांगल आहे. अजून १० द्या. अहो आपण परत कर्ज घ्यायचा, एका बाजूला २६० कोटीचा कर्ज घ्यायला निघालात. परत अजून १० कोटीचा कर्ज. शहराला काय कर्ज बाजारी करायचं आहे का? १० कोटी आले तर १० कोटीचे काम करा. पुढच्यावेळी १० कोटी आले तर परत ते १० कोटीचे काम पूर्ण करा. मी प्रकरण क्र. २४ चा ठराव वाचतो. शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ दि. ८ मार्च २०१६ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.१० कोटी एवढा "विशेष निधी" मंजुर करण्यात आला आहे. सदर १० कोटी रकमेत रु.१०.०० कोटी महानगरपालिकेचा हिस्सा लावून एकूण रु.२०.०० कोटी प्रकल्पावर खर्च करावयाचा आहे. सदर २० कोटी रकमेचे प्रस्ताव तयार करुन त्यास प्रथम महासभेची मान्यता घ्यावी लागेल. तद्नंतर सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय समितीपुढे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस तरतूद

करावयाची रु.१० कोटी रक्कम सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कर्ज निधीतून उभारावयाची आहे. त्यानुसार गोषवाऱ्यामध्ये दिलेल्या परिशिष्टाच्या अनुक्रमांक १ ते ९ ''विशेष निधी'' तुन करावयाच्या विकास कामांचा प्रस्ताव मान्यतेसाठी पालिका प्रशासनाने मा. महासभेसमोर सादर केलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अनेक योजना सुरु आहेत. तसे ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना, भुयारी गटार योजना, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, विकास आराखड्यातील रस्ते व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (पर्जन्य जलवाहिनी) यासाठी एकूण कर्ज २५९ कोटी ५ लक्ष २२ हजार एवढे कर्ज घेतलेले असून सद्यस्थितीत १७१ कोटी ५४ लक्ष ५८ हजार इतकी शिल्लक अदा करणे बाकी आहे. या परिस्थितीचे अवलोकन करता नवीन कर्ज घेणे महापालिकेच्या आर्थिक हिताचे नाही. शासनाच्या आदेशानुसार सातवे वेतन आयोग व किमान वेतन अदा करणे बंधनकारक आहे व महापालिकेच्या उत्पन्नाचा नविन स्त्रोत प्रस्तवित नसताना अशा प्रकारचा कर्ज स्वरुपाचा अतिरिक्त आर्थिब बोजा पालिकेला पेलवणार नाही.

तरी शहराच्या विकासाच्या हितात कॉक्रीटचे रस्ते बनणे गरजेचे असल्याने मुलभुत सोयी सुविधांचा विकास अंतर्गत मंजूर रु. १० कोटी विशेष निधी मधुनच मिरा भाईंदर शहर विकास कामांचा प्रस्ताव पुढील मा. महासभेसमोर प्रस्तावित करावे, असा मी ठराव मांडत आहे.

वंदना चक्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मतदानाला घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

मा. महापौर :-

श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१ विरोधात २३ इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. २४ :-

विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. २४ :-

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ दि. ८ मार्च २०१६ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.१० कोटी एवढा ''विशेष निधी'' मंजुर करण्यात आला आहे. सदर १० कोटी रकमेत रु.१०.०० कोटी महानगरपालिकेचा हिस्सा लावून एकूण रु.२०.०० कोटी प्रकल्पावर खर्च करावयाचा आहे. सदर २० कोटी रकमेचे प्रस्ताव तयार करुन त्यास प्रथम महासभेची मान्यता घ्यावी लागेल. तद्नंतर सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय समितीपुढे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस तरतूद करावयाची रु.१० कोटी रक्कम सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कर्ज निधीतून उभारावयाची आहे. त्यानूसार खालील कामे ''विशेष निधी''तून प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | उत्तन येथे मार्केट स्थलांतरीत करण्यासाठी मार्केट मागील नाल्याची बांधणी करणे. | रु.४,१८,००,०००/- |
| २) | मिरारोड (पुर्व) शांतीपार्क बालाजी हॉटेल ते देना बॅक पर्यतचा रस्ता सीमेंट कॉक्रीटचा तयार करणे. | रु.६,८१,१७,६००/- |
| ३) | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२१ वाचनालय बांधणे. | रु.२,७८,३०,०००/- |
| ४) | मिरारोड (पूर्व) अयप्पा मंदिर शेजारील नाल्यावर स्लॅब टाकणे. | रु.६०,००,०००/- |
| ५) | भाईंदर (प.) गणेश देवल येथे शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ६) | राष्ट्रीय महामार्गालगत आरक्षण क्र. ३६७ शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ७) | मिरारोड (पूर्व) हैदरी चौक ते नरेंद्र पार्क सर्कल कॉक्रीट रस्ता करणे. | रु.२,६२,५२,४००/- |
| ८) | मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क रस्त्यालगत आरक्षण क्र. ३३१ मार्केट शेड बांधणे. | रु.१,००,००,०००/- |
| ९) | भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क येथे कम्यूनिटी हॉल बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| | एकूण | रु.२०,००,००,०००/- |

तरी, शासन निर्णयानूसार महानगरपालिकेस प्राप्त होणारे रु.१०.०० कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा रु.१०.०० कोटीची तरतूद सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करून त्यामधून वरील प्रमाणे प्रस्तावित कामे हाती घेण्यासाठी तसेच सदर निधी व्यतिरीक्त लागणारा निधी पुर्न:विनीयोजनाव्दारे उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील कामांना देखील प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | आरक्षण क्र.२३५ विकसीत करणे | मंजुर अंदाजपत्रकीय खर्च रु.४,९८,००,०००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.६,८४,००,०००/- |
| २) | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ दहिसर चेक नाका ते काशिमिरा नाक्यापर्यंत सर्व्हीस रस्त्यालगतचा रस्ता रुंदीकरण करुन गटार बांधणे | मुळ अंदाजपत्रक रु.४,१०,२५,५००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.९,५५,२५,४००/- |
| ३) | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर फाऊंटन हॉटेल ते काशिमिरा पोलिस स्टेशन व पुढे ठाकुर मॉल पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे व गटार बांधणे | मुळ अंदाजपत्रक रु.४,२८,५०,४००/- सुधारीत अंदाजपत्रक रु.८,५३,२७,७००/- |
| ४) | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते रुंदीकरणाकरीता गटारे, स्लॅब फुटपाथ इ. कामे करणे. | रु.२,००,००,०००/- |
| ५) | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते रुंदीकरणाच्या ठिकाणी रस्ते तयार करणे | रु.२,००,००,०००/- |
| ६) | मिरारोड (पु.) कानुगो इस्टेट (अल्ला हजरत) येथील उद्यानाचा विकास करणे | रु.२०,००,०००/- |
| ७) | मिरारोड (पु.) नयानगर गंगा कॉम्प्लेक्स येथील रस्त्याची दुरुस्ती करणे | रु.१०,००,०००/- |
| ८) | मिरारोड (पु.) नयानगर गंगा कॉम्प्लेक्स येथील सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी गटार बांधणे (बहुल नागरी क्षेत्र) | रु.१०,००,०००/- |

वरील कामांपैकी अ.क्र. १, २ व ३ कामे ही मुळ अंदाजपत्रकातील मंजूर दरानुसार व स्थायी समितीने निविदा मंजूर केलेल्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :-श्री. नरेंद्र मेहता    अनुमोदक :-  श्री. प्रशांत केळूसकर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | अनिता जयवंत पाटील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | काझी रशीदा जमील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | लियाकत ग. शेख | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | भोईर कमलेश यशवंत | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | अशोक तिवारी | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |
| ४१ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कारवाई केलेली वाहने ठेवण्यासाठी वाहतुक विभागास जागा देणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी नो पार्कींग क्षेत्रात उभी राहणाऱ्या वाहनांवर तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर वाहतुक शाखेमार्फत कारवाई करुन सदर वाहने जमा करण्यात येतात. सद्यस्थितीत सदर वाहने वाहतुक विभागामार्फत एम.आय.डी.सी. च्या भुखंडावर ठेवण्यात येतात. सदर भुखंड ताब्यात घेण्याची प्रक्रीया एम.आय.डी.सी. मार्फत सुरु आहे. दरम्यानच्या काळात सदर जागा अत्यंत अपुरी असून वाहतुक शाखेकडे कारवाई केलेली वाहने ठेवण्यास जागा नसल्याने शहरातील वाहनांवर कारवाई करुन वाहने जमा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत सद्यस्थितीत वाहतुक विभागासाठी आरक्षित जागा नाही. त्यासाठी नविन विकास आराखड्यात जागा आरक्षित करण्याची प्रक्रीया करता येईल, तथापी सद्यस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या ताब्यातील व विकसित न झालेला आरक्षणाचा भुखंड तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यासाठी व शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन सदर वाहने उभी करण्यास वाहतुक विभागास जागा उपलब्ध होऊन कामास मदत होईल. तरी मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील असलेल्या जागांपैकी ज्या आरक्षाणाचा विकास सद्यस्थितीत करण्यात येणार नाही अशा आवश्यक जागा निश्चित करून वाहन ठेवण्यासाठी वाहतूक विभागास तात्पुरत्या स्वरूपात देण्याची कार्यवाही करण्यासाठी तसेच खाजगी जागेवर देखील वाहने ठेवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करुन जागा देणेसाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत असून सदर कार्यवाहीस मंजूरी देत आहे. त्याचबरोबर शहरात सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्याप्रमाणात वाहने बस, डंपर उभ्या राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यासाठी मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील असलेल्या जागांपैकी ज्या आरक्षणाचा विकास सद्यस्थितीत करण्यात येणार नाही अशा जागेवर तसेच शहरातील खाजगी जागेवर देखील पार्किंग करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करुन जागा तात्पुरत्या स्वरुपात पार्किंगकरीता जागा निश्चित करुन दोन वर्ष मुदतीसाठी पार्किंगचा ठेका देण्यास परवानगीसाठी व सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देत आहे. सदर कार्यवाही करताना महानगरपालिकेने पार्किंग चार्जेस सद्यस्थितीत टोईंगचे असलेले दर पार्किंगचे घ्यावयाचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गाडीचा प्रकार | सध्याचे टोईंग दर | सुधारीत टोईंग दर | पार्किंग दर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ तास | पुढील २ तास | २४ तास |
| १ | दुचाकी | १०० | २०० | ५० | ५० | २०० |
| २ | कार | २०० | ४०० | १०० | १०० | ४०० |
| ३ | ऑटो | १०० | २०० | ५० | ५० | २०० |
| ४ | टेम्पो | ४०० | ६०० | १५० | १५० | ६०० |
| ५ | ट्रक/बस | ६०० | ९०० | २०० | २०० | ९०० |

२४ तासानंतर पुढील दिवसाचे दर लागु राहतील.

वरील प्रमाणे वाहन विभागास ४ टोईंग उपलब्ध करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया करावी तोपर्यंत वरीलप्रमाणे सुधारीत दर घेण्यात यावे. वरीलप्रमाणे ठरविलेले दर हे खाजगी जागेवरील पार्किंगना देखील लागु राहतील. मा. आयुक्त यांनी गरज पडल्यास शहरात ४ पार्किंग विविध ठिकाणी करण्यासाठी खाजगी जागा ताब्यात घेवून त्यावर देखील पार्किंग करण्यास परवानगी द्यावी आवश्यक वाटल्यास अशा जागा मालकांना जागेचे भाडे/अनुदान देण्यात यावे.

वरील प्रमाणे सर्व आवश्यक कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम यह क्या है? जागा मिळणेबाबत ठराव है की पार्किंग फिज का यह है क्या?

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडम हा विषय प्रशासनाने दिला त्याबद्दल त्याच धन्यवाद. या शहरामध्ये सध्या एकाच ठिकाणी आपण पार्किंग करत असतो. एम.आय.डी.सी. मध्ये हायवेवर मिरागाव जवळ तेही जागा आपण २५ टक्के रस्त्याखाली बाधित झाली. कलेक्टरने आपल्याला पत्र दिले आहे की ती जागा एम.आय.डी.सी.ला ताब्यात द्या. म्हणजे भविष्यात टोईंग केलेली जागा हे कुठेही आपल्याकडे उपलब्ध राहणार नाही. आणि एखादा भाईंदर वेस्टची गाडी उचलून जायचं असेल तर त्याला जायला १ तास लागतो यायला १ तास लागतो म्हणजे कितीही केल तरी दिवसभरात ३ गाड्यापेक्षा जास्त उचलू शकत नाही म्हणून मा. आयुक्तांनी जे आरक्षण सद्यस्थितीत विकसित करायचे नाहीत येणाऱ्या २ वर्षात त्या ठिकाणी तात्पुरत्या एक भाईंदर पूर्वेला एक भाईंदर पश्चिमेला एक मिरारोड या साईडला आणि एक त्या साईडला असे ४ ठिकाणी वेगवेगळी पार्किंग जागा उपलब्ध करुन द्यावी. आणि त्यासाठी आपण टोईंग चार्जेस घेतो, पार्किंग चार्जेस जे आम्ही आता नक्की केले की रिक्षाचे ५० रु. कारचे १०० रु., ऑटोचे ५०, टेम्पोचे १५० आणि ट्रकचे २०० हे पार्किंग चार्जेस टोईंग व्यतिरिक्त त्यांच्याकडून घ्यावे. एखादा आपल्याकडे जागा उपलब्ध असेल तर प्रायव्हेट खाजगी जागा घेऊन हे जे पार्किंग चार्जेस त्यांनी घेतले तरी चालतील अशा प्रकारचं आयुक्तांना आम्ही प्राधिकृत करत आहोत. ४ ठिकाणी असल्याशिवाय या शहरामध्ये आजच्या ठिकाणी ट्रॅफिकमध्ये चेकनाका पर्यंत जायचं आणि परत यायचं कुठल्याही प्रकारचं नावासाठी फक्त एखादा कोणीही फोन केला की रस्त्यामध्ये गाडी उभी आहे येऊन जा आला तरी त्याला दोन अडीच तास लागतात हे काम ईझी व्हाव व्यवस्थित व्हाव पार्किंगचा प्रॉब्लेम सॉल्व्ह व्हावा यासाठी हा विषय आम्ही मांडला आहे धन्यवाद.

भगवती शर्मा :-

गोषवारा के अतिरिक्त विषय को कैसे मंजुरी देंगे।

मा. महापौर :-

अच्छा काम है ना होने दो। ठराव सर्वानुमते मंजूर. 'ज' चा विषय घ्या.

प्रकरण क्र. २५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कारवाई केलेली वाहने ठेवण्यासाठी वाहतुक विभागास जागा देणेबाबत.

ठराव क्र. २५ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी नो पार्कींग क्षेत्रात उभी राहणाऱ्या वाहनांवर तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर वाहतुक शाखेमार्फत कारवाई करुन सदर वाहने जमा करण्यात येतात. सद्यस्थितीत सदर वाहने वाहतुक विभागामार्फत एम.आय.डी.सी. च्या भुखंडावर ठेवण्यात येतात. सदर भुखंड ताब्यात घेण्याची प्रक्रीया एम.आय.डी.सी. मार्फत सुरु आहे. दरम्यानच्या काळात सदर जागा अत्यंत अपुरी असून वाहतुक शाखेकडे कारवाई केलेली वाहने ठेवण्यास जागा नसल्याने शहरातील वाहनांवर कारवाई करुन वाहने जमा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत सद्यस्थितीत वाहतुक विभागासाठी आरक्षित जागा नाही. त्यासाठी नविन विकास आराखड्यात जागा आरक्षित करण्याची प्रक्रीया करता येईल, तथापी सद्यस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या ताब्यातील व विकसित न झालेला आरक्षणाचा भुखंड तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यासाठी व शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन सदर वाहने उभी करण्यास वाहतुक विभागास जागा उपलब्ध होऊन कामास मदत

होईल. तरी मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील असलेल्या जागांपैकी ज्या आरक्षाणाचा विकास सद्यस्थितीत करण्यात येणार नाही अशा आवश्यक जागा निश्चित करून वाहन ठेवण्यासाठी वाहतूक विभागास तात्पुरत्या स्वरूपात देण्याची कार्यवाही करण्यासाठी तसेच खाजगी जागेवर देखील वाहने ठेवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करुन जागा देणेसाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करीत असून सदर कार्यवाहीस मंजूरी देत आहे. त्याचबरोबर शहरात सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्याप्रमाणात वाहने बस, डंपर उभ्या राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यासाठी मंजूर विकास योजनेतील आरक्षणाच्या महानगरपालिकेच्या ताब्यातील असलेल्या जागांपैकी ज्या आरक्षणाचा विकास सद्यस्थितीत करण्यात येणार नाही अशा जागेवर तसेच शहरातील खाजगी जागेवर देखील पार्किंग करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करुन जागा तात्पुरत्या स्वरुपात पार्किंगकरीता जागा निश्चित करुन दोन वर्ष मुदतीसाठी पार्किंगचा ठेका देण्यास परवानगीसाठी व सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देत आहे. सदर कार्यवाही करताना महानगरपालिकेने पार्किंग चार्जेस सद्यस्थितीत टोईंगचे असलेले दर पार्किंगचे घ्यावयाचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गाडीचा प्रकार | सध्याचे टोईंग दर | सुधारीत टोईंग दर | पार्किंग दर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३ तास | पुढील २ तास | २४ तास |
| १ | दुचाकी | १०० | २०० | ५० | ५० | २०० |
| २ | कार | २०० | ४०० | १०० | १०० | ४०० |
| ३ | ऑटो | १०० | २०० | ५० | ५० | २०० |
| ४ | टेम्पो | ४०० | ६०० | १५० | १५० | ६०० |
| ५ | ट्रक/बस | ६०० | ९०० | २०० | २०० | ९०० |

२४ तासानंतर पुढील दिवसाचे दर लागु राहतील.

वरील प्रमाणे वाहन विभागास ४ टोईंग उपलब्ध करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया करावी तोपर्यंत वरीलप्रमाणे सुधारीत दर घेण्यात यावे. वरीलप्रमाणे ठरविलेले दर हे खाजगी जागेवरील पार्किंगना देखील लागु राहतील. मा. आयुक्त यांनी गरज पडल्यास शहरात ४ पार्किंग विविध ठिकाणी करण्यासाठी खाजगी जागा ताब्यात घेवून त्यावर देखील पार्किंग करण्यास परवानगी द्यावी आवश्यक वाटल्यास अशा जागा मालकांना जागेचे भाडे/अनुदान देण्यात यावे.

वरील प्रमाणे सर्व आवश्यक कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. मुन्ना सिंग

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २६, सन्मा. सदस्य श्री. राकेश रतिशचंद्र शाह यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

सदरच्या विषयाबाबत प्रशासनाने रितसर गोषवारा द्यावा व गोषवाऱ्यासह सदरचा विषय पुढील सभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. २६ :-

सन्मा. सदस्य श्री. राकेश रतिशचंद्र शाह यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत.

ठराव क्र. २६ :-

सदरच्या विषयाबाबत प्रशासनाने रितसर गोषवारा द्यावा व गोषवाऱ्यासह सदरचा विषय पुढील सभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २७, सन्मा. सदस्य श्री. हरीश्चंद्र आमगावकर यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेबाबत ''ज'' खाली प्रस्ताव घेणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारणे बाबतचा एकत्रित प्रस्ताव गोषवाऱ्यासह पुढील सभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. २७ :-

सन्मा. सदस्य श्री. हरीश्चंद्र आमगावकर यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेबाबत ''ज'' खाली प्रस्ताव घेणेबाबत.

ठराव क्र. २७ :-

भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारणे बाबतचा एकत्रित प्रस्ताव गोषवाऱ्यासह पुढील सभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. २८, सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा पुतळा बसविणेबाबत. प्रकरण क्र. २९, सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसान दुर करण्यासाठी महापालिकेमार्फत ठोक मानधनावर शिक्षकांची भरती करणेबाबत. सन्मा. सदस्य आसिफ शेख गैरहजर आहेत. प्रकरण क्र. ३०, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक ०३/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण २७, ठराव क्र. ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व रस्ते विकसित करणेबाबतच्या ठरावावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात यावा असा प्रस्ताव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

ठराव माझ्याकडे आहे. ठराव तुम्हाला फेटाळता येत नाही. हरीभाऊ फेटाळता येतो का? 'ज' चा प्रस्ताव कसा फेटाळणार तुम्ही.

भगवती शर्मा :-

रितसर घ्या ना विषय.

जुबेर इनामदार :-

तुम्हाला घ्यावे लागेल. फेटाळता येत नाही हा विषय.

नरेंद्र मेहता :-

त्यांचा जो विषय आहे ते मगाशी आपण जे गर्व्हमेंटला आपण पत्र दिलं.........

जुबेर इनामदार :-

ते तुम्ही बोलता हो त्याचा अजून काही पुरावा नाही. मी ठराव वाचणार सचिव साहेब. मिरा-भाईंदर क्षेत्रात दि. ०५/०३/२०१० रोजी रवि डेव्हलपर्स यांच्याकडून मनपा आयुक्तालापत्र देण्यात आले त्यांच्या प्रस्तावित विकास क्षेत्रामध्ये डी.पी.रस्ते महापालिकेला हस्तांतरीत करुन त्याचा विकासहक्क चटईक्षेत्र स्वरुपात घेऊन तद्नंतर त्याच रस्त्यांना स्वखर्चाने सिमेंट कॉंक्रीटचे बांधून त्याच्या मोबदल्याच्या स्वरूपातडी.आर.सी. मिळणेबाबतचा अर्ज केला होता.मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० च्या सभेमध्ये प्रकरण क्र. २७, ठराव क्र. ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व रस्ते विकसीत करणेबाबतचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. सदरच्या ठरावाचा सारांश खालीलप्रमाणे :

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ३३, परिशिष्ट ४ मधील ६ अन्वयेच्या तरतूदीनुसार मालक किंवा पट्टाधारक यांनी सुविधा विकसीत करुन हस्तांतरीत केल्यास हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रा इतके विकास हक्क प्रमाणपत्र जमीनधारक किंवा पट्टाधारक यांना देता येतो. या तरतूदीनुसार रस्ता किंवा आरक्षणे ही एकाच मालकाची असल्यास, या तरतूदीचा अवलंब करता येतो. तथापि, रस्ता व बांधकाम योग्य आरक्षणे यांचा मालकीहक्क विविध धारकांकडे/विकासाकडे/ उपविकासकाकडे/अधिकारपत्रधारकाकडे असल्यास या तरतूदीचा वापरकरता येत नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ९(IV)(A) नुसार नियोजित रस्ते हे महानगरपालिकेस विकसीत करता येतात. इतरांनी रस्ते विकसीत करण्याची तरतूद नाही. त्यामुळे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रस्ते व बांधकाम योग्य आरक्षणे विकसीत करावयाचे असल्यास, अशा सोयी सुविधांचे अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करुन संभाव्य खर्चाचा आढावा घेण्यात यावा व सुविधेसाठी होणा-या संभाव्य किमान खर्चावर आधारीत त्या-त्या नियोजन प्रभागातील बाजारमुल्य तक्त्यातील दरानुसार विकास हक्क प्रमाणपत्र खर्चाचे प्रमाणात क्षेत्राचे स्वरुपात देण्यात येईल, या अटीवर जाहीर निविदा मागवून स्पर्धात्मक जो विकासक / कंत्राटदार कमीत-कमी विकास हक्क प्रमाणपत्र घेण्याचे बोली निविदा पध्दतीनुसार सादर करेल. त्यास या सुविधा विकसीत करण्यासाठी कार्यादश देता येवू शकेल. या पध्दतीनुसार सुविधा विकसीत केल्यास महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सुविधा विकाससाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता भासणार नाही. सुविधा / विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार, कार्यप्रणाली व संहितेप्रमाणे होवू शकतात. तसेच या विकसीत होणा-या सोयी सुविधांची गुणवत्ता तपासणी व इतर बाबी ह्या महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार होणे आवश्यक राहील. तथापि देण्यात येणा-या विकास हक्काची कमाल मर्यादा १.० च्या मर्यादीत ठेवणे आवश्यक राहील.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत वरील बाबींचे फेरबदल राज्य शासनाकडे प्रस्तावित असतानाही तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांनी दि.२२/०२/२०११ रोजी जावक क्रमांक मनपा/सा.बा./८८३०/२०१०-११ अन्वये श्री. जयेश शहा (रवि डेव्हलपर्स) यांना सिमेंट कॉंक्रीटचे ररते विकसीत करण्यासाठी अटी व शर्तीसह नियमबाह्य कार्यादेश दिले.विकासकाने कार्यादेश प्रमाणे रस्त्यांचे बांधकाम करत असताना मिभामनपा सार्वजनिक बांधकाम विभागाने त्रयस्थ पक्ष तांत्रीक तपासणीसाठी नियुक्त केलेली ज़्ऋक्क्च्संस्था यांच्याकडून तांत्रीक परीक्षण करुन अहवाल प्राप्त केले. संस्थेने सादर केलेल्या अहवालात नमूद केलेल्या विविध मुद्यांनुसार मे. रवि डेव्हलपर्स यांनी केलेले काम निकृष्ठ दर्जाचे असल्याचे दिसून आले. विकासक विकासहक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत मनपाकडून मागणी करत होता. मनपाच्या माध्यमातून विकासहक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी रवि डेव्हलपमेंट यांनी दावा क्र. ५५०९/२०१३ अन्वये जनहित याचिकाही दाखल केली होती. सदरच्या दाव्याला अनुसरुन दि. २४/०९/२०१३ रोजी मि.भा.मनपा शहर अभियंता शिवाजी बळीराम बारकुंड यांनी WAPCOS च्या त्रयस्थ तांत्रीक परीक्षण अहवालानुसार मा. उच्च न्यायालयात सुरु असलेल्या दाव्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर केले.

गत काळात ठराव क्र.३२ विकास नियंत्रण नियमावलीत प्रस्तावित बदलांचा विषय शासनाकडे प्रलंबित असताना व त्या अनुषंगाने त्यासाठी दि. १६/०९/२०११ रोजी मनपा/नर/१८६०/२०११-१२ व दि. २०/११/२०१३ मनपा/नर/३०९०/२०१३-१४ अन्वये प्रधानसचिव-१ यांना स्मरणपत्र पाठविले असताना रवि डेव्हलपर्स यांना रस्ते व गटार बांधणेसाठी कार्यादेश देणे नियमबाह्य होते. तसेच शहर अभियंता यांनी प्रशासनातर्फे मा. न्यायालयात सुरु असलेल्या दाव्यात प्रतिज्ञापत्र सादर केले. परंतु फक्त तांत्रीक परीक्षण अहवालाची अडचण त्यात नमूद केली पण कुठेही मिभामनपा मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील कुठल्याही नियमांचा, ज्या आधारे रस्ता व गटारे बांधण्यासाठी कार्यादेश देण्यात आले होते व ज्याला अनुसरुन मे. रवि डेव्हलपर्सला मोबदल्याच्या स्वरुपात विकासहक्क प्रमाणपत्र प्रदान करता येईल किंवा कसे, यांचा उल्लेख केला नाही.

दि. ३०/११/२०१४ रोजी बांधकाम व नगरविकास विभागाने रस्ता व गटारे बांघकामाच्या कार्यादेशाप्रमाणे विकासहक्क प्रमाणपत्र मोबदल्याच्या स्वरुपात मे. रवि डेव्हलपर्स यांना देण्यासाठी विधी विभागाचा अभिप्राय अपेक्षिले होते. त्याला अनुसरुन विधी विभागाने दि. २६/०९/२०१४रोजी आपल्या टिपणीमध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे की बांधकाम विभागाने विषयांकीत रस्त्याची कामे करण्याबाबत संबंधीत विभागाचे अभिप्राय अपेक्षिले आहे. परंतु विकास योजनेचे रस्ते मनपा व्यतिरिक्त इतरांकडून कसे विकसीत करुन घेण्याबाबत फेरबदलबाबतचा प्रस्तावावर महाराष्ट्र शासन यांच्याकडून निर्णय होईपर्यंत तसेच

WAPCOS लि. यांनी मे. रवि डेव्हलपमेंट यांनी विकसीत केलेल्या रस्त्याच्या कामाबाबत दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील आदेश होईपर्यंत सदर रस्त्याची कामे करण्याबाबत निर्णय घेण्यास योग्य होणार नाही, असे विधी विभागाने आपल्या टिपणीमध्ये संबंधीत विभागांना सुचित केलेले आहे.

मे. रवि डेव्हलपमेंट यांनी मे. जीयोकॉन यांच्याकडील विकसीत केलेले सिमेंट काँक्रीटचे रस्ते तांत्रीक दृष्ट्या सक्षम असलेबाबत प्रमाणपत्र सादर केले व मे. वीरमाता जीजाबाईटेक्निकल इन्स्टिटयुट (VJTI) यांनी सदर अहवालास मंजूरी दिली. त्याच धर्तीवर मनपा प्रशासनाने एक पाऊल पुढे जाऊन स्वतःहून तपासणी शुल्क भरुन भारतीय प्रायोगिक संस्था आय.आय.टी. यांच्याकडून विकसीत केलेले रस्ते सक्षम असल्याचे तांत्रीक तपासणी अहवाल प्राप्त केले.

दि.१५/०४/२०१५ रोजी जनहित याचिका क्र.५५०९/२०१३ मा. उच्य न्यायालयाने मिभामनपा ह्यांना सदर विषयाबाबत चार आठवड्यात निर्णय घेण्यासाठी आदेशीत केले व त्या आदेशाच्यानुसार मिभामनपाने स्थायी समिती सभा दि. २७/१०/२०१५ साठी प्रकरण क्र. ५० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४८१(१)(ह) तडजोड करण्याकरीता मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला. सादर गोषवा-यामध्ये विकास नियंत्रण नियमावलीचा व मोबदल्याच्या स्वरुपात विकासहक्क प्रमाणपत्र त्यांच्या अटीशर्तीबाबत कुठेही उल्लेख केलेले नाहीत किंवा सदर मोबदला कोणत्या अधिनियमांच्या अंतर्गत देता येईल याचीही माहिती सदस्यांना देण्यात आली नाही, वास्तव्यात सदस्यांची दिशाभूल करुन वादीला पाठीशी घालण्याचे काम प्रशासनाने केले त्यात अधिका-यांचा स्वार्थ असल्याचे प्रथमदर्शनी नाकारता येत नाही.

स्थायी समिती दि.२७/०७/२०१५ रोजी ठराव क्र. ४९ अन्वये प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार विषयांकीत याचिकेमध्ये महानगरपालिकेच्या वतीने याचिकादार यांच्या सोबत तडजोड करण्यास आणि समझौता पत्र दाखल करण्यास कलम ४८१(१)(अ) अन्वये मंजूरी दिली.

ज्याअर्थी मे रवि डेव्हलपमेंन्ट बिल्डर अँन्ड डेव्हलपर्स पार्टनर जयेश टी. शहा हे विकासक अधिकारपत्रधारक आहेत त्याअर्थी त्यांना मिभामनपा मंजूर विकास नियंत्रण नियमावली ड़ण्ड्ढद्रद्यड्ढद्ध ३३ क्ष्ज/६ अन्वये विकसीत केलेल्या सुविधा याचा मोबदला विकासहक्क प्रमाणपत्र ज्याचा वापर चटईक्षेत्रात करता येईल असे किंबहुना देता येत नाही. सुविधा विकसीत केल्यानंतर मोबदला देणे असल्यास जमिन मालक किंवा पट्टाधारक यांनाच देता येईल, असा नियम आहे. अधिकारपत्रधारक व अन्य यांना देता येणार नाहीट तरीही मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांनी दि. २८/०८/२०१५ रोजी रवि मे. डेव्हलपमेंट बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स पार्टनर जयेश टी.शहा (अधिकार पत्रधारक) यांना विकासहक्क प्रमाणपत्र क्र. ५१७ दि. २८/०८/२०१५ construction Ammenity of cement concret Road (D.P.Road) ९६९३.३२ चौ.मी. व प्रमाणपत्र क्र. ५३० दि. २९/०४/२०१६ construction Ammenity of cement concret Road (D.P.Road)९७२९.७२चौ.मी. ची डी.आर.सी. देण्यात आली.

मे रवि डेव्हलपमेंन्ट बिल्डर अँन्ड डेव्हलपर्स पार्टनर जयेश टी. शहा यांना प्रदान केलेले विकासहक्क प्रमाणपत्र ५१७/२०१५ व ५३०/२०१६ हे मिभामनपा मंजूर विकास नियंत्रण नियमांना विसंगत आहे. उपरोक्त विषय हा एका विकासकाच्या अनधिकृत बांधकामांना व नियमबाह्य कृतींना जाणीवपुर्वक पाठीशी घालण्याचा तसेच मोठ्या प्रमाणात प्रशासकीय भ्रष्टाचाराचे प्रतिबींब असल्याचे स्पष्ट दिसून येते.

मे रवि डेव्हलपमेंन्ट बिल्डर अँन्ड डेव्हलपर्स पार्टनर जयेश टी. शहा यांनाआज दिनांकापर्यंत उपरोक्त विषयान्वये प्रदान केलेले विकासहक्क प्रमाणपत्र रद्द करावे व या नियमबाह्य कृती करणा-या संबंधीतांवर उच्य स्तरीय चौकशी लावावी. तसेच मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण क्र. २७, ठराव क्र. ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व्यवस्था विकसीत करणेबाबतचा शासनाकडे प्रलंबीत असलेला ठराव मंजूर झाल्यानंतरच अशा प्रकारचे विकास हक्क प्रमाणपत्र प्रदान करावे, असा मी ठराव मांडत आहे.

लियाकत शेख :-

माझे अनुमोदन आहे.

भगवती शर्मा :-

सचिव साहेब ७ बज गए।

मा. महापौर :-

शेवटचा विषय आहे. आपण ते करुन घेऊ.

भगवती शर्मा :-

कैसे होगा नियम बदलना पडेगा।

जुबेर इनामदार :-

तुम्हाला मंजूरी घ्यावी लागेल सभागृहाची.

नगरसचिव :-

सभागृहाची मान्यता देत असेल तर.

जुबेर इनामदार :-

मान्यतेसाठी किती लागतात.

मा. महापौर :-

आपण १० मिनिट वाढवून घेऊ. आज शेवटचा विषय संपवून जाऊ. १० मिनिटे वाढवून घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

मा. महापौर :-

श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८ विरोधात १९ इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ३० :-

सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक ०३/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण २७, ठराव क्र. ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व रस्ते विकसित करणेबाबतच्या ठरावावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. २८ :-

सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | विराणी रेखा अनिल | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | जैन गिता भरत | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | वंदना रामदास चक्रे | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | काझी रशीदा जमील | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | इनामदार जुबेर | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | सामंत प्रमोद जयराम | निरंक |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | लियाकत ग. शेख | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | | | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २६ | तारा विनायक घरत | | | |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २८ | जयमाला किशोर पाटील | | | |
| २९ | परमार अनिता भरत | | | |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३३ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

भगवती शर्मा :-

शोकप्रस्ताव श्री. ओमप्रकाशजी गाडोदीया के बडे भ्राता श्री. महावीरप्रकाश नाम था। उनको देहांत हो गया है भगवान उनकी आत्मा को शांती दे।

दुःखवटा ठराव क्र. २९ :-

श्री. ओमप्रकाशजी गाडोदीया यांचे मोठे भाऊ श्री. महावीरप्रकाश गाडोदीया यांचे निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा        अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

२ मिनिट जागेवर उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली द्यायची आहे.

(सभा संपल्याची वेळ सायं ७.१० वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

